म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २२२९

REFBK-0018715

निबंध - संदर्भ


# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 MAY 1976

16 MAY 1979

4 JUN 1979

[क्र. मा. प.]

# सुखाची लिपी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

लेखक

शांताराम आठवले

REFBK-0018715

श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन, दादर, मुंबई २८

प्रकाशक :
आर. व्ही. रघुवंशी
श्रीगजानन बुक डेपो,
कबुतरखाना, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८.

किंमत १० रुपये

© शांताराम आठवले

प्रथम आवृत्ती १५-३-१९७३

मुखपृष्ठ : बांदोडकर मुंबई

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव,
पुणे ३०.

आधी–सरस्वतीच्या सुबक सुंदर
मूर्तींच्या रूपाने
आणि–नंतर
प्रत्यक्ष–‘ लक्ष्मी रूपाने–माझी सून होऊन–जिने–
आमच्या घरकुलात प्रवेश करून
‘ जीवन हे नाटय आहे ’–याचे
सुखद–प्रत्यंतर–घडविले–त्या
चि. सौ. –‘ सरिता ’–स
अनेक शुभाशीर्वादांसह

२१ जाने. १९७३

—शान्ताराम आठवले

# शान्ताराम आठवले यांचे–ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| (१) **' प्रभात ' काळ**—व्हीनस प्रकाशन | | १२–५० |
| (२) **' शान्ताचिया घरा '**—गायत्री प्रकाशन (आवृत्ती संपली) | | १२–०० |
| (३) **' साधा विषय मोठा आशय '**—गायत्री प्रकाशन | | ७–०० |
| (४) **' ॐकार रहस्य '**— | मनोहर ग्रंथमाला | १०–०० |
| (५) **नाडीग्रंथ-एक अभ्यास**— | ,, ,, | ८–०० |
| (६) **' सुखाची लिपी '**—श्रीगजानन बुक डेपो, दादर | | १०–०० |
| (७) **बनातली वाट**—व्होरा आणि कंपनी | | |

**आगामी**

(१) **ज्ञानदेवीची आराधना**—मनोहर ग्रंथमाला पुणे
(२) **शिशुपण बरवे**—गायत्री प्रकाशन

The man who regards his own life and that of his fellow creatures as meaningless is not merely unfortunate but almost disqualified for life.

—**Albert Einstein**

# शान्ताराम आठवले यांचे-ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| (१) ' प्रभात ' काळ—व्हीनस प्रकाशन | | १२-५० |
| (२) ' शान्ताचिया घरा '—गायत्री प्रकाशन (आवृत्ती संपली) | | १२-०० |
| (३) ' साधा विषय मोठा आशय '—गायत्री प्रकाशन | | ७-०० |
| (४) ' ॐकार रहस्य '— | मनोहर ग्रंथमाला | १०-०० |
| (५) नाडीग्रंथ-एक अभ्यास— | " " | ८-०० |
| (६) ' सुखाची लिपी '—श्रीगजानन बुक डेपो, दादर | | १०-०० |
| (७) बनातली वाट—व्होरा आणि कंपनी | | |

**आगामी**

(१) ज्ञानदेवीची आराधना—मनोहर ग्रंथमाला पुणे
(२) शिशुपण बरवे—गायत्री प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १८७९५
[illegible] शाखा (स्थळ प्रत)

# पाटीपूजन

भारतीय संस्कृती ही 'सुखाची लिपी' आहे हा या ग्रंथाचा गाभा. 'सुखाची लिपी' हे श्री ज्ञानेश्वर महाराजांचे शब्द आहेत. 'शांताचिया घरा' या माझ्या ग्रंथाप्रमाणेच या ग्रंथालाही शीर्षक म्हणून ज्ञानेश्वर महाराजांचेच अमृतमय शब्द लाभावेत हे माझे आणि वाचकांचेही सौभाग्य.

नोव्हेंबर १९७० मध्ये लोणावळा येथील 'युवक सभे'च्या विद्यमाने एक व्याख्यान-सप्ताह साजरा झाला. 'भारतीय संस्कृती–विज्ञानाच्या कसोटीवर' या विषयावर एकूण सात व्याख्याने देण्याची संधी मला लाभली. 'युवक सभे'च्या कार्यकर्त्यांचा उत्साह आणि स्त्री पुरुष श्रोत्यांचा प्रतिसाद अपूर्व होता. दीड ते दोन तास व्याख्यान रंगत असे. त्याचा परिणाम श्रोत्यांच्या मुद्रेवर प्रतिबिंबित झालेला स्पष्टपणे वाचता येत असे.

या व्याख्यानांची अचूक टिपणे कु. शोभा हळबे या एका दक्ष महाविद्यालयीन विद्यार्थिनीने घेतली. ती सारी तिने प्रसिद्धीसाठी पुणे येथे प्रसिद्ध होणाऱ्या सुप्रसिद्ध आणि सुप्रतिष्ठित 'एकता' या मासिकाकडे पाठविली. 'एकता' मासिकाशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. माझ्याच व्याख्यानांची टिपणे तपासण्यासाठी माझ्याकडे आली. सुकन्या कु. हळबे हिने आपले काम इतके चोख बजावले होते की त्या टिपणांमुळे, त्या व्याख्यानांवर आधारित स्वतंत्र लेखमालाच का प्रसिद्ध करू नये? असा विचार माझ्या आणि 'एकते'च्या संपादकांच्या चर्चेत निघाला. त्याला मूर्त स्वरूप आले, आणि चैत्र–शके १८९३ (मार्च १९७१) ते श्रावण शके १८९४ (ऑगस्ट १९७२) या कालावधीत एखाददुसरा अंक वगळता 'एकता' मासिकात क्रमशः ही व्याख्यानमाला 'सुखाची लिपी' या नावाने प्रसिद्ध झाली. ती वाचकांना उद्बोधक वाटली याचा प्रत्यय अनेक प्रकारे आला. एक उदाहरण अवश्य उल्लेखावे असे आहे.

लेखमाला चालू असता डोंबिवली येथील एक रसिक सज्जन आणि एकतेचे नियमित वाचक श्री. श्रीधर नामजोशी यांनी 'सुखाची लिपी'च्या वाचनाने होणारा आनंद अनेक पटींनी वाढावा आणि त्याचा लाभ अनेक श्रोत्यांना मिळावा म्हणून माझ्याशी अगत्याने पत्रव्यवहार करून माझी दोन प्रवचने घडवून आणली. त्यांचे वास्तव्य असलेल्या विष्णुनगर, डोंबिवली येथील जयहिंद वसाहतीत ता. २२ आणि

२३ जानेवारी १९७२ या दोन दिवशी रात्रीच्या वेळी एका गच्चीवर हा प्रवचनांचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

या ग्रंथाचे श्रेय लोणावळा येथील युवक सभेचे प्रमुख कार्यकर्ते श्री. वि. के. मोघे, श्री. मा. ह. कुलकर्णी, श्री. आपटे व त्यांचे सर्व सहकारी याच्याकडे प्रामुख्याने जाते. कु. हळवे या सुकन्येने टिपणे घेतली नसती तर कदाचित ही ' सुखाची, लिपी ' इतक्या लवकर वाचकांना सादर करणे शक्य झाले असते की नाही याची शंका आहे. म्हणून युवक सभेचे वरील कार्यकर्ते, कु. हळवे, एकतेचे संपादक व संचालक आणि डोंबिवली येथील श्री. श्रीधर नामजोशी व त्यांच्यासारखे आणखी अनेक स्नेही-सुहृद् या सर्वांचा मी अंतःकरणपूर्वक कृतज्ञ आहे.

१९६६ या वर्षी ' वावटळ ' या माझ्या मराठी चित्रपटाला महाराष्ट्र शासनाची दिग्दर्शन आणि इतर मिळून एकूण दहा पारितोषिके मिळाली. हा प्रसंग टाइपराय-टरच्या घंटेप्रमाणे थांबण्याची सूचना म्हणून मी ओळखला आणि सुमारे ३३ वर्षे ज्या चित्रपट-व्यवसायात मी आनंदाने व्यतीत केली त्या व्यवसायातून व क्षेत्रांतून मी तित-क्याच आनंदाने स्वयंनिवृत्ती पत्करली.

चित्रपटासारख्या मोहमयी सृष्टीत दीर्घ काल वावरलेला माझ्यासारखा माणूस स्वयं निवृत्ती पत्करून अध्यात्म, संस्कृती, गूढ विद्या इत्यादि विषयांचे चिंतन-संशोधन-लेखन याकडे वळतो आणि त्या विषयावर व्याख्याने-प्रवचने देतो याचे अनेकांना जितके कौतुक तितकेच कुतूहल वाटते. चित्रपटासारख्या मोहमयी सृष्टीत अधिकतर जीवन घालवून, ' करून करून भागले आणि उतारवयात देवपूजेला लागले ' असा माझ्या जीवनातील परिवर्तनाविषयी पुष्कळांच्या मनात कुतर्क येणे स्वाभाविक आहे. पण माझ्या बाबतीत सुदैवाने तसे काही घडलेले नाही.

माझ्या मूळच्या आवडीच्या विषयांकडे मी योग्य वेळी आणि स्वेच्छेनेच वळलो आहे. चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमाचा उपयोग मला हवा तसा मी करू शकत नाही, या प्रखर जाणीवेतूनच व्याख्यान-प्रवचनांचे आणि संशोधन-लेखनाचे नवे क्षेत्र मी बुद्धिपुरस्सरच निवडले आहे.

वक्ता म्हणून मी कधीच प्रसिद्ध नव्हतो. नटनटींना संवाद-भाषणे-शिकवणे एवढ्यापुरतेच माझे प्राविण्य मर्यादित होते. पण आता व्याख्यान-प्रवचनांशिवाय दिवस जात नाही. अध्यात्म, संस्कृती, धर्म, गूढविद्या यांच्या चिंतनात-संशोधनात-लेखनात माझी एक स्वतंत्र, डोळस, विज्ञाननिष्ठ पण तितकीच भावसमृद्ध अशी दृष्टी आणि युगानुकूल अशी बैठक आहे हे मी नम्रपणे सांगू इच्छितो.

गेल्या ३-४ वर्षांत माझ्या व्याख्यान प्रवचनांची संख्या ५००।६०० वर गेली असल्याचे मला आढळून आले. या विषयाच्या संदर्भात मी हेतुपूर्वक माझी दैनंदिनी ठेवली आहे आणि अनेक प्रकारच्या नोंदी कटाक्षाने केल्या आहेत.

आजच्या वेग आणि भोगमय अणुयुगात साऱ्या विश्वात जीवनमूल्यांचा प्रचंड

संघर्ष चालू आहे. यंत्रमयता आणि विज्ञानाच्या विकासातून निर्माण होणारी संहारक अस्त्रे यांच्यामुळे विनाशाची वाटचाल करणारी आजची आणि उद्याची मानवता खऱ्या सुखशांती समाधानाला पारखी होणार आहे याची प्रचीती क्रांतदर्शी प्रज्ञावंतांना प्रखरपणे येत आहे. भारतीय संस्कृतीची मूळ बैठक आणि तिच्यातील चिरंतन मूल्ये या संभाव्य विनाशातून विश्वाला वाचवू शकतील, या श्रद्धेतून साऱ्या जगातील प्रगत राष्ट्रांच्या प्रयोगशाळांतून जे विविध प्रकारचे संशोधन सध्या चालू आहे त्याच्या अभ्यासाच्या प्रकाशात भारतीय संस्कृतीच्या मूळ उज्ज्वल बैठकीचे–रहस्याचे दर्शन मला घडले. गेल्या ६–७ वर्षांच्या दीर्घावधीत ईश्वरी कृपेने सज्जन स्नेह्यांच्या सहकार्याने, मला अनेक दुर्मिळ ग्रंथ, अनेक वैज्ञानिक शोध, अनेक प्रकारचे प्राचीन व अर्वाचीन साहित्य उपलब्ध होत गेले आणि त्यातून ही 'सुखाची लिपी' साकार होऊन वाचकांना सादर करता आली याचा मला मनापासून आनंद वाटतो. 'सुखाच्या लिपीतील' सर्व साहित्य वाचकांना विचारप्रवृत्त करील असा मला विश्वास वाटतो.

गेल्या काही वर्षांत धनाची अथवा मानाची अपेक्षा न बाळगता मी महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात सर्वत्र व्याख्याने प्रवचने देत फिरलो. या भ्रमंतीत भारतीय जनमानसाचे मला जवळून जिवंत दर्शन झाले. सध्याचा काळ विपरीत आहे असे म्हटले जाते तरीही मला माझ्या या भ्रमणात मानवतेच्या स्नेहमयतेचे, सौजन्यपूर्णतेचे आणि मांगल्याचेच दर्शन घडले हे मुद्दाम सांगावेसे वाटते.

या ६–७ वर्षांच्या दीर्घावधीत अनेक संस्था, अनेक सज्जन स्नेही अनेक निरलस कार्यकर्ते यांच्या अनेकविध सहकार्याचा बहुमोल लाभ मला होत गेला त्याबद्दल त्या सर्वांचे ऋण मी विनम्रपणे मान्य करतो. 'जुने सोने पारखून घेणे' हा या विषयाचा आरंभलेख 'वाङ्मय-शोभे'चे साक्षेपी संपादक–माझे स्नेही श्री. मनोहर म. केळकर यांनी प्रथम अगत्याने प्रसिद्ध केला. याचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे.

या ग्रंथाच्या शेवटी साहित्यसंदर्भ ही पुरवणी जोडली आहे ती वाचकांनी अवश्य दृष्टीखालून घालावी. या ग्रंथाच्या विवेचनात कळत न कळत कोणावर अन्याय झाला असेल किंवा कोणत्याही प्रकारचा मर्यादातिक्रम झाला असेल तर त्याबद्दल मी आगाऊच क्षमा मागून ठेवतो.

हा ग्रंथ वास्तविक 'गायत्री–प्रकाशना'च्या वतीने प्रसिद्ध झाला असता. पण दादर येथील श्री. गजानन बुक डेपोचे संचालक श्री. रमेश रघुवंशी यांनी तो प्रकाशित करण्याचा प्रेमळ आग्रह धरला. माझे साहित्य ते आवडीने वाचतात. अलीकडे प्रख्यात गूढवादी श्री. अ. ल. भागवत, यांचे काही ग्रंथ त्यांनी धडाडीने प्रसिद्ध केले आहेत. 'सुखाची लिपी' त्यांच्या स्वाधीन करताना एक अनुभवी व्यवहारी प्रकाशक या नात्याने तिचा अधिकात अधिक प्रसार ते करतील असा मला विश्वास वाटतो.

सौंदर्य आणि अचूकता यांचा संयोग म्हणजेच आनंद मुद्रणालय, हे समीकरण

आता वाचकांच्या परिचयाचे झाले आहे. आनंद मुद्रणालयाचे जोशी बंधू यांच्या सहाय्या-वाचून 'सुखाची लिपी' रेखीवपणे साकार झालीच नसती.

शाळिग्राम विषयक एक रहस्य या ग्रंथात मी विशद केले आहे. बीरवाडी ( जि. कुलाबा) या महाड जवळच्या गावचे एक वृद्ध अनुभवी आणि प्रयोगशील धन्वन्तरी श्री. र. अं. पटवर्धन हे, माझे लेखन व त्यातील विचारांची दिशा पाहून एवढे प्रभावित झाले की प्रकृती ठीक नसतानाही ते एके दिवशी समक्ष माझ्या भेटीस आले. प्राणापलीकडे जपून ठेवलेले काही जुने जीर्णशीर्ण लेख व हस्तलिखिते त्यांनी माझ्या स्वाधीन केली. त्यात शाळिग्राम शिळेमागचे रहस्य मला उपलब्ध झाले. त्याचा मग मी अधिक शोध घेतला आणि माझी खात्री झाल्यावर मी ते प्रसिद्ध केले. श्री. पटवर्धन यांची ज्ञानलालसा आणि प्रयोगशीलता नुसतीच प्रशंसनीय नाही तर अमोल आहे. त्यांचा मी ऋणी आहे.

अशा आणखी पुष्कळ व्यक्ती आहेत की ज्यांचे स्नेहसद्‌भावाचे साह्य मला लाभले आहे; त्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

१६१३ सदाशिव, पुणे ३०<br>
२१ जानेवारी, १९७३

वाचकांचा नम्र<br>
**शान्ताराम आठवले**

# १

भारतीय संस्कृती ही 'सुखाची लिपी' आहे. पण ही लिपी आज आमच्यापैकी पुष्कळांना दुर्बोध झाली आहे. या लिपीचे ज्ञान जर आम्ही नव्याने नीट करून घेतले तर सुखशांतीचे-अनेक स्रोत आमच्या जीवनात आणण्याचे काम ती करू शकेल.

आमची ही लिपी सध्या पाश्चात्यांनी आत्मसात करण्याचे ठरविले आहे. आम्हांला मात्र ती अभ्यासण्याची आवश्यकता वाटत नाही.

'भारतीय संस्कृती' ही जितकी प्राचीन तितकीच श्रेष्ठ संस्कृती आहे. तपोधन अशा ऋषीमुनींनी ती प्रवर्तित केलेली आहे. विज्ञानाच्याही पलीकडे असलेल्या प्रज्ञानातून तिचा उगम झाला आहे. कोणाही भारतीयाला असीम अभिमान वाटावा अशीच तिची योग्यता आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला जी मान्यता व विशेष-प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे ती भारताने केलेल्या राजकीय व अन्य क्षेत्रांतील प्रगतीचा वा पराक्रमाचा परिणाम असेलही कदाचित, पण भारताचा वैभवशाली सांस्कृतिक वारसा हेच तिचे खरे कारण आहे असे मला वाटते.

आमच्या या प्राचीन व थोर संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी पंडित संशोधक, व विद्यार्थी वारंवार भारतात येत असतात. ज्या संपन्न संस्कृतीचा वारसा-आम्ही सांगतो आणि तिचा असीम अभिमान आम्ही मिरवितो ती संस्कृती आज या देशात व आमच्या दैनंदिन जीवनात कोणत्या स्वरूपात विद्यमान आहे याचा शोध माझ्यासारखे आस्थेवाईक अभ्यासक घेऊ लागतात; त्यावेळी त्यांना काय आढळते? जीवनसमृद्धी व जीवनकल्याण यांची शाश्वत मूल्ये मानवतेला उपलब्ध करून देणाऱ्या या संस्कृतीतल्या मूळ चैतन्याचा गाभा आज नाहीसा झाला आहे आणि आमची संस्कृती म्हणून आम्ही कवटाळली आहेत ती परंपरेने चालत आलेली केवळ शुष्क टरफले! संस्कृतीचे जे काही असे अवशेष आज अस्तित्वात असलेले आढळतात-तेही स्त्रियांनी श्रद्धेने टिकविले, जगविले आहेत म्हणून.

सतत एक शतक आम्हांला दास्याच्या दावणीत जखडून ठेवणाऱ्या धूर्त इंग्रजांनी आमच्या संस्कृतीच्या, धर्माच्या, इतिहासाच्या व परंपरेच्या साऱ्या गौरवशाली खुणा पुसून

टाकण्याचाच नव्हे तर त्यांची पाळेमुळे उखडण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात देशापुढे अनेक नवे ज्वलंत प्रश्न उभे राहिले. संस्कृतीतील चैतन्यहीनता आणि विकृती यांकडे कोणाचे विशेष लक्ष गेले नाही; हे खरे असले तरी स्वातंत्र्यलाभानंतर देशाची विविध अंगांनी प्रगती साधू इच्छिणाऱ्या नव्या पिढीच्या पुढाऱ्यांना व सुशिक्षितांना त्याकडे दुर्लक्ष करावेसे वाटले हेही तितकेच खरे.

आजचे युग विज्ञानाचे आहे. साऱ्या विश्वात विज्ञानाने केलेल्या विलक्षण क्रांतीचे पुरावे व परिणाम पदोपदी प्रत्ययास येत आहेत. अमेरिका, रशिया या देशांची अंतराळयाने चंद्र-मंगळावर यशस्वी झेप घेत आहेत. तुमच्या-आमच्या नातवंडांच्या काळात पृथ्वीवर जन्म, चंद्रावर प्रियाराधन, शुक्रावर मधुचंद्र आणि मंगळावर अपत्याचा जन्म, ही नवलकथा उरणार नाही. अशा वेळी नव्याने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मान व स्थान मिळवू इच्छिणाऱ्या भारतासारख्या महत्त्वाकांक्षी देशाला वैज्ञानिक-विकास, औद्योगिक, यांत्रिक व भौतिक प्रगती यावर लक्ष केंद्रित करणे सर्वाधिक महत्त्वाचे वाटले तर त्यात वावगे काहीच नाही. पण हे ध्येय साध्य करताना आमची प्राचीन संस्कृती उपयोगी पडणार नाही अशी आमच्या नव्या पिढीची समजूत झालेली दिसते.

भारतीय संस्कृतीने मानवाच्या सुखशांतीचा, विकास-वैभवाचा-आणि इहपर-कल्याणाचा सखोल सर्वांगीण विचार केलेला आहे. पण संस्कृतीच्या या मूळ स्वरूपावर अज्ञानाची, उपेक्षेची, अपसमजांची एवढी धूळ साठली आहे व विकृतीची एवढी कवचे दाटली आहेत की तिचे मूळ स्वरूप लोप पावल्यासारखे झाले आहे. तिच्यातील मांगल्याची व चिरंतन जीवनकल्याणाची-रहस्ये-विस्मृत, विद्रूप, क्वचित् विछिन्न झाली आहेत. त्यामुळे ही जुनीपुराणी आजीबाईची-विशीर्ण संस्कृती-अस्तंगत झाली तरी चालेल. नव्हे –‘ जुने जाउद्या मरणालागुनी ’– या न्यायाने ती नष्ट झालेलीच बरी अशी आमची भ्रांत समजूत झालेली आहे.

नव्या युगाच्या नव्या पिढीला असे वाटावे याचे आणखी एक कारण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीच्या मार्गाने प्रगतीची वाटचाल करणाऱ्या भारतापुढे आदर्श आहेत ते प्रामुख्याने अमेरिका-इंग्लंड-रशिया यांचे. दारिद्र्य आणि अज्ञान यांचा नायनाट करून-विज्ञानाची वाट चोखाळून औद्योगिक-यांत्रिक प्रगतीच्या साहाय्याने देशाचा सर्वांगीण उत्कर्ष साधला पाहिजे आणि जगाच्या राजकारणात आणि उलाढालीत आपल्या राष्ट्राला सन्मान प्राप्त करून दिला पाहिजे हे-नव्या भारताचे-स्वप्न आहे-उद्दिष्ट आहे-धोरण आहे आणि ते केव्हाही योग्य आणि प्रशंसनीयच म्हणावे लागेल.पण या नवजागरणाच्या व नवनिर्मितीच्या उद्योगात आपण आपल्या संस्कृतीकडे-दुर्लक्ष करीत आहोत. तिच्या रक्षणा-उद्धरणाविषयी उदासीन आहोत-ही आपली फार मोठी चूक आहे-याकडे अद्याप कोणाचे जावे तसे लक्ष गेलेले दिसत नाही; किंवा त्यावर कोणी प्रखर प्रकाश टाकलेला आढळून येत नाही.

आमच्या जीवनात विद्यमान असलेल्या संस्कृतीचे स्वरूप चैतन्यहीन आहे या

विधानाचा प्रत्यय आणून देणारी काही बोलकी उदाहरणे या संदर्भात अभ्यासण्या-सारखी आहेत.

भारतीय संस्कृतीचा जवळून अभ्यास करता यावा यासाठी अनेक परदेशी अभ्यासक-संशोधक-पंडित व विद्यार्थी भारताला भेटी देत असतात. संस्कृतीचे केंद्र, विद्वानांचे आगर व विद्येचे माहेर—म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुण्यासारख्या नगरात तर ते आवर्जून येतात. अशा परदेशी पाहुण्यांना भारतीय संस्कृतीचे दर्शन कोणत्या स्वरूपात होते याचे काही प्रत्यक्ष घडलेले नमुने या संदर्भात सादर करण्यासारखे आहेत.

पुण्यासारख्या शहरात येणाऱ्या परदेशी पाहुण्यांची वास्तव्याची सोय स्वाभाविक-पणेच ज्यांचे स्वतःचे घर आहे, वाहन आहे व ज्यांच्याकडे आवश्यक त्या सर्व आधुनिक सुखसोयी आहेत अशाच सधन—सुशिक्षित व प्रतिष्ठित कुटुंबातून बहुशः केली जाते.

असेच एक परदेशी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पथक काही दिवसांपूर्वी पुण्यास आले होते. काही दिवसांच्या आपल्या वास्तव्यानंतर व अभ्यास—निरीक्षणानंतर या विद्यार्थ्यांनी आपल्या काही शंका—त्यांच्या आतिथ्यासाठी तत्पर असणाऱ्या महिलामंडळाच्या पदवी-धर—कार्यकर्त्यांपुढे—मांडल्या.

शंका क्रमांक एक :—आम्ही ज्या कुटुंबातून राहतो त्यातील सर्व मंडळी सज्जन व आतिथ्यशील आहेत. आमच्या सर्व प्रकारच्या सुखसोयींकडे दक्षतेने लक्ष पुरविले जाते. पण या सर्व कुटुंबांतून—आम्ही ज्या भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आलो आहोत तिचे खरे दर्शन आम्हास होत नाही. आम्ही सर्व विद्यार्थी ज्या कुटुंबातून राहतो त्या कुटुंबात आम्हाला कोठेही भारतीय भोजनपद्धतीचे अथवा भारतीय स्वयंपाक-पद्धतीचे दर्शन व ज्ञान झाले नाही. या सर्व घरांतून पाश्चात्य पद्धतीची टेबलावरील भोजनाची व्यवस्था व पद्धत आढळून येते. वाढपी असतो, काटे—चमचे असतात—फ्रिजची सेवा असते—क्वचित— ताटे वाट्या आढळल्या तरी एकूण थाट-घाट सारा पाश्चात्य वळणाचा असतो. भारतीय पद्धतीचे स्वयंपाकघर— व भारतीय भोजनव्यवस्था आम्हास पाहावयास सापडावी.

शंका क्रमांक दोन :—पुण्यातील विद्यालये व विद्यादानपद्धती आम्ही पाहिली. शाळेत जाणाऱ्या ८ ते १२ वयाच्या बालिका आम्ही प्रत्यही पाहतो. शाळेत जाताना आणि घरीही त्या बहुधा इंग्लिश वा अमेरिकन पद्धतीचे स्कर्टस् परिधान करताना आढळतात. ८ ते १२ या वयातील बालिकांचा भारतीय वेश कोणता हे जाणण्याची आमची इच्छा—नव्हे जिज्ञासा आहे.

शंका क्रमांक तीन :—पुणे हे इतिहासप्रसिद्ध शहर आहे. या शहरासंबंधी अनेक कथा व आख्यायिका आमच्या कानावर आहेत. संभाजी उद्यानाबाहेरचा रणवीर झाशीच्या राणीचा पुतळा आम्ही मुद्दाम पाहिला. पुण्यातील महिला हुशार व धीट असतात असे आम्ही ऐकले आहे व त्याचा थोडाफार पडताळाही घेतला आहे. पुण्यातील महिलांची नऊवारी साडी ही अत्यंत रेखीव कलापूर्ण आणि प्रेक्षणीय असते, अशी ख्याती आम्ही

ऐकतो. अजंठा-वेरूळ यासारख्या ऐतिहासिक सौंदर्यसंपन्न स्थळांना आम्ही भेटी देऊन आलो आहोत. आमच्यापैकी काही विद्यार्थी चित्र व शिल्पकलांत प्रवीण आहेत. पुण्याच्या तडफदार महिलांची वैशिष्ट्यपूर्ण डौलदार नऊवारी साडी–आमच्या पुण्यातील वास्तव्यात आम्ही वावरतो त्या परिसरात तरी आम्हाला कोठेही आढळलेली नाही. तेव्हा ही ऐतिहासिक वस्तू नामशेष झाली की काय ? हे जाणण्याची आणि शक्य तर त्या साडीतील साजिऱ्या सौभाग्यवतींच्या दर्शनाची संधी आम्हांला लाभावी.

पाहुण्यांच्या या तिसऱ्या व शेवटच्या शंकेचे निरसन करण्याचे महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी लगेच ठरविले. महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी दुसऱ्या दिवशी नऊवारी साडीचे प्रात्यक्षिक पाहुण्यांना द्यावे असे ठरले. प्रत्येक सदस्याने नऊवारी साडी प्राप्त करून ती नेसण्याचा सराव करून ठीकठाकपणे दुसऱ्या दिवशी चार वाजता महिला मंडळाच्या सभास्थानी उपस्थित राहावे असे ठरले.

डेक्कन जिमखाना किंवा त्यासारख्या आधुनिक वस्तीत राहणाऱ्या महिलांना नऊवारी लुगडे मिळविणे व ते नीटनेटकेपणाने नेसणे–ही समस्याच झाली. कित्येक घरांतून आत्या, आजी, मावशी इत्यादी प्रौढ स्त्रियाही नऊवारी साडीला पारख्या होत्या. काहींना तर नऊवारी साडी विकत घ्यावी लागली. आणि काहींना नाट्य–संसारसारख्या संस्थांमधून भाड्याने प्राप्त करावी लागली. ९ वारी साडी सहज व सुबकपणाने नेसणे कौशल्याचे काम आहे, ते अभ्यासानेच साध्य होते. ९ वारी साडी नेसण्याच्या तातडीच्या सरावात अनेक महिलांना कवाईतच घडली. कासोटा जमला तर पदर जमेना–पदर जमला तर ओचे सावेनात, असे प्रकार होऊ लागले.

त्याच संध्याकाळी त्या परदेशी पाहुण्या विद्यार्थिनींचे पथक लक्ष्मीपथावरून जात होते. एका आकर्षक वस्त्रनिकेतनात त्यांना बाहेर टांगून ठेवलेल्या नव्या नऊवारी साड्या दिसल्या. विद्यार्थिनींची झुंड दुकानात घुसली. साड्या खरोखरीच देखण्या होत्या. त्यांच्यातल्या एका विद्यार्थिनीने एक शक्कल काढली. ती सगळ्यांनाच एकदम मान्य झाली. आणि त्या दुकानदाराचे उखळ पांढरे झाले. पसंत केलेल्या लुगड्यांशी रंगसंगती साधणाऱ्या चोळ्या दुकानदाराने तातडीने शिवून द्याव्यात, या अटीवर नऊवारी साड्यांची ती खरेदी झाली. त्यांच्यापैकी एक चुणचुणीत विद्यार्थिनी भारतात राहिलेली होती; कलाचतुर होती. तिने गुपचुप आपल्या खोलीवर त्या सगळ्या मैत्रिणींना नेले. आणि ९ वारी साडी सुबकपणाने कशी नेसावी याची तिने सर्वांना दीक्षा दिली. दुसरे दिवशी महिला मंडळाच्या सर्व सदस्या आपापल्या ९ वारी साड्यांचे बोंगे आवरीत सावरीत सभागृहात येतात तो त्यांना परदेशी पाहुण्या विद्यार्थिनींनी आश्चर्याचा धक्काच दिला. कारण त्या सर्व विद्यार्थिनी उत्कृष्ट पद्धतीच्या ९ वारी साड्या नेसून आणि त्यांना शोभणाऱ्या चोळ्या परिधान करून सहास्य मुद्रेने महिला मंडळाच्या सदस्यांना हात जोडून सामोऱ्या आल्या होत्या !

नगरसंचारार्थ निघालेली ही परदेशी पाहुण्यांची तुकडी अशीच एके दिवशी

पुण्यातील शनिवार, नारायण या जुन्या विभागात येऊन पोहोचली. प्रशस्त अंगण असलेला एक जुना वाडा त्यांना दिसला. त्या वाड्याचा कुलीन व भारदस्त तोंडावळा त्यांच्या मनात भरला. त्या घराच्या अंगणात प्राजक्त, औदुंबरासारखी जुनी झाडे होती. एका वटवृक्षाभोवती प्रशस्त दगडी पार होता. अंगण नुकतेच शेणाने सारवून सडासंमार्जनाने व रांगोळीने अलंकृत केले होते. त्या दृश्याने पाहुण्यांना मोहिनी घातली. अंगणाच्या दुसऱ्या बाजूस गाईचा गोठा होता. गाईचे गोंडस पाडस तेवढ्यात हंबरले आणि त्या गोजिरवाण्या गोवत्साकडे अनेकांनी कौतुकाने धाव घेतली. गाईला हिंदू पवित्र मानतात; हे त्या परदेशीयांना चांगले ठाऊक होते. डेक्कन जिमखान्यावर त्यांना कुठेही असे लोभसवाणे दृश्य दिसले नव्हते. गाईच्या पवित्र शेणाने सारवलेल्या त्या अंगणातील ठळक-सुबक रांगोळी त्या पाहुण्यांच्या कुतूहलाचा व चर्चेचा विषय झाली. रांगोळी रेखिण्याच्या या सांस्कृतिक आचारात अनेक अर्थ आहेत, संकेत आहेत, रहस्ये लपलेली आहेत. ही रांगोळी स्त्रिया अंगणात नित्यनियमाने का रेखितात, तिच्यात अंतर्भूत झालेल्या विशिष्ट आकृतीच त्या का काढतात इत्यादी अनेक प्रश्नांची सरबत्ती परदेशी पाहुण्यांनी त्यांच्याबरोबर असलेल्या महिला व सांस्कृतिक मंडळाच्या पदवीधर अध्यक्षांवर केली. रांगोळीतील स्वस्तिक, गोपद्म, सर्वतोभद्रचक्र इत्यादी अनेक आकृती परंपरेने चालत आलेल्या म्हणून महिला मंडळाच्या अध्यक्षांना परिचित होत्या. पण त्या आकृतींच्या मागचे सांस्कृतिक संकेत, त्यांच्या मागची जीवनकल्याणकारी रहस्ये, त्यांना अज्ञात होती. पाहुण्यांपैकी एका बहुश्रुत विद्यार्थिनीने तिला ठाऊक असलेली काही उपयुक्त माहिती उत्स्फूर्तपणे सादर केली. रांगोळीतील स्वस्तिक हे विश्वप्रकाशक सूर्याचे प्रतीक आहे हे तर तिने विशद केलेच, पण भारतीय स्वस्तिकाची आकृती आणि हिटलरने प्रचारात आणलेली स्वस्तिकाकृती यातील उजवा-डावा भेदही तिने स्पष्ट केला.

त्या घरात त्या दिवशी काही तरी विशेष समारंभ किंवा हव्यकव्य असावे. त्या घराच्या स्वामिनीने भरजरीचे नऊवारी लुगडे परिधान करून नाकात लफ्फेदार नथ घातली होती. गृहस्थाने पीतांबर नेसून अंगावर शालजोडी घेतली होती. पाहुण्यांच्या आगमनाच्या चाहुलीने ते पती-पत्नी कुतूहलाने अंगणात आले. घरधनिणीच्या नाकातील नथीने परदेशी महिलांचे लक्ष वेधून घेतले. त्या गृहिणीभोवती गोळा होऊन एखादे अद्भुत पाहावे त्याप्रमाणे त्या नवलपूर्ण नथीचे निरीक्षण करू लागल्या. चाप नसलेली ती नथ गृहिणी नाकात बिनधोक कशी घालू व पेलू शकते याचे त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्या संदर्भात अनेक प्रश्न विचारून गृहिणीला भंडावून सोडले.

पाहुण्यांच्या विनंतीनुसार गृहस्थाने आपल्या त्या जुन्या घराचा सर्व भाग त्यांना दाखवला. त्या घरात चुली होत्या, काही कणगी होत्या, रांजण होते. बसण्याचे रंगीत पाट होते. चौरंग होते. देवाचे सुंदर मखर होते. कुटुंबात परंपरेने चालत आलेले तांब्याचे व चांदीचे पूजासाहित्य होते. त्यात वैश्वदेवाचे तांब्याचे एक कुंडही होते. त्या सर्व वस्तू व त्या घरातील एकूण वातावरण पाहुण्यांना खऱ्या अर्थाने भारतीय वाटले

आणि म्हणूनच ते त्यांना रुचले. पाहुण्यांपैकी काहींनी तर अशी इच्छा व्यक्त केली की, घरधन्याच्या खाजगी जीवनावर आक्रमण होणार नाही अशा पद्धतीने त्या घरात, अंगणात, ओसरीवर, गोठ्यात कोठेही काही दिवस वास्तव्य करण्यास मिळावे. डेक्कन जिमखान्यावरील आधुनिक सुखसोयींपेक्षा या ठिकाणच्या गैरसोयीही सोसून आपण या घरात राहू; कारण, भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्याचा आपला हेतू येथे सफल होऊ शकेल.

भारतीय संस्कृती व भारतीय प्राचीन विद्या यांच्या अध्ययनसंशोधनासाठी अनेक परदेशी पंडित भारतात येतात. कोणी शिवदेवता या विषयाचा ध्यास घेऊन आलेला असतो. तर एखादी फ्रेंच विदुषी हरिपाठावर सखोल संशोधन-लेखन करते. असाच एक साक्षेपी संशोधक पुण्यात थोडे दिवसांपूर्वी आला होता. वैदिक मंत्रांत सामर्थ्य असते. संध्येतील वैदिक मंत्रांच्या पठणामुळे संध्या करण्यापूर्वीचे पाणी आणि मंत्रपठणाचा परिणाम झालेले संध्यावंदनाच्या विधीनंतरचें पाणी यात मंत्रशक्तीमुळे रासायनिक स्वरूपाचा पालट होतो का ? हा-त्याच्या अभ्यासाचा-संशोधनाचा विषय होता.

ह्या पंडिताचे पुण्यातील वास्तव्य एका नव्या आधुनिक नगरातील एका सधन, सुविद्य व सुसंस्कृत कुटुंबात होते. कुटुंबप्रमुख आणि त्यांचे तरुण चिरंजीव दोघेही आपल्या व्यवसायात प्रवीण व प्रसिद्ध होते. पंडिताला त्या घरातील एकूण वातावरण आवडले. घर आधुनिक पद्धतीचे असूनही त्यात देवघर होते. दृष्टीस पडताच माथा विनम्र व्हावा अशा एका साक्षात्कारी थोर संताचे भव्य व रंगीत छायाचित्र त्या ठिकाणी होते.

कुटुंबप्रमुखाशी त्या पंडिताचे पुढीलप्रमाणे संभाषण झाले होते.

पंडित :—आपले कुटुंब ब्राह्मणाचे ना ?

कु. प्र. :—होय.

पंडित :—ब्राह्मण म्हणजे टिळकांच्या जातीचे ना ?

कु. प्र. :—होय.

पंडित :—मग आपल्या नित्यक्रमात संध्याविधी असणारच !

कु. प्र. :—हो तर !

पंडित :—संध्या आली म्हणजे गायत्री मंत्रही आलाच ?

कु. प्र. :—अर्थातच. गायत्री हा संध्येचाच भाग आहे.

आपण ज्या कुटुंबात राहतो ती मंडळी टिळकांच्या जातीची असल्यामुळे त्यांच्या घरातले संध्येचे प्रात्यक्षिक पाहण्याची त्या पंडिताला उत्सुकता होती. कामासाठी बाहेरगावी फिरतीवर असलेले कुटुंबप्रमुखाचे चिरंजीव एके दिवशी परत आले. त्या रात्री पाहुण्या पंडितांशी चिरंजीवांचे बरेच मनमोकळे बोलणे झाले. वडिलांशी झालेल्या संभाषणाचे वृत्त निवेदन करून पंडितांनी दुसरे दिवशी सकाळी आपणास संध्येचे प्रात्यक्षिक पाहावयास मिळावे अशी इच्छा व्यक्त केली.

रात्री १० च्या सुमारास ते चिरंजीव गाडी घेऊन सरळ माझ्या घरी आले. ज्योतिष, गूढ-विद्या इत्यादी विषयांचे ते नादी असल्यामुळे माझ्याकडे त्यांचे येणे-जाणे होते. पण ते सहसा रात्रीचे इतक्या उशीरा कधी येत नसत. त्यामुळे त्यांच्या आगमनाचे तसेच काही विशेष कारण असावे असे मी ओळखले. आगत-स्वागत व प्रास्ताविक हवा-पाण्याच्या गोष्टी होताच मी त्यांना मुद्याचा प्रश्न केला.

मी–आज कधी नव्हे ते या वेळी कसे ?

मित्र–मुद्दामच आलोय्. थोडं एक लफडं झालंय् !

मी–म्हणजे ?

मित्र–तसं भलतं काही नाहीय्–पण ते एक परदेशी संशोधक पंडित आमच्याकडे उतरलेय्त ना ? त्यांनी आज आम्हाला गोंधळात टाकलंय् ! आमच्या पिताजींनी आम्ही टिळकांच्या जातीचे ब्राह्मण आहोत आणि रोज संध्या आणि गायत्री करतो असे त्यांना सांगितले. मी बाहेरगावाहून येताच त्यांनी मला वेठीला धरले. उद्या सकाळी त्यांना संध्या व गायत्रीचे प्रात्यक्षिक करून दाखविण्याचा प्रसंग ओढवला आहे. तो टाळताही येण्यासारखा नाही. तेव्हा तुमच्याकडे मुद्दाम धाव घेतली. तुम्हाला ठाऊकच आहे. आम्ही अगदी टिळकांच्या जातीचे ब्राह्मण असलो तरी संध्या आम्ही करीत नाही. गायत्रीचे महत्त्व व सामर्थ्य तुमच्या लेखात आम्ही वाचले. त्यासंबंधीचे ग्रंथही विकत घेतले. पण गायत्री मंत्र आम्हाला पाठ नाही किंवा नीट म्हणताही येत नाही. ब्राह्मण्याची निशाणी असे यज्ञोपवीत–तेही आमच्या गळयात नाही ! तेव्हा आमचं पहिलं काम असं की दुकाने आता बंद झालीयत्. यावेळी कुठे जानवी जोड विकत मिळेलसं वाटत नाही. आमचे गुरुजीही घरी नाहीत. तेव्हा तुमच्याकडे एखादे ‘ स्पेअर ’ जानवे असले तर ते आम्हांला द्या. गायत्रीमंत्र शास्त्रोक्त पद्धतीने कसा म्हणायचा त्याचीही संथा द्या. आणि संध्येची चोवीस नावे आमच्याकडून पाठ करून घ्या.

माझ्या मित्रावर कोसळलेल्या त्या प्रसंगाचे वृत्त ऐकून मला हसू आवरेना. मी त्यांना हसतच म्हटले– ‘ मंत्र, तंत्र, अध्यात्म, संस्कृती याविषयी मी संशोधन करतो, लिहितो. तरी ‘ स्पेअर ’ जानवे सोडाच, माझ्या गळयातही ती पवित्र निशाणी सापडेलच असा भरवंसा नाही ! आणि या विषयात मला असे वाटते की, त्या पंडिताला तुम्ही स्पष्ट सांगायला हवे होते, की आम्ही ब्राह्मण असलो–अगदी टिळकांच्या जातीचे असलो–आणि संध्या, गायित्री इत्यादी विषयांचा बेगडी अभिमान बाळगत असलो तरी आमचे आधुनिक जीवन इतके पाश्चात्य वळणाचे झाले आहे की, आमचा धर्म व आमची संस्कृती यांचे अस्तित्व आमच्या जीवनात व घरात अभावानेच आहे–ही वस्तुस्थिती आहे !

मित्र :—आमच्या वडिलांनी त्यांना आधीच आश्वासन देऊन ठेवले हो ! त्यामुळे ही ‘ समस्या ’ निर्माण झाली.

त्या माझ्या सन्मित्राने दुसऱ्या दिवशी सकाळी त्या संशोधक पंडिताला काय सांगितले याची चौकशी मी केली नाही. पण हा प्रसंग माझ्या स्मरणात कायमचा

राहिला एवढे मात्र खरे.

आमची संस्कृती, आमचा इतिहास, आमच्या परंपरा या विषयीचे–आमचे केवढे अज्ञान आहे; याचे अनेक बोलके पुरावे उपलब्ध आहेत. त्यांपैकी एक दोन निवडक नमुने सांगावेत असे आहेत. प्रत्यक्षच अनुभवलेले आहेत.

भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्ध चालू होते त्या वेळची घटना आहे. त्यावेळी वर्तमानपत्रात युद्धाच्या ज्या वार्ता प्रत्यही प्रसिद्ध होत होत्या, त्यांत काश्मीरमधील ‘ बारा-मुल्ला ’ या स्थळाचा वारंवार निर्देश असे. काश्मीरमधील या प्रख्यात शहराचे ‘ बारा-मुल्ला ’ हे नाव कसे पडले याची काही माहिती आहे का ? ’–असे–राजकारणातील केवळ घोषवाक्ये पाठ असणाऱ्या माझ्या एका पुढारी मित्राला मी विचारले.

माझा तो हजरजबाबी हिंदुत्वनिष्ठ मित्र म्हणाला, ‘ त्यात काय माहिती असाय-चीय ? गावाची नावे अनेक असतात आणि ती कशी पडतात हे आपल्याला ठाऊकच आहे. जिथे वडाची झाडे पुष्कळ–ते वडगाव. चिंचेची झाडे जिथे अधिक ते चिंचवड. या बारामुल्लाचेही तसेच असणार. काश्मीरमध्ये मुस्लिमांची वस्ती पुष्कळ आहे. मुस्लिमांचे वास्तव्य आले म्हणजे मशिदी आल्याच. मशीद आली की फकीर मुल्ला आलेच. अशाच एखाद्या प्रमुख मशिदीच्या आवारात किंवा मशिदीबाहेरच्या झाडाखाली कट्ट्या-वर–मुल्ला फकीर यांचा अड्डा असेल. दहा-बारा फकीर नेहमी तिथे बसत असतील. त्यांचा हा अड्डा लोकांच्या चर्चेचा–आकर्षणाचा विषय असेल. त्यावरून ‘ बारामुल्ला ’ हे नाव रूढ झाले असेल–आणि पुढे तेच त्या शहराचे नाव प्रचलित झाले.

माझ्या मित्राने केले असेच स्पष्टीकरण कोणीही खोलात न जाणारा माणूस करील. माझ्या मित्राला मी म्हटले–‘ अनेक विषयांबद्दल आमचे अज्ञान कसे असते व ते दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाही; याचे हे उत्तम उदाहरण आहे. हिंदुत्वाच्या घोषणा आम्ही अहमहमिकेने करतो, हिंदुत्वाचा अभिमान बाळगतो, पण काश्मीरमधल्या एक महत्त्वाच्या शहराच्या नावाचा उगम कशात आहे–याचा इतिहास, याची परंपरा आम्हाला पूर्ण अज्ञात असते आणि ती समजून घेण्याची आम्हाला आवश्यकता वाटत नाही. ’

माझा मित्र उपेक्षेने आणि काहीशा उपहासाने उद्गारला, ‘ राजकारणात किंवा व्यवहारातही असल्या ज्ञानाची किंवा संस्कृती–परंपरा इत्यादींच्या अभ्यासाची उठाठेव कोण करीत बसतो ? मुख्य मुद्दा–रोखठोक व्यवहाराचा–तो चोख पाहावा म्हणजे झाले. ’

‘ मुख्य मुद्याविषयीच आमचे अज्ञान असते हेच तर मला सांगावयाचे आहे ’ मी माझ्या मित्राला चुचकारत म्हटले. त्यावर उसळून तो पुन्हा म्हणाला, ‘ ठीक आहे पाजळा आपले पांडित्य, ऐकू द्या तुमचं मुद्द्याचं पुराण–बारामुल्लाच्यासंबंधीचं–! ’

‘ पुराण नव्हे–वस्तुज्ञान–जे व्यवहाराला धरून आणि जीवनोपयोगी आहे. ऐव तर, शुद्ध मुसलमानी वाटावं असंच ‘ बारामुल्ला ’ हे नाव आहे, पण या बारामुल्लाच मु स्लिमांशी, त्यांच्या मशिदींशी, त्यांच्या फकीर–मुल्लांशी काडीइतकाही संबंध नाही

स्वातंत्र्य मिळून पाव शतक होत आले; तरी अशा किती तरी गोष्टी आम्हांला अजून ठाऊक नाहीत. शुद्ध मुसलमानी भासणाऱ्या या ‘ बारामुल्ला ’ चे मूळ रूप-मूळ नाव-‘ वराहमूलम ’ असे शुद्ध संस्कृत आहे. मूळच्या ‘ वराहमूलम् ’ चा गाभा नाहीसा झाला आणि आम्ही कवटाळून धरले आहे ते त्या शुद्ध संस्कृत नावाचे अपभ्रष्ट-विकृत-शुष्क टरफल ! आमच्या एकूण संस्कृतीचे असेच झाले आहे. ती मुळात आहे ‘ वराहमूलम् ’ची-पण, आज मात्र तिचा झाला आहे ‘ बारामुल्ला ’ !

० ० ०

१९६२ साली-केंद्र सरकारच्या चित्रपट विभागासाठी मी एक चित्र तयार करीत होतो. चित्रपट विभागाच्या नेहमीच्या लघु-अनुबोधपटापेक्षा या चित्राचे स्वरूप वेगळे होते-प्रयोगशील होते. संवाद-गीत-नृत्य इ. सर्वांगांनी परिपूर्ण असा हा ९००० फूट लांबीचा चित्रपट-राजस्थानातील एका ग्रामीण विभागातील सत्य घटनेवर आधारलेला होता. राजस्थानातील ‘ पाण्याची समस्या ’ हा या चित्राचा प्रधान हेतू होता. त्या चित्राचे सारे दृश्यांकन राजस्थानातील जोधपूर जवळच्या ‘ बोरुंदा ’ नावाच्या एका छोट्या खेड्यात राहून मी केले. चित्रपटाचे स्वरूप वास्तव होते. खरी माणसे, खरी जिवंत स्थळे, रंगरंगोटी नाही, कृत्रिम नेपथ्य-वेश-केशभूषा नाही-सारे खरे अकृत्रिम, जिवंत जातिवंत असे त्या चित्राचे स्वरूप होते.

राजस्थानचे लोकसंगीत सरस व संपन्न आहे. ‘ होरी, ’ ‘ लोरी, ’ ‘ घनघोर ’ इ. अनेक वेधक श्रुतिरम्य प्रकार त्यांत आहेत. राजस्थानचे रीतिरिवाज, व्रते, उत्सव, इ. सांस्कृतिक आचार-विचारांचा मी अभ्यास करीत होतो. ‘ प्रभात ’ मध्ये अशा अभ्यासाची आम्हाला सवय लागली होती. ‘ प्रभात ’मध्ये संगीताशी माझा अगदी जवळून संबंध आला. मास्तर कृष्णराव, केशवराव भोळे, वसंत देसाई यांच्यासारख्या संगीत-महर्षींचा सतत व निकट सहवास मला लाभला. संगीताचा सौंदर्यास्वाद घेण्यात त्यामुळे माझा कान तयार झाला आहे. राजस्थानच्या लोकसंगीताचे विविध पैलू ऐकत-अभ्यासत असता-‘ घनघोर ’ या नावाने प्रसिद्ध असलेल्या एका प्रकाराने मला गोंधळात टाकले. त्या संगीत प्रकाराचे परंपरेने चालत आलेले नाव ‘ घनघोर ’ होते-पण त्याच्या प्रत्यक्ष-स्वररचनेत-मात्र-‘ घनघोर ’ पणाची-भयंकरपणाची-भीषणतेची प्रतीती मुळीच येत नव्हती. उलट ‘घनघोर’च्या साऱ्या स्वररचनेत मांगल्य-कोमलता-उदात्तता यांचा आविष्कार जाणवत होता. मुळातल्या स्वररचनेच्या स्वरूपाशी विसंगत, काहीसे विपरीत असे ‘ घनघोर ’ हे नाव या संगीतप्रकाराला कसे पडले असावे ?-याचा विचार मी करू लागलो. शोध घेऊ लागलो.

त्या मागासलेल्या खेड्यातल्या लोकांना ‘ घनघोर ’ हे परंपरेने चालत आलेले संगीत ठाऊक होते, पण त्याचे ते नाव कसे पडले याबद्दल कोणतीच माहिती नव्हती. त्या खेड्यातले एक वृद्ध ठाकूरसाहेब आमच्या बैठकीत रोज येत असत. गावात त्यांना

मान होता–प्रतिष्ठा होती. एकेकाळी त्यांनी शौर्य गाजवले होते–वैभव उपभोगले होते. त्याच्या खुणा त्यांच्या मिशीच्या पिळात शिल्लक असलेल्या दिसत होत्या. आपला फौजेतला खास वेष घालून ठाकुरसाहेब आपल्या हुक्क्यासह आमच्या बैठकीत येत आणि हुक्का आणि मिशा यांना कुरवाळीत राहात. त्यांचा योग्य तो मान मी ठेवीत असे. राजस्थानचा इतिहास, रजपुतांचे शौर्य, त्याग इत्यादी ऐतिहासिक परंपरांचा नितांत अभिमान बाळगणाऱ्या वृद्ध ठाकुरसाहेबांना–राजस्थानची सांस्कृतिक रहस्ये ठाऊक असतील या कल्पनेने 'घनघोर' या संगीत प्रकाराबद्दल मी मुद्दाम विचारले–'ठाकुरसाब, आप तो बुजुर्ग हैं। अपनी सारी जिंदगी आपने इस भूमीमें बितायी है। राजस्तानी लोकसंगीतमें यह जो 'घनघोर' नामका प्रकार है उसके बारे में आपको जरूर मालूम होगा–यह नाम संगीतके इस प्रकार को कैसे मिला है ?'–ठाकूरसाहेबांनी मिशीला ताव दिला आणि आपल्या विशिष्ट अभिनिवेशात ते म्हणाले, 'अरे, डायरेक्टरसाहब ! आपको क्या बतायें ? यह राजस्थान ऐसी भूमी है–जहाँ आपको ऐसी सैंकडो चीजें मिलेंगी कि आप ताज्जुब करते रहेंगे। राजस्थानका लोकसंगीत एक ऐसीही चीज है। हम तो बचपन से सुनते आये हैं–लेकिन हमने यह कभी सोचाही नहीं–इसको यह 'घनघोर' नाम कैसे मिला ? मेरी समझ में यह पहलेसेही 'घनघोर' है और यह 'घनघोर' ही रहेगा। हम इतनाही जानते हैं कि यह चीज राजस्थानकी है–हमारे बुजुर्गोंकी है–प्यारी है–बढ़िया है और हमेशा के लिये वैसेही रहेगी। आप एक काम कीजियेगा डायरेक्टरसाहब ! यह जो 'घनघोर'–संगीत है उसको आप जैसा है वैसाही रिकार्ड कर लीजियेगा।—,

'घनघोर'चे मूळ शोधण्यासाठी शेवटी मला एका राजस्थानी प्राध्यापकाचे साहाय्य घ्यावे लागले. त्याने मला सांगितले की, राजस्थानात तुम्हाला असा मुळाचा शोध घेणारे कोणी भेटणार नाही. जुन्याचा अभिमान बाळगून मिशीला पीळ घालतील पण असले ज्ञानसंशोधन कधी करणार नाहीत. आणि असे म्हणून त्या प्राध्यापकांनी मला सांगितले की, 'घनघोर' हा लोकसंगीताचा प्रकार–राजस्थानातील प्रसिद्ध व पवित्र अशा 'गणगौर' या सणाच्या वेळी गायला जातो. आणि मुळातल्या या 'गणगौर'ने–'घनघोर' हे भ्रष्टरूप धारण केले आहे. हे स्पष्टीकरण ऐकल्यावर मला आनंद झाला तो अशासाठी की या संगीत प्रकाराच्या स्वररचनेत मांगल्य–पावित्र्य व उदात्तता आहे हे मला प्रतीत झाले होते ते खरे ठरले. पण दुःख झाले ते अशासाठी–की–आमच्या संस्कृतीचा गाभा 'गणगौर'चा असतो, पण समाजात तो विद्यमान–प्रसिद्ध–रूढ असतो तो मात्र 'घनघोर' स्वरूपात !

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ९०७५१ वि: निबंध
क्रमांक २२२९ नों. दि: ८।५।७३

# २

माणसाची सारी धडपड सुखासाठी, शांतीसाठी, समाधानासाठी चाललेली असते. स्वतःच्या–कुटुंबाच्या व शेवटी–समाजाच्या व राष्ट्राच्या. आम्ही ज्यांचे आदर्श पुढे ठेवले आहेत, त्या विज्ञाननिष्ठ प्रगत पाश्चात्य राष्ट्रांत हे–माणसाला हवे असलेले सुख कोणत्या स्वरूपात उपलब्ध व अस्तित्वात आहे याचा शोध या संदर्भात घेणे उचित ठरेल. अमेरिकेसारख्या राष्ट्राचेच उदाहरण घेऊ या. अमेरिका हे संपन्न, प्रगत–वैभवशाली राष्ट्र आहे. संपत्तीला तोटा नाही. भोगविलासांना मर्यादा नाही, अशी तेथे स्थिती आहे. सुखाची सर्व आधुनिक साधने अमेरिकेत उपलब्ध आहेत. विज्ञानाच्या विक्रमी विकासाने मानवी जीवनाचे स्वरूपच बदलून टाकले आहे. यंत्रे चोवीस तास माणसाच्या सेवेसाठी सज्ज आहेत. विज्ञानाचा विकास व यांत्रिक व औद्योगिक प्रगती यामुळे इंद्रियसुखाचे नाना भोग व ते भोगण्याची अनेकविध साधने अमेरिकेत उपलब्ध आहेत. मग वास्तविक अमेरिकेत सुख, शांती, समाधान निर्वेधपणे नांदावयास हवे होते. पण प्रत्यक्ष शोध घेतला तर अमेरिकेत खरे सुख, खरी शांती, खरे समाधान ही अभावाने अस्तित्वात आहेत, असेच दिसून येते. इंद्रियसुखांचा व भोगविलासांचा अतिरेक माणसाला सुखशांती देतोच असे नाही, असेच अमेरिकेतील एकूण जीवन पाहिल्यावर दिसून येते. इंग्लंड, अमेरिका, रशिया यांसारख्या देशांत, विज्ञानाच्या विकासाने, औद्योगिक प्रगतीने आणि सुखोपभोगांच्या, आधुनिक साधनांनी सुखशांती वाढलेली तर नाहीच उलट माणूस खऱ्या सुखशांतीला अधिकाधिक पारखा होतो आहे, असाच निष्कर्ष निरीक्षकाला काढावा लागतो. या संदर्भात या देशातील क्रांतदर्शी प्रज्ञावंतांचे ग्रंथ वाचले, भाषणे ऐकली म्हणजे भोगविलासांचा अतिरेक म्हणजे सुखाचा उपभोग नव्हे हे कटु सत्य या विचारवंतांच्या ध्यानी स्पष्टपणे आलेले आहे असे दिसून येते. भोगाच्या सुखापेक्षा–सुखाचा भोग कसा घेता येईल हे सांगणाऱ्या, शिकविणाऱ्या शाश्वत मूल्यांच्या शोधात हे पाश्चात्य पंडित आहेत; असे स्पष्ट दिसून येते. आजच्याच नव्हे तर उद्याच्या मानवतेला खरे सुख, खरी शांती ज्यामुळे लाभू शकेल अशी मूल्ये भारतीय तत्त्वज्ञानात, संस्कृतीत व ऋषिमुनींच्या प्रज्ञानात आढळतील, या अपेक्षेने या देशांत भारतीय संस्कृती, योग इत्यादींचा अभ्यास करण्याची

प्रवृत्ती वाढत्या प्रमाणावर आहे. याची काही बोलकी उदाहरणे आपण पाहणार आहोत. 'ब्रह्मसूत्रां'चा अभ्यास या कामी उपयुक्त ठरेल, या कल्पनेने अमेरिकेत एक संस्था स्थापन झाली आहे. तिचे चिंतनशील सदस्य ठराविक दिवशी एकत्र जमून—'ब्रह्मसूत्रां'चे परिशीलन करीत असतात.

अमेरिकेतील कौटुंबिक आणि वैवाहिक जीवन अस्थिरच नव्हे तर उद्ध्वस्त होऊ लागले आहे. अमेरिकेतल्या पालकांना समाजधुरीणांना, शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांना-सध्याच्या अमेरिकेतील तरुण विद्यार्थ्यांत बेफाम व बेजबाबदार वृत्तीचे जे थैमान दिसून येते आहे त्यामुळे चिंता वाटू लागली आहे. तरुण पिढीच्या या ज्वलंत प्रश्नाचा अभ्यास अमेरिकेतील एक श्रेष्ठ धर्माधिकारी, चिंतनशील मानसशास्त्रज्ञ व लोकप्रिय समाजहितैषी लेखक डॉ. श्री. नॉर्मन व्हिन्सेंट पील यांनी केला आहे. श्री. पील यांचे ग्रंथ अत्यंत प्रभावी व प्रेरक असतात. The Power of Positive Thinking हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ अमेरिकेत गीतेसारखा पूज्य व प्रिय आहे. धर्म व मानसशास्त्र यांचा मनोज्ञ संगम घडवून आणण्याचे अवघड काम श्री. पील हे गेली कित्येक वर्षे परिश्रमपूर्वक करीत आहेत. अशा या थोर लेखकाने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा व माहितीपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला. त्याचे नाव 'Sin, sex and self control' असे आहे. याच ग्रंथाची संक्षिप्त आवृत्ती 'Readers digest' या प्रख्यात नियतकालिकाने आपल्या १९६८ च्या ऑक्टोबरच्या अंकात 'Man, Morals & Maturity' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केली आहे. अमेरिकन समाजाची सद्यःस्थिती दाखविणारे काही अद्ययावत व अधिकृत आकडे डॉ. पील यांनी या आपल्या ग्रंथात उपलब्ध करून दिले आहेत. त्यावरून आणि डॉ. पील यांनी केलेल्या सडेतोड विवेचनावरून केवळ विज्ञानाच्या विकासाने, यांत्रिक प्रगतीने, औद्योगिक क्रांतीने, अमाप संपत्तीच्या प्राप्तीने किंवा भोगविलासांच्या अतिरेकी उपयोगाने माणसाला खरे सुख, खरी शांती, टिकाऊ समाधान मिळतेच असे नाही; असे सिद्ध झाले आहे. ज्या समाजाला नैतिक, धार्मिक व तात्त्विक अधिष्ठान नाही तो समाज वाळूवर उभारलेल्या मंदिरासारखा आहे. स्वैराचार आणि अनैतिकता यांच्या उकिरडयावर उभारलेले समाजाचे मंदिर कधीच स्थिर व मंगल असू शकणार नाही, असा स्पष्ट निष्कर्ष डॉ. पील यांनी आपल्या या भेदक ग्रंथात काढला आहे. त्यांनी दिलेले काही आकडे अवश्य दृष्टीखालून घालण्यासारखे आहेत.

(१) अमेरिकेतील हायस्कूलमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पाहणीत असे आढळून आले की, प्रत्येक तीस विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये पंचविसांना विद्यालयीन अभ्यास चालू असताना; त्यांची वये कोवळी असताना व त्यांचे विवाह झालेले नसताना संभोगाचा अनुभव असतो.

(२) अमेरिकेतील सहा विवाहित मुलींपैकी एकजण विवाहाच्या वेळी आधीच गरोदर असते.

(३) १९४२ ते १९६२ या वीस वर्षांच्या कालावधीत अनौरस संततीचे प्रमाण

पुढील प्रमाणात वाढलेले आढळते.

वयोमान १५ ते १९ – ४०,५०० वरून ९४,४००.
वयोमान २० ते २४ – २७,२०० वरून ७७,३००.
वयोमान २५ ते २९ – १०,५०० वरून ३४,००.
वयोमान ३० ते ३४ – ५२,०० वरून १९,८००.
वयोमान ३५ ते ३९ – ३,००० वरून ११,०००.

४ ) १९५६ ते १९६३ या कालावधीत लैंगिक रोगांनी पछाडलेल्यांची संख्या दुप्पट झाल्याचे निदर्शनास आले.

लेखकाने याखेरीज आणखीही पुष्कळ आकडे दिले आहेत, पण वर दिलेल्या आकड्यांवरून आवश्यक ती कल्पना येऊ शकेल.

नीतिकल्पनांची धूळधाण, स्वैराचाराचा हैदोस, आणि लैंगिक स्वातंत्र्याच्या नावाखाली पेटणारा व पसरणारा अधःपाताचा वणवा राष्ट्राला अधोगतीला नेल्याविना राहणार नाही; असे जळजळीत स्पष्ट उद्‌गार डॉ. पील यांनी काढले आहेत.

डॉ. पील यांच्या ग्रंथानंतर नुकताच एक प्रक्षोभक ग्रंथ अमेरिकेतील प्रसिद्ध लेखक व संशोधक **Vance Packard** यांनी प्रसिद्ध केला आहे. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इटली, स्वीडन अशा आणखी दहा देशांतील तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या जीवनाचा लैंगिक प्रश्नांच्या दृष्टीने या लेखकाने अभ्यास केला–शोध घेतला. सतत चार वर्षे प्रस्तुत लेखक वेगवेगळ्या मार्गांनी व साधनांनी या प्रश्नाबद्दलची विविधांगी अधिकृत माहिती गोळा करीत होता. हाती आलेल्या एकूण साहित्याचे स्वरूप त्याला एवढे स्फोटक व क्रांतिकारक आढळून आले की–' The Sexual Wilderness ' असे अत्यंत प्रक्षोभक पण तितकेच अन्वर्थक शीर्षक त्याला आपल्या या ग्रंथाला द्यावे लागले. ( ' The Sexual Wilderness ' ' लैंगिक हाहाःकार ' लेखक श्री. व्हॅन्स पॅकार्ड. मूळ आवृत्तीचे प्रकाशक डेव्हिड मॅकके कंपनी. स्वस्त आवृत्ती–**Pocket books** न्यूयार्क ) या पुस्तकात संग्रहित करण्यात आलेली माहिती व आकडेवारी अमेरिकेतील तरुण पिढीच्या लैंगिक प्रवृत्तींचे वास्तव दर्शन घडविणारी तर आहेच, पण विचारवंतांना ती सचिंत करणारी तर सर्वसामान्यांना धक्का देणारी वाटेल; यात संशय नाही. तरुण पिढीच्या अनिर्बंध नैतिक कल्पना आणि लैंगिक स्वैराचार याविषयीचे या पुस्तकातील अनेक प्रकारचे आकडे व इतर इतिवृत्ते, डॉ. पील यांच्या पुस्तकातील निष्कर्षांपेक्षाही विदारक वाटतील. मासल्यासाठी पुढील काही आकडे पाहा :—

विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या एका पाहणीत विवाहापूर्वी अनेक मुलींशी समागमाचा अनुभव असणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांचे प्रमाण शेकडा ५८ असे आढळून आले. विवाहापूर्वी अनेक मुलांशी समागमाचा अनुभव असणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण मात्र शेकडा ३५ असे दिसून आले !

इंग्लिश विद्यापीठाच्या एका विद्यार्थीगटाच्या पाहणीत विवाहापूर्वी अनेक मुलींशी

मान होता–प्रतिष्ठा होती. एकेकाळी त्यांनी शौर्य गाजवले होते–वैभव उपभोगले होते. त्याच्या खुणा त्यांच्या मिशीच्या पिळात शिल्लक असलेल्या दिसत होत्या. आपला फौजेतला खास वेष घालून ठाकूरसाहेब आपल्या हुक्क्यासह आमच्या बैठकीत येत आणि हुक्का आणि मिशा यांना कुरवाळीत राहात. त्यांचा योग्य तो मान मी ठेवीत असे. राजस्थानचा इतिहास, रजपुतांचे शौर्य, त्याग इत्यादी ऐतिहासिक परंपरांचा नितांत अभिमान बाळगणाऱ्या वृद्ध ठाकुरसाहेबांना–राजस्थानची सांस्कृतिक रहस्ये ठाऊक असतील या कल्पनेने ' घनघोर ' या संगीत प्रकाराबद्दल मी मुद्दाम विचारले–' ठाकुरसाब, आप तो बुजुर्ग हैं। अपनी सारी जिंदगी आपने इस भूमीमें बितायी है। राजस्तानी लोकसंगीतमें यह जो ' घनघोर ' नामका प्रकार है उसके बारे में आपको जरूर मालूम होगा–यह नाम संगीतके इस प्रकार को कैसे मिला है ? '–ठाकूरसाहेबांनी मिशीला ताव दिला आणि आपल्या विशिष्ट अभिनिवेशात ते म्हणाले, ' अरे, डायरेक्टरसाहब ! आपको क्या बतायें ? यह राजस्थान ऐसी भूमी है–जहाँ आपको ऐसी सैंकडो चीजें मिलेंगी कि आप ताज्जुब करते रहेंगे। राजस्थानका लोकसंगीत एक ऐसीही चीज है। हम तो बचपन से सुनते आये हैं–लेकिन हमने यह कभी सोचाही नहीं–इसको यह ' घनघोर ' नाम कैसे मिला ? मेरी समझ में यह पहलेसेही ' घनघोर ' है और यह ' घनघोर ' ही रहेगा। हम इतनाही जानते हैं कि यह चीज राजस्थानकी है–हमारे बुजुर्गोंकी है–प्यारी है–बढ़िया है और हमेशा के लिये वैसेही रहेगी। आप एक काम कीजियेगा डायरेक्टर-साहब ! यह जो ' घनघोर '–संगीत है उसको आप जैसा है वैसाही रिकार्ड कर लीजियेगा।—,

' घनघोर 'चे मूळ शोधण्यासाठी शेवटी मला एका राजस्थानी प्राध्यापकाचे साहाय्य घ्यावे लागले. त्याने मला सांगितले की, राजस्थानात तुम्हाला असा मुळाचा शोध घेणारे कोणी भेटणार नाही. जुन्याचा अभिमान बाळगून मिशीला पीळ घालतील पण असले ज्ञानसंशोधन कधी करणार नाहीत. आणि असे म्हणून त्या प्राध्यापकांनी मला सांगितले की, ' घनघोर ' हा लोकसंगीताचा प्रकार–राजस्थानातील प्रसिद्ध व पवित्र अशा ' गणगौर ' या सणाच्या वेळी गायला जातो. आणि मुळातल्या या ' गणगौर 'ने–'घनघोर ' हे भ्रष्टरूप धारण केले आहे. हे स्पष्टीकरण ऐकल्यावर मला आनंद झाला तो अशासाठी की या संगीत प्रकाराच्या स्वररचनेत मांगल्य–पावित्र्य व उदात्तता आहे हे मला प्रतीत झाले होते ते खरे ठरले. पण दुःख झाले ते अशासाठी–की–आमच्या संस्कृतीचा गाभा ' गणगौर 'चा असतो, पण समाजात तो विद्यमान–प्रसिद्ध–रूढ असतो तो मात्र ' घनघोर ' स्वरूपात !

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
नुक्रमांक १०७५१ वि: निबंध
क्रमांक २२२१ नों: दि: ८।५।८३

# २

माणसाची सारी धडपड सुखासाठी, शांतीसाठी, समाधानासाठी चाललेली असते. स्वतःच्या–कुटुंबाच्या व शेवटी–समाजाच्या व राष्ट्राच्या. आम्ही ज्यांचे आदर्श पुढे ठेवले आहेत, त्या विज्ञाननिष्ठ प्रगत पाश्चात्य राष्ट्रांत हे–माणसाला हवे असलेले सुख कोणत्या स्वरूपात उपलब्ध व अस्तित्वात आहे याचा शोध या संदर्भात घेणे उचित ठरेल. अमेरिकेसारख्या राष्ट्राचेच उदाहरण घेऊ या. अमेरिका हे संपन्न, प्रगत–वैभवशाली राष्ट्र आहे. संपत्तीला तोटा नाही. भोगविलासांना मर्यादा नाही, अशी तेथे स्थिती आहे. सुखाची सर्व आधुनिक साधने अमेरिकेत उपलब्ध आहेत. विज्ञानाच्या विक्रमी विकासाने मानवी जीवनाचे स्वरूपच बदलून टाकले आहे. यंत्रे चोवीस तास माणसाच्या सेवेसाठी सज्ज आहेत. विज्ञानाचा विकास व यांत्रिक व औद्योगिक प्रगती यामुळे इंद्रियसुखाचे नाना भोग व ते भोगण्याची अनेकविध साधने अमेरिकेत उपलब्ध आहेत. मग वास्तविक अमेरिकेत सुख, शांती, समाधान निर्वेधपणे नांदावयास हवे होते. पण प्रत्यक्ष शोध घेतला तर अमेरिकेत खरे सुख, खरी शांती, खरे समाधान ही अभावाने अस्तित्वात आहेत, असेच दिसून येते. इंद्रियसुखांचा व भोगविलासांचा अतिरेक माणसाला सुखशांती देतोच असे नाही, असेच अमेरिकेतील एकूण जीवन पाहिल्यावर दिसून येते. इंग्लंड, अमेरिका, रशिया यांसारख्या देशांत, विज्ञानाच्या विकासाने, औद्योगिक प्रगतीने आणि सुखोपभोगांच्या, आधुनिक साधनांनी सुखशांती वाढलेली तर नाहीच उलट माणूस खऱ्या सुखशांतीला अधिकाधिक पारखा होतो आहे, असाच निष्कर्ष निरीक्षकाला काढावा लागतो. या संदर्भात या देशातील क्रांतदर्शी प्रज्ञावंतांचे ग्रंथ वाचले, भाषणे ऐकली म्हणजे भोगविलासांचा अतिरेक म्हणजे सुखाचा उपभोग नव्हे हे कटु सत्य या विचारवंतांच्या ध्यानी स्पष्टपणे आलेले आहे असे दिसून येते. भोगाच्या सुखापेक्षा–सुखाचा भोग कसा घेता येईल हे सांगणाऱ्या, शिकविणाऱ्या शाश्वत मूल्यांच्या शोधात हे पाश्चात्य पंडित आहेत; असे स्पष्ट दिसून येते. आजच्याच नव्हे तर उद्याच्या मानवतेला खरे सुख, खरी शांती ज्यामुळे लाभू शकेल अशी मूल्ये भारतीय तत्त्वज्ञानात, संस्कृतीत व ऋषिमुनींच्या प्रज्ञानात आढळतील, या अपेक्षेने या देशांत भारतीय संस्कृती, योग इत्यादींचा अभ्यास करण्याची

प्रवृत्ती वाढत्या प्रमाणावर आहे. याची काही बोलकी उदाहरणे आपण पाहणार आहोत. 'ब्रह्मसूत्रां'चा अभ्यास या कामी उपयुक्त ठरेल, या कल्पनेने अमेरिकेत एक संस्था स्थापन झाली आहे. तिचे चिंतनशील सदस्य ठराविक दिवशी एकत्र जमून—'ब्रह्मसूत्रां'चे परिशीलन करीत असतात.

अमेरिकेतील कौटुंबिक आणि वैवाहिक जीवन अस्थिरच नव्हे तर उद्ध्वस्त होऊ लागले आहे. अमेरिकेतल्या पालकांना समाजधुरीणांना, शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांना-सध्याच्या अमेरिकेतील तरुण विद्यार्थ्यांत बेफाम व बेजबाबदार वृत्तीचे जे थैमान दिसून येते आहे त्यामुळे चिंता वाटू लागली आहे. तरुण पिढीच्या या ज्वलंत प्रश्नाचा अभ्यास अमेरिकेतील एक श्रेष्ठ धर्माधिकारी, चिंतनशील मानसशास्त्रज्ञ व लोकप्रिय समाजहितैषी लेखक डॉ. श्री. नॉर्मन व्हिन्सेंट पील यांनी केला आहे. श्री. पील यांचे ग्रंथ अत्यंत प्रभावी व प्रेरक असतात. The Power of Positive Thinking हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ अमेरिकेत गीतेसारखा पूज्य व प्रिय आहे. धर्म व मानसशास्त्र यांचा मनोज्ञ संगम घडवून आणण्याचे अवघड काम श्री. पील हे गेली कित्येक वर्षे परिश्रमपूर्वक करीत आहेत. अशा या थोर लेखकाने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा व माहितीपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला. त्याचे नाव 'Sin, sex and self control' असे आहे. याच ग्रंथाची संक्षिप्त आवृत्ती 'Readers digest' या प्रख्यात नियतकालिकाने आपल्या १९६८ च्या ऑक्टोबरच्या अंकात 'Man, Morals & Maturity' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केली आहे. अमेरिकन समाजाची सद्यःस्थिती दाखविणारे काही अद्ययावत व अधिकृत आकडे डॉ. पील यांनी या आपल्या ग्रंथात उपलब्ध करून दिले आहेत. त्यावरून आणि डॉ. पील यांनी केलेल्या सडेतोड विवेचनावरून केवळ विज्ञानाच्या विकासाने, यांत्रिक प्रगतीने, औद्योगिक क्रांतीने, अमाप संपत्तीच्या प्राप्तीने किंवा भोगविलासांच्या अतिरेकी उपयोगाने माणसाला खरे सुख, खरी शांती, टिकाऊ समाधान मिळतेच असे नाही; असे सिद्ध झाले आहे. ज्या समाजाला नैतिक, धार्मिक व तात्त्विक अधिष्ठान नाही तो समाज वाळूवर उभारलेल्या मंदिरासारखा आहे. स्वैराचार आणि अनैतिकता यांच्या उकिरडयावर उभारलेले समाजाचे मंदिर कधीच स्थिर व मंगल असू शकणार नाही, असा स्पष्ट निष्कर्ष डॉ. पील यांनी आपल्या या भेदक ग्रंथात काढला आहे. त्यांनी दिलेले काही आकडे अवश्य दृष्टीखालून घालण्यासारखे आहेत.

(१) अमेरिकेतील हायस्कूलमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पाहणीत असे आढळून आले की, प्रत्येक तीस विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये पंचविसांना विद्यालयीन अभ्यास चालू असताना; त्यांची वये कोवळी असताना व त्यांचे विवाह झालेले नसताना संभोगाचा अनुभव असतो.

(२) अमेरिकेतील सहा विवाहित मुलींपैकी एकजण विवाहाच्या वेळी आधीच गरोदर असते.

(३) १९४२ ते १९६२ या वीस वर्षांच्या कालावधीत अनौरस संततीचे प्रमाण

पुढील प्रमाणात वाढलेले आढळते.

वयोमान १५ ते १९ – ४०,५०० वरून ९४,४००.
वयोमान २० ते २४ – २७,२०० वरून ७७,३००.
वयोमान २५ ते २९ – १०,५०० वरून ३४,००.
वयोमान ३० ते ३४ – ५२,०० वरून १९,८००.
वयोमान ३५ ते ३९ – ३,००० वरून ११,०००.

४ ) १९५६ ते १९६३ या कालावधीत लैंगिक रोगांनी पछाडलेल्यांची संख्या दुप्पट झाल्याचे निदर्शनास आले.

लेखकाने याखेरीज आणखीही पुष्कळ आकडे दिले आहेत, पण वर दिलेल्या आकड्यांवरून आवश्यक ती कल्पना येऊ शकेल.

नीतिकल्पनांची धूळधाण, स्वैराचाराचा हैदोस, आणि लैंगिक स्वातंत्र्याच्या नावाखाली पेटणारा व पसरणारा अधःपाताचा वणवा राष्ट्राला अधोगतीला नेल्याविना राहणार नाही; असे जळजळीत स्पष्ट उद्गार डॉ. पील यांनी काढले आहेत.

डॉ. पील यांच्या ग्रंथानंतर नुकताच एक प्रक्षोभक ग्रंथ अमेरिकेतील प्रसिद्ध लेखक व संशोधक **Vance Packard** यांनी प्रसिद्ध केला आहे. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इटली, स्वीडन अशा आणखी दहा देशांतील तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या जीवनाचा लैंगिक प्रश्नांच्या दृष्टीने या लेखकाने अभ्यास केला–शोध घेतला. सतत चार वर्षे प्रस्तुत लेखक वेगवेगळ्या मार्गांनी व साधनांनी या प्रश्नाबद्दलची विविधांगी अधिकृत माहिती गोळा करीत होता. हाती आलेल्या एकूण साहित्याचे स्वरूप त्याला एवढे स्फोटक व क्रांतिकारक आढळून आले की–' **The Sexual Wilderness** ' असे अत्यंत प्रक्षोभक पण तितकेच अन्वर्थक शीर्षक त्याला आपल्या या ग्रंथाला द्यावे लागले. ( ' The Sexual Wilderness ' ' लैंगिक हाहाःकार ' लेखक श्री. व्हॅन्स पॅकार्ड. मूळ आवृत्तीचे प्रकाशक डेव्हिड मॅकके कंपनी. स्वस्त आवृत्ती–**Pocket books** न्यूयार्क ) या पुस्तकात संग्रहित करण्यात आलेली माहिती व आकडेवारी अमेरिकेतील तरुण पिढीच्या लैंगिक प्रवृत्तींचे वास्तव दर्शन घडविणारी तर आहेच, पण विचारवंतांना ती सचिंत करणारी तर सर्वसामान्यांना धक्का देणारी वाटेल; यात संशय नाही. तरुण पिढीच्या अनिर्बंध नैतिक कल्पना आणि लैंगिक स्वैराचार याविषयीचे या पुस्तकातील अनेक प्रकारचे आकडे व इतर इतिवृत्ते, डॉ. पील यांच्या पुस्तकातील निष्कर्षांपेक्षाही विदारक वाटतील. मासल्यासाठी पुढील काही आकडे पाहा :—

विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या एका पाहणीत विवाहापूर्वी अनेक मुलींशी समागमाचा अनुभव असणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांचे प्रमाण शेकडा ५८ असे आढळून आले. विवाहापूर्वी अनेक मुलांशी समागमाचा अनुभव असणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण मात्र शेकडा ३५ असे दिसून आले !

इंग्लिश विद्यापीठाच्या एका विद्यार्थीगटाच्या पाहणीत विवाहापूर्वी अनेक मुलींशी

समागम करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांचे प्रमाण शे. ७४ असे दिसले तर मुलींच्या बाबतीत हेच प्रमाण शे. ६५ असे आढळून आले !

विद्यापीठात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थिनींत विवाहापूर्वी संभोगाचा अनुभव असणाऱ्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळले.

नवागत विद्यार्थिनी–शे. १५ ते २०.

प्रारंभिक विद्यार्थिनी शे ३० ते ३५.

खालच्या श्रेणीच्या विद्यार्थिनी–शे. ४० ते ४५.

वरच्या श्रेणीच्या विद्यार्थिनी–शे. ५० ते ६०.

पदवीपरीक्षेच्या विद्यार्थिनी–श. ६० ते ७०

विवाहपूर्व समागम मान्य असणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संस्थावार टक्केवारी पुढीलप्रमाणे निदर्शनास आली.

धार्मिक संस्थांच्या विद्यमाने चालणाऱ्या विद्यालयांतील—

विद्यार्थी शे. ३८

विद्यार्थिनी शे. १२

खाजगी शिक्षणसंस्थांतील

विद्यार्थी शे. ६०

विद्यार्थिनी शे. ४९

सार्वजनिक शिक्षणसंस्थांत शिक्षण घेणारे

विद्यार्थी शे. ६३.

विद्यार्थिनी शे. ४२.

कॅलिफोर्नियातील समुद्रकाठच्या एका विशिष्ट गटाच्या पाहणीत विवाहापूर्वी समागम करणाऱ्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळून आले.

पुरुष शे. ८५; स्त्रिया शे. ४०

ज्यांचे विवाह नुकतेच झाले आहेत अशा वसतिगृहात राहणाऱ्या व विवाहापूर्वी प्रियकराबरोबरच समागम केलेल्या विद्यार्थिनींचे प्रमाण शेकडा ५० असे आढळून आले.

एका निरीक्षकाने एक अगदी चमत्कारिक वाटणारी माहिती गोळा केली. अमेरिकेतील काही प्रमुख नगरातील रहदारीच्या प्रमुख केंद्रावर थांबून दृष्टिपथात येणाऱ्या पहिल्या शंभर तरुण स्त्रियांचे विशेषतः त्यांच्या वेषाचे निरीक्षण त्याने केले. यात एका ठिकाणी शंभरापैकी ६५ तरुणी पुरुषी केश व वेषभूषा केलेल्या आढळल्या.

प्रथम समागमाच्या वेळी आपण मद्यप्राशन केलेले नव्हते असे पाहणीतल्या दोन तृतीयांश विद्यार्थ्यांनी सांगितले. प्रथम समागमप्रसंगी मद्यप्राशन केलेल्यांचे प्रमाण आठात एक असे दिसून आले. प्रथम संभोगाच्या वेळी मद्यप्राशन केलेल्या विद्यार्थिनींचे प्रमाण इंग्लिश विद्यार्थिनींत अधिक आढळते.

ही सारी आकडेवारी काय दाखवते ?

अमेरिकेत कुटुंब, विवाहसंस्था आणि नैतिकता उद्ध्वस्त झाली आहे. तरुण पिढीत बेजबाबदारीबरोबर वैफल्याची, असुरक्षिततेची भावना बळावत आहे. भांग, गांजा, चरस, चंडोल, आणि L. S. D. यासारखी मादक द्रव्ये सेवन करण्याकडे अमेरिकेतील तरुण-तरुणींची वाढती प्रवृत्ती दिसून येते. समाजस्वास्थ्य पोखरणाऱ्या या विकारापासून शाळेतील कोवळे विद्यार्थीही सुटलेले नाहीत.

या राष्ट्रीय आपत्तीकडे लक्ष वेधण्याचे काम अमेरिकेतील जागरूक समाजसेवक करीतच आहेत, पण या आपत्तीने काही सुखी कुटुंबांचे छायाळ वृक्ष कसे, करपून कोळपून गेले आहेत, जात आहेत, याच्या सत्यकथा अगदी अलीकडे Readers' Digest या मासिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. एका मध्यमवर्गीय सुखी सुशील कुटुंबातला सोळा वर्षांचा हिरवा कोवळा पोर, मुळात सरळमार्गी व बुद्धिमान, पण शाळेतल्या कुसंगतीच्या प्रभावाने गांजासारख्या व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे त्याचे आणि त्याच्या प्रेमळ मातापित्यांचे सारे जीवन कसे विफल, दुःख-शोकमय होऊन गेले; याची एक करुण सत्यकथा १९७१ च्या जानेवारीच्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. ( पृष्ठ ५६ ) ती जिज्ञासूंनी अवश्य पाहावी. याच संदर्भात त्याच मासिकातील पुढील लेखांचे परिशीलन उद्‌बोधक ठरेल.

(1) What I tell youngsters about Drugs.
लेखिका—सिस्टर पॅट्रीशिआ ( पृष्ठ ३४ ), ऑगस्ट १९७०.

(2) My daughter died from Drugs.
लेखक—आर्ट लिंकलेटर ( पृष्ठ ६६ ), जून १९७०.

( ३ ) Readers Digest ऑक्टोबर १९७१ व नोव्हेंबर १९७१ या दोन्ही अंकांत असेच या विषयींचे उद्‌बोधक लेख आहेत.

'Peace of Mind' या दुसऱ्या महायुद्धकाळातील गाजलेल्या ग्रंथाचा थोर लेखक जोशुआ लिबमन हा ज्यू धर्मगुरू तर होताच, पण समाजकल्याणाचे चिंतन करणारा तो एक महर्षी होता. मृत्यूपूर्वी त्याने लिहून ठेवलेल्या 'Hope for man' 'उद्याच्या मानवतेचे उज्वल भवितव्य' या अपूर्व ग्रंथात विवाहसंस्थेची स्थिरता व नैतिक मूल्याची आवश्यकता प्रतिपादन करताना तो म्हणतो, "१८६७ साली अमेरिकेतील घटस्फोटांचा आकडा १०००० होता. हाच आकडा १९३७ साली २५०,००० इतका वाढला. या अवधीत लोकसंख्येची वाढही झाली, पण तिचे प्रमाण शे. ३०० असे होते-तर घटस्फोटांच्या वाढीचे प्रमाण शे. २००० नी वाढले होते. ही-वाढ-कोणाही सुबुद्ध माणसाला विचार करावयास लावणारी आहे." 'स्त्री पुरुष संबंधात-नैतिक पातळी वाढविल्याशिवाय समाजात सुख आणि शांती नांदणे अशक्य आहे,' असे आपले स्पष्ट मत या थोर लेखकाने व्यक्त केले आहे.

डॉ. नॉर्मन व्हिन्सेन्ट पील आणि श्री. व्हॅन्स पॅकार्ड यांच्या ग्रंथानंतर अगदी अलीकडे प्रकाशित झालेल्या एका ग्रंथाचा निर्देश अवश्य केला पाहिजे. या ग्रंथाचे नाव आहे

'Crime in America'–अमेरिकेतील गुन्हेगारी. या माहितीपूर्ण व महत्त्वपूर्ण ग्रंथाचे लेखक आहेत श्री. रॅम्से क्लार्क. हे एक तरुण, तज्ज्ञ व तडफदार विधिविशारद आहेत. केनेडी यांच्या राजवटीत ते असि. ॲटर्नी जनरल या पदावर होते आणि जॉन्सन यांच्या काळात ॲटर्नी जनरल म्हणून काम पाहात होते. सध्या सरकारी नोकरी न करता ते स्वतंत्र वकिलीचा व्यवसाय करतात.

अमेरिकेतील अपप्रवृत्ती, तरुणांचे मादक द्रव्यांचे भेसूर व्यसन व यासारखेच समाजाला व राष्ट्राला पोखरून काढणारे इतर गुन्हे यांची आकडेवारी तर श्री. क्लार्क यांनी दिलीच आहे. पण अशा गुन्ह्यांना, अपप्रवृत्तींना आणि अनैतिकतेला आळा घालण्यासाठी प्रतिबंधक उपाय आणि विधायक योजनाही श्री. क्लार्क यांनी सुचविल्या आहेत अमेरिकेतील समाजस्थितीवर प्रखर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ या प्रश्नांचा विचार व अभ्यास करणाऱ्या प्रत्येकाने वाचावाच असा आहे.

औषधांच्या मोहक व फसव्या रूपाने अमेरिकेत अफू, गांजा, चरस यासारख्या द्रव्यांनी व L. S. D. यासारख्या रसायनांनी धुमाकूळ घातला आहे. तरुण विद्यार्थ्यांत अशा मादक द्रव्यांचे सेवन करण्याची प्रवृत्ती एकसारखी वाढती आहे.प्रशालांतील विद्यार्थ्यांपासून तो पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्व थरांतील विद्यार्थी अशा मादक द्रव्यांच्या आहारी गेलेले आढळतात. विद्यार्थ्यांची ही वाढती व्यसनाधीनता, हा वैफल्य, विमनस्कता, ध्येयशून्यता आणि स्नेहशून्य जिण्यातून निर्माण होणाऱ्या चिंताव्याधींचा व वैतागाचा अपरिहार्य परिणाम आहे, असे उद्‌गार लेखकाने काढले आहेत. दुःखमुक्ती, चैन–आणि जीवनातील पलायनवादी वृत्ती–ही या व्यसनाधीनतेची आणखी कारणे आहेत.

आजकालचे तरुण विद्यार्थी हे पूर्वीच्या पिढीपेक्षा अधिक चौकस, अधिक बहुश्रुत आणि अधिक जीवनसन्मुख आहेत. व्यसनाधीनता हे पाप आहे, एवढा उपदेश त्यांना करून भागणार नाही. तर मोहक स्वरूपातील ही द्रव्ये हा जीवनाला लागणारा सुरुंग आहे, हे त्यांच्यापुढे पुराव्याने ठेवले गेले पाहिजे. या व्यसनात चैनीपेक्षा किंवा दुःखमुक्तीपेक्षा–हानिप्रदताच अधिक आहे ही गोष्ट तरुणपिढीच्या मनावर ठसवली गेली पाहिजे, असे मत लेखकाने व्यक्त केले आहे. त्यासाठी अधिक संशोधनाची व प्रतिबंधक उपायांची आवश्यकताही लेखकाने प्रतिपादन केली आहे.

मादक द्रव्यांच्या सेवनाचे लागलेले व्यसन माणसाला एकसारखे अवनतीच्या गर्तेकडेच नेत राहते. अमेरिकेतील सर्वसामान्य नागरिकाला आपल्या या व्यसनासाठी प्रत्यही पंचवीस डॉलर्स तरी कमीत कमी खर्च करावे लागतात. नोकरी–चाकरी नसलेल्या किंवा असूनही द्रव्यचिंता किंवा मोजकी प्राप्ती असलेल्या माणसाला व्यसनासाठी पैसा उभा करण्यासाठी–चोरी किंवा त्यासारख्याच अपप्रवृतीला बळी पडावे लागते. आणि अशा प्रकारे समाजात दुराचाराची व आपत्तींची परंपरा निर्माण होते.

मादक द्रव्यांचे सर्वाधिक साठे उपनगरे आणि त्यातही महाविद्यालयांच्या परिसरातच सर्वाधिक आढळले, अशी नोंद आहे. सरकारतर्फे जप्त केल्या गेलेल्या मादक

द्रव्यांच्या साठ्यांचे काही बोलके आकडे पुढीलप्रमाणे :—अफू व त्यासारखी मादक द्रव्ये-सरकारने जप्त केली-१९६७ ते १९६८ या वर्षांत प्रमाण १२८,९५३ ग्रॅम्सवरून ३२७,७५० ग्रॅम्स इतके वाढले.

मारिजुआना म्हणजे गांजासारख्या मादक द्रव्याचे प्रमाण १९६७-६८ या वर्षात १२,१४८,१२९ ग्रॅम्सवरून ३१,८२४,६२८ ग्रॅम्स इतके वाढले.

उत्साहवर्धक गोळ्या व त्यासारख्या सोज्ज्वळ तोंडावळ्याने औषधांच्या दुकानातून मिळणाऱ्या रासायनिक मादक द्रव्यांचे प्रमाण १९६७ या वर्षात ३,२९२,५८३ ग्रॅम्सवरून १९,५६३६०७ ग्रॅम्सवर गेलेले आढळले.

सरकारने जप्त केलेल्या साठ्यांचे हे आकडे आहेत. चोरून गुप्तपणे होणारा प्रसार यापेक्षाही अधिक असलाच पाहिजे.

तरुणांच्या गुन्हेगारीप्रवृत्तीवर प्रकाश टाकणारे पुढील काही आकडे दृष्टीखालून जावेत असे आहेत. एकूण गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात तरुणांचा वाटा मोठ्या प्रमाणावर आढळतो या सत्यावर लेखकाने मुद्दाम बोट ठेवले आहे.

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांसाठी पकडण्यात येणाऱ्या १८ वर्षांखालील तरुणींचे प्रमाण ( विशेषतः उपनगरातील ) १९६० ते १९६७ या अवधीत १४९ टक्क्यांनी वाढल्याचे आढळून आले.

१९६८ या वर्षी तरुण गुन्हेगारांच्या संख्येत नेहमीपेक्षा सातपट वाढ झालेली आढळून आली.

गंभीर स्वरूपाच्या चोरीच्या गुन्हेगारांपैकी शेकडा ५४ एकवीस वर्षांच्या आतील तरुण होते.

१९६७ या वर्षी मनुष्यवधाच्या अपराधासाठी पकडलेल्या एकूण गुन्हेगारांपैकी शेकडा ९ अठरा वर्षे वयाखालचे तरुण होते आणि खुनाच्या अपराधासाठी पकडलेल्या एकूण गुन्हेगारांपैकी शे. ३७ पंचविशीच्या आतील तरुण होते.

अशा प्रकारचे आणखी किती तरी भेदक व बोलके आकडे श्री. रॅम्से क्लार्क यांनी आपल्या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. या पुस्तकात अमेरिकेचे अंतर्दर्शन स्पष्टपणे घडविण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

□ □ □

# ३

रशिया–इंग्लंड–अमेरिका या देशांतील जीवनातील संघर्षमयता, यांत्रिकता आणि अशांती–यामुळे त्या देशांतील अनेक संशोधक–चिंतक व मानवतेच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले वैज्ञानिकही भारताकडे आशेने पाहात आहेत. भारतीय संस्कृती–योग–इत्यादींचे अध्ययन-संशोधन करण्याकडे त्यांचा वाढता कल आढळून येतो. निरुपयोगी म्हणून आमच्या ज्या जुन्या आचारविचारांचा व सांस्कृतिक मूल्यांचा त्याग करण्याच्या विचारात आम्ही आहोत–नेमके तेच आचारविचार इंग्लंड–अमेरिकेतील प्रयोगशाळांतून शास्त्रीय संशोधनाचा विषय बनले आहेत; याची भारतीयांना कल्पनाही नाही.

'पतंजली' हे नाव आम्ही ऐकले आहे. 'पातंजल योगसूत्रे' या त्यांच्या ग्रंथाबद्दलही आमच्या कानी थोडेफार आले आहे. पण त्या ग्रंथात खरोखर काय आहे व जे आहे त्याचा मानवी जीवनाला काही विशेष उपयोग आहे का, याचा विचार आमच्या मनात येत नाही. मग त्या ग्रंथातील सिद्धांत अभ्यासण्याचे, अनुभवण्याचे दूरच राहो. या आमच्या उदासीन वृत्तीमुळे, आमच्या संस्कृतीने, धर्माने व तत्त्वज्ञानाने आम्हांला दिलेल्या कल्पवृक्षांची व चिंतामणींचीही आम्हांला ओळख उरली नाही. 'कल्पतरुतळवटीं बैसोनि झोळिये पाडी गाठी' अशी आमची करंटी वृत्ती झालेली आहे.

याच्या उलट पाश्चात्य पंडितांना भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती यांची रहस्ये समजून घेण्याने मानवी जीवनाच्या सार्थकतेची चिरंजीव मूल्ये हस्तगत होतील असा विश्वास वाटतो. ते नुसतेच जिज्ञासू नसतात, तर श्रमशील व प्रयोगशील असतात. पातंजल योगाचेच पाहा. ज्या श्रेष्ठ ग्रंथाचे महत्त्व व जीवनातील उपयुक्तता याबद्दल आम्ही अज्ञानी व उदासीन आहोत, त्याच ग्रंथाच्या अंतरंगाचा शोध घेण्याविषयी ते किती दक्ष आहेत याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऑस्ट्रेलियन डॉ. हॅन्स जेकब्स यांचे.

डॉ. हॅन्स जेकब्स हे ऑस्ट्रेलियात सुमारे नऊ वर्षे मानसोपचार पद्धतीचा ( सायकोथेरॅपी ) अवलंब करून वैद्यकीय व्यवसाय करीत होते. पाश्चात्य मानसशास्त्र बाल्यावस्थेत आहे, याचा अनुभव त्यांना आला होता. आपल्या विषयात व उपचारपद्धतीत प्रगती कशी करता येईल या चिंतनातून ते भारतीय योगाकडे वळले. ऑस्ट्रेलियात

राहूनच सुमारे चार वर्षे त्यांनी पातंजल योगाचा व इतर भारतीय ग्रंथांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्यांना असे आढळून आले की, पुस्तकी ज्ञानाने व पाश्चिमात्य पंडितांच्या माहितीवर विसंबून कार्य होणार नाही; भारतीय संस्कृती, धर्म व योग यांचे यथार्थ ज्ञान हवे असेल तर भारतातच गेले पाहिजे. हे पटल्यावर ते भारतात आले.

भारतात राहून त्यांनी पातंजल योगाचा मुळातून सूक्ष्म अभ्यास केला. स्वामी प्रत्यगात्मानंद सरस्वती हे त्यांचे सद्गुरू. प्रत्यक्ष भारतात आल्यामुळे त्यांचा अनेक प्रकारे लाभ झाला. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान यांनी ते विलक्षण प्रभावित झाले. पाश्चात्य मानसशास्त्र व मानसशास्त्रीय उपचारपद्धती खरोखरीच 'पाळण्यात' आहे हे त्यांच्या प्रत्ययास आले. भारतीय योगी व तत्त्वचिंतक यांनी मानसशास्त्राचा व एकूण मानवी जीवनाचा जो सखोल व सर्वस्पर्शी विचार केला आहे व जे सिद्धांत पतंजलींसारख्या महर्षींनी शब्दबद्ध केले आहेत त्यांच्या मानाने पाश्चात्यांना श्रेष्ठ व वंदनीय वाटणाऱ्या फ्रॉईड व युंग यांना मानवी मनाची व जीवनाची रहस्ये अद्याप काहीच समजलेली नाहीत. डॉ. हॅन्स जेकब्स यांनी असे उद्गार काढले आहेत की, भारतीय ऋषिमुनींच्या उत्तुंग ज्ञानापुढे शेक्सपीयर, बीथोवेन, रेम्ब्रां, यांसारखे प्रतिभाशाली नाटककार, संगीतकार, चित्रकार, पंडित व जीवनाचे भाष्यकार खुजे होत.

डॉ. हॅन्स जेकब्स यांनी भारतात जे पाहिले, अभ्यासले, अनुभविले ते सारे आपल्या एका ग्रंथात लिपिबद्ध केले आहे. भारतातून परत गेल्यावर त्यांनी 'वेस्टर्न सायकोथेरपी अँड हिंदू साधना' या नावाचा अत्यंत व्यासंगपूर्ण ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. ( प्रकाशक—जॉर्ज ॲलन अँड अनविन, लंडन, १९६१ )

भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक कशी बळकट, विश्वव्यापक, चिरंतन, मौलिक तत्त्वावर आधारित आहे, भारतीय ऋषिमुनींनी आणि चिंतकांनी मानवी जीवनाचा व विश्वाचा विचार–स्थूलाच्या–भौतिकतेच्या–पलीकडे जाऊन कसा केला आहे आणि माणसाच्या जीवनाचा उद्धार करणारी मूल्ये कशी अनुभूतिपूर्वक विशद केली आहेत याचे उत्कट दर्शन डॉ. जेकब्स यांनी आपल्या या अमोल ग्रंथात घडविले आहे. त्यांच्या या ग्रंथाच्या आवृत्ती जर्मन, फरेंच, स्वीडिश व स्पॅनिश या भाषांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

झूरिच येथील एक मानसोपचारतज्ज्ञ डॉ. मेडार्ड बॉस यांनी डॉ. जेकब्स यांच्याही पुढे दौड मारिली आहे. १९५६ मध्ये एकदा आणि १९५८ मध्ये दुसऱ्यांदा त्यांनी भारतयात्रा केली. भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास भारतीय पद्धतीनेच केला पाहिजे, हे तत्त्व पटल्यामुळे त्यांनी भारतीय गुरूच्या पायाशी बसून भारतीय योग व तत्त्वज्ञान यांचे परिशीलन केले. भारतीय तत्त्वज्ञान व मानसशास्त्र ही परस्परांस पूरक व पोषक असतात, याबद्दल डॉ. बॉस यांनी संतोष व्यक्त केला आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रात फलज्योतिष व खगोलशास्त्र या दोहोंचाही अंतर्भाव होतो याचे डॉ. बॉस यांना सहर्ष नवल वाटले, कारण पुष्कळसे पाश्चात्य पंडित फलज्योतिष हे शास्त्रच मानीत नाहीत व जे मानतात ते खगोलशास्त्रात त्याचा अंतर्भाव करीत नाहीत.

भारतयात्रेने व भारतीय विद्यांच्या सूक्ष्म अध्ययनाने प्रभावित झालेले डॉ. बॉस यांनी-'ए सायकियॉट्रिस्ट डिस्कवर्स इंडिया' या नावाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ( प्रकाशक ओसवाल्ड वूल्फ, लंडन-१९५६ ) काही अदूरदृष्टीचे व उथळ ज्ञानाचे पाश्चिमात्य पंडित भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती ही बाल्यावस्थेत आहे-अविकसित आहे असे मानतात. ते त्यांचे नुसते अज्ञानच नाही तर आकुंचिततेतून निर्माण झालेला तो हटवादी उद्धटपणा आहे असे परखड उद्‌गार डॉ. बॉस यांनी काढले आहेत.

डॉ. मॅक्स रॉजिस्टर हा जर्मन पंडित भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी नुकताच येथे येऊन गेला. भारतात भ्रमण केल्यावर व येथील अनेक शास्त्री, पंडित, साधुसंत, योगी व ज्योतिर्विद यांच्या भेटी घेतल्यानंतर भारतीय संस्कृती व भारतीय विद्या यांबद्दल त्यांच्या मनात नितान्त आदर निर्माण झाला. स्वदेशी परत गेल्यावर आपल्या अनुभवांवर आधारित भारत आणि भारतीय संस्कृती यांचे विशेष वर्णन करणारा ग्रंथ त्यांनी जर्मन भाषेत लिहिला. 'इंडियन इस्ट अँडर्स' हे त्या ग्रंथाचे नाव. भारतातील एक प्रख्यात ज्योतिषी-अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनचे संपादक डॉ. बी. व्ही. रामन यांच्या भेटीचा वृत्तांत त्यांनी आपल्या ग्रंथात विस्ताराने दिला आहे. भारतीय ज्योतिषशास्त्र किती प्रगत व अचूक आहे याचे त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. एकही प्रश्न न विचारता केवळ मुद्रा पाहून अथवा पत्रिकेची चौकट पुढे धरून डॉ. रामन यांनी डॉ. रॉजिस्टर यांच्या आयुष्यातील अनेक घटनांवर नेमके बोट ठेवले याचा त्यांना अचंबा वाटला. अनेक भारतीय पंडितांशी झालेल्या भेटीत त्यांना असे आढळून आले की, त्या पंडितांचे ज्ञान अगाध आहेच, पण ही सारी मंडळी अत्यंत शालीन-विनम्र आहेत. प्रत्येक वस्तुमात्रात विश्वचैतन्याचा अनुभव करण्याची भारतीयांची विशाल बुद्धी त्यांना आदर्श वाटली.

स्वामी योगानंद नावाच्या हटयोग्याच्या सहवासात डॉ. रॉजिस्टर काही काळ राहिले. स्वामी योगानंद यांचे कृश पण कांतिमान चपळ शरीर आणि त्यांच्या मुद्रेवरील तेज पाहून ते थक्क झाले. प्रसिद्धी आणि आत्मश्लाघा यांपासून अलिप्त असलेले स्वामी योगानंद गाजावाजा न करता अत्यंत साधेपणाने व निरलस निष्ठेने आपले कार्य सतत करीत असतात हे पाहून डॉ. रॉजिस्टर भारावून गेले. योगासने करताना होणाऱ्या हालचाली व अवघड आसने सहजपणे करण्यातील त्यांचे कौशल्य त्यांना असाधारण वाटले. योगसाधनेने आरोग्य तर लाभतेच पण योगातील काही प्रक्रियांनी म्हातारपण-देखील शरीरावर आक्रमण करू शकत नाही, याबद्दलचे काही निर्विवाद पुरावे त्यांनी पाहिले व भारतीय योगशास्त्राची श्रेष्ठता त्यांना पूर्णपणे पटली.

जीवमात्रात एकच ईश्वरी तत्त्व भरलेले आहे, या जाणिवेने सर्व जडचेतनविश्वात समभाव पाहणे हा भारतीय संस्कृतीचा विशेष साधुसंतांच्या व शास्त्रीपंडितांच्या आचरणात त्यांना प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळाला. भारतीयांचा कर्मसिद्धान्त त्यांनी समजावून घेतला. जप, मंत्र, अनुष्ठाने, पूजा, यज्ञ इ. साधनांनी जीवन शुद्ध, पवित्र, उन्नत करता येते

आणि प्रसंगी संकटावर विजय मिळविता येतो; या दृष्टीने ज्योतिषशास्त्राचा उपयोग कसा होतो याचे ज्ञान त्यांना झाले.

स्वामी सुदर्शनानंद नावाच्या एका सत्पुरुषाच्या सहवासात त्यांनी काही दिवस मुद्दाम घालविले. स्वामी सुदर्शनानंद यांना लठ्ठ पगाराची नोकरी होती. पण योगसाधना आणि अंतिम जीवनसाफल्य यासाठी त्यांनी ती सोडून दिली व ते स्वामी झाले याचे त्यांना नवल वाटले. स्वामी सुदर्शनानंद यांच्या सहवासाने आणि त्यांच्या मुखातून सतत स्रवणाऱ्या ज्ञानामृताने आपण धन्य व पावन झालो असे उद्‌गार डॉ. मॅक्स रॉजिस्टर यांनी आदराने काढले आहेत.

सायको सिंथेसिस या मानसशास्त्रीय शाखेचा प्रवर्तक डॉ. रॉबर्टो अॅसॅगिओली याच्याबद्दल मी ‘शांताचिया घरा’ या माझ्या पुस्तकात माहिती दिली आहे. ( पाहा पान ४१ ) डॉ. रॉबर्टो अॅसॅगिओली यांनी हिटलरच्या बंदिशाळेतील एकांताचा उपयोग करून पातंजल योगशास्त्राचा प्रत्यक्ष व्यावहारिक प्रत्यय घेतला होता. प्राणायाम, ध्यान-धारणा इ. योगाची साधना त्यांनी बंदिवासात निष्ठेने केली व त्यांना प्रकाशदर्शन झाले. पातंजलयोगात मानसशास्त्राचा जो सखोल व विस्तृत विचार केला गेला आहे-त्याचा अभ्यास प्रत्येक पाश्चात्य मानसशास्त्रज्ञाने आधी करावा, तरच मानसशास्त्रात त्यांची खरी प्रगती होईल, असे प्रत्ययकारी उद्‌गार डॉ. अॅसॅगिओली यांनी १९६२ साली या संदर्भात मत व्यक्त करताना काढले आहेत.

सायको सिंथेसिसचे त्यांनी वेगवेगळे प्रयोग करून व पद्धती अभ्यासून–त्या उपयुक्त व प्रभावी म्हणून प्रचलित केल्या. अद्याप प्रयोगशीलतेची, नव्या पद्धतीच्या संशोधनाची किती आवश्यकता आहे यासंबंधी तळमळीने बोलताना ते म्हणतात, “या क्षेत्रात पाश्चात्य व पौर्वात्य अशा दोन्हीही मानसशास्त्रवेत्त्या पंडितांच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. विशेषतः भारतात योग-अध्यात्म व शरीरशास्त्र यांच्या समन्वयात्मक ज्ञानाचे भांडारच आहे. भारतीय योगाच्या भिन्न भिन्न शाखांतील ज्ञान व प्रयोग यांचा अभ्यास व वापर पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांनी कटाक्षाने केला पाहिजे. म्हणजे पाश्चात्य मानसोपचारपद्धती व शास्त्र यात निश्चित सुधारणा होईल. भारतीय मानसशास्त्र व अध्यात्म एकजीव आहे, एकसंधी आहे. त्याचा उपयोग पाश्चात्य प्रयोगपंडितांनी अवश्य करून एकूण मानसशास्त्र व त्याच्या ज्ञानशाखा संपन्न व समृद्ध करण्याविषयी दक्ष राहावे.”

० ० ०

डॉ. केनेथ वॉकर हे इंग्लंडमधील एक प्रख्यात शस्त्रवैद्य आहेत. वैद्यकीपेक्षाही मानवी जीवनाच्या कल्याणाचे व तद्विषयक प्रमेयांचे त्यांनी अधिक चिन्तन केले आहे. जीवनशास्त्राचा त्यांनी मूलगामी अभ्यास केला आहे. भारतीय तत्त्वज्ञान–विशेषतः वेदोपनिषदे आणि योग यांनी ते विशेष प्रभावित झाले. तत्त्वज्ञानाच्या–तुलनात्मक

अभ्यासात त्यांना असे आढळून आले की, भारतीय ऋषीमुनींच्या ज्ञानाची खोली, उंची व व्यापकता पाश्चात्त्य चिन्तकांत व लेखकांत नाही. या दृष्टिकोनातून त्यांनी काही मौलिक तेजस्वी ग्रंथ लिहिले आहेत. त्यात ' Diagnosis of Man ' ' मानवतेचे भवितव्य ' हा त्यांचा ग्रंथ अनेक दृष्टींनी अप्रतिम आहे :

" अन्तिम सत्याचे जे भाष्यकार झाले त्यात भारतीय ऋषींची योग्यता सर्वश्रेष्ठ आहे; आणि माझ्या ग्रंथात मी व्यक्त केलेली मते वाचून पुष्कळांना मी पूर्वेचा पक्षपाती आहे असे वाटेल–पण त्याबद्दल मला खेद वा खंत नाही; उलट अभिमानच आहे. पाश्चात्त्यांनी विज्ञानाचा विकास व भौतिक प्रगतीचा उच्चांक गाठला असला तरी त्यांचे सारे ज्ञान-विज्ञान हे भौतिक, स्थूल व बाह्यांगविचारी आहे. पूर्वेकडील राष्ट्रांत आजही अज्ञान, अनारोग्य, अविकसितपणा व दारिद्र्य इत्यादी दोषांचे दर्शन घडत असले तरी त्यामुळे भारतीय ऋषिमुनींच्या ज्ञानसंपदेची योग्यता तिळमात्र कमी होत नाही. भारतासारख्या देशात दारिद्र्य असेल, दोष असतील, तरीही अप्रगत, अडाणी म्हणून भारतीयांना हिणविण्याचा पाश्चात्त्यांना अधिकार पोचत नाही. कारण याच प्राचीन देशांकडून व त्यांतील प्रज्ञावंतांकडून पाश्चात्त्यांना चिरंतन जीवनमूल्ये शिकावयाची आहेत. मानवाच्या आध्यात्मिक विकासाला उपयुक्त अशी जी विश्वोद्धारक मूल्ये भारतीय ऋषिमुनींनी निर्माण करून ठेविली आहेत, त्यांचा आश्रय उद्याच्या जगाला–( पाश्चात्त्यांना देखील– ) करावा लागणार आहे. ' अशा आशयाचे परखड उद्‌गार डॉ. केनेथ वॉकर यांनी आपल्या या ग्रंथात काढले आहेत.

डॉ. केनेथ वॉकर यांचा वेदोपनिषदांचा सूक्ष्म व मार्मिक अभ्यास दिसून येतो. उपनिषदांची थोरवी व काव्यमयता वर्णन करणारी काही वेचक वचने त्यांनी आपल्या ग्रंथात अंतर्भूत केली आहेत. क्रान्तदर्शी ऋषींच्या तत्त्वचिन्तनात्मक साहित्यात अपूर्व रसमयता कशी आहे याचे त्यांनी तन्मयतेने वर्णन केले आहे. ' वेदान्ताचे सारसर्वस्व ' म्हणता येईल असे दर्शविणारे मैत्र्युपनिषदातील काही उद्‌बोधक उतारे त्यांनी दिले आहेत.

वेदान्त व उपनिषदे यांवरील आपल्या भाष्यात लेखक स्वतःच इतका रंगून गला आहे की, त्याच्या त्या भाष्यालाही अपूर्व रसाळपणा व रमणीयता प्राप्त झाली आहे. बहुतेक उपनिषदे ही त्यातील अर्थगर्भ व सौंदर्यपूर्ण तत्त्वविवेचनामुळे महाकाव्ये बनली आहेत. त्यात वेदांतील ऋषींचा दिव्य संदेश आकर्षकपणे व आटोपशीरपणे प्रकट झाला आहे व त्यामुळेच त्याच्या सौंदर्याला अवीट गोडी प्राप्त झाली आहे, असा आपला अभिप्राय डॉ. केनेथ वॉकर यांनी मोकळेपणाने प्रकट केला आहे.

' Diagnosis of Man ' या ग्रंथात डॉ. केनेथ वॉकर यांनी केलेले ' ब्रह्म ' शब्दाचे विवेचन वाचून एका प्रवाशाला आनंद-समाधीचा विलक्षण व विस्मयकारक अनुभव कसा आला याचा वृत्तांत त्यांनी आपल्या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत ( १९६२ ) समाविष्ट केला आहे. रेनॉर जॉन्सन या लेखकाने तो मुळात आपल्या

'Watchers on Hill' या ग्रंथात निवेदन केला होता. 'शान्ताचिया घरा' या माझ्या पुस्तकात मी तो दिला आहे. पण तो पुन्हा वाचल्याने कोणाच्याही आनंदात व ज्ञानात भरच पडेल म्हणून मी तो या संदर्भात मुद्दाम पुन्हा उद्धृत करीत आहे.

( पेलिकन आवृत्ती १९६२, पान १७ )

घटना १९४८ सालच्या डिसेंबर महिन्यात घडली. सैन्यात काम करणारा एक गृहस्थ ( पुढे तो डॉक्टर झाला. ) नाताळच्या सुट्टीत प्रवासास निघाला होता. ज्या आगगाडीने तो निघाला होता, तिला गर्दी बेताची होती व तो ज्या डब्यात बसला होता त्यात तर दुसरा कोणीही प्रवासी नव्हता. गाडी चालू झाली. आपल्या जवळच्या सामानातून त्याने एक पुस्तक काढले व ते तो वाचू लागला. गाडीने वेग घेतला होता. पुस्तकानेही त्याच्या मनाचा वेध घेतला होता. डब्यातला पूर्ण एकान्त, वेगाने चाललेल्या गाडीची डोलविणारी लय, यामुळे हाती घेतलेल्या पुस्तकातील आशयाशी तो चटकन समरस झाला. ते पुस्तक होते डॉ. केनेथ वॉकरचे 'Diagnosis of Man.' त्यातील वेदान्त व उपनिषदे यावरील प्रकरणच तो वाचीत होता. 'ब्रह्म हे कसे सर्वव्यापी, सर्वांतर्यामी, अनंत, अपरिमेय व चिदानंदस्वरूप आहे, हे सारे दृश्य-अदृश्य विश्व हा त्या परब्रह्माचाच कसा चिद्विलास आहे याचे बहारीचे वर्णन वाचता वाचता त्याला अनन्यसाधारण आनंदाचा अनुभव आला. त्या वर्णनाने झालेल्या आनंदात तो बघता बघता बुडून गेला. क्षणभर त्याला स्वतःचा, भोवतालच्या पार्थिवतेचा संपूर्ण विसर पडला. आपण केवळ आनंदमयच आहोत असा साक्षात्कार त्याला झाला. त्या अवस्थेत ईश्वरी सान्निध्याची अनुभूती ती हीच असावी असे पण त्याला जाणवले. त्या अनुभूतीची सूक्ष्म संवेदना बाह्य विश्वातली नव्हती तर तो अंतरात्म्याचा आविष्कार असावा, असे त्याला भासले. आणि अनंत आनंदकल्लोळात तो विरून विरघळून गेला. ज्या सुखाला सीमा नाही–ज्या आनंदाला आवर नाही– असा काही तरी–अनुपमेय सुखप्रवाह–अनंत अमृतधारांप्रमाणे आपल्या अंगांगातून–रोमरोमातून स्रवतो–द्रवतो आहे, आणि त्या अमृताच्या अनामिक कारंज्याचा उगम कुठे तरी आत आत–अगदी खोल खोल आहे असली काही तरी अतींद्रिय संवेदना त्याला प्रतीत होत होती. आपण चैतन्यमय–सर्वशक्तिमान आहोत असाही एक आविर्भाव त्याच्या ठिकाणी स्फुरत होता.

गाडीत–गाडीबाहेर धावणाऱ्या वनोपवनांत, झाडांत, पाखरांत, आकाशात किंबहुना चराचरात आपण भरलेले आहो व आपल्यात ते सारे आहे. सर्व विश्व आपण आहोत व आपलाच अंश सभोवताली अनंत रूपाने नाचतो आहे, अशी एक विलक्षण एकात्मता, अभिन्नता, सर्वात्मकता प्रकर्षाने त्याच्या अनुभवास येत होती. त्याच्यातल्या 'मी' ने ब्रह्मरूप धारण करून विश्वैक्याचा साक्षात्कार त्याला घडविला होता.

साक्षात्काराचा हा अनुपम आनंदमय अनुभव काही मिनिटे टिकला. अपार व सहज आनंदाचे आलेले ते भरते हळूहळू ओसरले व काही वेळाने तो मूळ स्थितीवर आला. त्याला आलेला हा अनुभव, झालेला हा साक्षात्कार, घडलेले ब्रह्मरूपदर्शन इतके

अचूक, उत्कट व प्रत्ययकारी होते की, त्याच्या सत्यतेबद्दल त्याला शंकाच उरली नाही !

एका अज्ञात इंग्रज प्रवाशाला झालेला व एका प्रख्यात लेखकाने वर्णन केलेला हा साक्षात्कार उपनिषदांचा वारसा सांगणाऱ्या आम्हा भारतीयांना काहीच साक्षात्कार घडवू शकणार नाही का ?

डॉ. केनेथ वॉकर यांनी ' The Circle of Life ' ( जीवनाचे रहाटगाडगे ) या नावाचा आणखी एक ग्रंथ लिहिला आहे. 'मृत्यू'चा विचार करताना डॉ. वॉकर यांनी भारतीयांच्या कर्मसिद्धांताचा पाठपुरावा केला आहे-ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

ॲलन डब्ल्यू. वॅट्स ( Alan W. Watts ) हा एक अमेरिकेचा नव्या पिढीचा, ताज्या दमाचा तडफदार लेखक-ग्रंथकार. त्याच्या लेखणीला विलक्षण धार आहे. जगातील तत्त्वज्ञानाचा-संस्कृतीचा त्याचा अभ्यास आरपार आहे. त्याच्या विचारांना दिशा आहे-दृष्टिकोनात चैतन्य आहे-आशा आहे. L. S. D. सारख्या मादक द्रव्याचा प्रत्यक्ष अनुभव त्याने घेतला आहे. त्याबरोबरच ध्यानधारणेच्या द्वारे लाभणाऱ्या समाधी-साक्षात्काराचाही आनंद त्याने लुटला आहे. आजच्या अर्थ हीन व आदर्शशून्य अमेरिकन जीवनपद्धतीचे तो आपल्या लेखनात वाभाडे काढतो, विज्ञानाचा विकास, यांत्रिकता, आणि भोगवाद यांच्या अवलंबनाने सुखी होण्याऐवजी संत्रस्त व संभ्रांत झालेल्या मानवतेला खरे सुख, खरी शांती हवी असेल तर त्यासाठी भारतीयांच्या वेदान्ताला शरण गेले पाहिजे; तरच तरणोपाय आहे-असा त्याचा स्पष्ट संदेश आहे. वेदान्ताच्या शिकवणुकीसारखे तारक व उद्धारक असे जगात दुसरे कोणतेही तत्त्वज्ञान नाही, असे आपल्या ग्रंथातून हा लेखक हिरीरीने प्रतिपादन करतो.

चंद्र-मंगळावर अवकाशयाने नेण्याच्या व्यर्थ खर्चिक खटाटोपापेक्षा आधुनिक माणूस आपल्या अंतरंगाच्या अंतराळात अवगाहन करील तर ते त्याच्या व जगाच्या दृष्टीने अधिक उपकारक, कल्याणप्रद ठरेल असे तो खणखणीतपणे बजावतो. चंद्र-मंगळावरील मातीचे ढिगारे उपसण्यात आणि उकिरडे तपासण्यात खरा पराक्रम नाही आणि त्यामुळे मानवतेच्या सुखशांतीचा-सुरक्षिततेचा प्रश्न मुळीच सुटणार नाही-असे आपले मत प्रतिपादन करताना त्याने फ्रेड हॉईलसारख्या प्रख्यात शास्त्रज्ञाच्या मताचा पुष्टिकारक पुरावा सादर केला आहे.

ॲलन वॅट्स यांचा- ' The Book ' हा ग्रंथ या दृष्टीने अवश्य वाचावा असा आहे. त्याचे अन्य ग्रंथही असेच उद्बोधक, सडेतोड, प्रेरक व विचार-प्रवर्तक आहेत.

अमेरिकेचा पहिला अणुबॉम्ब तयार करणारा थोर शास्त्रज्ञ रॉबर्ट-ऑपेनहॅमर याचे नाव बहुश्रुत वाचकांच्या परिचयाचे असेल. विलक्षण बुद्धिमान असलेला हा शास्त्रज्ञ संस्कृत भाषा शिकला आहे. भारतीय तत्त्वज्ञानाशी आणि विशेषतः श्रीमद् भगवद्‌गीतेशी त्याचा गाढ परिचय आहे. किंबहुना भगवद्‌गीतेची त्याच्या मनावर सर्वाधिक मोहिनी आहे.

शास्त्रज्ञ या नात्याने त्याने आपल्या मायदेशाची-अमेरिकेची फार मोठी सेवा

केली आहे. पहिला अणुबॉम्ब तयार करण्याची महत्त्वाची व अत्यंत अवघड कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. आपल्या ज्ञानाचा, बुद्धिमत्तेचा, परिश्रमांचा परिपूर्ण उपयोग करून त्याने १९४५ च्या जुलै महिन्याच्या सोळा तारखेस पहिला यशस्वी चाचणी अणुस्फोट केला.त्या स्फोटामुळे जो प्रचंड हादरा बसला आणि त्याचे जे प्रलयंकर स्वरूप अनुभवास आले, त्यामुळे हा ऋषितुल्य शास्त्रज्ञ व्यथित झाला; आणि त्या वेळी त्याच्या मुखातून- ‘ कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो ’- हे श्रीकृष्णाचे भगवद्गीतेतील उद्गार बाहेर पडले-ही सत्यकथा फार बोलकी आहे. पुढे जपानवर अणुबॉम्ब टाकल्यावर जो अभूतपूर्व अनर्थ झाला तो पाहिल्यावर रॉवर्ट ऑपेनहॅमर याने अणुशक्तीचा असा विश्वविनाशाच्या कामी उपयोग होऊ नये असा प्रचार तर केलाच, पण आपल्या उच्च अधिकाराचा-पदाचा त्याने त्याग केला.

श्री शंकराचार्य ही भारताची महान विभूती. ‘ सौंदर्यलहरी ’ ही त्यांची एक रसपूर्ण रचना. पण या रचनेचे सौंदर्य आणि तिच्यातील सामर्थ्य यांची यथार्थ प्रतीती घडविणारा अप्रतिम विवेचक ग्रंथ निर्माण करतो तो एक अमेरिकन रसज्ञ-मर्मज्ञ ! त्या महाभागाचे नाव आहे-डब्ल्यू नॉर्मन ब्राऊन. सौंदर्यलहरींनी आकर्षित होऊन तो भारतात आला. अनेक दुर्मिळ ग्रंथ-जुनी हस्तलिखिते, चित्रे, मुद्रा--इत्यादी साहित्याचा त्याने शोध घेतला, अभ्यास केला. रसिकतेला परिश्रमांची जोड देऊन त्याने एक अभ्यसनीय ग्रंथ जगाला उपलब्ध करून दिला. ‘ The Flood of Beauty ’ हे त्या ग्रंथाचे इंग्रजी नाव.

आमचे शंकराचार्य-आमच्या सौंदर्यलहरी. पण यांचा उपयोग या रसज्ञ संशोधकाने असा काही केला की, त्याच्या ग्रंथकृतीच्या केवळ दर्शनाने दृष्टी तृप्त व्हावी-हृदय प्रसन्न, उन्नत व्हावे ! याच पंडिताने अशाच परिश्रमांनी प्रसिद्ध व प्रचलित अशा ‘ महिम्न ’ स्तोत्राचेही असे काही सुबक व सुखद ग्रंथदर्शन घडविले आहे की, कोणीही त्याची प्रशंसा करावी, त्याला धन्यवाद द्यावे !

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आमचे, भागवत धर्म आपला, त्या भागवत धर्माची शिकवण असलेला हरिपाठ आमच्याजवळ असूनही आमची त्या अमोल ठेव्याकडे बहुधा पाठच असते. एक फ्रेंच विदुषी शार्लें वोद्रेविल-या हरिपाठाने आकर्षित होते. प्रभावित होते. हरिपाठाच्या अभ्यासाच्या ओढीने भारतात येते. संस्कृत, मराठी या अवघड भाषा अभ्यासते. संतवाङ्मयाचे परिशीलन करते. हरिपाठाच्या अभंगातील सूक्ष्म संकेत, बहारदार बारकावे अचूक हेरते आणि त्यावर प्रबोधक प्रबंध लिहिते. तोही इतका रसमय व परिणामकारक की, कोणीही त्याच्या वाचनाने डोलावे, आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलावे !

हीच अभ्यासू वृत्ती, हीच परिश्रमशीलता व हीच भारतप्रीती-आणखी एका तरुण परदेशी विद्यार्थिनीच्या ठिकाणी नुकतीच दिसून आली. महाराष्ट्रातल्या कर्तृत्वशील पण काहीशा कुविख्यात अशा चित्पावन-या ब्राह्मणांच्या एका प्रमुख शाखेच्या साऱ्या वैशिष्ट्यांचा व वैगुण्यांचा यथातथ्य परामर्श घेणारा एक असा काही अभ्यासपूर्ण मार्मिक ोचक लेख या विद्यार्थिनीने टाईम्सच्या साप्ताहिक आवृत्तीत ( Illustrated

Weekly of India ) लिहिला की, खुद्द चित्पावनांच्या विद्यमान अंकुरांनी देखील त्या लेखाच्या दर्पणात आपली कालची व आजची हुबेहूब प्रतिबिंबे कौतुकाने व आश्चर्याने न्याहाळावीत !

आल्डुस हक्सले हा लेखक व पंडित भारताशी अनेक प्रकारे समरस झाला होता. भारतीय संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा त्याचा गाढा व्यासंग होता. भारतीय योग व तंत्रशास्त्र यातही त्याची चांगली गती होती. क्रिस्टोफर ईशरवुड यांनी संपादन केलेल्या श्री भगवद्गीतेच्या आवृत्तीला त्याने विद्वत्तापूर्ण व विवेचक प्रस्तावना लिहिली आहे. हक्सले हा नुसताच लेखक वा पंडित नव्हता तर प्रयोगवीरही होता. हिंदूंच्या संध्यावंदनाचे व गायत्रीमंत्राचे महत्त्व पटल्यामुळे तो कित्येक दिवस एखाद्या कर्मठ आचारनिष्ठ ब्रह्मश्रेष्ठाप्रमाणे संध्या करण्यात धन्यता मानीत असे.

भारतीय योगाच्या अभ्यासात त्याला समाधी व सिद्धींचे महत्त्व समजले होते. समाधीतील अवस्थेचा अनुभव L. S. D. सारख्या काही मादक–उत्तेजक रसायनांच्या सेवनाने होऊ शकेल; या कल्पनेने त्याने तसे प्रयोग स्वतः करून पाहिले. या त्याच्या उपक्रमांचा परिणाम म्हणजेच–' The Doors of Perception ' व ' The Brave New World ' या त्याच्या असाधारण ग्रंथांची निर्मिती.

टागोर जन्मशताब्दीच्या निमित्ताने एक चिलीयन साधक संशोधक–मिगुएल सेरानो याच्यासह हक्सले भारतात मुद्दाम आला होता. भारतीय योग व तंत्र यांचा अधिक अभ्यास हा त्याच्या भारतभेटीचा एक प्रमुख उद्देश होता. '–Vedant For Modern Man ' या ' Collier Books ' ( १९६२ ) द्वारा प्रकाशित झालेल्या लेखसंग्रहात आल्डुस हक्सले याचे–भारतीय तत्त्वज्ञान–योग इ. विषयावरील बरेच उद्‌बोधक लेख वाचावयास मिळतात.

अर्नाल्ड टॉयन्बी हे एक वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व चिन्तनशील असे इंग्रज लेखक आहेत. ते इतिहासकार म्हणून प्रख्यात आहेत. या विषयावरील त्यांचे व्यासंगी व विपुल लेखन विद्वानांच्या प्रशंसेचा विषय झाले आहे. इतिहासाच्या अभ्यासात स्वाभाविकच जगातील संस्कृतींचा अभ्यास ओघानेच आला. अशा या थोर लेखकाला व विचारवंताला भारतीय संस्कृतीबद्दल अपार आस्था व अभिमान वाटतो. भारतीय ऋषिमुनींच्या अध्यात्मज्ञानावर श्री. टॉयन्बी लुब्ध आहेत. भगवद्गीता या ग्रंथाबद्दल त्यांना एवढा आदर आहे की स्वतःबरोबर भगवद्गीतेची एक प्रत ते सदैव बाळगीत असतात. आजच्या संत्रस्त व संभ्रान्त मानवतेला जर कशाची सर्वाधिक आवश्यकता असेल तर ती धर्माची आहे. सर्वसहिष्णु, सर्वसमावेशक अशा, सर्वात्मक धर्माची. आज असा धर्म जगात एकच आहे. तो म्हणजे हिंदुधर्म–वेदांतधर्म ( मात्र हिंदुधर्मातील कर्मकांड–जातीयवाद ही मात्र त्यांना मान्य नाहीत. )

' मृत्यू–' या विषयावरील एका परिसंवादात त्यांनी भाग घेतला. त्या विषयाचे उत्कृष्ट विवेचन तर त्यांनी केले आहेच, पण आपल्या या विवेचनाच्या शेवटी ते

' तत्त्वमसि ' या भारतीय आध्यात्मिक सिद्धान्तावर येऊन ठेपले आहेत; ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. टॉयन्बीसारख्या श्रेष्ठ लेखकाला व सखोल चिंतकाला भारतीय संस्कृती, अध्यात्म यांबद्दल वाटणारी आस्था निश्चयाने चिंतनीय आहे.

डॉ. जे. बी. ऱ्हाईन हे अमेरिकेचे एक फार थोर ऋषितुल्य संशोधक आहेत. अतींद्रिय मानसशास्त्र आणि मानवी मनाची गूढ सामर्थ्ये यांच्या शास्त्रशुद्ध अभ्यासासाठी ते गेली तीन तपे अमेरिकेच्या ड्यूक विद्यापीठात संशोधनाचे कार्य निरलसपणे आणि ध्येयवादाने करीत आहेत. त्यांची पत्नी लुईझा ऱ्हाईन हिचे त्यांना, संसाराइतकेच या शोधकार्यातही सहकार्य आहे.

आपल्या संशोधनावर आधारित असे काही मौल्यवान ग्रंथ डॉ. ऱ्हाईन यांनी प्रसिद्ध केले आहेत. ' दि न्यू फ्राँटियर्स ऑफ दि माईंड ', ' दि न्यू वर्ल्ड ऑफ माईंड ' यांसारखे त्यांचे अनेक ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेची व मौलिक संशोधनाची यथार्थ कल्पना देतात.

अशा या शास्त्रज्ञाला भारताविषयी विशेष आदर व आपुलकी वाटते. भारतातील एक प्राध्यापक डॉ. व्ही. व्ही. अकोलकर हे डॉ. ऱ्हाईन यांच्या सहवासात काही काळ अभ्यास व संशोधन करीत होते. आपला अभ्यासक्रम संपवून ते भारतात परत यावयास निघाले त्यावेळी डॉ. ऱ्हाईन यांनी अत्यंत कळकळीने पुढील आशयाचे उद्‌गार काढले; ' तू भारतासारख्या देशाचा नागरिक आहेस. एक तर तू परत जाऊ नकोस; या विषयाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तू येथेच राहा. कारण उद्याच्या अतींद्रिय ज्ञानाच्या संशोधनाची मुख्यत्वे भारत हीच कार्यभूमी राहणार आहे. त्या दृष्टीने संशोधनासाठी तुला आवश्यक त्या सर्व सोयी–सवलती व साधने मी उपलब्ध करून देईन. आणि तुला भारतात जाणे भागच असेल तर एक काम अवश्य कर. आपल्या या अतींद्रिय मानसशास्त्र संशोधनाची एक शाखा तू पुण्यात स्थापन कर. एखाद्या महाविद्यालयाशी ती संलग्न ठेव–आणि संशोधनाचे काम चालू कर. तुझ्या या शाखेसाठी लागणारी सारी साधने व सहाय्य तुला मिळावे यासाठी मी आवश्यक ती सारी खटपट करीन. मी निवृत्त होण्याच्या मार्गावर आहे आणि म्हणून भारतात परत जाताच तू शाखा–स्थापनेचे कार्य तातडीने कर. "

डॉ. अकोलकर यांनी डॉ. ऱ्हाईन यांची तळमळ ध्यानी घेऊन–पुण्यात पॅरासायकॉलजीचे–अतींद्रिय मानसशास्त्राचे संशोधनकेंद्र–वाडिया महाविद्यालयाच्या सहकार्याने चालू केले आहे. डॉ. अकोलकर यांच्या सौजन्याने डॉ. ऱ्हाईन यांची काही अशीच आस्थापूर्ण पत्रे वाचण्याचा योग लाभला आणि या थोर शास्त्रज्ञाचे आपल्या शास्त्रावरील व भारतावरील प्रेम पाहून अंतःकरण अभिमानाने दाटून आले.

मिरज येथील डॉक्टर गोसावी हे कर्करोग्यांवर उपचार करण्यात निष्णात आहेत. मिरजेस व्याख्यानासाठी गेलो असता, तेथील रसिक व आतिथ्यशील इनामदार कुटुंबाच्या सौजन्याने डॉ. गोसावींच्या भेटीचे सौभाग्य साधता आले. थोडया वेळात आम्ही

पुष्कळशा गोष्टी बोललो. त्यात डॉ. गोसावी यांनी सहज निवेदन केलेली एक छोटी गोष्ट माझ्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. भारत व भारतीय यांच्याबद्दल परदेशात किती जिज्ञासा व आस्था आहे, यावर प्रकाश टाकणारी ती गोष्ट आहे. ज्या एका थोर तज्ज्ञ डॉक्टरांच्या हाताखाली डॉ. गोसावी काम करीत होते त्यांचा– शिक्षणक्रम संपवून मायदेशी परतताना डॉ. गोसावी निरोप घेत होते; त्यावेळी ते थोर डॉक्टर, डॉ. गोसावी यांना म्हणाले, ‘ स्वदेशी परत गेल्यावर एक गोष्ट न विसरता कर. तुझ्या गावापासून पुणे दूर नसावे. पुण्याजवळ एक मंदिर किंवा मशिदीसारखे ठिकाण आहे. मी असे ऐकले आहे की, त्या ठिकाणी दोन वाटोळे दगड आहेत. त्या दगडांना ८|१० माणसांनी मिळून–एकाच वेळी बोटांनी नुसता स्पर्श करताच दगड अलगद उचलले जातात. हा चमत्कार खरेच घडतो का हे तू स्वतः जाऊन पाहून खात्री करून घे व मग मला कळव. खरोखर तसे घडत असेल तर ती अद्‌भुत घटना पाहण्यासाठी मी भारतात अवश्य येईन. ’

डॉ. गोसावींशी भेट होईपर्यंत पुण्यापासून अगदी जवळ पुणे–सातारा मार्गावर असलेल्या शिवापूर येथील दरग्यातील–हा चमत्कार मीही प्रत्यक्ष पाहिला नव्हता. अमेरिकेतला एक थोर डॉक्टर जी गोष्ट मुद्दाम भारतात येऊन समक्ष पाहू इच्छितो ती आमच्या अगदी जवळ असूनही मी पाहिली नव्हती. मिरजेहून परत आल्यानंतर मी पहिली गोष्ट केली ती ही की, माझ्या काही चिकित्सक मित्रांसह मी शिवापूर येथील त्या दरग्यात गेलो आणि नुसत्या ८–१० माणसांच्या अंगुलीस्पर्शाने तिथल्या मैदानातला तो दगड उचलला जातो; हा चमत्कार स्वतः पाहिला, तेव्हा माझे समाधान झाले. परदेशी मंडळींना भारताबद्दल केवढी जिज्ञासा व जिव्हाळा आहे–याचा एक सहज पुरावा म्हणून हे सकृत् दर्शनी क्षुल्लक वाटणारे वृत्त मी सादर केले आहे.

एडवर्ड थॉर्न्टन या नावाचा एक इंग्रज साधक आहे. आपल्या आध्यात्मिक अनुभवांवर आधारलेला एक आत्मचरित्रात्मक ग्रंथ त्याने प्रसिद्ध केला आहे. ‘ The Diary of a Mystic ’ ( साधकाची दैनंदिनी ) हे त्या ग्रंथाचे नाव. हा गृहस्थ जन्माने इंग्रज आणि धर्माने ख्रिश्चन असूनही स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथवाचनाने विलक्षण प्रभावित झाला. विवेकानंदांच्या प्रत्यक्ष भेटीसाठी तो आतुर झाला. पण तपास करता त्याला समजले की, आपल्या अंतःकरणावर एवढा प्रभावी ठसा उमटविणारे स्वामी विद्यमान नाहीत. स्वामी विवेकानंदांच्या सहवासात राहिलेल्या टॅन्टाईन मॅकलिऑड नावाच्या एका भगिनीचा शोध काढून त्याने तिची भेट घेतली. योगायोगाने डॉ. केनेथ वॉकर यांचे ‘ Diagnosis of Man ’ हे पुस्तक त्याच्या हाती पडले. त्या पुस्तकाच्या वाचनाने तर तो अधिकच प्रभावित झाला. डॉ. केनेथ वॉकर यांची त्याने समक्ष भेट घेतली.

एडवर्ड थॉर्न्टन याने त्यानंतर भारतीय योगाचा आणि वेदोपनिषदांचा अभ्यास केला. भारताच्या श्रेष्ठ आध्यात्मिक वाङ्मयाचा हा अभ्यास, त्याच्या साधनेतील प्रगतीला

उपकारक ठरला. स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेने आपल्या नित्य पठणासाठी त्याने एक वैदिक प्रार्थना निवडली.

एडवर्ड थॉर्न्टन श्री रामकृष्ण परमहंसांना ईश्वरी अवतार मानू लागला. स्वामी विवेकानंदांना आपले सद्‌गुरुपद देऊन तो प्रतिरात्री झोपी जाण्यापूर्वी अनन्यशरणतेने ती प्रार्थना एकाग्रपणे करू लागला.

त्या प्रार्थनेने त्याचे अंतःकरण उजळू लागले. विवेकानंदांच्या विषयीची भक्ती आणि रामकृष्ण परमहंसांविषयीचा त्याचा पूज्यभाव प्रत्यही वाढतच गेला.

एका रात्री थकून भागून आलेला एडवर्ड थॉर्न्टन झोपी जाण्यापूर्वी आपल्या सद्‌गुरूंचे स्मरण करून श्री रामकृष्णांना शरण जाऊन डोळे मिटून प्रार्थनेत निमग्न झाला. काही क्षण तो स्वतःला विसरून गेला. प्रार्थना संपून त्याने आपले डोळे उघडले तो त्याच्या उघडया डोळयांना एक अपूर्व चमत्कार दिसला. त्याची खोली दिव्य प्रकाशाने कोंदून गेली होती. पाहाता पाहाता त्या प्रकाशातून त्याच्या समोर येशू ख्रिस्ताची तेजोमय आणि हास्यमुखी मूर्ती उभी राहिली. साक्षात्काराचा तो क्षण एडवर्ड थॉर्न्टनचे जीवन उजळून टाकणारा होता. तो अवाक् होऊन त्या दिव्य मूर्तीकडे पाहात असतानाच हळूहळू ती मूर्ती प्रकाशात वितळन अंतर्धान पावली. एडवर्ड थॉर्न्टन याला त्या घटनेचा नीट उलगडाच होईना.

या घटनेने तो विवेकानंदांशी अधिकच एकरूप झाला. त्याचा अभ्यास तर अनेकांगांनी वाढलाच; पण आपल्या गुरूच्या प्रेमामुळे त्याला त्यांच्या जन्मभूमीचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. ती त्याची इच्छा लौकरच पूर्ण झाली. त्याचा भारतयात्रेचा योग जमून आला. ज्या ज्या ठिकाणी आपल्या गुरूची पावले उमटली त्या सर्व पुण्यस्थळांना त्याने भेटी दिल्या. भारतातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रे त्याने पाहिली. हिमालयाच्या दिव्य भव्य दर्शनाने त्याला महासुखाचा लाभ झाला. श्री रामकृष्णांची जन्मभमी कामारपुकुर या गावी त्यांच्या झोपडीत त्याने मुद्दाम एक रात्र वास्तव्य केले. त्या रात्री स्वप्नात श्री रामकृष्णांनी बाल स्वरूपात दर्शन देऊन त्याला धन्य केले.

एडवर्ड थॉर्न्टन या इंग्रज साधकाला, ज्या एका प्रार्थनेच्या प्रभावाने साक्षात्कार साध्य झाला ती वैदिक प्रार्थना कोणती होती? ज्या तीन ओळींच्या प्रार्थनेत भारतीय तत्त्वज्ञानाचे सार-सर्वस्व ग्रथित झाले आहे ती प्रार्थना अशी होती :

ॐ असतो मा सद्‌गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्मा अमृतम् गमय॥

वेद, उपनिषदे, गीता यांपैकी कशाशीही तुमचा परिचय नसला तरी ही एक प्रार्थना जर तुम्हाला कळेल तर अध्यात्मातील फार मोठे रहस्य तुम्हाला गवसले असे होईल. म्हणूनच रवींद्रनाथ ठाकूर यांनी 'Personality' या आपल्या ग्रंथात सर्व

भारतीय प्रार्थनांत या ऋचांना अग्रस्थान दिले आहे.

'ॐ असतो मा सद्गमय'–या प्रार्थनेच्या–प्रभावाची आणखी एक अशीच सत्यकथा या संदर्भात अवश्य ऐकावी अशी आहे. प्रार्थना आमची–पण तिचे महत्त्व आमच्यापेक्षाही भावशील परदेशीयांच्या कसे ध्यानी येते हे पाहण्यासारखे आहे.

डॉ. आल्फ्रेड कूपर वूल्नर हे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे पदवीधर–प्राध्यापक आपल्या वयाच्या २५ व्या वर्षी ते भारतात–पंजाब विद्यापीठाचे रजिस्ट्रार आणि Oriental महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नियुक्त झाले. १९२० नंतर ते आधी विद्या-पीठाचे डीन, व नंतर व्हाइस–चॅन्सेलर झाले.

प्रा. वूल्नर आणि त्यांची सहचारिणी मेरी एमिली वूल्नर या दोघांचे एकमेकांवर दवी प्रेम होते. त्या दोघांनाही भारत, भारतीय, अध्यात्म, भारतीय संस्कृती याबद्दल अपार प्रेम होते. प्रा. वूल्नर यांनी आपल्या कारकीर्दीत फार मोठे भरीव कार्य केले. ते पट्टीचे संशोधक होते. निरलस परिश्रम आणि सखोल संशोधन याबद्दल त्यांची ख्याती होती. वैदिक संस्कृतीचे संशोधन हा त्यांचा मुख्य अभ्यासविषय होता.

वयाच्या ५८ व्या वर्षी प्रा. वूल्नर कर्तृत्वाच्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच एकाएकी अकाली निधन पावले. असंख्य सहकाऱ्यांना व विद्यार्थ्यांना त्यांच्या आकस्मिक मृत्यूने धक्का बसला. त्यांची पत्नी तर हतबुद्धच झाली.

तिने आपले उरलेले आयुष्य पतीचे स्मरण करीत व त्याचे विश्वमोलाचे कार्य पुढे चालविण्यास साह्यभूत होत घालविले. आपल्या पतीच्या कार्याचे व जीवनाचे बोलके स्मारक म्हणून लाहोर येथे उभारलेल्या प्रा. वूल्नर यांच्या समाधीवर तिने 'ॐ असतो मा सद्गमय' ही प्रार्थना कोरण्याचा निर्णय घेतला. आणि ख्रिश्चनधर्मीयांच्या व काही इंग्रज अधिकाऱ्यांच्या विरोधाला यत्किंचितही न जुमानता तिने तो प्रत्यक्षात आणला! डॉ. वूल्नर यांच्या कार्याची आणि 'ॐ असतो मा' या प्रार्थनेची थोरवी गाणारे हे स्मारक आजही लाहोर येथे उभे आहे!

रामायण, महाभारत, गीता, भागवत हे आपले पूज्य–पवित्र राष्ट्रीय ग्रंथ. पण या ग्रंथांत काही विज्ञान असेल अशी कल्पनाही आपल्याला बहुधा शिवत नाही. केवळ श्रद्धेने व भाविकपणाने आपण त्यांच्याकडे पाहतो. आधुनिक विज्ञानाचे महर्षी श्री. आइन्स्टीन यांच्या सापेक्षवादाच्या सिद्धांताचा उगम हिंदूंच्या महाभागवत या थोर ग्रंथात आहे; असे कोणी सांगितले तर आपला त्यावर विश्वास बसणार नाही. पण वस्तु-स्थिती अशी आहे की एका जाणकार लेखकाने आपल्या एका ग्रंथात त्यावर प्रकाशझोत टाकला आहे. या लेखकाचे नाव **Lobsang Rampa** लाब्संग रम्पा–असे आहे; आणि ज्यात यासंबंधीचे विवेचन त्याने केले आहे तो ग्रंथ '**The Chapters of Life**' या नावाने प्रसिद्ध आहे. ( पाहा–स्वस्त आवृत्ती. कॉर्गी बुक्स आवृत्ती १९७०, पाने ७०।७१ ) लाब्संग रम्पा याने उल्लेखिलेली श्रीमद्भागवतातील, कथा सारांशरूपाने अशी :—

एक होता राजा. त्याला एक मुलगी होती. मुलगी मोठी झाली–वयात आली.

पण तिला अनुरूप असा वर मिळेना. त्यामुळ तिचा विवाह ही एक समस्या झाली. या संदर्भात राजाने प्रत्यक्ष ब्रह्मदेवाची भेट घेण्याचे ठरविले. मुलीला बरोबर घेऊन तो ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवाची आणि त्याची भेट झाली. राजाच्या चिंतेचे निवारण करून ब्रह्मदेवाने त्याला आपल्या कन्येसह परत पृथ्वीवर जाण्यास सांगितले. पण जाताना ब्रह्मदेवाने एक महत्त्वाची गोष्ट राजाच्या निदर्शनास आणली. पृथ्वीवरची आणि ब्रह्मदेवाच्या सत्यलोकातील कालगणना कशी भिन्न आहे आणि ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे पृथ्वीवरची अनेक सहस्र वर्षे-कशी होतात हे राजाला ब्रह्मदेवाने समजावून सांगितले. पृथ्वीवरचे आणि ब्रह्मदेवाच्या सत्यलोकातील 'परिमाण' (Dimension) वेगळे आहे आणि म्हणून आता पृथ्वीवर परत गेल्यावर तुला सर्व लोक-सर्व वातावरण बदललेले आढळेल. एक नवे युग पृथ्वीवर अवतीर्ण झाले असेल आणि त्यात श्रीकृष्ण नावाचा एक पराक्रमी पुरुष प्रसिद्धीस आलेला असेल. त्याचा थोरला भाऊ बलराम हा तुझ्या कन्येचा भावी पती नियोजित केला गेलेला आहे. त्या दृष्टीने तू पृथ्वीवर गेल्यावर शोध घे. म्हणजे तू आणि तुझी कन्या दोघेही सुखी, निश्चिंत व्हाल.

ब्रह्मदेवाने सांगितल्याप्रमाणे त्या राजाची ती कन्या रेवती-ही बलरामाची अर्धांगी झाली.

या कथेचा उल्लेख करून लॉब्संग रम्पा याने हे विशद केले आहे की प्राचीन काळच्या ऋषीमुनींना कालगणनेचे व विविध भिन्न परिमाणांचे (Dimensions) सम्यग् ज्ञान होते.

भारतीय संस्कृतीत, तत्त्वज्ञानात आणि धर्मात अनेक गोष्टी प्रतीकांच्या सहाय्याने सांगितल्या जातात. ब्रह्मदेवाच्या चार तोंडांचा अर्थ पुष्कळ प्रकारे केला गेला आहे. पण ब्रह्मदेवाची चार तोंडे हे चतुर्मितीचे (Fourth Dimension) द्योतक किंवा सूचक आहे ही कल्पना अवश्य विचार करण्यासारखी आहे.

भागवतातील या व यासारख्या अन्य कथांच्या वाचनातून व अभ्यासातूनच आइन्स्टीनला आपल्या विश्वविख्यात सापेक्षवादाची कल्पना सुचली असली पाहिजे असे लॉब्संग रम्पा याने मार्मिकपणे प्रतिपादन केले आहे.

लॉब्संग रम्पा हा स्वतः एक तिबेटमधील योगी-लामा-आहे. योग व गूढ विद्यांचे त्याचे ज्ञान सखोल व अचूक आहे. तर्कबुद्धीच्या पलीकडच्या अनेक अतींद्रिय गूढ घटनांचा त्याने आपल्या अनेक ग्रंथांतून रोचक ऊहापोह केला आहे. भागवतातील कथेवरून आइन्स्टीनला आपला शोध सुचला असणे शक्य आहे हे त्याचे विधान काहीसे अतिशयोक्तीचे व धाडसाचे वाटले तरी भागवतातील त्या कथेत कालगणनेची व विविध परिमाणांची रहस्ये लपलेली आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही आणि या दृष्टीने ज्याला आपण केवळ एक पुराण समजतो त्या भागवतासारख्या प्राचीन ग्रंथातील रहस्यावर त्याने टाकलेला प्रकाश चिन्तनीय-मननीय नाही-असे कोण म्हणेल ?

या संदर्भात पुराणातील व संतांच्या चरित्रांतील अनेक प्रसंग हे अंधःश्रद्धेतून

निर्माण झालेल्या चमत्कारपूर्ण भाकडकथा नसून वैज्ञानिक रहस्यावर आधारलेल्या सत्यकथा आहेत, हे सिद्ध होते.

श्री गुरुचरित्र ग्रंथातील ४४ व्या अध्यायातील कथेत भक्त तंतुकाला श्रीगुरु श्री शैल्य-यात्रेसाठी घेऊन जातात असा कथाभाग आहे. तंतुकाला श्रीगुरु पादुकांना घट्ट धरून डोळे मिटावयास सांगतात व त्याला मनोवेगाने शैलपर्वतावर घेऊन जातात. ही कथा वरील चतुर्मितीच्या संदर्भाने पाहिल्यास ती भाकडकथा वा चमत्कारकथा न वाटता-तिची वैज्ञानिक भूमिका ध्यानी येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात भौतिक उत्कर्षाच्या लालसेने वा महत्त्वाकांक्षेने झपाटून आम्ही भारतीय ज्या पाश्चात्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्यात धन्यता मानीत आहोत; त्याच विज्ञाननिष्ठ व वैभवशाली पाश्चात्य राष्ट्रांतील विचारवंत पंडित, लेखक व साधक-अणुयुगातील स्पर्धा, संघर्ष, असुरक्षितता आणि भोगवादाचा अतिरेक यांना विटून खऱ्या सुखशांतीच्या लाभाच्या आशेने, भारताकडे आणि त्याच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभवाकडे, ज्ञानसंपदेकडे कसे आस्थेने, आपुलकीने व अपेक्षेने पाहत आहेत याची थोडीफार कल्पना यावी हाच माझ्या या विविध वृत्तांत-निवेदनाचा वा विवेचनाचा मुख्य हेतू आहे.

□ □ □

# ४

भारतीय संस्कृतीच्या प्रज्ञान धनप्रवर्तकांनी संस्कृतीची उभारणी तीन प्रमुख सूत्रांवर केलेली आढळते. भारतीय संस्कृतीची ही सूत्रमय त्रिवेणी अवश्य समजून घेतली पाहिजे. भारतीय संस्कृतीचा प्रत्येक आचारविचार, व्रतवैकल्य, सणसमारंभ यामागे ही त्रिवेणी विद्यमान आहेच; याचा प्रत्यय संस्कृतीच्या अभ्यासकाला येतोच येतो. या त्रिवेणीचे तीन पेड किंवा प्रवाह असे :—

(१) मानवी देह-मनांचे आरोग्य म्हणजेच वैद्यक.

(२) योग.

(३) खगोल शास्त्र व त्याचाच व एक विभाग–फलज्योतिष.

देहमनाच्या आरोग्याचा व निरामयतेचा अत्यंत मूलगामी विचार भारतीय संस्कृतीने केलेला आढळतो. भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांचा अभ्यास करताना या सूत्राचा प्रत्यय पदोपदी व अनेक प्रकारे येतो. दुसरे सूत्र-योग. याचा संस्कृतीला अभिप्रेत असलेला अर्थ अत्यंत व्यापक असा आहे. चिरंतनाकडे घेऊन जाणारा, शाश्वताशी नाते जोडणारा, आत्मस्वरूपाशी सख्य साधणारा कोणताही आचार, विचार, प्रयत्न वा साधन, उपासना वा तपस्या म्हणजेच योग. अशी योगाची व्यापक व्याख्या ऋषिमुनींना अभिप्रेत आहे. केवळ हठयोग किंवा त्यासारखेच अन्य योगप्रकार म्हणजेच योग इतका आकुंचित अर्थ योगाचा नाही.

जन्मापासून मृत्यूपर्यंत, सकाळपासून रात्रीपर्यंत माणूस जे जे काही करतो–आचरतो त्या प्रत्येक आचाराविचारामागे जीवन–कल्याणाचा, जीवनसमृद्धीचा सखोल विचार भारतीय संस्कृतीने केलेला आहे असे दिसून येते. भारतीय संस्कृती वैराग्यप्रधान आहे. ऐश्वर्य व सौंदर्यविन्मुख आहे अशी भ्रांत कल्पना कित्येक पाश्चात्य लेखकांनी प्रसृत केली आहे. उदा. पाहा. डॉ. स्वाइटझर ' **Indian Thought & Its Development.** ' ती निखालस चुकीची हे सिद्ध करणारे अनेक पुरावे देता येतील. भारतीय संस्कृतीला माणसाची सर्वोच्च भौतिक उन्नती, प्रगती तर मान्य आहेच, सौंदर्यदृष्टीलाही भारतीय संस्कृती मुळीच पारखी नाही. पण या संस्कृतीने प्रामुख्याने विचार केला आहे

तो मानवाला शाश्वत सुखशांती देणाऱ्या मूल्यांचा. वैज्ञानिक विकासाने, यांत्रिक प्रगतीने, भोगसाधनसंपन्नतेने माणूस सुखी होऊ शकत नाही याची रोकडी प्रचीती पाश्चात्यांना येऊन चुकली आहे. सुखाचा भोग देऊ शकतील अशा ज्या शाश्वत मूल्यांच्या शोधात सध्या पाश्चात्य आहेत, ती मूल्ये भारतीय ऋषिमुनींना फार प्राचीन काळी गवसली आहेत. निसर्गाच्या सहवासात एकांत तपःसाधना करून ब्रह्मचैतन्याशी एकरूप होणाऱ्या ऋषिमुनींनी, संतयोग्यांनी साऱ्या विश्वाच्या कल्याणाचा विचार केलेला आढळतो. भारतीय संस्कृतीला सुखाची कोणती व्याख्या वा कल्पना अभिप्रेत आहे हे समजून घेण्यासाठी वेदोपनिषदांच्या गहन गुहेत जाण्याची आवश्यकता नाही. ऋषिमुनींचे मनोगत आणि वेदोपनिषदांचे हृद्गत विश्वसुहृद श्रीज्ञानदेवांनी केवळ एका ओळीत सांगून टाकले आहे. ज्ञानदेवांनी सुखाची व्याख्या जिच्यात केली आहे ती ओवी अशी :—

किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे
तेथ जे होअे । तया नाम सुख ।।

मानवी जीवनात शांती, समाधानाला केवढे महत्त्व आहे हे ओळखणारे ज्ञानेश्वरांसारखे संत त्या शांतियुक्त जिव्हाळ्याचे महत्त्व कसे वर्णन करतात त्याचा हा नमुना पाहा :

जेथ शांतिचा जिव्हाळा नाहीं ।
तेथ सुख विसरोनी न रिगे कहीं ।
जैसें पापियाच्या ठाईं । मोक्षु न वसे ।।

भारतीय संस्कृतीच्या आणखी एका विशेषाचा निर्देश आवश्यक आहे. संस्कृती हे जीवनशास्त्र समजून धर्माच्या अंगाने प्रत्येक आचार-विचार संस्कृतीने रूढ व दृढ करून ठेवला आहे. आपल्या रसज्ञ पूर्वजांची, साधुसंतांची, भक्तयोग्यांची सारी भाषा व अभिव्यक्ती गूढ काव्यमय असते. या प्रवृत्तीमुळे भारतीय संस्कृतीतही प्रतीकांचा, रूपकांचा, संकेतांचा व सूचकतेचा वापर विपुल प्रमाणात केलेला आढळतो. कालप्रभावाने, रूढीने यापैकी संस्कृतीच्या अनेक मूळ रहस्यांवर अज्ञानाची, विकृतीची परंपरागत विचित्र समजुतींची अनेक पुटे व कवचे चढलेली आहेत. ती झाडून–फोडून त्यामागची मूळ जीवन व निसर्गरहस्ये विशद करणे हे आजच्या भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांचे, संशोधकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. टरफले टाकून देऊन मूळ गाभ्याला हात घालणे, धूळ झटकून मूळ चैतन्याचा शोध घेणे अगत्याचे आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संस्कृतीतील कित्येक आचारविचार, आजीबाईची संस्कृती म्हणून आपण उपेक्षेने, अज्ञानाने व तुच्छतेने दुर्लक्षीत आहोत. सोडून देत आहोत. ज्यांचा आदर्श पुढे ठेवून आम्ही हा अविचार करीत आहोत त्या विज्ञाननिष्ठ व प्रगत पाश्चात्य देशातील अनेक अद्ययावत् संशोधनकेंद्रांतून, व प्रयोगशाळांतून नेमके तेच आचारविचार विज्ञानाच्या कसोटीवर घासले जाऊन जीवनोपयोगी म्हणून सिद्ध

होत आहोत. अशा काही शोधांचा व संशोधनांचा परिचय करून घेणे 'अंजन' स्वरूप ठरेल

रशिया हा साम्यवादी देश. तिथे धर्म ही अफू मानली जाते. श्रद्धा ही भोळे-भाबडेपणात जमा होते. अशा ह्या रशियात काही दीर्घोद्योगी व चिंतनशील पंडितांनी असे काही प्रयोग व संशोधन चालविले आहे की त्यांचा अधिकृत वृत्तांत वाचल्यावर कोणीही आश्चर्यात बुडावे आणि रशियाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोण बदलला पाहिजे असे त्याला स्वाभाविकच वाटावे. एल्. एल्. व्हॅसीलेव या नावाचा एक थोर संशोधक लेनिनग्रॅड विद्यापीठात इंद्रियविज्ञानशास्त्राचा प्राध्यापक होता. गूढ विद्या व अतींद्रिय शक्ती यांचा तो अभ्यासक होता. परचित्तज्ञानविषयक (Telepathy) अनेक प्रयोग त्याने केले होते. ह्या प्रयोगात मानवी मनातील उत्कट संकल्पात अपार सामर्थ्य असते याचा प्रत्यय त्याला आला होता. पण ते संकल्पसामर्थ्य शास्त्रशुद्ध प्रमाणांनी व प्रयोगांनी सिद्ध करणे आवश्यक होते. त्यासाठी त्याने सतत ४० वर्षे चिकाटीने व काटेकोरपणाने आपले प्रयोग चालू ठेवले. या संशोधनाचे फलित त्याने 'मेंटल सजेशन' या आपल्या अपूर्व ग्रंथाच्या द्वारे जगाला उपलब्ध करून दिले. एल्. एल्. व्हॅसीलेव याचे संशोधन इतके मोलाचे आहे की, त्याच्या या ग्रंथाची जगातील सर्व प्रमुख भाषांतून भाषांतरे झाली. त्याच्या या मौलिक संशोधनाचे सारस्वरूप असे :—

मानवी मनातील उत्कट संकल्प प्रवास करतात. गतिशील असतात. उत्कट संकल्पाच्या द्वारे निर्माण होणाऱ्या स्पंदनात किंवा वलयात लयबद्धता असते. या संकल्प-लहरी कुठल्याही कृत्रिम वा अकृत्रिम अडथळयांना वा आवरणांना न जुमानता अव-काशातील अनंत अंतर ओलांडून इष्ट स्थळी जाऊन पोहोचू शकतात. कल्पना करा की, उत्कट संकल्प करणारी एक व्यक्ती एका विवक्षित वेळी व्हॅसीलेवच्या प्रयोगशाळेत बसली आहे. त्याच वेळी त्या स्थळापासून कित्येक योजने दूर अशा ठिकाणी दुसरी एखादी व्यक्ती आपल्या मनोवृत्ती केंद्रित करून बसली तर प्रयोगशाळेत बसलेल्या व्यक्तीच्या मनातील उत्कट संकल्प या दूर अंतरावरील व्यक्तीपर्यंत अप्रतिहतपणे प्रवास करून पोचतात व त्याला त्या संकल्पाची प्रतीती येते. असे शेकडो प्रयोग एल्. एल्. व्हॅसीलेव यांनी केले. या सर्व प्रयोगांत निर्णायकपणे असे दिसून आले की, गतिशील उत्कट संकल्पांच्या या स्पंदनांत विद्युतशक्ती असते आणि चुंबकीय आकर्षणही असते.

संकल्प लहरींच्या प्रवासात अडथळा आणता येतो का? हे पाहण्यासाठी व्हॅसीलेव याने अनेक युक्त्या व क्लृप्त्या उपयोजून चाचणी घेतली. उत्कट संकल्प करणाऱ्या व्यक्तीला वेगवेगळया धातूंनी बनविलेल्या बंद पिंजऱ्यांत ठेवून त्याने अनेक प्रयोग केले. कुठल्याही कृत्रिम वा अकृत्रिम अडथळयांना न जुमानता संकल्प आपला प्रवास पार पाडतातच असे त्याला दिसून आले. उत्कट संकल्पांचे उत्सर्जन करणारी व्यक्ती व ते ग्रहण करणारी व्यक्ती यांच्यात कितीही अंतर असले तरी त्याचा परिणाम

संकल्पाच्या प्रवासावर होत नाही. तसेच संकल्प ग्रहण करणाऱ्या व्यक्तीपर्यंत ते पोचण्यासही प्रत्यवाय येत नाही असे सिद्ध झाले.

आरंभीच्या प्रयोगांची अचूक यशस्विता पाहिल्यावर एल्. एल्. व्हॅसीलेव याने त्यापुढचा एक महत्त्वाचा प्रयोग हाती घेतला आणि दीर्घ परिश्रमाने तोही संपूर्ण यशस्वी केला. यापूर्वीच्या प्रयोगात संकल्पाचे ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला संकल्प सूक्ष्मरूपाने प्रतीत होत असत. ज्या संकल्पलहरींच्या ठिकाणी गतिशीलता आहे, विद्युतशक्ती आहे व चुंबकीय आकर्षण आहे, त्या साकार किंवा मूर्त होऊ शकल्याच पाहिजेत, हे व्हॅसीलेवच्या लक्षात आले. पण प्रत्यक्षात ते सिद्ध करण्यासाठी त्याला काही उपकरणे निर्मावी व योजावी लागली. ही उपकरणे संकल्प ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला वापरण्यास देण्यात आली. उपकरणांच्या साहाय्याने यापूर्वी ज्या संकल्पलहरी केवळ प्रतीत होत असत त्या आता ग्रहण करणारा साकार स्वरूपात मूर्तिमंत पाहू शकेल अशी व्यवस्था झाली. याचा अर्थ मानवी मनातील उत्कट संकल्पांचे सामर्थ्य एवढे असते की ते संकल्प ग्रहण करणारी व्यक्ती कितीही अंतरावर बसली तरी तिला ते संकल्प केवळ प्रतीतच होतात असे नाही तर प्रत्यक्ष मूर्तिमंत साकार स्वरूपात दिसू शकतात. हा महत्त्वाचा सिद्धांत एल्. एल्. व्हॅसीलेव याने काटेकोर प्रयोगांनी निर्विवादपणे सिद्ध केला.

भारतीय ऋषिमुनी व साधुसंत तपस्येच्या वा उत्कट भक्तीच्या द्वारे स्थूलाच्या सीमा ओलांडून उन्मनी अवस्थेचा व त्या अवस्थेत ब्रह्मांडाशी एकरूप होण्याचा अनुभव घेऊ शकतात. अशा द्रष्ट्या पंडितांना, तुरीया अवस्थेत गेलेल्या योग्यांना व संतांना आपल्या मानसशक्तीच्या प्रभावाने संदेश पाठविता येतो व एकाच वेळी अनेक ठिकाणी सदेह संचारही करता येतो अशा कथा आपण पुराणातून वाचतो. आजीबाईच्या संस्कृतीच्या मागे काही विज्ञान असेल अशी कल्पनाही नसणाऱ्या आधुनिकांना या पुराणकथा भाकड वाटतात. पण एल्. एल्. व्हॅसीलेव यांच्या संशोधनाच्या प्रकाशात त्या पाहिल्यास त्यांचे रहस्य ध्यानी येऊ शकेल.

रामायण-महाभारतातून, पुराणांतून व साधुसंतांच्या चरित्रातून आपण ज्या अतींद्रिय मानस-संचाराच्या व सामर्थ्याच्या कथा वाचतो ते केवळ कल्पित अद्‌भुत चमत्कार नाहीत तर तसे चमत्कार घडविण्याचे सामर्थ्य खरोखरच मानवी मेंदूत, बुद्धीत व संकल्पात आहे हेच व्हॅसीलेव यांच्या संशोधनाचे सार आहे. भारतीय संस्कृतीने हे संकल्पसामर्थ्य ओळखूनच सामाजिक आचाराचा एक भाग म्हणूनच संकल्पशुचितेला महत्त्व दिले आहे. धार्मिक वा व्यावहारिक कोणत्याही कार्याच्या आरंभी स्पष्ट शब्दांत आपल्या संकल्पाचा उच्चार करावा असा आग्रह भारतीय संस्कृती धरते. देवपूजेपासून पोटपूजेपर्यंत सर्व कार्यांत संकल्पविधीचे महत्त्व दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या प्रवर्तकांना संकल्पाच्या सामर्थ्याचे रहस्य निश्चितपणे ठाऊक होते म्हणूनच त्यांनी हा नियम घालून दिला आहे. एल्. एल्. व्हॅसीलेव यांच्या सिद्धांताच्या संदर्भात आपल्या संकल्पविधीची शास्त्रीयताच प्रत्ययास येत आहे.

संकल्पाचे सामर्थ्य किती असते व खऱ्या अर्थाने माणसाने कोणते संकल्प करावे हे जाणून घेण्याची इच्छा असल्यास छांदोग्य उपनिषदातील आठव्या अध्यायातील द्वितीय खंड अवश्य अभ्यासावा. संकल्पसामर्थ्याचे यथार्थ विवेचन या अध्यायात आढळते.

एल्. एल्. व्हॅसीलेव यांच्या संशोधनाच्या संदर्भात निरीक्षण केल्यास भारतीय संस्कृतीतील आणखीही काही संकेतामागची जीवनकल्याणकारक. बैठक सहज ध्यानी येऊ शकेल. परंपरेने चालत आलेली आपली संस्कृती श्रद्धापूर्वक टिकवणारी आजीबाई आपल्याला एक फार मोठा मंत्र सांगते– " माणसाने स्वप्नातही कोणाचे वाईट चिंतू नये " हा तो मंत्र. या दृष्टीने संस्कृतीने रूढ केलेले काही वाक्प्रचारही मनन करावेत असे आहेत. स्त्रिया आपल्या भालप्रदेशी मंगलतिलक रेखितात. या कुम्कुम् तिलकामागे पावित्र्याची व मांगल्याची भावना आहे. नव्या पिढीतील एखादी पदवीधर तरुणी कपाळी कुंकू लावीत असली आणि ते–आपले कुंकू–चुकून पुसले गेले आहे असे तिला आढळले तर ती निःशंकपणे म्हणेल, " माझे कुंकू पुसले आहे, जरा कुंकवाचा करंडा इकडे घे. " भारतीय संस्कृतीत मुरलेली आजीबाई, ' कुंकू पुसले आहे ' हा शब्दप्रयोग तोंडाने स्वतः कधी करणार नाही आणि पवित्र कुम्कुम् तिलकाचा अवमान करणारा हा अभद्र शब्दप्रयोग करणाऱ्याच्या तोंडावर हात ठेवून त्या वाक्प्रयोगाला प्रतिबंध करील. " कुंकू पुसले ", " बांगडी फुटली " असे म्हणण्याऐवजी ' कुंकू वाढवले ', ' बांगडी वाढवली '–असा शुभ शब्दप्रयोग संस्कृतीने रूढ केला आहे. ज्या गोष्टीबद्दल समाजात किंवा आपल्या मनात मांगल्याची-पावित्र्याची भावना आहे त्या गोष्टीचा उल्लेख करताना अशुभाचा स्पर्शही आपल्या जिभेला होऊ नये हा अत्यंत उदात्त विचार संस्कृतीला अभिप्रेत आहे.

दान, देणगी वा पारितोषिक देताना ते नेहमी–वाढाव्याने--द्यावे असा संकेत संस्कृती शिकवते. ब्राह्मणाला दक्षिणा देताना रुपया न देता सव्वा रुपया द्यावा आणि तोही ओला करून द्यावा या प्रथेमागे केवढे मांगल्य आहे, जीवन कल्याणाचा केवढा सूक्ष्म विचार आहे हे व्हॅसीलेव यांच्या संशोधनाने प्रकर्षाने ध्यानी येईल. गुरुजनांकडून व वयोवृद्धांकडून शुभाशीर्वाद ग्रहण करावेत, यामागेही फार मोठी जीवनसमृद्धीची बैठक आहे याचा आम्हाला विसर पडलेला आहे.

आज अज्ञानाने उपेक्षणीय वाटणाऱ्या संस्कृतीतल्या अशा अनेक आचार–विचारामागे हीच बैठक आहे व तिचा शोध घेतला पाहिजे एवढा संदेश आपल्या मनावर बिंबला तरी व्हॅसीलेव यांच्या ४० वर्षांच्या प्रदीर्घ संशोधनाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

संकल्पांचे व मानवी मनातील उत्कट विचारांचे सामर्थ्य निर्विवादपणे सिद्ध करणारा एक अवघड प्रयोग हॅरॉल्ड शेरमन या अमेरिकन संशोधकाने केला व तो त्या शास्त्रातील अधिकारी पंडितांनी मान्य केला. हॅरॉल्ड शेरमन याला गूढ विद्यांची

स्वाभाविक आवड. त्याने अभ्यासाने काही अतींद्रिय शक्ती वा सिद्धी प्राप्त करून घेतल्या आहेत. त्याने काही ग्रंथही लिहिले आहेत. त्या ग्रंथांतून गूढ विद्या व अतींद्रिय शक्ती यासंबंधीचे अनेक प्रयोग व अनुभव त्याने दिले आहेत.

१९३७ ते ३८ या कालावधीत त्याने पुढील प्रयोग यशस्वीपणे पार पाडला. रशियन सरकारचे काही वैमानिक आपले विमान घेऊन सरळ उत्तरध्रुव प्रदेशावर झेप घेऊन तेथून अमेरिकेत उतरण्याचा महत्त्वाकांक्षी मनसुबा करून निघाले. त्यांच्या त्या धाडसी प्रयत्नात यश न येता उत्तर ध्रुवाच्या आसपास त्यांचे विमान बेपत्ता झाले. या विमानाचा व त्यातील धाडसी वीरांचा शोध घेण्याचे काम रशियन सरकारने, सर ह्यूबर्ट विल्किन्स यांच्यावर सोपविले. सर ह्यूबर्ट विल्किन्स यांचाही अतींद्रिय सिद्धी व इतर गूढ विद्या यांचा गाढ अभ्यास होता. पुढे घडणाऱ्या प्रसंगांची पूर्वसूचना त्यांना अनेकदा मिळत असे. मानवी मनाच्या सामर्थ्याविषयीं त्यांना अनेक प्रकारे प्रत्यय आला होता. हॅरॉल्ड शेरमन यांच्याशी त्यांचा स्वाभाविकच स्नेह होता. बेपत्ता विमानाच्या शोधाचे काम हाती घेताना हॅरॉल्ड शेरमन यांच्याशी झालेल्या संभाषणातून शोध घेण्याचे काम पार पाडताना ह्यूबर्ट विल्किन्स यांनी आठवड्यातून सोमवार, मंगळवार आणि गुरुवार या तीन दिवशी मध्यरात्री बरोबर ११॥ वाजता ( ईस्टर्न स्टॅण्डर्ड टाईम ) एका जागी बसावे आणि हॅरॉल्ड शेरमन यांच्याशी संपर्क साधावा, हॅरॉल्ड शेरमन याने त्याच वेळी न्यूयार्कमधील आपल्या अभ्यासिकेत बसून सर विल्किन्स यांच्याशी सूक्ष्म मानसिक संयोग किंवा एकतानता साधावी, सर विल्किन्स यांच्याकडून येणाऱ्या संदेशांची, संवेदनांची व सूक्ष्म स्पंदनांची हॅरॉल्ड शेरमन यांनी अचूक नोंद ठेवावी असे ठरले. सर विल्किन्स यांनीही आपल्या दैनंदिनीत या मानसभेटीत घडणाऱ्या प्रकारांचे यथातथ्य टिपण ठेवावे असेही योजण्यात आले. हे प्रयोग सहा महिनेपर्यन्त अव्याहतपणे चालू होते. या सर्व प्रयोगांत निर्विवादपणे असे सिद्ध झाले की, एकमेकांपासून इतक्या दूर अंतरावर असूनही केवळ मानसिक सामर्थ्याच्या आधारे सर विल्किन्स यांच्या मनातील विचार, संदेश व संवेदना जशाच्या तशा ग्रहण करण्यात हेरॉल्ड शेरमन यास शेकडा ७० या प्रमाणात सफलता लाभली. हॅरॉल्ड शेरमन यांच्या या प्रयोगाला प्रसिद्धी तर मळालीच. पण या प्रयोगामुळे मानवी मनाच्या व संकल्पाच्या अपार सामर्थ्याकडे शास्त्रज्ञांचे लक्ष वेधले.

मनाच्या एकाग्रतेने अद्‌भुत वाटणाऱ्या घटनाही सहज घडून येतात याची विपुल उदाहरणे भारतीय पुराणांतून व संत-महात्म्यांच्या चरित्रांतून आढळतात. विशिष्ट सिद्ध मंत्रांच्या किंवा स्तोत्रांच्या आवाहनाने यज्ञस्थळी त्या त्या देवता प्रत्यक्ष अवतीर्ण होत असत. व्हॅसीलेव यांच्या शोधाच्या संदर्भात पाहिल्यास या घटना चमत्कार मानण्याचे कारण नाही हे सहजच कळून येईल.

दशोपनिषदांपैकी ‘ छांदोग्य ’ हे एक अत्यंत प्रसिद्ध व महत्त्वाचे उपनिषद आहे. या उपनिषदाच्या आठव्या अध्यायाच्या द्वितीय खंडात ‘ संकल्प-सामर्थ्य ’ हा विषय

आलेला आहे. एकूण दहा मंत्रांत संकल्पाचे सामर्थ्य व माहात्म्य त्यात वर्णन केलेले आहे. त्याचे सार शेवटच्या १० व्या मंत्रांत आले आहे तो मंत्र व त्याचा आशय असा :- ' यं यमन्तमभिकामो भवन्ति यं कामं कामयते। सोऽस्य संकल्पादेव समुत्तिष्ठति तेन संपन्नो महीयते ॥ ( ज्या ज्या ठिकाणची आणि गोष्टींची इच्छा होईल त्या सर्वांची त्याला ( संकल्प करणाऱ्याला ) केवळ संकल्पाने प्राप्ती होईल व त्यांनी युक्त होऊन तो महत्त्व पावतो. )

रशियासारख्या देशात एल्. एल्. व्हॅसीलिवसारखा संशोधक सतत चाळीस वर्षे ज्याचे सखोल व प्रदीर्घ संशोधन करतो तो संकल्प-सामर्थ्यांचा भाग हा आपल्या प्राचीन उपनिषदांचा विषय आहे. वेदोपनिषदांचा वारसा आपण सांगतो; पण ऋषिमुनींच्या या तेजस्वी ग्रंथात सांगितलेले विषय मात्र आम्हाला ठाऊक नसतात. नव्या काळात नव्या दृष्टीने त्यांचा अभ्यास व संशोधन करावे ही प्रवृत्तीही आमच्या विद्यापीठांतून दिसत नाही.

संकल्पाचे सामर्थ्य संतांना चांगले ठाऊक होते. आणि म्हणूनच ' सत्य संकल्पाचा दाता भगवान् ' असे सुभाषित प्रचलित आहे, आणि समर्थांसारखे अधिकारी ' मना सत्य संकल्प जीवी धरावा ' असे आवर्जून व बजावून सांगतात. पण त्यांच्या शिकवणुकीत काही सामर्थ्य असेल आणि त्या मागे वैज्ञानिक बैठक असेल याची पुसट देखील कल्पना आपल्याला नसते.

पण संस्कृतीने त्याचा विचार केलेला आहे व त्या संदर्भात आजीबाईंच्या कित्येक परंपरा या शास्त्रशुद्ध आहेत असे शोध करणाऱ्याला दिसून येईल. पण रशियाला जे शोधावे वाटते ते आम्हाला मात्र विसरावे, टाकून द्यावे असे वाटते !

° ° °

अमेरिकेसारख्या देशात अनेक प्रकारची संशोधने चालू आहेत. ड्यूक विद्यापीठात गेली तीन तपे डॉ. जे. बी. ऱ्हाईनसारखा ऋषितुल्य संशोधक अनेक अतींद्रिय सामर्थ्यांचा व गूढ गोष्टींचा शोध घेत आहे. डॉ जे. बी. ऱ्हाईनलाही साधणार नाही असे मौलिक संशोधन-पैसा, प्रयोगशाळा, शासनाचे साहाय्य व मान्यता इत्यादींची पर्वा न करता एका मराठी माणसाने केले आहे, पण त्याकडेही विद्वानांचे, संशोधकांचे लक्ष गेलेले नाही. या उपेक्षित संशोधकाचे नाव आहे कै. श्री. रामचंद्र विनायक कुलकर्णी ऊर्फ ' आनंदघनराम ' ( जन्म इ. स. १८६५; मृत्यू १९३९ ). या गृहस्थांनी संकल्पसामर्थ्यांचे अनेक प्रयोग पूर्णपणे यशस्वी केल्याची नोंद आहे.

आनंदघनरामांच्या ज्ञानाची बैठक भारतीय अध्यात्मातील होती. त्यांनी पाश्चात्त्य मानसशास्त्रज्ञांचे ग्रंथ अभ्यासिले होते. पण भारतीय ऋषिमुनींच्या ज्ञानसंपदेपुढे पाश्चात्त्यांची प्रगती व ज्ञान अगदी थिटे आहे याबद्दल त्यांची खात्री झाली होती. त्यांनी नुसतेच चमत्कार केले नाहीत, तर अनेक विषयांवर आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या

आधारावर कित्येक छोटेमोठे ग्रंथ लिहून ते प्रसिद्ध केले आहेत. त्यात सूर्यविज्ञानापासून स्वप्नमीमांसेपर्यंत अनेक गूढ तत्त्वज्ञानविषयक व जीवनोपयोगी प्रेरक ग्रंथांचा समावेश आहे

आनंदघनरामांचे एक वैशिष्टय असे की त्यांनी आपली दैनंदिनी ठेवली होती. केलेला कोठलाही प्रयोग लिपिबद्ध करून ज्यांच्या समक्ष तो केला त्यांच्या, त्या प्रयोगाच्या काटेकोर नोंदीखाली ते स्वाक्षऱ्या घेत असत. अशा विविध प्रयोगांच्या महत्त्वाच्या नोंदी असलेल्या त्यांच्या रोजनिशया या पाश्चात्त्य मानसशास्त्रीय संस्थांच्या अहवालांइतक्याच महत्त्वाच्या म्हटल्या पाहिजेत. लोकांना भविष्य सांगताना किंवा कोठलाही थक्क करून टाकणारा प्रयोग करताना ते कोणापासूनही कवडीदेखील घेत नसत. असे लोकोत्तर कार्य करणारा हा लोकविलक्षण साक्षेपी साधक व कल्पक संशोधक १९३९ सालापर्यंत विद्यमान होता. असे असताही त्यांच्या कार्याची जेवढी महती व माहिती जनतेपुढे यावयास पाहिजे होती तेवढी ती आलेली नाही असे दिसते. पाश्चात्त्यांनी देखील थक्क व्हावे असे व एवढे कार्य या एकटया गृहस्थाने आयुष्यभर खपून करून ठेविले आहे. पण त्याकडे विद्वानांचे, संशोधकांचे, विद्यापीठांचे व सरकारचेही लक्ष अजून नीट गेलेले दिसत नाही. ते तसे वेधण्याचा आस्थेवाईक प्रयत्नही कोणी केल्याचे आढळत नाही. निदान माझ्या तरी दृष्टोत्पत्तीस ते आलेले नाही.

आनंदघनरामांकडे माझे प्रथम लक्ष वेधले ते श्री. कृष्णाजी केशव कोल्हटकर यांच्या " भारतीय मानसशास्त्र " अथवा " पातंजल योगदर्शन " या प्रसिद्ध व बहुमोल ग्रंथामुळे. या ग्रंथाला जोडलेल्या परिशिष्टात श्री. कोल्हटकर यांनी काही दुर्मिळ माहिती संग्रहित केली आहे. तिच्यात श्री. आनंदघनरामांचा महत्त्वाचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. दुसऱ्याच्या मनातले विचार अचूक ओळखण्यात आनंदघनराम प्रवीण होते. आपल्या या प्रावीण्याची चुणूक त्यांनी श्री. कोल्हटकरांना दाखविली होती. तो अनुभव कोल्हटकरांनी जसाच्या तसा नमूद केला आहे. तो त्यांच्याच शब्दांत ऐकू या : " आपल्या मनात जे जे विचार येतात त्यांना अति सूक्ष्म आकार असतात आणि त्या आकारांचे स्पंद बाहेरील वातावरणात प्रसृत होत असतात. जर एखाद्या पदार्थावर मन स्थिर होईल तर त्या पदार्थाचे आकारस्पंद बाहेरच्या वातावरणात प्रसृत होतात आणि ते ग्रहण करण्याची ज्याच्या मेंदूत पात्रता असेल त्याला ते आकार गोचर होतात. हे प्रयोगाने सिद्ध करण्याकरिता आनंदघनराम यांनी एके प्रसंगी मला कोणत्याही एका वस्तूचे मनात ध्यान करावयास सांगितले. सुमारे ५ मिनिटे मजप्रमाणेच तेही चित्त एकाग्र करून बसले व नंतर मी ज्या एका देवतेचे ध्यान करीत होतो तिचे बरोबर वर्णन त्यांनी मला सांगितले. ह्यात आणखी एक मौज अशी झाली होती की, प्रथम मिनिट अर्धमिनिट माझ्यासमोर खुंटीवर एक पांढरा अंगरखा लोंबत होता तोच मी प्रथम अनुसंधानाकरिता घेतला होता. मागून मला वाटले, ध्यान करावयाचे तर अंगरख्याचे न करता एखाद्या देवतेचे करू. म्हणून मी त्यावरून मन काढून देवतेची मूर्ती मनापुढे आणली होती. प्रयोगातील मी मनात धरलेली देवता त्यांनी ओळखल्यावर प्रयोग खरा आहे ही खूण पटण्याकरिता ते

मला म्हणाले, ' प्रथम तुम्ही काहीतरी उभा लांब पांढरा पदार्थ मनापुढे धरला होता. त्या आकारचे स्पंद माझ्या मेंदूत भिडत होते. ती वस्तू काय आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करीत असता ते स्पंद नाहीसे झाले आणि निराळ्या आकाराचे स्पंद येऊ लागले. तीन चार मिनिटांत मला तो देवतेचा आकार गोचर झाला व मी तुम्हाला सांगितला. हा प्रयोग त्यांच्या दैनंदिनीत माझ्या स्वाक्षरीनिशी उतरला आहे. ''

श्री. कोल्हटकरांनी कथन केलेला हा वृत्तांत कोणाचेही लक्ष वेधून घेईल असा आहे. यापेक्षाही अपूर्व असा दुसरा एक इच्छाशक्तीचा प्रयोग ते करीत. एकाच मोगऱ्याच्या वेलीची कलमे काढून ती शेजारी लावून त्यास खतपाणी वगैरे अगदी सारखे घालावयाचे. एका कलमापाशी बसून उत्तेजक भावनांचा परिणाम कलमावर करावयाचा आणि दुसऱ्या कलमापाशी बसून निरुत्साही भावनांचा परिणाम त्या कलमावर करावयाचा, असा काही महिने प्रयोग केल्यावर पहिल्या कलमाला उन्हाळ्यात फुलांचा तरारून बहर आला आणि दुसरे कलम शुष्क होत जाऊन त्याला चारदोनच फुले आली.

त्यांनी या प्रकारचा केलेला आणखी एक प्रयोग तर चमत्कारात जमा व्हावा असा आहे. शाळूच्या एका रोपावर, बीजावस्थेपासून त्याची कणसे पूर्ण होऊन वाळून जाईपर्यंतच्या काळात त्याच्या सर्व अवस्थांवर आनंदघनरामांनी मनःसंयम केला आणि त्यामुळे त्या शाळूचे ते ताट दहा फुटांपेक्षा अधिक उंच झाले आणि त्याच्या प्रत्येक पेऱ्यागणिक पोटरी येऊन तिचे उत्तम कणीस बनले. हे झाड त्या वेळी कोल्हापूर येथे शेतकी प्रदर्शनात प्रेक्षणीय वस्तू म्हणून पाठविण्यात आले होते !

आनंदघनरामांनी पार पाडलेला आणखी एक अद्भुत संकल्पसामर्थ्याचा प्रयोग असा—प्रयोग तासगाव येथे आनंदघनराम यांच्या घरी माडीवर केला गेला. खोलीच्या मध्यभागी आनंदघनरामांनी एक जागा निश्चित केली. तिच्या भोवती त्यांनी एक वर्तुळ रेखिले. एका बाजूस स्वतः आनंदघनराम व दुसऱ्या बाजूस त्यांच्या समोर श्री. जोशी नावाचे सहकारी यांनी आसन घातले. वर्तुळ केलेल्या जागी एक शेवंतीचे रोप रुजविले जाऊन त्याच्या फांदीला घवघवीत फूल येऊन त्याचा दाखला कोणाच्याही प्रत्यक्ष प्रत्ययास यावा असे त्या प्रयोगाचे स्वरूप होते. दोघांनीही एकाच वेळी त्या वर्तुळाच्या ठिकाणी शेवंतीचे रोप यावे, वाढावे व त्याच्या फांदीला फूल लागावे या संकल्पावर दृढ मनःसंयम करावयाचा होता. प्रयोग सतत काही दिवस व ओळीने कित्येक तास एकाग्रतेने करावयाचा होता. थोडयाच दिवसांनी खरोखरच त्या जागी खऱ्याखुऱ्या शेवंतीची हिरवीगार फांदी उभी असल्याचे दिसून आले आणि त्यानंतर थोडयाच अवधीत त्या फांदीला फुले येऊन त्यांचा सुगंध घरभर पसरला. आनंदघनरामांचे एक स्नेही त्यांना हाक मारीत अंगणात आले. त्यांना शेवंतीच्या फुलांचा तो सुगंध प्रकर्षाने जाणवला. ते दिवस शेवंतीच्या फुलांचे नव्हते. त्यामुळे तर त्यांच्या आश्चर्यात भरच पडली. संकल्पसिद्धीच्या बाबतीत आनंदघनराम यशस्वी झाले होते. हे सर्व वर्णन एखाद्या जादूच्या प्रयोगाप्रमाणे वाटण्याचा संभव आहे. पण आनंदघनराम संकल्पशक्तीच्या बळावर अशा

अनेक जादू सहज करून दाखवीत असत. या प्रयोगात फसवाफसवीचा यत्किंचितही प्रकार नसे. आनंदघनरामांनी अखंड साधनेने, अविरत अभ्यासाने या सिद्धी मिळविल्या होत्या. सूक्ष्म ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांच्या द्वारा एकाग्रतेने या सिद्धी कोणालाही प्राप्त करणे व स्थूल ज्ञान व कर्मेंद्रियांना त्यांचा अनुभव व प्रत्यय देणे सहज शक्य आहे, हे या प्रयोगाने आनंदघनरामांनी सिद्ध केले होते !

० ०

एल्. एल्. व्हॅसिलेव याच्या संशोधनानंतर अगदी अलीकडे डॉ. कॉटकोव या नावाच्या संशोधकाने संकल्पसिद्धी आणि ' सूचना ' ( Suggestion ) यांचा उपयोग व्यापक प्रमाणावर ' राजकीय ' प्रचारासाठी करता येईल का ? यासंबंधीचे संशोधन व प्रयोग केले. या प्रयोगांत सामूहिक स्वरूपात सूचनेच्या व संकल्पसामर्थ्याच्या द्वारे प्रभावी परिणाम साधता येतात असे या शास्त्रज्ञाने सिद्ध केले आहे. आणि हे सारे प्रयोग ज्या तत्त्वावर आधारले गेले आहेत ती तत्त्वे व सिद्धांत हे भारतीय धर्मांचा व संस्कृतीचा गाभा आहेत.

रशियात चालू असलेल्या विविध संशोधनांपैकी आणखी एका अपूर्व संशोधनाची माहिती आपण अवश्य करून घेतली पाहिजे. रशियातील एक लेखक संशोधक व्ही. झाइट्सेव याचा हा शोध आहे. आकाशात झेप घेणाऱ्या आणि चंद्रमंगळावर उड्डाण करणाऱ्या अवकाशयानांचे आकार आणि जगातील प्राचीनातील प्राचीन आणि अर्वाचीनातील अर्वाचीन धर्ममंदिरांचे गगनचुंबी निमुळते कळस यांच्या आकृतींतील व शिल्पांतील साम्य त्याच्या सहज ध्यानी आले. त्याच्या विचारचक्राने गती घेतली. इतिहासाचा त्याचा व्यासंग होता. शिल्पशास्त्राशीही परिचय होता. जगातल्या सर्व धर्मांच्या मंदिरांच्या आकृती त्याने नीट अभ्यासल्या, तपासल्या. त्याची खात्री झाली की, धर्म कोणताही असो, काळ कोणताही असो, देश कोणताही असो, धर्ममंदिराच्या आकृतीत कळस हे सर्वत्र, सर्वदा गगनचुंबी–निमुळते असेच आढळतात. हा धागा घेऊन त्याने या विषयाचे सशास्त्र, सखोल परिश्रमपूर्वक संशोधन चालू केले.

या विषयाचे कित्येक ग्रंथ त्याने गोळा केले, अभ्यासिले. वेगवेगळ्या संस्कृतींचा मागोवा घेतला आणि त्यावरून त्याने आपल्या अनुमानाला सिद्धांतरूप देऊन ते आपले संशोधन ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. त्याने हे सिद्ध व विशद केले की, प्राचीन काळी अवकाशातून इतर ग्रहगोलांवरून अवकाशयाने पृथ्वीवर येत असत. त्यातून अवतरणारे अवकाश-यात्री हे देव किंवा देवदूत असत. पृथ्वीवरील मानवांशी ते संपर्क साधीत. मानवापेक्षा त्यांचे ज्ञान व अतींद्रिय सामर्थ्य निश्चितपणे अधिक होते. हे देव किंवा देवदूत यांचे वेष व अलंकार हे मानवापेक्षा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण होते. प्राचीन काळी सुमेरियन संस्कृतीसारख्या काही मानववंशांनी या देवदूतांकडून मिळणाऱ्या ज्ञानाचा लाभ करून घेऊन आपल्या जीवनात प्रगती केली होती. पृथ्वीवर अवतरणारे हे देवदूत

पृथ्वीवरील आपल्या वास्तव्यात आपल्या यानांतच झोपत असत. त्या काळच्या देव व देवदूतांच्या त्या अंतराळयानांची स्मृती किंवा अवशेष म्हणजेच धर्ममंदिरांच्या कळसांच्या गगनचुंबी निमुळत्या घुमटाकृती ! आजच्या अंतराळयानाच्या आकृतींशी मंदिरांच्या कळसांचे जे विलक्षण साम्य आढळते त्याचा उगम व इतिहास हा असा आहे.

या संशोधकाच्या दृष्टिकोनातून आपली देवळे, त्यांचे कळस, त्यांचे शिल्प, देवळातील देवदेवतांच्या मूर्ती, त्यांचे वेष व अलंकार यांची तुलना आजच्या अवकाश-यानांशी व अंतराळयात्रींच्या वेशभूषेशी अवश्य करण्यासारखी आहे. संस्कृत भाषेत मंदिरांच्या कळसांना 'विमान' अशी संज्ञा आहे. या रशियन संशोधकाने आपल्या संशोधनाच्या कामी प्राचीन भारतीय संस्कृत ग्रंथांचा आधार घेतला होता. त्याला एक श्लोकबद्ध संस्कृत ग्रंथ मिळाला. त्या ग्रंथातील विवेचनाचा त्याला सर्वांत अधिक उपयोग झाला. किंबहुना त्या एकाच ग्रंथाच्या आधारावर त्याचे संशोधन तो निर्णायक स्वरूपात जगापुढे मांडू शकला. त्या संस्कृत ग्रंथाचे नाव 'समरांगणसूत्रधार' असे आहे. त्याची श्लोकसंख्या २३० असल्याचे त्याने नमूद केले आहे. अंतराळयान उडताना जी प्रक्रिया होते, तिचे व अन्य अनेक प्रक्रियांचे अचूक वर्णन या ग्रंथात त्याला आढळले.

खिस्तपूर्व ३५ ते ५५ शतकापूर्वीच्या इतिहासात देखील अंतराळयानाचे पुरावे मिळतात, असे या लेखकाचे म्हणणे आहे. 'बायबल' मधील डेव्हिड हा अंतराळयाना-तूनच आला असावा असे या संशोधकाचे अनुमान आहे.

रशियातील एका संशोधकाला आपले क्रांतिकारक संशोधन एका प्राचीन संस्कृत ग्रंथाच्या आधारे करता आले, या गोष्टीपासून आम्ही कितीतरी बोध घ्यावयास हवा. अशा प्रकारच्या ग्रंथाचे ज्ञान व अध्ययन दूरच राहिले, पण ज्या संस्कृत भाषेत तो ग्रंथ आहे त्या देववाणीकडेही आमचे संपूर्ण दुर्लक्ष होत आहे.

व्ही. झाइट्सेव याच्या शोधाचा व त्या शोधाचा आधार असलेल्या 'समरांगण-सूत्रधार' या ग्रंथाचा वृत्तांत माझ्या व्याख्याना-प्रवचनांतून ठिकठिकाणी मी जवळजवळ एक वर्षपर्यंत सांगत होतो. पण तो ग्रंथ काय आहे ? कसा आहे ? कोठे आहे ? याबद्दल माहिती असणारा एकही विद्वान वा अभ्यासक मला कोठे भेटला नाही, याची मनाला विलक्षण खंत वाटली.

डिसेंबर १९७० मध्ये नाशिक येथील 'कलायतन' या संस्थेच्या वर्धापन दिना-निमित्त प्रमुख पाहुणा म्हणून माझे व्याख्यान होते. नाशिक येथील, मराठा विद्या प्रसारक समाजाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य व साक्षेपी संशोधक डॉ. जी. आर. साळुंखे, ( एम्. ए-इंग्लंड, एम् ए. (सोशिओ.) पीएच्. डी. ) यांनी माझे भाषण ऐकले. त्यांना ते आवडले. आपल्या महाविद्यालयात एक व्याख्यान देण्याचा त्यांनी मला आग्रह केला. वेळेच्या अभावी तारीख २३ डिसेंबर रोजी सकाळी ७॥ वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले. कडाक्याची थंडी, सकाळची अवेळ; असे असूनही विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सभागृह भरून गेले होते. माझ्या व्याख्यानात स्वाभाविकपणेच

' समरांगणसूत्रधार ' या प्राचीन संस्कृत ग्रंथाचा आणि त्या ग्रंथाच्या आधारे एका रशियन पंडिताने लावलेल्या शोधावा मी उल्लेख केला. व्याख्यान संपल्यानंतर श्री. वकील या नावाचे सज्जन मुद्दाम भेटले. नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयातील दुर्मिळ संस्कृत ग्रंथांचे संकलन व वर्गीकरण करण्याचे काम श्री. वकील करीत असतात. नाशिक येथील पेठे हायस्कूलमध्ये संस्कृत विषयाचे ते शिक्षक आहेत. त्यांनी ' समरांगण-सूत्रधार ' या ग्रंथाबद्दल मला हवी असलेली माहिती सांगितली. ग्रंथ त्यांनी नुसता पाहिलेला नव्हता तर त्याच्यातील कित्येक श्लोक त्यांच्या जिभेवर होते आणि नमुना म्हणून काही श्लोक त्यांनी मला लगेच म्हणूनही दाखविले. बडोद्याचे अधिपती कै. सयाजीराव यांनी भारतीय प्राचीन ग्रंथ प्रकाशन करणारी जी माला चालू केली होती तिच्या विद्यमाने ' समरांगणसूत्रधार ' हा दुर्मिळ ग्रंथ मुद्रित झाला असल्याचे वृत्त श्री. वकील यांनी मला सांगितले. त्यांनी हेही सांगितले की, रशियन संशोधकाला त्या ग्रंथातील अवकाशयानासंबंधीचे वर्णन अचूक वाटले यात नवल नाही. कारण त्या ग्रंथातील माहिती खरोखरच अपूर्व अशीच आहे. ' समरांगणसूत्रधार ' या ग्रंथावर श्री. वकील यांनी टाकलेल्या वास्तव प्रकाशामुळे माझी जिज्ञासा पूर्ण झाली आणि मला विलक्षण हर्ष झाला.

व्ही. झाइट्सेव याच्याप्रमाणेच अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या पण जन्माने जर्मन असणाऱ्या ' Eric Von Daniken ' या संशोधकाने स्वतंत्रपणे, एक ग्रंथ प्रसिद्ध केला. ' Chariots of the Gods ' हे त्याचे नाव. प्राचीन काळी पृथ्वीवर अंतराळ-याने येत असत, हीच गोष्ट या लेखकाने अनेक प्रकारच्या पुराव्यांसह या ग्रंथात सिद्ध केली आहे. ' Imprint ' या नियतकालिकात हा ग्रंथ संक्षेपाने प्रकाशित झाला होता. ( जाने. १९७० ) व्ही. झाइट्सेव याचे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर ' एरिक व्हॅन डॅनिकेन ' हा मुद्दाम रशियास गेला. अंतराळ संशोधन विभागाच्या प्रमुखाची त्याने भेट घेतली आणि तेथून तो भारतात आला. भारतीय प्राचीन पुराण ग्रंथांतून विमानांचे व अंतराळयानांचे अनेक उल्लेख आहेत हे त्याने ऐकले होते. त्याला संस्कृत भाषा येत नव्हती. भारतीय प्राचीन ग्रंथातील विमानविषयक माहितीचा शोध घेऊन त्याचा उपयोग त्याला आपल्या नवीन ग्रंथात करावयाचा होता. त्यासाठी त्याने त्या विषयातील भारतीय तज्ज्ञांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यात प्रा. नंदी या नावाचे एक अधिकारी संस्कृततज्ज्ञ होते. आणि एक अँग्लोइंडियन विद्वान महिलाही होत्या.

त्यांच्याशी झालेल्या चर्चेत या लेखकाला असे सांगण्यात आले की पुराण ग्रंथातील विमानविषयक कथा व माहिती ही काल्पनिक आणि अद्‌भुत असण्याचाच संभव अधिक. ती वास्तव व विश्वसनीय म्हणता येणार नाही. भारतीय पंडितांचे हे मत ऐकून ' एरिक व्हॅन डॅनिकेन ' याचे समाधान तर झाले नाहीच पण या भेटीच्या संदर्भात त्याने काढलेले उद्‌गार, ' रिटर्न टु द स्टार्स ' या त्याच्या नवीन पुस्तकात वाचावयास सापडतात. आपली भारत–भेट आणि भारतीय पंडितांच्या भेटीमुळे व त्यांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायाने

निराश होऊन हा लेखक म्हणतो, ' या पंडितांवर ' अवलंबून राहण्यापेक्षा–मला स्वतः-लाच संस्कृत भाषा येत असती तर किती चांगले झाले असते ! '

माझ्या ठिकठिकाणी होणाऱ्या भारतीय संस्कृतिविषयक व्याख्यानांत व्ही. झाइट्सेव, समरांगण–सूत्रधार, एरिक व्हॅन डॅनिकेन यांच्याबद्दलची माहिती मी मुद्दाम सांगत असतो. लातूर येथे भारत–पाकिस्तान युद्धापूर्वी माझी व्याख्याने झाली. त्यात वरील माहिती मी ओघानेच सांगितली. व्याख्यानानंतर एक तरुण डॉक्टर माझ्या भेटीस आले. त्यांनी आपल्याबरोबर एक जुना ग्रंथ आणला होता. तो ग्रंथ माझ्या स्वाधीन करून ते गृहस्थ नम्रपणे म्हणाले, ' हा ग्रंथ आपण अवश्य वाचा आणि काम झाल्यावर परत करा. ' मी शांतपणे तो ग्रंथ चाळला. त्या ग्रंथाचे नाव होते ' महर्षि भरद्वाज-प्रणीत बृहद् विमानशास्त्र ' – अर्थात – ' यंत्रसर्वस्व अंतर्गत वैमानिक प्रकरण. ' ( संपादक व भाषानुवादक स्वामी ब्रह्ममुनी परिव्राजक, गुरुकुल कांगडी, हरिद्वार, मूल्य रु. १३; १९५६. प्रकाशक सार्वदेशिक आर्यप्रतिनिधी–सभा, दयानंद भवन नई दिल्ली नं. १ ) व्ही झाइट्सेव याने ज्यावरून आपले संशोधन प्रसिद्ध केले त्या समरांगण-सूत्रधार या संस्कृत ग्रंथाचा उल्लेख मला यात आढळला. त्या ग्रंथाचा कर्ता, ' महाराजा भोज ' आहे ही नवीन माहितीही मला उपलब्ध झाली.

आमच्या प्राचीन ग्रंथांच्या आधारे पाश्चात्य देशांतील लेखक आपली महत्त्वपूर्ण संशोधने जगापुढे मांडतात. त्या ग्रंथांची आम्हाला माहितीही नसते आणि माहिती झाल्यावरही त्या ग्रंथांचा शोधक बुद्धीने अभ्यास करण्याची आम्हाला आवश्यकता वाटत नाही. ' समरांगण सूत्रधार ' आणि ' बृहद् विमानशास्त्र ' या ग्रंथातून अंतराळ यान–निर्मितीची दिलेली माहिती आजच्या विज्ञानशास्त्रातील अद्ययावत ज्ञानाच्या संदर्भात कितपत अचूक व उपयुक्त आहे यावर प्रकाश टाकला जाणे अत्यंत आवश्यक आहे; पण त्याकडे कोणाचेही लक्ष वेधलेले दिसत नाही. या ग्रंथांसारखे ऋषिमुनीप्रणीत अनेक दुर्मिळ ग्रंथ असू शकतील आणि त्यात अनेक विद्या आणि प्रक्रिया अंतर्भूत असतील. या सर्व वैभवशाली भांडाराकडे नव्या पिढीच्या पंडितांचे, संशोधकांचे, विद्यापीठांचे आणि शासनाचे लक्ष जाणे संस्कृतीच्या व राष्ट्रहिताच्या दृष्टीने नितांत महत्त्वाचे आहे.

□ □ □

# ५

आपण हिंदू लोक गाईला पवित्र मानतो. गंगा, गाय व गीता हे तीन आपले गौरवास्पद गकार. गाईच्या ठिकाणी तेहतीस कोटी देवतांचे वास्तव्य असते अशी आपली श्रद्धा. म्हणूनच तिला आपण गो-माता असे संबोधितो. गाईसारख्या चतुष्पादाला धर्मात व संस्कृतीत हे पावित्र्य व माहात्म्य कशामुळे प्राप्त झाले ? शेतीला उपयोगी पडणाऱ्या, काबाडकष्ट करणाऱ्या बैलांची केवळ जन्मदात्री म्हणून काही ते तिला लाभलेले नाही खास. मग त्याच्या मागचे रहस्य कोणते ? याचा सशास्त्र डोळस बोध घेण्याची आवश्यकता आम्हांला वाटत नाही.

शहाण्या माणसाने गोमयभक्षण करावे म्हणजेच 'शेण खावे' असे आपले शास्त्र सांगते. गोरस, गोमय व गोमूत्र या तिन्हीही द्रव्यांना धर्मात व संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. घर किंवा देवघर गोमयाने सारवून स्वच्छ, सुबक करतात. स्वच्छतेसाठी किंवा पावित्र्यासाठी गोमूत्राचा उपयोग करतात. आरोग्यासाठीही गोमूत्र लाभदायक ठरते. पोटातील कृमी गोमूत्रप्राशनाने नाहीसे होतात. जलोदरासारख्या असाध्य रोगातही गोमूत्र उपकारक ठरते, असे वैद्यक शास्त्र सांगते. आमच्या लहानपणी अंगणात नेहमी एखादी तरी गाय असेच. आता पुण्या-मुंबईतील विद्यार्थ्यांना गाईची ओळख काँग्रेसची निशाणी असलेल्या बैलांची थोर माता एवढीच असते. नुकत्याच झालेल्या निवडणुकींनी पुष्कळांचा सवत्स धेनूशी चांगला परिचय झाला; पण पूर्वी प्रत्येक घराचे गाय हे भूषण असे. त्या दृष्टीने आम्ही भाग्यवान होतो. आमच्या घरी गोठयात दोन गाई नाहीत असे कधी घडले नाही. आमच्या घरच्या गाई हा एकाच गाईचा वंशवेल होता. त्या गोऱ्यापान, देखण्या व घाऱ्या डोळयांच्या असत. त्यांना आम्ही कोकणस्थ गाई म्हणत असू. रेचकासाठी एरंडेल किंवा डॉक्टर वैद्यांची औषधे आम्हास घ्यावी लागत नसत. पोट साफ होण्यासाठी आमची आई आम्हाला मधून-मधून सकाळी उठताक्षणीच पहिल्या धारेचे गोमूत्र प्राशन करावयास लावी. आमच्या गाई उकिरडा हुंगणाऱ्या नव्हत्या; त्यामुळे त्यांचा 'तो' प्रसाद घेण्यास आम्हाला कधी संकोच वाटला नाही. जितके वेळा ते पहिल्या धारेचे गोमूत्र गाळून घ्यावे व प्यावे तितके वेळा पोट साफ

स्वच्छ होई. घरच्या गाईचे जुन्यातले जुने तूप दादरा बांधलेल्या एका स्वच्छ सुरक्षित बरणीत दक्षतेने राखून ठेवलेले असे. सर्दी, खोकला व नाक, कान, घसा यांच्या व्याधीवर हे गाईचे जुने तूप रामबाण औषध होते. त्यावेळी व्हिक्स्, अमृतांजन यासारख्या श्रीमंत पाहुण्यांना घरात मज्जाव असे. गाईच्या जुन्या तुपाने दोन-तीन दिवसांत रोगमुक्ती लाभत असे. आजच्या तथाकथित सुधारलेल्या जीवनात गोमूत्रप्राशन, पंचगव्य-भक्षण आणि जुन्या तुपाचा औषध म्हणून उपयोग या गोष्टी निःसंशय हास्यास्पद मानल्या जातील. कारण या सर्वांच्या मागे काही निश्चित शास्त्रीय बैठक आहे, विज्ञान आहे याविषयी आपले संपूर्ण अज्ञान आहे.

१९५२ ते ५४ या कालावधीत चित्रपट व्यवसायाच्या निमित्ताने माझे अधिकतर कार्यक्षेत्र मुंबईत होते. पुणे-मुंबई प्रवास ही नित्याचीच गोष्ट होती. मुंबईस जाण्यायेण्याची माझी गाडी, वर्ग व डबा ठरलेला असे. प्रवासात पुस्तकात मान खुपसून बसण्यापेक्षा समोरची आजूबाजची माणसे वाचणे, न्याहाळणे हा माझा छंद असे. त्यावेळी लोणावळयास एक गृहस्थ गाडीत चढत व बोरीबंदर येथे उतरत. या गृहस्थांनी माझे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या हातात सदैव एक सुबक पिशवी असे, तिला ते फार जपत. त्या पिशवीच्या एका बाजूस एक भरतकाम केलेला डौलदार कोंबडा काढलेला होता. दुसऱ्या बाजूस तितकेच सुरेख, ऐटबाज व गतिमान असे हरीण भरलेले होते. त्या आकृती, ती पिशवी व ते गृहस्थ माझ्या निरीक्षणाचा विषय तर झालेच पण त्या वस्तू व ती व्यक्ती यांच्याविषयीचे माझे कुतूहलही शिगेस पोहोचले. ते गृहस्थही मला नेहमी पाहात पण अद्याप आमचा अधिकृत परिचय झाला नव्हता.

एके दिवशी मुंबईहून पुण्यास येताना मेलमध्ये नेहमीच्या डब्यात ते गृहस्थ आपल्या पिशवीसह होते. त्या दिवशी योग असा की प्रख्यात संगीतदिग्दर्शक व 'प्रभात' मधील एके काळचे माझे सहकारी श्री. वसंत देसाई माझे सहप्रवासी होते. श्री. वसंत देसाई यांचा त्या पिशवीवाल्या गृहस्थांशी परिचय होता. श्री. देसाई यांनी त्या गृहस्थांशी माझी ओळख करून दिली. त्यांचे नाव नाडकर्णी आहे असे मला कळले. चहापाणी, गप्पागोष्टी झाल्या. इतके दिवस ज्यांच्याबद्दल जिज्ञासा वाढली होती त्यांचा असा सहज परिचय झाल्यामुळे मला आनंद वाटला. लोणावळा येताच श्री. नाडकर्णी उतरून गेले.

पुढच्याच आठवडयात त्याच पूना-मेलने मी मुंबईस जात असताना त्याच नेहमीच्या डब्यात अपेक्षेप्रमाणे श्री. नाडकर्णी लोणावळयास गाडीत चढले. माझ्या जवळची जागा रिकामीच होती. श्री. नाडकर्णी सहास्य मुद्रेने आपल्या त्या पिशवीसह माझ्याजवळ येऊन बसले, चहा आला, आणि त्याबरोबरच आमच्या गप्पांनाही रंग भरला. श्री. नाडकर्णी यांना मी गेले कित्येक दिवस मनात असलेली गोष्ट सरळच विचारली :

"आपल्या हातात ही लक्ष वेधून घेणारी पिशवी नेहमी असते, तिला आपण जपताही जिवापलीकडे. त्या पिशवीवर रेखिलेल्या दोन्ही बाजूंच्या सुंदर आकृतीही लक्ष

वेधून घेणाऱ्या आहेत. या आकृतींमागे काही विशेष रहस्य आहे काय ? "

श्री. नाडकर्णी हसत म्हणाले, " हा प्रश्न विचारणारे तुम्हीच पहिले रसिक भेटलात. ही पिशवी मी जवळ बाळगतो ती उपयुक्ततेपेक्षाही मला ती आवडते म्हणून. आवडते याचे कारण माझ्यावर अत्यंत प्रेम करणाऱ्या माझ्या बहिणीने ती मला भेट म्हणून दिली आहे. माझ्या बहिणीला चित्रकला व भरतकाम उत्कृष्ट येते. पिशवीवरच्या दोन्ही बाजूच्या या आकृती ही तिचीच कलाकृती आहे. त्या आकृती तर सुरेख आहेतच; पण त्या आकृतींच्या द्वारे सूचित होणारा अर्थ त्यापेक्षाही मार्मिक आहे. ह्या दोन आकृतींच्या प्रतीकात आपले जीवनचित्र सामावले आहे. निदान माझे तरी. कोंबडा आरवताच आपल्या रोजच्या जीवनक्रमास आरंभ होतो. जीवनकलहासाठी आपल्याला नेहमी उरी फुटेतो जी धावपळ करावी लागते तिचे प्रतीक म्हणजे हे धावणारे हरीण. हे साधे पण सुंदर रहस्य या आकृतीमागे दडलेले आहे. श्री. नाडकर्णी यांनी विशद केलेले ते रहस्य माझ्या मनात खोलवर रुजले. आमच्या मनमोकळ्या गप्पा चालू झाल्या. त्यात श्री. नाडकर्णी यांनी आपण मृत्यूच्या सीमेपर्यंत जाऊन परत जीवनात कसे आलो याची सत्यकथा सांगितली. तिचा आपल्या विषयाशी घनिष्ठ संबंध आहे म्हणून तिचा सारांश पुढे देत आहे :

" श्री. नाडकर्णी यांना चांगल्या पगाराची नोकरी होती. धन होते, मान होता. सर्व काही सुरळीत चालले होते. पण मुंबईचे जीवन. त्या चाकोरीतून प्रवास चालू असता मधून मधून त्यांना सर्दी-पडशाचा उपद्रव होऊ लागला. किरकोळ घरगुती उपाय ते करीत पण न कळत दुखण्याने उग्र रूप धारण केले. सर्दी सोडून जाईना. बेचैनी वाढू लागली. शेवटी तज्ञ वैद्यांस प्रकृती दाखवली. गोळ्या, इंजेक्शन्स्, टॉनिक्स् इ० सर्व नेहमीचे प्रकार झाले. तरीही त्रास वाढतच गेला. शेवटी रक्त, लघवी वगैरे, वगैरे सर्व प्रकारची तपासणी झाली. नाकाची व घशाची 'क्ष' किरणांची छायाचित्रे घेण्यात आली त्या शाखेतील ज्ञात्यांनी निर्णय दिला. नाकाचा कर्करोग आहे. श्री. नाडकर्णी यांच्यावर वज्राघातच झाला. त्यांचे सुरळीत जीवन उद्ध्वस्त झाले. नानातऱ्हेचे महागडे उपाय करूनही व्याधी आटोक्यात येईना. अशावेळी नेहमी घडते तेच झाले. मंत्र तंत्र, साधु-संत-ज्योतिषी बैरागी सर्व करून झाले. या सर्व उपद्व्यापांपेक्षा मरण बरे असा वैताग श्री. नाडकर्णी यांच्या वाट्यास आला. याच सुमारास त्यांचा एक जुना जिव्हाळ्याचा मित्र त्यांना भेटला. त्याने एक मोठी बाटली श्री. नाडकर्णी यांच्याजवळ आणून देऊन म्हटले, " इतके उपाय केलेस, आता हा एक साधा पण रामबाण उपाय करून पाहा. या बाटलीत गाईचे जुने औषधी तूप आहे. ते रोज रात्री नाकात घालीत जा. या जुन्या तुपाला उग्र दुर्गंधी येते. तेवढी सहन करायची. झाला तर उपायच होईल; अपाय खात्रीने होणार नाही. मला वाटते हा उपाय अवश्य करून पाहा. "

श्री. नाडकर्णी रोगाला, औषधांना, ती देणाऱ्या डॉक्टरांना व एकूण मुंबईच्या जीवनाला विटले होते. आपली शिल्लक असलेली दीर्घ मुदतीची रजा त्यांनी घेतली.

लोणावळयास त्यांच्या एका स्नेह्याचा प्रशस्त व सुसज्ज बंगला होता. त्या ठिकाणी श्री. नाडकर्णी यांनी तळ ठोकला. आहारविहार नियंत्रित केले. रोज सकाळ-संध्याकाळ दूरवर फिरावयास जाण्याचा उपक्रम चालू केला. मित्राने दिलेले गाईचे तूप न चुकता नाकात घालणे एवढे एकच औषध चालू ठेवले. बाकी सर्व गोळया, बाटल्या यांना उकिरडा दाखविला. याच्या जोडीला जप, प्रार्थना इ. आध्यात्मिक साधनांची श्रद्धायुक्त जोड दिली. या सगळयाचा परिणाम इष्ट असा झाला. सर्दी पळून गेली, नाक कोरडे झाले. अन्नपाण्याला चव आली. जीवनात आनंद वाटू लागला. गाईच्या तुपाचा मारा मात्र, त्याचा गुण पटल्यामुळे चालू ठेवला. रजा संपण्यापूर्वी श्री. नाडकर्णी व्याधिमुक्त झाले. त्यांच्या डॉक्टरांनी तपासणी केली त्यात कर्करोगाचा अवशेष उरला नाही, असे दृष्टोत्पत्तीस आले. डॉक्टरांनी विस्मयाने प्रश्न केला, " आश्चर्य आहे! असा काय उपाय केलात की ज्यामुळे अशक्य ते शक्य झाले ? " श्री. नाडकर्णी शांतपणे म्हणाले, " गोमातेला शरण गेलो. "

" म्हणजे ? " डॉक्टर उद्‌गारले.

" गाईच्या जुन्या तुपाचा हा सारा परिणाम आहे " डॉक्टरांना विश्वास ठेवणे भागच होते.

श्री. नाडकर्णी यांची ही सत्यकथा त्यांच्याच तोंडून मी ऐकली आणि मनोमन श्री. नाडकर्णी यांच्या त्या पिशवीला व तिच्यावरील त्या रेखीव आकृतींना धन्यवाद दिले.

गाईचे तूप, दूध, गोमूत्र व गोमय यामुळे घडलेल्या चमत्कारांच्या अनेक कथा मला ठाऊक आहेत. ऋक्, यजु, अथर्व या सर्व वेदांतून गाईची थोरवी वर्णन करणाऱ्या अनेक ऋचा आहेत. महाभारताच्या अनुशासन पर्वांतील ५१, ६६, ७१, ७४ आणि ७८ या अध्यायांतून गाईचे माहात्म्य अनेक प्रकारे वर्णन केलेले आढळते. हिंदू तर गाईला पवित्र मानतातच. पण पार्शी लोकही गाय पूज्य मानतात. ' झेंद अवेस्ता ' या पार्शी धर्मग्रंथात, ' गाईची हत्या करू नये तिला पवित्र मानावे ' असे सांगितले आहे. पार्शी धर्माची दीक्षा देताना गोमूत्राचा उपयोग केल्याचे उल्लेख सापडतात. ' आरोग्यासाठी गाईचे दूध हे अमृतासारखे आहे. गाईचे तूप व्याधिनिवारक आणि गाईचे मांस हे रोगकारक आहे ' असे ख्रिस्ती धर्माचा प्रेषित इसाइया याने आपली पत्नी आयेषा हिला सांगितल्याचे प्रसिद्ध आहे.

गोमातेची श्रेष्ठता व गोरक्षणाचे महत्त्व याबद्दलचे आपले विचार प्रकट करताना विदर्भातील साधुश्रेष्ठ श्री. गुलाबरावमहाराज यांनी काढलेले उद्‌गार अवश्य मनन करण्यासारखे आहेत. श्री. गुलाबराव महाराज म्हणतात, " वैद्यकशास्त्राचा इतिहास पाहिला तर गाईचा अपमान केल्यामुळे व तिची हिंसा झाल्याने कित्येक रोगांचे आमच्या देशात ठाणे होऊन बसले आहे,' ' अतिसार चिकित्साध्यायात ' अशी कथा आहे :

" पूर्वी यज्ञामध्ये पशूंची हिंसा होत नव्हती. परंतु इक्ष्वाकू वगैरेंच्या यज्ञांत पशूंची हिंसा होऊ लागली. पुढे पृषध्रांनी दीर्घकाळपर्यंत एक यज्ञ केला. त्यात इतर पशू

न सापडल्यामुळे त्यांनी गाईचा वध करण्यास आरंभ केला. त्यामुळे सर्वांवर कृपा करणाऱ्या त्या जगन्मातेसाठी सर्व प्राण्यांना ताप होऊ लागला. गाईचे मांस अतिशय जड, अविहित व अयोग्य असल्यामुळे पृषध्र राजाच्या यज्ञातच अतिसाराची उत्पत्ती झाली. तोपर्यंत या पृथ्वीवर अतिसार म्हणून ठाऊक नव्हता.

" गाईच्या शुद्ध दुधाचा, शुद्ध तुपाचा, शुद्ध ताकाचा व दह्याचाही अनेक रोगांवर उपयोग सांगितला आहे. सुवर्ण उगाळून घातलेले गाईचे दूध क्षयावर फार उपयोगी आहे. गाईचे दहीं व ताक संग्रहणीवर अत्यंत उपयोगी आहे. ताकाने म्हातारपण येत नाही असे पाश्चात्य तज्ज्ञही मान्य करीत आहेत. तात्पर्य धर्मतः, अर्थतः, कामतः गाईचे रक्षण करणे आम्हा आर्यांचे पहिले कर्तव्य असले पाहिजे असे मला वाटते. "

हे सर्व इतक्या विस्ताराने लिहिण्याचे कारण ' गाय ' हा भारतीय राजकारणातला एक ज्वलंत प्रश्न होतो. गाईवरून जातीय वैमनस्ये वाढतात व दंगेही होतात. गोहत्या कायद्याने बंद व्हावी यासाठी चळवळ होते. भारतातील एका पीठाचे जगद्गुरू श्री शंकराचार्य त्यासाठी साठापेक्षाही अधिक दिवसांचे उपोषण करतात. पण भारतीय संस्कृतीत गाईला जे महत्त्व व पावित्र्य आले आहे, त्यामागचे वैज्ञानिक रहस्य शोधून काढण्यासाठी पद्धतशीर प्रयोग व संशोधन करण्याची बुद्धी वा इच्छा एकाही भारतीय विद्यापीठाला, विद्वानाला व संशोधकाला स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षांच्या दीर्घ कालावधीत होत नाही हे कशाचे लक्षण आहे ?

जगद्गुरू श्री शंकराचार्य ( पुरी ) यांच्याबद्दल आदर बाळगूनही निःशंकपणे म्हणावेसे वाटते की आपल्या पीठाचा, प्रतिष्ठेचा, ज्ञानाचा व धनाचा उपयोग करून त्यांनी गोरस, गोमूत्र व गोमय यांचे प्रयोगशाळेत शास्त्रीय संशोधन केले वा करविले असते तर ते आपल्या देशालाच नव्हे तर सगळ्या जगाला लाभप्रद ठरले असते. आता या द्रव्यांची आरोग्यकारकता आणि जीवनोपकारकता इंग्लंड, अमेरिका व रशिया यांच्या प्रयोगशाळांतून विज्ञानाने सिद्ध होईल. पंचगव्याच्या आणि गोमूत्राच्या बाटल्या त्या देशांतून आधुनिक स्वरूपात येऊ लागतील, तेव्हाच आम्ही पुनः एकदा राजरोसपणे शेण खायला लागू. गोमातेचे श्रेष्ठत्व त्यावेळी आम्हाला खात्रीने पटेल.

रशियामध्ये जे अनेक प्रयोग व संशोधने चालू आहेत त्यांत गोमयाचाही समावेश आहे. माझ्या एका तरुण शास्त्रज्ञ मित्राकडून यासंबंधीचे एक वृत्त मला समजले आहे. ते अधिकृत स्वरूपात घोषित होण्यापूर्वीच सांगून टाकण्यास प्रत्यवाय नाही, अंतराळयानांच्या निर्मितीत एका विशिष्ट यांत्रिक प्रक्रियेत घर्षण व उष्णता यांच्या प्रतिबंधासाठी गोमयाचा प्रयोग करण्यात आला. आणि तो यशस्वी ठरला. उष्णता कमी करण्याच्या कामी गोमयाचे साधन इतर सर्व साधनांपेक्षा अधिक उपयुक्त ठरले. आता हा गोमयमहिमा रशियन संशोधक प्रसिद्ध करतील त्यावेळी गोमातेची खरी महती आम्हांला समजेल अशी आशा करूया.

शास्त्रात सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या पंचगव्याच्या वापरात केवढ

प्रभावी सामर्थ्य असते यासंबंधीचा एक अद्भुत पण वास्तव अनुभव वाई येथील गेल्या पिढीतील एक पंडितश्रेष्ठ धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांनी चिरंजीव करून ठेवला आहे " ओंकाररहस्य " या माझ्या ग्रंथात तो समग्र वृत्तांत मी समाविष्ट केला आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य दृष्टीखाली घालावा. ( ओंकाररहस्य-मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पृष्ठ ५७-५८ ).

अग्रतः संतु मे गावो ।
गावो मे सन्तु पृष्ठतः ।
गावो मे हृदये सन्तु ।
गवांमध्ये वसाम्यहम् ॥

या श्लोकाच्या शुभस्मरणाने बरेच लांबलेले हे गोमातापुराण संपवूया.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १८५१५
शंभू शाखा (स्थळ प्रत)

न सापडल्यामुळे त्यांनी गाईचा वध करण्यास आरंभ केला. त्यामुळे सर्वांवर कृपा करणाऱ्या त्या जगन्मातेसाठी सर्व प्राण्यांना ताप होऊ लागला. गाईचे मांस अतिशय जड, अविहित व अयोग्य असल्यामुळे पृषध्र राजाच्या यज्ञातच अतिसाराची उत्पत्ती झाली. तोपर्यंत या पृथ्वीवर अतिसार म्हणून ठाऊक नव्हता.

" गाईच्या शुद्ध दुधाचा, शुद्ध तुपाचा, शुद्ध ताकाचा व दह्याचाही अनेक रोगांवर उपयोग सांगितला आहे. सुवर्ण उगाळून घातलेले गाईचे दूध क्षयावर फार उपयोगी आहे. गाईचे दहीं व ताक संग्रहणीवर अत्यंत उपयोगी आहे. ताकाने म्हातारपण येत नाही असे पाश्चात्य तज्ज्ञही मान्य करीत आहेत. तात्पर्य धर्मतः, अर्थतः, कामतः गाईचे रक्षण करणे आम्हा आर्यांचे पहिले कर्तव्य असले पाहिजे असे मला वाटते. "

हे सर्व इतक्या विस्ताराने लिहिण्याचे कारण ' गाय ' हा भारतीय राजकारणातला एक ज्वलंत प्रश्न होतो. गाईवरून जातीय वैमनस्ये वाढतात व दंगेही होतात. गोहत्या कायद्याने बंद व्हावी यासाठी चळवळ होते. भारतातील एका पीठाचे जगद्गुरू श्री शंकराचार्य त्यासाठी साठापेक्षाही अधिक दिवसांचे उपोषण करतात. पण भारतीय संस्कृतीत गाईला जे महत्त्व व पावित्र्य आले आहे, त्यामागचे वैज्ञानिक रहस्य शोधून काढण्यासाठी पद्धतशीर प्रयोग व संशोधन करण्याची बुद्धी वा इच्छा एकाही भारतीय विद्यापीठाला, विद्वानाला व संशोधकाला स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षांच्या दीर्घ कालावधीत होत नाही हे कशाचे लक्षण आहे ?

जगद्गुरू श्री शंकराचार्य ( पुरी ) यांच्याबद्दल आदर बाळगूनही निःशंकपणे म्हणावेसे वाटते की आपल्या पीठाचा, प्रतिष्ठेचा, ज्ञानाचा व धनाचा उपयोग करून त्यांनी गोरस, गोमूत्र व गोमय यांचे प्रयोगशाळेत शास्त्रीय संशोधन केले वा करविले असते तर ते आपल्या देशालाच नव्हे तर सगळ्या जगाला लाभप्रद ठरले असते. आता या द्रव्यांची आरोग्यकारकता आणि जीवनोपकारकता इंग्लंड, अमेरिका व रशिया यांच्या प्रयोगशाळांतून विज्ञानाने सिद्ध होईल. पंचगव्याच्या आणि गोमूत्राच्या बाटल्या त्या देशांतून आधुनिक स्वरूपात येऊ लागतील, तेव्हाच आम्ही पुनः एकदा राजरोसपणे शेण खायला लागू. गोमातेचे श्रेष्ठत्व त्यावेळी आम्हाला खात्रीने पटेल.

रशियामध्ये जे अनेक प्रयोग व संशोधने चालू आहेत त्यांत गोमयाचाही समावेश आहे. माझ्या एका तरुण शास्त्रज्ञ मित्राकडून यासंबंधीचे एक वृत्त मला समजले आहे. ते अधिकृत स्वरूपात घोषित होण्यापूर्वीच सांगून टाकण्यास प्रत्यवाय नाही, अंतराळयानांच्या निर्मितीत एका विशिष्ट यांत्रिक प्रक्रियेत घर्षण व उष्णता यांच्या प्रतिबंधासाठी गोमयाचा प्रयोग करण्यात आला. आणि तो यशस्वी ठरला. उष्णता कमी करण्याच्या कामी गोमयाचे साधन इतर सर्व साधनांपेक्षा अधिक उपयुक्त ठरले. आता हा गोमयमहिमा रशियन संशोधक प्रसिद्ध करतील त्यावेळी गोमातेची खरी महती आम्हांला समजेल अशी आशा करूया.

शास्त्रात सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या पंचगव्याच्या वापरात केवढ

प्रभावी सामर्थ्य असते यासंबंधीचा एक अद्भुत पण वास्तव अनुभव वाई येथील गेल्या पिढीतील एक पंडितश्रेष्ठ धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांनी चिरंजीव करून ठेवला आहे " ओंकाररहस्य " या माझ्या ग्रंथात तो समग्र वृत्तांत मी समाविष्ट केला आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य दृष्टीखाली घालावा. ( ओंकाररहस्य-मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पृष्ठ ५७-५८ ).

अग्रतः संतु मे गावो ।
गावो मे सन्तु पृष्ठतः ।
गावो मे हृदये सन्तु ।
गवांमध्ये वसाम्यहम् ॥

या श्लोकाच्या शुभस्मरणाने बरेच लांबलेले हे गोमातापुराण संपवूया.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८५१५
ग्रंथ: शाखा (स्थळ प्रत)

# ६

गायत्री मंत्र हा सर्वश्रेष्ठ असा प्रभावी सिद्धमंत्र आहे. उपनयन संस्काराचा तो गाभा आहे. विद्यार्जनाचा आरंभ करणाऱ्या बटूला या मंत्राची दीक्षा विधिपूर्वक दिली जाते. गायत्री मंत्र हा तेजाचा मंत्र आहे.

ॐ भूः भुवः स्वः ।<br>
ॐ तत्सवितुर्वरेण्यम् ।<br>
भर्गो देवस्य धीमहि ।<br>
धियो यो नः प्रचोदयात् ॥

या मंत्राचा अर्थ सरळ साधा आहे. ज्ञानाच्या बळावर माणूस अनक पराक्रम व पुरुषार्थ करू शकतो. हे ज्ञान बुद्धीच्या कुशाग्रपणावर, प्रखरतेवर, प्रगल्भतेवर अवलंबून असते. बुद्धी मंद किंवा काजळलेली असेल तर ती ज्ञानग्रहणाचे काम समर्थपणे करू शकणार नाही. ' तेजतत्त्वाची आदी ' असे बुद्धीचे वर्णन श्री ज्ञानेश्वर महाराज करतात.

दहाव्या अध्यायातही श्रीकृष्णाच्या विभूतींचे वर्णन करताना, ' ते प्रथम जाण बुद्धी ' असा बुद्धीचा गौरवशाली उल्लेख ज्ञानेश्वर महाराज करतात. १८ व्या अध्यायातही, ' तैसी सर्व वृत्ति वैभवी । बुद्धीची एकली बरवी. ' अशा शब्दांत ते बुद्धीचे श्रेष्ठत्व प्रतिपादितात. समर्थांनीही रघुनायकाजवळ ' बुद्धि दे ' हीच मागणी केली आहे.

पिंड ब्रह्मांडात सामरस्य असणे हा आपल्या धर्माचा तत्त्वज्ञानाचा सिद्धांत. साऱ्या विश्वाला सूर्य प्रकाशित करतो. या सूर्यालाही ज्याच्यापासून प्रकाश लाभतो असा प्रकाशाचाही प्रकाश, सूर्याचाही सूर्य, तेजाचेही तेज, चैतन्याचेही चैतन्य असा जो हिरण्यगर्भ–भर्गदेव–त्याच्या तेजाचा अंश प्रत्येक मानवाच्या ठिकाणी बुद्धिरूपाने असतो. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी । मी अमुका आहे ऐसी ।<br>
जे बुद्धी स्फुरे अहर्निशी । ते वस्तु मी गा ॥ ४२१ ॥ १५ ॥

ब्रह्माण्डातील अणुरेणूंना उजळणाऱ्या हिरण्यगर्भाशी पिंडातील त्याच्या तेजाच्या

अंशाचे सामरस्य असावे याबद्दल कटाक्षाने दक्ष राहण्यास आपला धर्म, आपली संस्कृती सांगते. पिंडातल्या तेजाचा अंश काजळीने व्याप्त होऊ नये, जिच्या द्वारा हा प्रकाश पसरावयाचा ती बुद्धी तेजस्वी, प्रखर, कुशाग्र असावी, प्रज्वलित असावी, तिला चोदना मिळावी, अशी सर्वांसाठी केलेली ही विशाल, व्यापक प्रार्थना आहे. भारतीय ऋषि-मुनींच्या सर्व प्रार्थना सर्वांसाठी, विश्वासाठी असतात. ' Give me my daily bread.' असली आकुंचितता त्यांत नसते–हे लक्षात घ्यावे. या मंत्राचे हे सामर्थ्य आज आम्ही विसरलो आहोत. व्रतबंधसमारंभ सामाजिक प्रतिष्ठेचा एक भाग म्हणून आजही आम्ही साजरा करतो. त्यावेळी सर्व लौकिक विधी, सोहळे पार पडतात, निमंत्रणपत्रिका निघतात, जेवणावळी झडतात, स्वागतसमारंभ साजरे होतात. त्यावेळी आमच्या संस्कृतीत नसलेला बँड देखील वाजतो. कारण तो वाजल्यावाचून ' मुंज ' झाली याची घोषणा होत नाही. पण ज्यासाठी मुख्यत्वे हा सोहळा असतो त्या गायत्री मंत्राकडेच तेवढे नेमके दुर्लक्ष होते. व्रतबंधाच्या दिवशी बटूला गायत्री मंत्र शिकविला जातो. नव्या पिढीचा बटू हा महामंत्र एका कानाने ऐकतो आणि दुसऱ्या कानाने सोडून देतो. दुसऱ्या दिवशी चुकून गुरुजी या बटूला संध्या व गायत्री यांचा पाठ देण्यास आलेच तर हा बटू त्यावेळी राजकपूर वा मीनाकुमारीचा किंवा राजेश खन्ना व जया बहादुरीचा चित्रपट पाहण्यास निघून गेलेला असतो.

गायत्रीपेक्षा, ' कांचा रे कांचा, प्यार मेरा सांचा ' हा चित्रपटातील गीत–मंत्र त्याला अधिक आकर्षित करतो. या आकर्षणापुढे गायत्रीमंत्राचे महत्त्व त्याला वाटत नाही. गायत्री मंत्र, प्रार्थना, उपासना याबद्दलची तरुण पिढीची उपेक्षा सकारण आहे. त्या जुन्या विधींचा मानवी जीवनाच्या कल्याणाशी संबंध आहे; किंवा त्यामागे जीवनकल्याणाची, विज्ञानाची शास्त्रशुद्ध व प्रयोगसिद्ध बैठक आहे याचे यथार्थ ज्ञान त्यांना कोणी करून देत नाही. कारण त्या ज्ञानाबद्दल आईबाप अज्ञानी व म्हणूनच उदासीन असतात. शाळा किंवा महाविद्यालये यांत धर्म, संस्कृती इ. बद्दलचे शिक्षण दिलेच जात नाही. मग त्याबद्दलचे प्रयोग दूरच राहोत.

ज्या गायत्री मंत्राबद्दल आमची ही भूमिका व उदासीनवृत्ती आहे तो खरोखरच उपेक्षणीय, टाकावू, निरुपयोगी, पुराण-मंत्र आहे का ? बुद्धीच्या तेजस्वितेसाठी त्या मंत्राच्या साधनेचा काही उपयोग खरोखरीच होत नाही का ? या प्रश्नाकडे डोळस, चौकस, दृष्टीने पाहावे असे कोणाला वाटतच नाही.

पण परदेशात या विषयाबद्दल विचारवंतांना आस्था आहे. कुतूहल आहे. जिज्ञासा आहे. या संदर्भात अमेरिकेसारख्या प्रगत व विज्ञाननिष्ठ देशांत काय घडले आहे याचा एक पुरावा फार बोलका व परिणामकारक आहे. अमेरिकेतील एक शास्त्रज्ञ हॉवर्ड डी स्टॅंगल याच्या प्रयोगशाळेत त्याने एक अभिनव प्रयोग केला. भारतातल्या गायत्री मंत्रात अपूर्व सामर्थ्य आहे असे त्याला समजले. मंत्र म्हणजे विशिष्ट रचनेचा शब्दसमूह. या शब्दसमूहामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरींचे, स्पंदनांचे यांत्रिक मापन केले तर त्या

मंत्राचे सामर्थ्य अजमाविता येते. हॉवर्ड डी. स्टॅगल याने सामर्थ्यशाली समजल्या जाणाऱ्या सर्वच तथाकथित दिव्य मंत्रांचे यांत्रिक मापन करण्याचे योजिले, भारतीयांचा गायत्री मंत्र, बौद्धांचा ‘ ॐ मणि पद्मे हुम् ’ आणि आणखी असेच पुष्कळसे मंत्र त्याने जमविले. आपल्या प्रयोगशाळेतल्या यंत्रावर त्या मंत्रांच्या ध्वनिलहरींच्या सामर्थ्याचे त्याने शास्त्रोक्त मापन केले. एका सेकंदाला कुठलाही सामर्थ्यसंपन्न शब्दसमूह अधिकात अधिक २,५०,००० ध्वनी व ( प्रकाशलहरी ) निर्माण करू शकतो. हॉवर्ड डी. स्टॅगलने जगातल्या प्रसिद्ध मंत्रांच्या ध्वनिलहरींचे एकामागून एक मापन करून त्या प्रतिसेकंदाला किती भरतात याचे एक कोष्टक तयार केले. मंत्र म्हणताना, म्हणणारा ब्राह्मण होता की नाही, त्याने स्नान केले होते की नाही. त्याच्या गळयात जानवे होते की नाही या व अशा तपशिलाकडे त्याने लक्ष दिले नसावे. मंत्राचे उच्चारण स्वच्छ व शुद्ध व्हावे एवढी दक्षता त्याने घेतली असावी. तरीही त्याच्या या प्रयोगात जगातल्या सर्वश्रेष्ठ व सामर्थ्यशाली समजल्या जाणाऱ्या मंत्रात गायत्री मंत्राच्या ध्वनिलहरी प्रतिसेकंदाला सर्वाधिक म्हणजे २,१०,००० भरल्या आणि त्या मंत्राचे सामर्थ्य प्रथम श्रेणीचेच आहे असे यंत्रमापनाने प्रयोगशाळेत सिद्ध झाले ! ! गेल्या पिढीतील एक प्रसिद्ध संशोधक श्री. विनयतोष भट्टाचार्य यांनी मंत्र-रंग व रत्ने याबद्दल महत्त्वाचे संशोधन केले. ते परदेशातही जाऊन आले. त्यांच्याशी श्री. हॉवर्ड डी. स्टॅगल याचा परिचय होता. श्री. भट्टाचार्य यांच्या एका ग्रंथात श्री. स्टॅगल यांनी एक शास्त्रीय लेखही लिहिला आहे.

जुन्या दंतकथा व आख्यायिका या नेहमीच बोलक्या व मार्मिक असतात. गायत्रीमंत्राच्या माहात्म्यावर प्रकाश टाकणारी अशीच एक दंतकथा माझ्या वाचनात आली. बहुश्रुत वाचकांना ती संग्राह्य वाटेल.

हिमालयाच्या उंच उंच शिखरावर आपल्या नेहमीच्या सुरम्य क्रीडास्थानी शंकर व पार्वती गुजगोष्टी करीत बसले होते. भोवतालच्या वातावरणाप्रमाणेच त्या दोघांच्याही वृत्ती प्रसन्न होत्या. पार्वतीने मंजुळ आवाजात महादेवांना प्रश्न केला, ‘ प्राणप्रिय ! कितीतरी दिवस विचारीन म्हणत होते. आज बरी आठवण झाली आणि संधीही अनुकूल लाभली. आपण सर्व देवांचे देव, आपल्याला सर्व सिद्धी प्राप्त आहेत. हा सिद्धीलाभ आपण कोणत्या साधनेने अथवा विद्येने प्राप्त करून घेतलात हे जाणण्याची मला तीव्र जिज्ञासा आहे. ’

भोलेनाथ मनापासून हसून म्हणाले, ‘ देवी, तुझ्यासारखी चतुर रमणी विरळा. सहज प्रश्नाच्या निमित्ताने अगदी गाभ्यालाच हात घातलास. तुझ्यापासून मी कधीच काही लपवून ठेवीत नाही. माझ्या ठिकाणी जे अपार व अपूर्व सिद्धिसामर्थ्य आहे ते मला एका सर्वश्रेष्ठ व तेजस्वी अशा महामंत्राच्या साधनेने प्राप्त झाले आहे. ’

‘ आपणासारख्यांनी वंदनीय मानावा, असा कोणता हा महामंत्र ? ’

शंकर म्हणाले, ‘ कान्यकुब्ज देशातील गाधिपुत्र विश्वरथ याने महान् तपश्चर्येने

सिद्ध केलेला अपौरुषेय असा गायत्री मंत्र मी प्रत्यही जपतो. माझ्या सिद्धीचा उगम त्या अमोघ मंत्राच्या साधनेत आहे.'

देवी पार्वतीचे समाधान झाले.

° ° °

साऱ्या विश्वाला भगवद्गीतेच्या द्वारा प्रकाश व प्रेरणा देणारे श्रीकृष्ण हे तर महाविष्णूचे अवतार मानले जातात. अवतार असूनही भगवान श्रीकृष्ण प्रत्यही प्रातःकाळी उपासना करीत. त्यांच्या त्या आन्हिकात नियमितपणे ते गायत्री मंत्राचा जप करीत. असा उल्लेख भागवतात आहे. गायत्री मंत्राचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास यापेक्षा आणखी प्रभावी पुरावा कोणता हवा ?

° ° °

लॉप्संग रम्पा हा एक तिबेटमधील लामा आहे. त्याने इंग्रजीत अनेक ग्रंथ लिहिले आहेत. गूढ विद्या व योग यात हा लामा प्रवीण आहे. भारतीय योग व प्राचीन विद्या याबद्दलचे त्याचे ज्ञान सखोल आहे. विज्डम् ऑफ दि एन्शन्टस् ( **Wisdom of the Ancients** ) या आपल्या ग्रंथात ( कॉर्गी-बुक्स् स्वस्त आवृत्ती १९६९. ) त्याने गायत्रीमंत्र अचूक सांगितला तर आहेच. पण त्या मंत्राचा अर्थही त्याने इंग्रजीत विशद केला आहे. त्यावरील आपल्या भाष्यात हा अनुभवी योगी ख्रिश्चन धर्मीयांना आवर्जून आवाहन करतो की त्यांनी हिंदूंचा हा प्रभावी जप अवश्य नित्याचरणात आणावा. तो त्यांना विपुल लाभ देईल-

° ° °

थिऑसफीचे एक प्रख्यात साधक व लेखक सी. डब्लू. लेडबीटर यांना दिव्यदृष्टी होती. गायत्री मंत्राच्या प्रभावाचे वर्णन त्यांनी 'दि मास्टर अॅन्ड दि पाथ' या आपल्या गाजलेल्या ग्रंथात केले आहे. जिज्ञासूंनी ते सर्व मुळातून वाचावे ( पृष्ठ २२७ ते २२९, द्वितीय आवृत्ती १९२७ ) गायत्री मंत्र उच्चारणाऱ्या साधकाच्या देहात सूर्य त्यावेळी कोठेही असला तरी त्यापासून निघालेले तेजोमय किरण प्रवेश करतात, मंत्रोच्चारणाची क्रिया चालू असताना देहात शिरलेला हा तेजाचा अंश साधकाच्या देहातून सप्तरंगांनी बाहेर पडतो. या अर्धवर्तुलाकृती सप्तरंगी किरणात अपार सामर्थ्य असते.

° ° °

जे. बी. एच् हाल्डेन हे एक प्रख्यात शास्त्रज्ञ आहेत. भारतीय संस्कृतीचा व तत्त्वज्ञानाचा त्यांचा उत्तम अभ्यास आहे. 'सायन्स अॅन्ड इंडियन कल्चर' या आपल्या ग्रंथात त्यांनी विश्वामित्र आणि त्याने सिद्ध केलेला तेजस्वी गायत्री मंत्र यासंबंधी गौरवोद्-गार काढले आहेत. त्यांच्या सौंदर्यदृष्टीचे एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. आपले

आचार–विचार–वैभव भारतीय संस्कृतीने किती खोल विचार करून निर्माण केले आहे हे विशद करून सांगताना वैज्ञानिक असूनही जातिवंत रसिक असलेला हा लेखक म्हणतो : 'जून' हे आम्ही योजलेले महिन्याचे नाव आणि भारतीयांनी त्याच महिन्याला दिलेले 'ज्येष्ठ' हे नाव यात केवढा भेद आहे ! 'जून' या नावापेक्षा 'ज्येष्ठ' हे नाव जितके सुंदर तितकेच वास्तव आणि अन्वर्थक आहे. संस्कृत भाषेतील सर्वच महिन्यांना दिलेली नावे याच पद्धतीची आहेत, ज्या नक्षत्रावरून हे नाव दिले गेले त्या नक्षत्राचे आकाशातील प्रत्यक्ष दर्शन आपले डोळे घेऊ शकतात आणि त्या सौंदर्यात वृत्ती न्हाऊ शकतात. विश्वामित्राच्या संदर्भात हा शास्त्रज्ञ म्हणतो, 'विश्वामित्र हा एक श्रेष्ठ कवी होता–खगोल शास्त्रज्ञही होता. पण त्याने सिद्ध केलेला 'गायत्री–मंत्र' हा निश्चितपणे त्याला झालेला साक्षात्कार आहे. ध्येयाचा ध्यास घेतलेल्या संत-साधकांना आणि शास्त्रज्ञ-तत्त्वज्ञांना स्फुरणारे ज्ञान वा मंत्र हे अपौरुषेयच असतात. ते त्यांच्या निदिध्यासातून निर्माण झालेले 'ईश्वराचे मनोगत' असते.'

'काही सहस्र वर्षांपूर्वी भारतीय हे निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षक होते. गायत्री मंत्र सिद्ध करणाऱ्या विश्वामित्राने स्पष्टपणे सांगितले आहे की, केवळ ईश्वरी सामर्थ्याचे गुणगान करणे हा गायत्री उपासनेचा अर्थ नसून त्या मंत्रातील तत्त्व व संदेश विचारपूर्वक आपल्या आचरणात आणणे हे त्याचे रहस्य होय.

आजच्या आधुनिक युगातही विश्वामित्राचा हा संदेश आणि त्याचा मंत्र सारे भारतीय आपल्या आचरणात उतरवतील तर भारताचे प्राचीन वैभव त्याला पुन्हा प्राप्त करून घेणे सहज शक्य होईल. इतकेच नव्हे तर त्या बळावर तो सर्व विश्वाचे मार्गदर्शन करू शकेल.

° ° °

भारताचे एक थोर सुपुत्र विश्वविख्यात तत्त्वज्ञ श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी गायत्री मंत्राचे सामर्थ्य आणि वैभव अत्यंत मार्मिक शब्दांत व्यक्त केले आहे. 'प्रकाशदर्शनाचा चिरंतन ध्यास म्हणजेच हिंदूंचा प्रभावी गायत्री मंत्र'—असे त्यांचे मार्मिक उद्गार आहेत. (The Hindu Gayatri is a perpetual quest for Illumination).

° ° °

गायत्रीमंत्र सिद्ध करणारा विश्वामित्र हा क्षत्रिय होता. कान्यकुब्ज देशाच्या सिंहासनावर बसणारा तो युवराज होता. पण राजा होण्यापेक्षा पुरोहितपद प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्याने बाळगली होती. दीर्घकाल वनवास पत्करून त्याने खडतर तपश्चर्या केली. त्याचा परिणाम म्हणून तुरीया अवस्थेत त्याला दिव्य व अपौरुषेय असा छंदोमय मंत्र स्फुरला. तोच गायत्री मंत्र. विश्वामित्राच्या मंत्रप्राप्तीची ही अद्भुत पण सत्यकथा मी माझ्या ॐकाररहस्य या ग्रंथात विस्ताराने निवेदन केली आहे.

पण या विषयाचे महत्त्व ध्यानी घेता पुनरुक्तीचा दोष पत्करूनही ती या ठिकाणी पुन्हा सादर करणे मला अगत्याचे वाटते.

विश्वामित्र हे नाव सर्वपरिचित आहे. विश्वामित्र हा महाभारतापूर्वी–कित्येक वर्षे होऊन गेला. त्याचे मूळ नाव विश्वरथ. विश्वामित्राच्या मातेचे नाव गाधी. त्यावेळी कोसल देशात त्र्य्यारुण नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव सत्यव्रत. पण त्याची वागणूक मात्र नावाला अगदी न शोभणारी होती. लोकांना छळणे, पित्याची अवज्ञा करणे, स्त्रियांशी असभ्य वर्तन करणे–यांसारखी कुकर्मे करण्यात तो प्रवीण होता. मुलाच्या वर्तनाने बाप विटून गेला. त्याकाळी राजापेक्षाही पुरोहितांना अधिक मान व प्रतिष्ठा असे. वशिष्ठ कुळातला देवराज हा त्यावेळी प्रमुख पुरोहित होता. त्याने त्र्य्यारुणाला सल्ला दिला. त्या सल्ल्याप्रमाणे सत्यव्रताला राजाने आपल्या राज्याच्या सीमेबाहेर हाकून दिले. सत्यव्रत कान्यकुब्ज या सीमेवरील राज्याच्या अरण्यात पारध करून चरितार्थ चालवू लागला.

विश्वामित्र हा कान्यकुब्ज देशाचा राजा व्हावयाचा. पण त्याच्या डोक्यात एक वेगळेच विलक्षण वेड शिरले होते. एकदा तो मृगया करीत कोसल देशात गेला असता त्याला देवराज वशिष्ठ यांच्या आश्रमात आतिथ्य स्वीकारण्याचा प्रसंग आला. त्याकाळी पुरोहित वर्ग हा क्षत्रियांपेक्षा–राजापेक्षाही–प्रजेला वंद्य वाटत असे. पुरोहित वर्ग हा नेहमी कष्ट करण्यास, विद्यार्जनासाठी तप करण्यास, त्याग व सेवा करण्यास सिद्ध व तत्पर असे. पुरोहितांच्या आश्रमात राजांनी देखील हेवा करावा असे गोधन असे. राजप्रासादात न मिळणारी शान्ती व तपोवैभव हे पुरोहितांच्या आश्रमांचे भूषण असे. हे पुरोहित राजवर्गाला सुयोग्य सल्ला देत. राज्यातील शान्ती अबाधित राहावी यासाठी झटत. असे असूनही ते राजपदाची किंवा अधिकाराची अभिलाषा बाळगत नसत. त्यांच्या या त्यागशीलतेचा प्रभाव राजांच्या मनावरही होत असे. वशिष्ठांच्या आश्रमातील शिस्त, शान्ती, गोधन व विद्यावैभव पाहून विश्वामित्र एवढा प्रभावित झाला की राजा होण्यापेक्षा पुरोहितश्रेष्ठ होणे हेच त्याने आपल्या आयुष्याचे अंतिम ध्येय निश्चित केले.

त्याने आपला निश्चय प्रत्यक्षात आणला. पुरोहितांचे सामर्थ्य त्यांच्या विद्येत व तपस्येत होते. ते साध्य करण्यासाठी त्याने राजवैभवाचा त्याग करून वनाची वाट धरली. विद्यासंपादन व तपोवैभव मिळवण्यासाठी त्याने प्रत्येक क्षण वेचण्यास प्रारंभ केला

त्याच सुमारास देशात पूर्वी कधी पडला नव्हता असा दुष्काळ पडला. विश्वामित्र आपली पत्नी व मुलगा यांना सोडून वनात गेला होता. पाऊस पडेना, अन्न दुर्मिळ झाले. माणसे भुकेने तडफडून मरू लागली. विश्वामित्राची पत्नी व त्याचा मुलगा गालव्य यांना जगणे कठीण झाले. मुलाला विकण्याची पाळी आईवर आली. अशावेळी सत्यव्रताने दयाळूपणाने विश्वामित्राच्या पत्नीला साहाय्य केले व मुलाचा विक्रय थांबवला सत्यव्रत पारध करी व त्या मांसान्नावर तिघांचे पोट कसेबसे भागे. दुष्काळाचा तडाखा

एवढा तीव्र होता की एकदा सत्यव्रताला भुकेची वेळ भागवण्यासाठी वशिष्ठाच्या आश्रमातील एक गाय मारावी लागली. याच दुष्काळाने पीडित झालेल्या विश्वामित्राला कुत्र्याची तंगडी चोरून ती खाऊन पोटाची आग शमवावी लागली. ही पुराणकथा प्रसिद्ध आहे.

विश्वामित्राची तपस्या पुरी झाली. तो परत कान्यकुब्ज देशात आला. त्यावेळी दुष्काळ पण संपला होता. विश्वामित्र आपल्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे पुरोहित झाला होता. त्या वर्गांतच त्याने आपले वास्तव्य केले होते. दुष्काळात–आपत्काळात सत्यव्रताने आपल्या पत्नीला व पुत्राला साह्य करून वाचविले हे विश्वामित्राला समजले. सत्यव्रताने केलेल्या उपकाराची फेड करण्याचे त्याने ठरविले. सत्यव्रताला राजपद मिळावे यासाठी त्याने खटपट चालू केली. वशिष्ठ कुलश्रेष्ठ देवराज याची भेट घेऊन त्याने सत्यव्रताला–गादी मिळावी यासाठी शिष्टाई केली. सत्यव्रत हा पापी–अधम आहे; अशा दुष्टाला राजपद देणे इष्ट नव्हे. असा वशिष्ठाने आपला अभिप्राय दिला. पण विश्वामित्राने आग्रहच धरला. तेव्हा वशिष्ठाने प्रजेची समजूत घालून चांगले वर्तन करण्याच्या अटीवर सत्यव्रताला कोसल देशाचे राजपद दिले.

राजपद मिळाल्यानंतर काही दिवसांनी सत्यव्रताने एक याग करण्याचे ठरविले. त्यासाठी त्याला पुरोहितश्रेष्ठ वशिष्ठांची अनुमती घेणे आवश्यक होते. देवराज वशिष्ठाने यागाला संमती देण्याचे अमान्य केले. वशिष्ठाबद्दल सत्यव्रताच्या मनात अढीच होती. त्याने यागाचे पौरोहित्य विश्वामित्राकडे सोपविण्याचे ठरविले. विश्वामित्राला ही संधी हवीच होती. महत्त्वाकांक्षेने तो पुरोहित झाला होता व ती आपली पदवी सिद्ध करण्याला त्याला ही नामी संधी होती. यज्ञाची तयारी धूमधडाक्याने चालू झाली. कोसल देशातील यज्ञाचे पौरोहित्य कान्यकुब्जाचा विश्वामित्र करणार, ही खळबळजनक वार्ता वशिष्ठ कुळात पसरली. 'आपला पौरोहितपदाचा अधिकार आधी सिद्ध करा व मग यज्ञ करा' असे वशिष्ठ कुळाने विश्वामित्राला आव्हान दिले. विश्वामित्राला ते स्वीकारणे भागच पडले.

विश्वामित्राने तप केले होते, विद्या संपादन केली होती; पण अशा प्रकारच्या आव्हानाला तोंड देऊन आपली श्रेष्ठता सिद्ध करणे त्याला साधले नाही. पुरोहितपदास आपण सर्वथैव पात्र आहोत असे त्याला सिद्ध करता आले नाही. वशिष्ठ कुळाच्या श्रेष्ठींनी त्याचा पराभवच नव्हे तर मानभंग व मनोभंग पण केला. विश्वामित्राला या घटनेने एवढा उद्वेग आला की, तो तडक अरण्यात गेला. अंतर्मुख झाला. आपल्या पराभवाचे कारण तो शोधू लागला. विचार करता त्याला असे आढळून आले की, वशिष्ठ कुळातील पुरोहितांची योग्यता निश्चित मोठी आहे. तेवढी पदवी आपल्याला का मिळवता येऊ नये? वशिष्ठ कुळातील पंडितांचे सामर्थ्य कशात आहे याचा तो विचार करू लागला. त्यांच्या सामर्थ्याची गुरुकिल्ली त्यांची तेजस्वी प्रखर चतुरस्र बुद्धी ही आहे; हे त्याला पटले. तशी बुद्धिमत्ता आपल्याला कशी प्राप्त करून घेता येईल?

हा विचार रात्रंदिवस त्याचा ध्यास बनला. बुद्धी देणारा कोण ? त्याची उपासना, ध्यान करावे हाच एक छंद त्याच्या मनाने घेतला. अष्टौप्रहर या एकाच विचारात तो मग्न राहू लागला. अरण्यातला एकान्त, मनाची विलक्षण आर्तता व एकाग्रता अशा अवस्थेत त्याची साधना चालू असता, एक चमत्कार घडला.

सकाळची वेळ होती. सूर्य उगवत होता. पुष्कर सरोवरात स्नान करून विश्वामित्र त्या रम्य, शांत, प्रसन्न प्रातःकाळी परमेश्वराचे ध्यान-चिंतन मनोभावे एकाग्रपणे करीत होता.

सतत ध्यासांचा, चिंतनाचा परिणाम म्हणून की काय,–त्या दिव्य क्षणी त्याच्या मुखातून आकस्मिकपणे व अस्खलितपणे छंदोबद्ध मंत्रवाणी स्फुरून ती स्पष्टपण उच्चारली गेली. विश्वामित्राच्या मुखातून उत्स्फूर्त सूक्त अवतरले होते. ती अपौरुषेय रचना होती. आदिमध्यांतरहित अशा तुरीयावस्थेत त्याला जो अनंताचा–परब्रह्माचा साक्षात्कार झाला होता, त्याचा आविष्कार त्याच्या वाणीच्या द्वारे प्रस्फुरित झाला होता, विश्वाला एका महामंत्राचा लाभ झाला होता. विश्वामित्राच्या मुखातून बाहेर पडलेली ती दिव्य छंदोमय वाणी अशी होती—

‘ तत्सवितुर्वरेण्यं
भर्गो देवस्य धीमही
धियो यो नः प्रचोदयात् ॥ ’

गायत्रीमंत्र म्हणून विश्वविख्यात असलेली मंत्रमय रचना विश्वामित्राला स्फुरली होती. गायत्री हा छंद आहे. विश्वामित्राचा हा मंत्र ही पहिलीच अशा प्रकारची रचना आहे की जी विशिष्ट अक्षरसंख्येने युक्त आहे. ही अक्षरबद्ध रचना गाणाऱ्याला तारणारी म्हणून प्रसिद्धी पावली व अशा रचनेचा उद्गाता म्हणून विश्वरथ हा विश्वामित्र या नव्या नावाने प्रसिद्धी पावला. अजरामर झाला. जी रचना गायली जाऊ शकते; अशा रचनेचा गायत्रीपासून प्रारंभ झाला व पुढे मग या प्रकारच्या रचनेला मान्यता व लोकप्रियता लाभली.

विश्वामित्राचे माहात्म्य एवढे वाढले की, अनेकानेक तरुण गायत्रीची दीक्षा घेण्यासाठी त्याच्या भोवती गोळा होऊ लागले. ज्या पुरोहितवर्गाने यज्ञाच्या वेळी त्याला परास्त केले होते, तोच वर्ग विश्वामित्राची स्तुती गाऊ लागला. इतकेच नव्हे तर खुद्द देवराज वशिष्ठाने विश्वामित्राच्या या गायत्रीचे कौतुक केले–त्याचा सत्कार केला. ब्राह्मणाला गायत्रीचा दीक्षाविधी आवश्यक ठरला. गायत्री मंत्राच्या तेजस्वितेमागे हा असा उज्ज्वल इतिहास आहे.

गायत्री, मृत्युंजय, नवार्ण यांसारखे सिद्ध महामंत्र, सर्व बीजमंत्र, रामरक्षा, अथर्वशीर्ष, पुरुषसूक्त, विष्णुसहस्रनाम, ललितासहस्रनाम, रुद्र, महिम्न, श्रीसूक्त, व्यंकटेशस्तोत्र यांसारखी स्तोत्रे, आणि गुरुचरित्र, सप्तशती, नवनाथभक्तिसार, शिवलीलामृत,

गीता, ज्ञानेश्वरी यांसारखे धर्मग्रंथ या सर्वांच्या मागे अशीच बैठक आहे. या स्तोत्रमंत्रांचे सामर्थ्य व मंत्रमयता विज्ञाननिष्ठ आहे आणि त्याचा प्रत्यय प्रयोगशाळांतून यांत्रिक मापनाच्या द्वारेही येतो; याचे अनेक पुरावे उपलब्ध होत आहेत. अपार श्रद्धेतून निर्माण होणारे बळही या स्तोत्रमंत्रांचा प्रभाव वाढविण्यास साहाय्यभूत होत असते. 'एथ प्रतिफळे भावना' या ज्ञानेश्वरांच्या वचनाची सत्यता या स्तोत्रमंत्राच्या बाबतीत अचूक प्रत्ययास येते.

□ □ □

# ७

नामरूपात्मक विश्वाचा उगम ॐकारातून झाला आहे. स्वरव्यंजनात्मक वर्णमाला आणि स्वरात्मक संगीत हा ॐकाराचाच आविष्कार आहे. वर्णमालेतील प्रत्येक अक्षरात कंपने किंवा ध्वनिलहरी निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. ऋषिमुनींना ब्रह्मचैतन्याशी एकरूप अवस्थेत स्फुरलेले मंत्र किंवा स्तोत्रे ही ईश्वराचीच निःश्वसिते असतात. त्यांच्या ठिकाणी अपौरुषेय दिव्यतेचे वलय असते. आणि म्हणून अशा स्तोत्र–मंत्रांच्या श्रद्धापूर्ण पठण–पारायणाने चमत्कारात गणना व्हावी अशा अद्‌भुत व अपूर्व गोष्टी घडून येतात. या विषयाचा शास्त्रशुद्ध विचार, ऊहापोह, ‘ ॐकाररहस्य ’ या माझ्या ग्रंथातील ‘ स्तोत्र, मंत्र व पवित्र ग्रंथ ’ या प्रकरणात केला आहे. त्याची पुनरुक्ती येथे करीत नाही. जिज्ञासूंनी तो ग्रंथ, त्यातील हे प्रकरण (पाने ३५ ते ८४) अवश्य वाचावी.

त्या ग्रंथात समाविष्ट न झालेला स्तोत्रमंत्रांच्या सामर्थ्याची वैज्ञानिक बैठक विशद करणारा एक प्रत्ययकारी शोध येथे सांगावासा वाटतो. स्तोत्रमंत्रातील रचनेमुळे व संगीतातील रागांच्या विशिष्ट रचनेमुळे आकृतिबंध निर्माण होतात. हे सौ. वॅट्स ह्यूजेस या लेखक संशोधिकेने परिश्रमपूर्वक सिद्ध केले आहे. या संशोधिकेने एक यंत्र तयार केले आहे. एडोफोन (Eidophone) हे त्या यंत्राचे नाव. या यंत्रावर ध्वनि-लहरींच्या आघातांनी निर्माण होणाऱ्या आकृतींची यथातथ्य नोंद होते. आरंभी तिने या यंत्राच्या तबकडीवर अगदी लहान बियांचा उपयोग केला. प्रयोगाच्या वेळी कोणत्याही ध्वनिलहरीचे आघात त्या यंत्रावर झाले की त्या कंपनामुळे त्या चिमुकल्या बिया विशिष्ट आकार निर्माण करून एक प्रकारचे नृत्य करीत. बियांच्या त्या लयबद्ध हालचालीत त्रिकोण, चौकोन इत्यादी आकार स्पष्टपणे दृश्यमान होत. पुढे तिने या बियांच्या ऐवजी विशिष्ट प्रकारची धुळीसारखी भुकटी वापरण्यास सुरुवात केली. अशा भुकटीत ‘ कोपो-डियम डस्ट ’ ही अधिक प्रभावी आढळून आली. विशिष्ट मंत्रांच्या–स्तोत्रांच्या उच्चारणा-मुळे निर्माण होणाऱ्या विविध आकृती या भुकटीवर स्पष्ट उमटलेल्या आढळून येतात. फ्रान्समध्ये मॅडम फिनलँग या गायिका कु. मेरीचे एक स्तोत्र तन्मयतेने गात. ‘ ओ ईव्ह मरियम ’ या नावाने ते स्तोत्र प्रसिद्ध आहे. ते स्तोत्र म्हटल्यावर त्याच्या ध्वनि-

लहरींच्या आघातांनी या यंत्रावर बाल खिस्ताला मांडीवर घेतलेल्या कु. मेरीची रेखीव प्रतिमा उमटलेली अनेकांनी पाहिली.

त्याच वेळी फ्रान्समध्ये विद्याभ्यास करीत असलेल्या बनारस येथील एका बंगाली तरुणाने भैरव राग आळविला. त्या रागाच्या स्वरलहरींचा परिणाम म्हणून यंत्रावर भैरवाची पारंपरिक प्रतिमा उमटलेली पाहावयास सापडली. भैरवाचे वाहन असलेला श्वानही त्याच्या पायाशी रेखीवपणे उमटलेला पाहून अनेकांनी आश्चर्याने तोंडात बोट घातले.

ज्यावेळी काही विशिष्ट स्वर किंवा विशिष्ट अक्षरे उच्चारली गेली त्यावेळी ते ते शब्द व स्वर यांचे परिणाम दर्शविणाऱ्या भिन्न आकृती रेखांकित झालेल्या आढळल्या. अशा आकृतीत फुले, तारे सर्प, पक्षी यासारख्या आकृती होत्या. मंत्र किंवा स्तोत्रे अथवा रागरागिण्या व भजने यांच्या ठिकाणी आकृतिबंध निर्माण करण्याचे सामर्थ्य असते, हे सौ. वॅट्स ह्यूजेस यांच्या या यंत्राच्या शोधाने व प्रयोगाने सिद्ध झाले आहे. या प्रयोगामुळे स्तोत्रमंत्रांची व संगीताची वैज्ञानिक बैठक आपोआपच प्रत्ययास आली आहे.

० ० ०

सावंतवाडी येथे १९७१ च्या नोव्हेंबर महिन्यात 'विश्वहिंदू परिषदे'च्या वतीने माझी तीन व्याख्याने झाली. त्या व्याख्यानांत श्रीमती वॅट्स ह्यूजेस हिच्या संशोधनाचे वरील वृत्त स्वाभाविकपणेच मी निवेदन केले. त्या व्याख्यानानंतर तेथील एक प्रतिष्ठित नागरिक आणि प्रसिद्ध उद्योगपती श्री. मसुरेकर यांची–माझी भेट झाली. त्या भेटीत त्यांनी एक चमत्कार सांगितला. सावंतवाडी येथे नवरात्रात (किंवा तसाच आणखी कोणता तरी प्रसंग असेल) श्रीसूक्ताची पारायणे मोठया प्रमाणात केली जातात. श्रीसूक्ताचे अनुष्ठान ज्या ठिकाणी केले जाते तेथे पसरून ठेवलेल्या रांगोळीवर अनुष्ठानाच्या शेवटी श्रीलक्ष्मीची मूर्ती उमटलेली आढळते. हा चमत्कार प्रत्यक्ष पाहण्याची संधी अद्याप मला मिळालेली नाही. पण ती मी अवश्य साधणार आहे.

० ० ०

शब्दरूप धारण करण्यापूर्वी मानवी मनात जे प्रबळ विचार व उत्कट संकल्प उसळतात त्यांनाही रंगरेखात्मक आकार किंवा रूप असते, हेही प्रयोगाने सिद्ध झाले आहे. थिऑसफीच्या ॲनी बेझंट आणि लेडबिटर यांनी 'थॉट फॉर्म्स' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्यात हा विषय रंगीत आकृतींसह अत्यंत परिणामकारकपणे मांडला आहे. जिज्ञासू अभ्यासकांनी हा ग्रंथ अवश्य दृष्टीखालून घालावा.

या संदर्भात एक सत्यकथा या विषयावर प्रखर प्रकाश टाकणारी आहे म्हणून सांगावीशी वाटते. आनंदमयी माँ या एक थोर योगिनी आणि भारताच्या विभूती

आहेत. त्यांचे सारेच जीवन अलौकिक आहे. योगिनी आणि परमभक्त असल्यामुळे वारंवार त्या भावावस्थेत जातात. १९२७ सालची घटना आहे. आनंदमयी माँचे एक भक्त श्री शशीभूषण दास गुप्ता हे डाका येथे शारदीय महोत्सवासाठी आले होते. परत जाण्यापूर्वी माताजींची काही छायाचित्रे घ्यावीत अशी त्यांची मनीषा होती. ते ज्या दिवशी आपल्या गावी परत जाणार होते त्या दिवशी छायाचित्रणाचा हा कार्यक्रम उरकणे आवश्यक होते. पण त्याच दिवशी त्याच वेळी माताजी भावावस्थेत निमग्न झाल्या होत्या. तशा स्थितीतच त्यांना छायाचित्रणासाठी बसविण्यात आले. एकामागून एक १८ काचा घेण्यात आल्या. त्यांपैकी फक्त एका काचेवर माताजींचे छायाचित्र उमटले. छायाचित्रणाच्या वेळी माताजींचे प्रिय शिष्य श्री ज्योतिषचंद्र रॉय हे दूर उभे राहून मुक्याने खुणांनी सूचना देत होते. छायाचित्र हाती आल्यावर माताजींच्या छायाकृतीच्या मागे प्रत्यक्ष छायाचित्रणासाठी उभे नसलेल्या श्री ज्योतिषचंद्र रॉय यांची छायाकृती स्पष्ट उमटलेली दिसून आली.

या चमत्कारामुळे सर्वजण चकित झाले. पुढे स्वतः माताजींनीच या चमत्कारामागचे रहस्य विशद केले. त्या म्हणाल्या, ‘ मी भावावस्थेत त्या काळोख्या खोलीत पडले होते त्यावेळी माझ्या शरीराभोवती एक प्रकाशमय ज्योती विलसत होती. छायाचित्रणासाठी माझ्या देहाला बाहेर आणण्यात आले त्यावेळी ती प्रकाशज्योतही बरोबर होती. हळूहळू ती ज्योत संकुचित होत होत कपाळामध्ये ( भ्रूमध्यात ) केंद्रित झाली. त्यावेळी मला असे वाटले की ज्योतिषबाबू माझ्या मागे आहेत.

ज्योतिषबाबू आपल्या मागे असावेत हा माताजींचा प्रबळ विचार प्रभावी होऊन त्याचा परिणाम ज्योतिषचंद्र यांच्यावरही झाला असला पाहिजे. माताजींच्या संकल्पप्रभावाने ज्योतिषचंद्र यांचा सूक्ष्म देह त्यांच्या स्थूल देहापासून वेगळा होऊन माताजींच्या इच्छेप्रमाणे छायाचित्रात त्यांच्यामागे जाऊन उभा राहिला असला पाहिजे.

• • •

संगीत ही विश्वभाषा आहे. भावनेची भाषा आहे. संगीतातील स्वरलहरींचे सामर्थ्य अमोघ व अमाप असते. संगीताचा परिणाम पशुपक्ष्यांवर व वनस्पतिसृष्टीवरही होतो हे आता शास्त्रसिद्ध झाले आहे. संगीत हा ‘ ॐ ’ या दिव्य मूळध्वनीचा मधुर आविष्कार आहे. ॐकारातून आविष्कृत झालेल्या संगीताचा–नादब्रह्माचा परिणाम माणसाच्या मनावर–मज्जातंतूंवरच नव्हे तर अंतर्मनावरही होतो. या सामर्थ्याचा अनुभव घेऊन व अभ्यास करून भारतीय ऋषिमुनींनी त्याचे शास्त्रच बनविले आहे. भारतीय संगीतातील रागरागिण्यांची अभिजात, रेखीव व आल्हादक रचना हा या अभ्यासाचाच परिपाक !

तंबोऱ्याच्या तारा छेडल्या जात असताना लक्षपूर्वक ऐकल्यास तंबोरा सुरात लागला असेल तर आल्हाददायक असा ॐकारध्वनीच निनादित होत असतो याचा

प्रत्यय येतो. प्रत्यक्ष गायनाला आरंभ करण्यापूर्वी गवयी ' नोम्-तोम् ' करतात. ही नोमतोम म्हणजे ॐचेच उच्चारण-आळवणी असते. वीणा या भारतीय वाद्याचा आकार ॐ या अक्षरावरूनच सुचलेला आहे. उपनिषदातील ऋर्षींनी ॐकाराला विश्ववीणेची उपमा दिली आहे. या संदर्भात पू. विनोबांनी काढलेले उद्गार उल्लेखनीय व मननीय आहेत. विनोबा म्हणतात, " हा ॐकार सर्वसहिष्णू असल्यामुळे याला बरे वाईट सर्वच ध्वनी सहन होऊ शकतात. कोणत्याही स्वराशी हा विसंवादी होत नाही. किंबहुना याच्या विश्वसंवादी नादामध्ये अनेक विसंवादी स्वर खपून जातात. म्हणूनच गवई लोक तंबोऱ्यावर ॐकाराचा ध्वनी लावून त्या ध्वनीबरोबर गातात. सगळे गवई या ॐकारनादिनी वीणेचा नित्यशः उपयोग करीत असतात. तिची ॐकारसदृश आकृती पाहात असतात. स्वर चढविण्या-उतरविण्यासाठी तिच्या अर्धमात्रेची खुंटी पिरगळत असतात. पण इतके करूनही त्यांना तिच्या स्वरूपाचे ज्ञान नसते. म्हणून बिचारे केवळ धनाचे भागी होतात. ' तद् ये इमे वीणायां गायंति, तस्मात् ते धनसंचयः । ' पण नारदासारख्यांना या वीणेची ओळख असल्यामुळे हिच्या उपासनेने ते मोक्षपदाचे अधिकारी होतात. सर्वसहिष्णू, विश्वसंवादी ॐकाराचा मंजुळ बोल बोलणारी ही वीणा कोणती असेल बरे ? देवी सरस्वतीच्या या ॐकारनादिनी वीणेला ऋषी ' शांति ' या नावाने ओळखतात. "

ॐकारापासून जन्मलेल्या वर्णमालेतील स्वरांना विशेष सामर्थ्य व महत्त्व असते. ' उदात्त, अनुदात्त, स्वरित, ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, तार, मंद्र, घोर,आरोह,अवरोह,उच्च-नीच इत्यादि जे वर्णधर्म आहेत ते अ, इ, उ, ऋ इत्यादि स्वरसंज्ञित वर्णावरच राहतात ' हे या विषयातील एका जाणकाराने काढलेले उद्गार चिंतनीय आहेत. भाषण, पठण, गायन इत्यादींच्या ठिकाणी जी रस व सौंदर्यनिर्मिती होते ती या स्वरांचीच किमया. वर्णमालेतील व्यंजनांना या स्वरांचा आश्रय केल्यावाचून उभेच राहता येत नाही. अशा या स्वरांच्या संयोजनेने झालेली संगीतनिर्मिती हा ॐकाराचाच मधुर आविष्कार आहे. जेथे आत्मविकास आहे तेथे स्वरविलास असणारच. भारतीय संगीतातील रागरागिण्यांची स्वररचना मंत्रमय आहे.

ध्वनिलहरींच्या ठिकाणी रंग—रूप—रेखात्मक आकृतिबंध निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे हे आता सिद्ध व मान्य झाले आहे. संगीतश्रवणाने गायी अधिक दूध देतात व संगीताच्या स्वरसिंचनामुळे वनस्पतींच्या वाढीवर इष्ट परिणाम होतो हे अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांत विज्ञानानेच सिद्ध झालेले आहे.

भारतातील एक संशोधक डॉक्टर व्ही. बी. गोरे यांनी संगीतसामर्थ्यांवर प्रकाश टाकणारे मौलिक संशोधन केले. त्यांच्या संशोधनाच्या आधारे त्यांनी ' आसावरी ' रागिणीच्या स्वररचनेत पौरुषहीनता दूर करण्याची शक्ती आहे व ' पूरिया ' रागाच्या स्वरसिंचनाने रक्तदाब कमी करणे सहज शक्य आहे, अशी ग्वाही दिली आहे.

भारतीय संगीतातील विशिष्ट रागरागिणींच्या गायनामुळे विशिष्ट आकृतिबंध

निर्माण होतात, या सिद्धांतावर प्रकाश टाकणारी एक दंतकथा बोलकी आहे. भारतीय संगीतशास्त्रकारांनी त्या त्या रागांच्या गायनामुळे निर्माण होणाऱ्या आकृतिबंधांना विशिष्ट देवतांची रूपे दिली आहेत. त्या त्या रागांची स्वररचना शास्त्रशुद्धपणे आळविली गेली नाही तर कसा अनर्थ होतो हे या दंतकथेंत प्रभावीपणे विशद केलेले आढळते. दंतकथा अशी :

नारद म्हणजे मूर्तिमंत संगीत. नारदांचे वीणावादन व गायन श्रीहरीला अत्यंत प्रिय. पण एकदा नारदांना आपल्या संगीतनैपुण्याचा अहंकार झाला. त्याच भरात त्यांचे गायन–वीणावादन भगवंतापुढे चालू होते. पण त्यामुळे भगवंतांच्या मुद्रेवर प्रसन्नते-ऐवजी उद्वेगाचे भाव उमटत असल्याचे नारदांना दिसून आले. काही तरी प्रमाद होतो आहे हे ध्यानी येऊन नारदांनी वीणेवरचे आपले हात काढून ते श्रीहरीच्या पदकमलांवर ठेवले; आणि नम्र भावाने विचारले, 'प्रभूंच्या अप्रसन्नतेचे कारण कळेल का ?' भगवंतांनी स्मित केले आणि नारदांना काहीशा खोचक स्वरात ते म्हणाले, 'खरे संगीत कशाला म्हणतात हे जाणून घेण्यासाठी आपण एक वेळ गंधमादन पर्वताला भेट द्या. त्या एकांतस्थळी हनुमान तप करीत आहे. त्याची आपण भेट घ्या. म्हणजे सर्व उलगडा होईल.'

नारद निघाले–गंधमादन पर्वतावर पोचले. त्या रम्य प्रदेशातून त्यांना एका वृक्षवाटिकेत स्त्रियांच्या विलापाचे करुण स्वर ऐकू आले. कुतूहलाने ते त्या वाटिकेत शिरले. त्या ठिकाणी त्यांना काही अप्सरातुल्य रमणींचा समुदाय दिसला. त्यांपैकी प्रत्येक सुंदरीच्या एखाद्या तरी अवयवात व्यंग किंवा विद्रूपता असल्याचे त्यांनी पाहिले. कोणाच्या नासिकेची कळी छेदली गेलेली होती, तर कोणाचे हात विद्रूप झालेले होते. ते दृश्य पाहून नारदमुनी द्रवले. त्यांनी स्नेहभावाने त्या रमणींची विचारपूस केली. त्यांच्या त्या दारुण अवस्थेचे कारण त्यांनी विचारले. त्या सुंदरींच्या मुखातून नारदांना पुढील वृत्त ऐकावयास मिळाले.

त्या म्हणाल्या, 'आम्ही सर्व संगीतातील वेगवेगळ्या रागदेवता आहोत. संगीत-तज्ज्ञ असूनही नारद नावाच्या ऋषीने वैकुंठात असे काही अशास्त्रीय–सदोष गायन केले की, त्याचा परिणाम आमच्या ठिकाणी हे शरीरदोष निर्माण होण्यात झाला. नारदाने केलेला प्रमाद कोणीतरी जाणत्या संगीतकाराने सुधारून शास्त्रशुद्ध अचूक संगीत आळविल्याशिवाय या वैगुण्यातून आमची मुक्तता होणार नाही.' क्षणार्धात नारदांच्या अहंकाराचा निरास झाला. आपल्या सदोष संगीतगायनामुळे या सुंदर देवतांना, विरूपता प्राप्त व्हावी याचे त्यांना दुःख झाले. त्यांनी त्या शोकमग्न देवतांना, आपणच अपराधी नारद आहोत, हे सत्य सांगून त्यांची क्षमा मागितली. व्यथित अंतःकरणाने नारद त्या देवतांना पुढे म्हणाले, 'या पर्वतावर तप करीत असलेल्या श्रीहनुमंतांच्या भेटीसाठी मी येथे आलो आहे. हनुमानांनी साधनेच्या द्वारे संगीतकलेत पूर्णता प्राप्त करून घेतली आहे. त्यांच्या पायाशी बसून मी संगीताचे पाठ घेणार आहे. ते घेतल्यावर माझ्या

गायनातील दोष व उणीवा दूर करून ते निर्दोष करीन. आणि मग तुम्हा सर्वांना आपल्या मूळ स्वरूपाची प्राप्ती होईल व तुम्ही निश्चिंत व्हाल.' असे आश्वासन देऊन नारदमुनी हनुमानांच्या दर्शनभेटीसाठी निघून गेले.

पर्वताच्या एका रम्य शांत शिखरावर हनुमंतांचा निवास होता. नारायणनामाचा जयघोष करून नारदांनी हनुमंतांच्या चरणी मस्तक ठेवले. हनुमंत आश्चर्याने पाहातच राहिले. नारदांनी आपल्या आगमनाचा हेतू उघड केला. ते म्हणाले, 'संगीतकलेत मी परिपूर्ण झालो आहे अशा भ्रममूलक अहंकाराने मी फुगून गेलो होतो. पण भगवंतांनी माझ्या अहंगंडावर प्रहार केला. आणि खऱ्या संगीताचे ज्ञान करून घेण्यासाठी त्यांनीच मला आपणांकडे पाठविले. आपण कृपावंत होऊन संगीतातील परमोच्च प्रावीण्याचा लाभ मला घडवावा.'

हनुमंतांनी मंदस्मित केले. आणि नारदांच्या हातातील वीणा आपल्या हाती घेऊन त्यांनी ती वाजविण्यास प्रारंभ केला. थोडयाच वेळात एक अपूर्व स्वरविश्व त्या ठिकाणी अवतीर्ण झाले. हनुमंत आपले देहभान विसरले होते. तल्लीन अवस्थेत त्यांचा स्वरविहार वातावरणात अमृतानंद निर्माण करीत होता. नादब्रह्माच्या त्या साक्षात्काराने नारदांना स्वतःच्या थिटेपणाची जाणीव करून दिली. थोडयाच वेळात तो अमृतप्रवाह थांबला. हनुमंतांनी नारदांना काही तांत्रिक रहस्ये उलगडून सांगितली. आणि तदनुसार वीणावादन करण्याची अनुज्ञा दिली.

हनुमंतांनी खाली ठेवलेली वीणा नारद आपल्या हाती उत्साहाने घेऊ लागले तो त्यांना एक चमत्कार आढळून आला. हनुमंतांचे वीणावादन चालू होते त्यावेळी त्यांच्या स्वरलहरींच्या प्रभावाने भोवतालचा कण न् कण द्रवला होता. पाझरला होता. विरघळला होता. हनुमंतांनी वीणा खाली ठेवताच तेथील भूमीने पूर्ववत् आपले काठिण्य धारण केले. परिणाम असा झाला की, शिलाखंडात रुतून बसलेली वीणा काही केल्या उचलली जाईना. नारदांना काय करावे ते सुचेना. त्यावर हनुमंतांनी हसून उपाय सुचविला. ते म्हणाले, 'ह्या शिला पुन्हा वितळतील, विरघळतील असे अमोघ रागगायन कर.' नारदांनी उत्कृष्ट राग आळविण्याची पराकाष्ठा केली. परंतु भूमी द्रवेना. तिच्या ठिकाणी सहृदयतेचा पाझर फुटेना. नारदांना आपला पराभव मान्य करावा लागला. ते हनुमंतांना विनम्र भावाने शरण गेले. त्यावर हनुमंतांनी गायनास आरंभ केला. त्यांच्या स्वरप्रभावामुळे थोडयाच वेळात कठीण शिलाखंड आपली कठोरता विसरून स्नेहार्द्र झाले. भोवतालची सर्व भूमी लोण्यासारखी मऊ झाली. त्यामुळे हात लावताच रुतून बसलेली नारदांची वीणा सहजपणे उचलली गेली.

नारदांचा अहंकार त्या दिवसापासून निरंतरचा नाहीसा झाला.

या दंतकथेत फार मोठे सत्य सहजपणे विशद केले गेले आहे. खडकालाही पाझर फोडण्याचे सामर्थ्य शास्त्रशुद्ध सुरेल संगीतात आहे, हा बोध ही कथा सांगते.

भारतीय संगीताची रचना अत्यंत शास्त्रशुद्ध आहे. तिच्यात नादयोगातील

तत्त्वांचा आणि प्रक्रियांचा पद्धतशीर उपयोग करण्यात आला आहे. संगीतातील ' राग ' ही संज्ञाही मंत्रयुक्त आहे. नाद, बिंदू, कला व ज्योती हे नादयोगातील विकासतत्त्व संगीतातही आढळते. इडा, पिंगला व सुषुम्ना या नाड्यांशी संगीताच्या अभिव्यक्तीचा संबंध आहे. रागरचनेतील स्वरांचा मानवी शरीरातील सूक्ष्म चैतन्यकेंद्राशी म्हणजेच षट्चक्राशी संबंध आहे. ' वं ' ' रं ' इत्यादी बीजाक्षरांचा त्या त्या रागांशी संबंध आहे. उदाहरणार्थ ' वं ' बीज मेघ रागाच्या रचनेत प्रमुख आहे. कारण ' वं ' हे जलतत्त्वाचे बीज आहे. ' रं ' हे अग्निबीज आहे. त्याचा दीपक रागाशी संबंध आहे. योग व तंत्र यांतील तत्त्वांवर संगीताची संपूर्ण रचना कशी आधारित आहे यावर स्वच्छ प्रकाश टाकणारा एक उद्बोधक प्रबंध बनारस विद्यापीठाच्या प्रेमलता शर्मा यांनी लिहिला आहे. तो ' चक्र ' या नावाच्या योग व तंत्रविषयक इंग्रजी त्रैमासिकाच्या १९७१ च्या दुसऱ्या अंकात प्रकाशित झाला आहे. तो प्रबंध लिहिण्याच्या कामी योग व तंत्रविषयक मार्गदर्शन व विवरण त्या शास्त्रातील एक श्रेष्ठ अधिकारी स्वामी प्रत्यगात्मानंद सरस्वती यांनी केले आहे. कुंडलिनी–जागरण आणि त्याचेच पर्यवसान जिच्यात होते त्या आनंद–समाधीची प्राप्ती भारतीय संगीतसाधनेने कशी होऊ शकते, हे या प्रबंधात सुस्पष्ट झाले आहे. या दृष्टीने संगीतक्षेत्रातील अधिकारी, अभ्यासक व साक्षेपी साधक यांनी भारतीय संगीताचे अधिक सखोल अध्ययन व संशोधन करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले तर संगीतसाधना केवळ एक रोगोपचार म्हणूनच नव्हे तर मोक्षप्रदही होऊ शकेल यात शंका बाळगण्याचे कारण नाही.

या दृष्टीने दीपराग आळविल्याने दीप उजळतात किंवा मेघमल्हार आळवल्याने घनगर्जिताची अनुभूती येते यावर निःसंदिग्धपणे विश्वास ठेवण्यास प्रत्यवाय नाही, पण आधुनिक बुद्धिवाद्यांना संगीताचे हे सामर्थ्य हा केवळ एक चमत्कार वाटण्याचा संभव आहे. अशा संशयवाद्यांसाठी असे म्हणता येईल की, वाटेल त्या गवयाने दीपराग आळवताक्षणीच सभास्थानी दीपपंक्ती उजळल्या नाहीत किंवा मेघमल्हाराच्या आळविण्याने आकाशात मेघांचा गडगडाट सुरू होऊन पावसाच्या सरी कोसळू लागल्या नाहीत तरी या रागांच्या ठिकाणी कोणाच्याही अंतःकरणातल्या ज्योती उजळण्याचे, वातावरण प्रज्वलित करण्याचे वा ते घनगंभीर करण्याचे सामर्थ्य आहेच आहे याची प्रतीती व प्रचीती घेणे सहज शक्य आहे. त्या विशिष्ट रागांची रचनाच अशी शास्त्रशुद्ध व मंत्रमय आहे की योग्य पद्धतीने आळविल्यास इष्ट तो दृश्य परिणाम दिसून आलाच पाहिजे.

भारतीय संस्कृतीने संगीताचे हे सामर्थ्य व उपयुक्तता ओळखली होती. भारतीय जीवनाच्या महावस्त्राला संगीताचे नैसर्गिक मुलायम अस्तर आहे. सकाळपासून सायंकाळ-पर्यंतचे व जन्मापासून मृत्यूपर्यंतचे भारतीय जीवनातील आचारविचार व संस्कार पाहिले म्हणजे त्यात संगीताला प्राधान्य असलेले आढळून येते. स्त्रीला गर्भ राहिल्यावर 'डोहाळे' म्हणावयाचे असतात; बालकाचे नामकरण करताना ' पाळणा ' म्हटला जातो; बालवयात गीतसंगीत बालकांच्या बरोबरच घरादारातून धावत बागडत असते. हदगा, भोंडला,

मंगळागौर यांसारख्या प्रसंगी घर नृत्यसंगीतात न्हाऊन निघते. खेड्यात तर संगीत पावलोपावली शेतकऱ्याची साथ करीत असते. शेत पेरताना, राखताना, कापताना शेतकरी गातो–नाचतो–बागडतो. बालकांना झोपविण्यासाठी रामबाण संजीवनी–गुटिका म्हणजे 'अंगाई'. पण आमच्या–सांस्कृतिक वारसा असलेल्या संगीताच्या दिव्य कवचाचा वापर आम्ही नाकारीत आहोत. सध्याच्या जीवनात नष्ट होणारी देहाची व मनाची शांती व स्वास्थ्य संगीताच्या उपचारांनी परत मिळवणे शक्य आहे. व्याधि–निवारण व पीडा–परिहार यासाठीही एक उपचारपद्धती म्हणून भारतीय संगीताचा शास्त्रशुद्ध व कुशल वापर करण्याकडे संगीतज्ञांचे व तज्ज्ञ वैद्यांचे लक्ष वेधले पाहिजे व त्यासंबंधी भिन्नभिन्न प्रयोग केले गेले पाहिजेत. भारतीय संगीत म्हणजे 'घराण्यां' चा त्यांच्या दोषांसकट खोटा अभिमान वा गळ्याची चमत्कारिक कसरत ही समजूत दूर झाली पाहिजे. भारतीय संगीत मुळातच शक्तिगर्भ आहे. नव्या जीवनाच्या संदर्भात संगीत-सामर्थ्याचा अभिनव प्रयोग व उपयोग करून जीवन अधिक समृद्ध व निरामय करणे आपल्या आधीन आहे. हा उपाय जसा स्वाधीन तसाच सोपा व स्वस्तही आहे.

सस्वर व सुस्वर वेदमंत्रांचा–सामवेदाचा–शांतिमंत्रांचा–मंत्रजागराचा उद्घोष वातावरणात व ऐकणाऱ्यांच्या अंतःकरणात अशा काही लहरी निर्माण करतो की ते पवित्र, उन्नत व हर्षित होऊन जाते हा अनुभव पुष्कळांनी घेतला असेल. मंजुळ सनई वाजली की एकदम मंगल शुभ कार्याचे वातावरण निर्माण होते. शिंगे, नौबती, ड्रम्स,–ढोल वाजू लागले की मनात एक वेगळेच वारे संचारते. एकतारी झणझणू आणि चिपळ्या चुटचुटू लागल्या की भक्तिरस पाझरू लागतो. सतार, सारंगी, दिलरुबा, इतकेच काय सुरात लागलेला तंबोरा स्वच्छ बोलू लागला की हृदयातले कोणीतरी सुप्त, खडबडून जागे होते. जिवाचा कान करून ऐकू लागते. त्या चार तारांच्या अनुरणनातून त्रैलोक्यातला सारा आनंद हेलावू लागतो, चैतन्य निनादू लागते. गोपाळकृष्ण आपल्या गोकुळाला, गोपींना आणि गायींना मुग्ध करी ही केवळ पुराणकथा समजण्याचे कारण नाही. बासरीच्या मंजुळ ध्वनीत गोपाळकृष्ण आपल्या अथांग प्रेमाची अद्भुत शक्ती मिसळीत असे. त्यामुळेच सारे वातावरण त्या मुरलीने मोहून जात असे. रावणाने देखील संगीत–साधनेनेच शंकराला प्रसन्न करून घेतले होते.

ईश्वराला आळविण्यासाठी, दुःखाला पळविण्यासाठी, भावना चेतविण्यासाठी विकारांना विझवण्यासाठी, संग्रामाला आव्हान देण्यासाठी, आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी जिचा सारखाच उपयोग होतो अशी संगीत ही एकच किमया आहे.

इतिहासात मोगल बादशहा शेरशहाबद्दल, एक दंतकथा प्रचलित आहे. शेरशहाने आपल्या पदरी उत्कृष्ट गवई ठेवले होते. त्यांचे गाण्याचे कार्यक्रम तो दरबारात करीत असे. त्याला डोकेदुखीची तीव्र व्यथा होती. अशा वेळी वैद्य–हकीमांच्या दवादारूने त्याच्या व्यथेचा उपशम होत नसे. त्याच्या डोकेदुखीवर एकच रामबाण उपाय त्याला अनुभवाने कळला होता. बादशहाचे डोके दुखू लागले की दरबारी गवयास

पाचारण होई. नेमक्या कोणत्या रागाच्या गायनाने त्याची डोकेदुखी कमी होत असे हे माहीत नाही, पण अभिजात संगीताच्या श्रवणाने त्याचा मस्तकशूळ थांबत असे हे मात्र खास.

पुण्यातील एका पारंगत भिषग्वर्याने संगीताचा उपयोग आपल्या डोके बिघडण्याच्या व्याधीवर स्वतःच कसा केला हा वृत्तांत या दृष्टीने अपूर्व व या मुद्यावर प्रकाश टाकणारा आहे. पुणे शहरात श्री. नारायण त्र्यंबक ऊर्फ बापूसाहेब मेहेंदळे हे एक अलौकिक पुरुष होऊन गेले. ( जन्म शके १७४७; मृत्यू शके १८०० ) या गृहस्थांचे सारेच चरित्र जगावेगळे–अद्‌भुत–असामान्य आहे. ऐतिहासिक नामवंत व श्रीमंत कुळात जन्म लाभला. बुद्धीचे तेज असे की शाळेत न जाता घरीच अभ्यास करून या गृहस्थाने केवळ वैद्यकशास्त्रच नव्हे तर अनेक अवघड विद्या व कलांचा अभ्यास करून त्यात अभूतपूर्व प्रावीण्य व पारंगतता मिळविली. समोरून येणाऱ्या माणसाचे चालणे, बोलणे किंवा हावभाव यांवरून ते त्याचे अचूक रोगनिदान करीत असत. परदेशी लोकांना देखील या धन्वंतरीने मृत्यू थोपवून धरून आपल्या विद्येचा चमत्कार दाखविला होता.

अशा या जगावेगळया धन्वंतरीला अभिजात संगीताची आवड होती व त्यांनी संगीतविद्येतही उत्तम गती मिळविली होती. यांच्या आयुष्यात एक वेळ अशी आली की, एकदा त्यांचे डोके बिघडले. स्वतःच्या या व्याधीची चिकित्सा व निदान त्यांनी स्वतःच केले. प्रत्यही अभिजात संगीताचे श्रवण हाच आपल्या व्याधीवर त्यांनी उपचार योजला. पैशाची किंवा लोकापवादाची पर्वा न करिता उत्तमोत्तम गायकगायिकांचे गाणे ऐकण्याचा उपक्रम त्यांनी चालू केला. ह्या काळात एका ब्राह्मण गृहस्थाने आपल्या घरात उघडपणे नायकिणीचे गाणे करणे वा ऐकणे हे समाजाच्या रोषाला वा टीकेला आमंत्रण होते. पण बापूसाहेब मेहेंदळे यांनी त्या सर्व विरोधांना व वादळांना तोंड देऊन आपला संगीतोपचार चालू ठेवला. संगीताच्या नित्यश्रवणाने त्यांची व्याधी दूर झाली हे लक्षात घेण्यासारखे आहे.

संगीतशास्त्रात या महाभागांची केवढी गती व प्रगती होती याचा निर्देशक असा एक प्रसंग वैशिष्ट्यपूर्ण आहे. मिश्रा नावाच्या एका गानकुशल नायकिणीने एकदा बापूसाहेबांना बनविण्याचा प्रयत्न केला. एक अत्यंत अवघड राग तिने आळविला व तो राग आळविताना तो अधिक कठीण करण्यासाठी तिने काही क्लृप्त्या लढविल्या. तिला वाटले होते की, या बावळट ब्राह्मणाला आपण सहज चकवू. तिची लबाडी त्यांनी लगेच ओळखली. आणि अत्यंत परखड शब्दांत त्यांनी तिची खरड काढली. बापूसाहेब म्हणाले, ‘तुझ्यासारख्या नादब्रह्माच्या उपासिकेने अभिजात स्वररचनेत असा अविहित स्वरसंकर करून आपल्या श्रोत्याला किंवा रसिकाला फसविणे हा शुद्ध अधमपणा आहे. पाप आहे. वैद्यकातल्या मात्रांपेक्षाही संगीतातील सूक्ष्म स्वरांचे व मात्रांचे ज्ञान या गानलुब्धाला आहे हे तू विसरलीस–’

बापूसाहेबांच्या स्पष्टवक्तेपणाने व ज्ञानाने मिश्रा नायकीण खजिल झाली आणि

तिने बापूसाहेबांची क्षमा मागितली.

पुण्यातील आणखी एक प्रसिद्ध धन्वंतरी महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रातील हा प्रसंग आहे. अण्णासाहेबांनी मद्रासहून परत येताना आपल्याबरोबर पेरु-अय्या या नावाचा एक तेलंगी ब्राह्मण आणला होता. रंगाने काळा, दिसायला काहीसा बावळा आणि स्वभावाने साधाभोळा असा हा पेरुअय्या संगीतनिष्णात होता. सारंग या रागावर त्याने विशेष प्रभुत्व मिळविले होते. गुरुवर अय्या या नावाच्या एका थोर पुरुषा-जवळ त्याने सतत बारा वर्षे संगीताचे अध्ययन केले होते. माध्यान्हीस भोजनापूर्वी पेरुअय्या भ्रामरी सूर काढीत असे. सहस्रावधी भुंगे एकत्र होऊन गुंजारव करीत आहेत असा भास पेरुअय्या निर्माण करीत असे. आर्यवैद्यकात ज्याला संनिपात असे म्हणतात त्या तापात रुग्णाला झोप लागत नाही, कोणत्याही उपायाने झोप लागणे हेच तो रोग बरा होण्याचे साधन आहे. अशा रोग्यांना आपल्या अद्‌भुत सुरावटीने पेरुअय्या मुग्ध करीत असे. आणि त्यामुळे रोग्याला हमखास झोप लागत असे. अशा २-३ रोग्यांना पेरुअय्याने आपल्या स्वरप्रभावाने व्याधिमुक्त केल्याचे महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांच्या चरित्रात स्पष्टपणे नमूद आहे. पेरुअय्याने आपल्या संगीतकरामतीने रावसाहेब मंडलीक यांनाही चकित केले होते, हे अण्णासाहेबांच्या चरित्रावरून ध्यानी येते.

भारतीय संगीताच्या तुलनेने पाश्चात्त्य संगीत अधिक विकसित नसूनही संगीताचा परिणाम मानवी जीवनात आणि मनात क्रांती घडवू शकतो याची काही पाश्चात्त्य देशातील ठळक उदाहरणे निर्देशयोग्य आहेत.

सी. ई. एम्. जोड या प्रख्यात शास्त्रज्ञाचे नाव सुशिक्षितांच्या परिचयाचे आहे. मुळात ‘ जोड ’ हा पूर्ण बुद्धिनिष्ठ आणि विज्ञानवादी संशोधक. दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेले हत्याकांड आणि विषमता व निर्घृणता यांचे थैमान पाहून या शास्त्रज्ञाच्या मनात आणि मतात इतके परिवर्तन घडून आले की, शेवटी तो अध्यात्माकडे–प्रार्थनेकडे विशेषतः संगीताकडे वळला. संगीत माणसाला सच्चिदानंदाचा साक्षात्कार घडवू शकते असा त्याला प्रत्यय आला. त्यातही खेड्यातील प्रभुमंदिरातील सामुदायिक प्रार्थना व संगीत यांच्याशी तो तात्काळ एकरूप होत असे. सुखशांतिलाभाचे आणि दुःखमुक्तीचे एकमेव अमोघ साधन म्हणजे संगीत अशी या शास्त्रज्ञाची खात्री पटली होती.

अमेरिकेत एक निग्रो गायिका संगीतसाधनेच्या बळावर मानवतेची महासेवा करीत आहे. ‘ महालिया जॅक्सन ’ हे त्या गायिकेचे नाव. ईश्वराने दिलेला गोड गळा आणि त्याच्याच कृपेने अनेकांची हृदये हलवून सोडणारे गानकौशल्य यांचा उपयोग ती अत्यंत प्रभावीपणे करीत आहे. वर्णद्वेष, जातिद्वेष या दुरितांचे तिमिर दूर करण्याच्या कामी आपल्या तेजस्वी संगीतकलेचा उपयोग ती स्वार्थत्यागपूर्वक करीत आहे.

श्वासोच्छ्वासाइतकीच सहजपणाने ‘ महालिया जॅक्सन ’ हिला स्वरसिद्धी प्राप्त झाली आहे. संगीताचे शास्त्रशुद्ध अध्ययन तिने केलेले नाही. पण तिला उपजतच संगीताचे सम्यक् ज्ञान आहे. धर्ममंदिरातील भक्तिसंगीताचा तिच्यावर फार परिणाम

झाला. भक्तिगीते लिहिणाऱ्या एका पियानोवादकाशी तिची मैत्री जमली. त्याच्या गीत-रचनेत आनंद ओसंडत असे. महालिया जॅक्सन ती गीते भावभक्तीने व तन्मयतेने आळवू लागली. गीतगायनात केवळ गळ्याचाच नव्हे तर शरीरातील सर्व इंद्रियांचा उपयोग करून ती देवाची आळवणी करते. लवकरच तिचे गीतगायन इतके लोकप्रिय झाले की, तिच्या कार्यक्रमाच्या वेळी गर्दी काबूत ठेवण्यासाठी पोलिसांना प्रचंड बंदोबस्त ठेवावा लागे. ती स्वतः निग्रो असूनही तिच्या गायनासाठी गोऱ्यांचाच श्रोतृवर्ग अधिक एकत्र होई. तिची लोकप्रियता एवढी वाढली की, तिने युरोपभर प्रवास केला. जेरुसलेम येथे तिच्या गाण्याच्या वेळी छप्पर कोसळून तिला इजा झाली. शस्त्रक्रियाही करावी लागली.

उपजीविकेसाठी ती एक सौंदर्यप्रसाधनगृह चालविते. पुष्परचनाकलेत ती सिद्ध-हस्त आहे. प्रेतयात्रेसाठी तिच्याकडून फुले विकत घेताना लोक अंत्ययात्रेत गीतगायना-साठी येण्याची तिला अट घालतात.अंत्ययात्रेच्या वेळी महालिया जॅक्सनच्या गीतगायनाचा ऐकणाऱ्याच्या मनावर केवढा विलक्षण परिणाम होतो याचा अनुभव मी स्वतःच घेतला आहे. 'इमिटेशन ऑफ लाईफ' या वर्णद्वेषावर आधारलेल्या एका सुंदर चित्रपटात मी प्रथम महालिया जॅक्सनचे प्रेतयात्रेबरोबरचे हृदय भेदून टाकणारे गीत ऐकले. त्यानंतरच तिचे नाव व तिचे अद्भुत चरित्र यांचा शोध मी घेतला.

महालिया जॅक्सनची १९३५ साली एका पदवीधर तरुणाशी गाठ पडली. त्यांचे प्रेम जमले. विवाह झाला. संसारही सुखाचा झाला असता. पण ध्येय सोडण्याऐवजी तिने आपल्या पतीचाच त्याग करणे श्रेयस्कर मानले. महालियाने आपल्या स्वर्गीय कलेचा विकास करून धार्मिक गीतगायनासाठीच त्याचा वापर न करिता नवीन पद्धतीने आकर्षक संगीत गावे, कीर्ती व संपत्ती मिळवावी असा तिच्या पतीने आग्रह धरला. महालिया जॅक्सन हिची श्रद्धा आहे की आपण देवाच्या, मानवतेच्या सेविका आहोत. माणसामाणसांतील भेद, द्वेष, कटुता नाहीशी करून आपल्या गायनकलेच्या द्वारा प्रेम, प्रसन्नता व पवित्रता यांचा प्रसार करण्यासाठी देवाने आपल्याला जन्म व गायन-कला दिली आहे.

महालिया जॅक्सन ही नुकतीच भारतात–मुंबईतही येऊन गेली. सहस्रावधी भाविकांनी व रसिकांनी तिच्या दिव्य गायनाचा लाभ घेतला. ती मुंबईत येऊन गेल्याची वार्ता मला उशीरा समजली. तिच्या अमृतस्वरांनी महानंदाची अनुभूती लाभलेल्या एका गुर्जर कवीने तिच्यावर एक उत्कृष्ट कविता लिहिली. त्या कवितेचा त्या कवीने स्वतःच केलेला इंग्रजी अनुवाद भारतीय विद्याभवन द्वारा प्रकाशित होणाऱ्या 'भवन्स जर्नल' ( १३ जून, १९७१ ) या लोकप्रिय पाक्षिकात माझ्या वाचनात आला. तो वाचून मला जितका आनंद झाला तितकीच चुटपुट वाटली. मुंबईत महालिया जॅक्सन येऊनही तिच्या स्वरमाधुरीच्या लाभाला मी मुकलो होतो. त्या रसिक गुर्जर कवीचे शुभनाम हरिन्द्र दवे असे आहे. ती सारी कविता उद्धृत करणे शक्य होणार नाही, पण तिच्यातील काही पंक्ती अशा—

— Into the cathedral
There was only a face;
Everything else melted
Even her pink frock and bulky body.
What remained was a face
As dark and bright as Lord Krishna
Two eyes were fixed on it like
Gems of rare brilliance. —

(या थोर गायिकेचा ता. २८ जानेवारी १९७२ या दिवशी हृदयविकाराने ख्रिस्त-वास झाला. मृत्यूच्या वेळी ती साठ वर्षांची होती.)

० ० ०

भारतीय संगीताच्या प्रभावाने व आकर्षणाने एका अमेरिकन तरुणाच्या जीवनात कशी व केवढी क्रांती झाली ही अगदी ताजी सत्यकथा ऐकण्यासारखी आहे. जॉन हिगिन्स हा अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स या संस्थानात एका सुविद्य रसिक कुळात जन्मला. त्याचे आईवडील संगीतविशारद होते. अभिजात संगीताच्या वातावरणात जॉन हिगिन्स हा लवकरच गायनवादनात प्रवीण झाला. त्याचा एक भाऊही असाच संगीतवेडा होता. रविवारी हिगिन्स कुटुंबात संगीताची मेजवानी असे. आई पियानो वाजवी. वडील चेलो-वादनात कुशल होते. जॉन व त्याचा भाऊ हेही वेगवेगळी वाद्ये तयारीने वाजवीत. त्या घरात संगीतकला मोहोरली होती. महाविद्यालयीन जीवनात जॉनने आपल्या संगीत-साधनेने नाव मिळविले होते; इतकेच नव्हे तर संगीताचा व्यासंगही अनेक प्रकारे वाढविला होता.

१९६२ साली एक नाट्यमय प्रसंग घडला. सुप्रसिद्ध दाक्षिणात्य नृत्यांगना टी. बालसरस्वती यांच्या भरतनाट्यम्‌चा एक कार्यक्रम जॉन हिगिन्स याला पाहावयास सापडला. बालसरस्वतींच्या नृत्याचा त्याच्यावर एवढा परिणाम झाला की, त्याने त्या भारतीय नृत्यांगनेची लगेच भेट घेतली. त्यांच्या त्या भेटीत दोघांनाही आपले जन्म-जन्मांतरीचे निकट नाते आहे असा मनोमन प्रत्यय आला. भारतीय–विशेषतः कर्नाटक संगीताच्या अभ्यासासाठी काय केले पाहिजे याबद्दलचे मार्गदर्शन त्याने बालसरस्वतीं-कडून मिळविले.

जॉन हिगिन्स कर्नाटकी संगीताने एवढा भारून गेला होता की, पदवी संपादन केल्यावर बालसरस्वतींचे बंधू रंगनाथन् यांना त्याने अमेरिकेत बोलावून घेतले. दोन वर्षांच्या दीर्घावधीत त्याने मृदंगम्‌च्या वादनकलेचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्याच विषयावरील आपला प्रबंध विद्यापीठाला सादर केला.

त्याच्या अभ्यासपूर्ण परिश्रमांना फळ आले. त्याला 'फुलब्राइट' शिष्यवृत्ती मिळाली. तो भारतात आला. रंगनाथन् आणि त्याचा भाऊ विश्वनाथन् यांच्यापाशी

त्याने कर्नाटकी संगीताचे सर्वांगीण सखोल अध्ययन आरंभिले. जॉन हिगिन्स सतत तीन वर्षे भारतात राहिला. त्याचे वास्तव्य त्याचे गुरुतुल्य बंधू व स्नेही विश्वनाथन् ह्यांच्या घरीच होते. पाश्चात्त्य आणि भारतीय संगीतातील सूक्ष्म भेद आणि आविष्काराची वैशिष्ट्ये यांच्या अभ्यासाने त्याला भारतीय संगीतातील सौंदर्य व अभिजातता यांच्या प्रत्यय आला. हळूहळू त्याने कर्नाटकी संगीतावर एवढे प्रभुत्व मिळविले की, १९६५ साली त्याने सुमारे १०–१५ हजार रसिकांसमोर आपला गायनाचा स्वतंत्र कार्यक्रम आत्मविश्वासाने सादर केला व एक उत्कृष्ट गायक म्हणून लौकिक मिळविला.

१९६७ साली तो आपल्या मायदेशी परत गेला आणि त्याने अमेरिकेत अनेक जाहीर कार्यक्रम करून भारतीय संगीताची अमेरिकन श्रोत्यांना नुसती गोडीच नव्हे तर वेडच लावले. गायकाला ठायी ठायी दाद देऊन उत्तेजित करण्याची भारतीय रसिक श्रोत्यांची पद्धत त्याला फार आवडली. अमेरिकेतही कार्यक्रम आकर्षक व चैतन्यमय करण्यासाठी त्याने अनेक उपाय चतुराईने योजिले. काही ठिकाणी भारतीय व अमेरिकन दोन्ही पद्धतींचे संगीत एकापाठोपाठ सादर करून त्याच वेळी त्यावर उद्बोधक चर्चाही घडवून आणली.

जॉन हिगिन्स याने केवळ भारतीय संगीतच आपलेसे केले नाही तर तो स्वतःही अंतर्बाह्य भारतीय बनून गेला आहे. धोतर–कुडता आणि दाक्षिणात्य पद्धतीचे उपरणे या वेषात तो मैफलीत श्रोत्यांपुढे आल्यावर त्याला ते ‘ भागवतार ’ असेच आपुलकीने संबोधितात. त्याची पत्नीही संपूर्ण भारतीय वेषात त्याच्याबरोबर असते.

जॉन हिगिन्स याच्या जीवनातील हे परिवर्तन हा भारतीय संगीताचा विजयच म्हणावा लागेल.

संगीत हे मनाला उल्हसित करणारे चिंता व रोगपरिहारक आहेच. पण ईश्वराच्या जवळ जाण्याचे ते अमोघ साधन आहे. याचा पुरावा सर्वत्र उपलब्ध आहे. कबीर, तुलसी, मीरा, पुरंदरदास, नरसी मेहता, सूरदास आणि नामदेव–तुकारामादि सर्व संतांचे भक्तिमय तल्लीन जीवन हे ॐकारसाधनेचेच साधे सोज्वळ रूप नाही काय ? ज्ञानदेव–तुकारामांचा विठ्ठलाचा नामघोष, पंडित विष्णु दिगंबर पलुसकर यांच्यासारख्यांची रामधून यातून निर्माण होणारा ब्रह्मानंद हा ॐकाराचाच साक्षात्कार नव्हे काय ? ईश्वराच्या नामघोषात, तल्लीन भजनकीर्तनात ॐकाराचेच साक्षात्कारसामर्थ्य आहे आणि म्हणूनच

‘ ऐसे माझेनि नामघोषे । नाहीचि करिती विश्वाची दुःखे ।
अवघे जगचि महासुखे । दुमदुमित भरले ।। ’

किंवा—

‘ तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे
जे नामचि नाही पापाचे । ऐसे केले ।। ’

असे उद्‌गार संत ज्ञानेश्वरांनी काढले आहेत.

— Into the cathedral
There was only a face;
Everything else melted
Even her pink frock and bulky body.
What remained was a face
As dark and bright as Lord Krishna
Two eyes were fixed on it like
Gems of rare brilliance. —

(या थोर गायिकेचा ता. २८ जानेवारी १९७२ या दिवशी हृदयविकाराने ख्रिस्तवास झाला. मृत्यूच्या वेळी ती साठ वर्षांची होती.)

० ० ०

भारतीय संगीताच्या प्रभावाने व आकर्षणाने एका अमेरिकन तरुणाच्या जीवनात कशी व केवढी क्रांती झाली ही अगदी ताजी सत्यकथा ऐकण्यासारखी आहे. जॉन हिगिन्स हा अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स या संस्थानात एका सुविद्य रसिक कुळात जन्मला. त्याचे आईवडील संगीतविशारद होते. अभिजात संगीताच्या वातावरणात जॉन हिगिन्स हा लवकरच गायनवादनात प्रवीण झाला. त्याचा एक भाऊही असाच संगीतवेडा होता. रविवारी हिगिन्स कुटुंबात संगीताची मेजवानी असे. आई पियानो वाजवी. वडील चेलोवादनात कुशल होते. जॉन व त्याचा भाऊ हेही वेगवेगळी वाद्ये तयारीने वाजवीत. त्या घरात संगीतकला मोहोरली होती. महाविद्यालयीन जीवनात जॉनने आपल्या संगीतसाधनेने नाव मिळविले होते; इतकेच नव्हे तर संगीताचा व्यासंगही अनेक प्रकारे वाढविला होता.

१९६२ साली एक नाट्यमय प्रसंग घडला. सुप्रसिद्ध दाक्षिणात्य नृत्यांगना टी. बालसरस्वती यांच्या भरतनाट्यम्‌चा एक कार्यक्रम जॉन हिगिन्स याला पाहावयास सापडला. बालसरस्वतींच्या नृत्याचा त्याच्यावर एवढा परिणाम झाला की, त्याने त्या भारतीय नृत्यांगनेची लगेच भेट घेतली. त्यांच्या त्या भेटीत दोघांनाही आपले जन्मजन्मांतरीचे निकट नाते आहे असा मनोमन प्रत्यय आला. भारतीय–विशेषतः कर्नाटक संगीताच्या अभ्यासासाठी काय केले पाहिजे याबद्दलचे मार्गदर्शन त्याने बालसरस्वतींकडून मिळविले.

जॉन हिगिन्स कर्नाटकी संगीताने एवढा भारून गेला होता की, पदवी संपादन केल्यावर बालसरस्वतींचे बंधू रंगनाथन् यांना त्याने अमेरिकेत बोलावून घेतले. दोन वर्षांच्या दीर्घावधीत त्याने मृदंगम्‌च्या वादनकलेचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्याच विषयावरील आपला प्रबंध विद्यापीठाला सादर केला.

त्याच्या अभ्यासपूर्ण परिश्रमांना फळ आले. त्याला 'फुलब्राईट' शिष्यवृत्ती मिळाली. तो भारतात आला. रंगनाथन् आणि त्याचा भाऊ विश्वनाथन् यांच्यापाशी

त्याने कर्नाटकी संगीताचे सर्वांगीण सखोल अध्ययन आरंभिले. जॉन हिगिन्स सतत तीन वर्षे भारतात राहिला. त्याचे वास्तव्य त्याचे गुरुतुल्य बंधू व स्नेही विश्वनाथन् ह्यांच्या घरीच होते. पाश्चात्त्य आणि भारतीय संगीतातील सूक्ष्म भेद आणि आविष्काराची वैशिष्ट्ये यांच्या अभ्यासाने त्याला भारतीय संगीतातील सौंदर्य व अभिजातता यांच्या प्रत्यय आला. हळूहळू त्याने कर्नाटकी संगीतावर एवढे प्रभुत्व मिळविले की, १९६५ साली त्याने सुमारे १०–१५ हजार रसिकांसमोर आपला गायनाचा स्वतंत्र कार्यक्रम आत्मविश्वासाने सादर केला व एक उत्कृष्ट गायक म्हणून लौकिक मिळविला.

१९६७ साली तो आपल्या मायदेशी परत गेला आणि त्याने अमेरिकेत अनेक जाहीर कार्यक्रम करून भारतीय संगीताची अमेरिकन श्रोत्यांना नुसती गोडीच नव्हे तर वेडच लावले. गायकाला ठायी ठायी दाद देऊन उत्तेजित करण्याची भारतीय रसिक श्रोत्यांची पद्धत त्याला फार आवडली. अमेरिकेतही कार्यक्रम आकर्षक व चैतन्यमय करण्यासाठी त्याने अनेक उपाय चतुराईने योजिले. काही ठिकाणी भारतीय व अमेरिकन दोन्ही पद्धतींचे संगीत एकापाठोपाठ सादर करून त्याच वेळी त्यावर उद्बोधक चर्चाही घडवून आणली.

जॉन हिगिन्स याने केवळ भारतीय संगीतच आपलेसे केले नाही तर तो स्वतःही अंतर्बाह्य भारतीय बनून गेला आहे. धोतर–कुडता आणि दाक्षिणात्य पद्धतीचे उपरणे या वेषात तो मैफलीत श्रोत्यांपुढे आल्यावर त्याला ते 'भागवतार' असेच आपुलकीने संबोधितात. त्याची पत्नीही संपूर्ण भारतीय वेषात त्याच्याबरोबर असते.

जॉन हिगिन्स याच्या जीवनातील हे परिवर्तन हा भारतीय संगीताचा विजयच म्हणावा लागेल.

संगीत हे मनाला उल्हसित करणारे चिंता व रोगपरिहारक आहेच. पण ईश्वराच्या जवळ जाण्याचे ते अमोघ साधन आहे. याचा पुरावा सर्वत्र उपलब्ध आहे. कबीर, तुलसी, मीरा, पुरंदरदास, नरसी मेहता, सूरदास आणि नामदेव–तुकारामादि सर्व संतांचे भक्तिमय तल्लीन जीवन हे ॐकारसाधनेचेच साधे सोज्वळ रूप नाही काय ? ज्ञानदेव–तुकारामांचा विठ्ठलाचा नामघोष, पंडित विष्णु दिगंबर पलुसकर यांच्यासारख्यांची रामधून यातून निर्माण होणारा ब्रह्मानंद हा ॐकाराचाच साक्षात्कार नव्हे काय ? ईश्वराच्या नामघोषात, तल्लीन भजनकीर्तनात ॐकाराचेच साक्षात्कारसामर्थ्य आहे आणि म्हणूनच

'ऐसे माझेनि नामघोषे । नाहीचि करिती विश्वाची दुःखे ।
अवघे जगचि महासुखे । दुमदुमित भरले ॥'

किंवा—

'तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे
जे नामचि नाही पापाचे । ऐसे केले ॥'

असे उद्गार संत ज्ञानेश्वरांनी काढले आहेत.

श्रीगुरुचरित्राचे नायक श्रीनृसिंहसरस्वती यांनी आपले अवतारकार्य संपवून श्रीशैल पर्वतावर जातेवेळी जे खुणेचे शब्द आपल्या शिष्यांना सांगितले आहेत, त्यात आपली भक्ती कशी करावी हे सांगताना त्यांनी म्हटले आहे—

‘ नित्य जे जन गायन करिती। त्यांवरी माझी अतिप्रीती।
त्यांच्या घरी अखंडिती। आपण असे अवधारा ॥ ’

श्रीतुकाराम महाराजांनी आपल्या एका अभंगात संगीताचे-गायनाचे सामर्थ्य थोडक्यात पण अत्यंत नेमक्या शब्दांत व उत्कटतेने सांगितले आहे. त्यांचा तो अभंग कोणालाही आवडावा-कंठस्थ करावासा वाटावा असा सरस व सुरेल आहे. तुकोबा म्हणतात,

‘ गायनाचे रंगी। शक्ति अद्‌भुत हे अंगी।
हे तो देणे तुमचे देवा। घ्यावी अखंडित सेवा।
अंगी प्रेमाचे भरते। ने घे उतार चढते।
तुका म्हणे वाणी। परम अमृताची खाणी ॥ ’

उत्कट भक्तिगीताचे किंवा संगीताचे स्वर ऐकून श्रीरामकृष्ण परमहंसांची भावसमाधी लागत असे हे प्रसिद्धच आहे.

या संदर्भात प्रसिद्ध गुर्जर संत नरसी मेहता यांच्या चरित्रातील एक दंतकथा मननीय आहे. ईश्वरभजनात तल्लीन राहणारा आणि ‘ वैष्णव जन तो ’ या महात्माजींच्या आवडत्या भजनाचा हा कर्ता. केदार राग आळविण्यात हा एवढा प्रवीण होता की आपल्या त्या केदार-किमयेने तो प्रत्यक्ष श्रीकृष्णांना मूर्तिमंत आपल्यापुढे उभे राहावयास लावीत असे. ही दंतकथा अद्‌भुत वाटली तरी तिच्यातले सत्य कोणाला नाकारता येणार नाही. केदाराच्या किमयेची ती कथा अशी—

‘ देवाचे नाव आळविणे-तेही सुरेलपणाने-देहभान विसरून हाच नरसी मेहतांचा छंद होता. हाच ब्रह्मानंद होता. केदार रागात भजन आळविताना ते रंगून जात. त्या रागावर त्यांनी असाधारण प्रभुत्व मिळविले होते. या एकाच रागाच्या रसमोहिनीने प्रत्यक्ष श्रीकृष्ण त्यांचे अंकित झाले होते. या एकाच रागाच्या सामर्थ्यावर त्यांनी अनेकांचे दुःख दूर केले होते. कित्येकांचे सुख वाढविले होते. केवळ या रागाच्या स्वरांनी त्यांनी सर्पदंश झालेल्या एका हरिजन बालकाचे प्राण परत दिले होते.

एकदा एक संसारी ब्राह्मण नरसींकडे आला. मुलीच्या लग्नाच्या विवंचनेने तो हराण झाला होता. लग्नाला लागणारे द्रव्य कोठून आणावयाचे ही त्याची चिंता होती. नरसींची महती व कीर्ती त्याने ऐकली होती. सारे उपाय सरल्यावर तो या भक्तश्रेष्ठाला शरण आला होता. नवनीतहृदयी नरसींनी विचारले, ‘ किती द्रव्य हवे ? ’ ब्राह्मण भीत-भीत उत्तरला, ‘ ५०० रुपये. ’ देवाचं भजन-कीर्तन हाच एक व्यवसाय करणारे आणि

व्यवहाराला पारखे असणारे भणंग भक्त नरसी–त्यांच्यापाशी एवढे द्रव्य कोठले असणार? पण त्रस्त वधूपित्याची चिंता दूर केल्याविना त्यांना राहवेना. शेवटी त्यांनी सावकाराचे घर गाठले. सावकार लोभी तसाच चाणाक्ष पण होता. नरसींचे भक्तिवैभव त्याला ठाऊक होते. त्यांच्या केदार रागाची कीर्ती त्याच्या कानी होती. तो म्हणाला, “पैसे देईन–पण तारण काय?” नरसींजवळ गहाण ठेवायला काय होते? प्रश्न झाला बिकट. पण सावकारानेच सहज एक तोड सुचविली. तो म्हणाला, ‘इतर काही नसले तरी तुझा हातखंडा राग केदार तर आहे ना? तो ठेव गहाण–देतो पैसे.’

सावकाराची कल्पना नरसीला पटली. त्याच्याजवळ तीच एक मूल्यवान वस्तू होती. ती गहाण ठेवल्याने श्रीकृष्णाच्या प्रत्यक्ष दर्शन–सहवासाला तो मुकणार होता. जीवनातला सर्वश्रेष्ठ आनंद तो हरवून बसणार होता. पण एका सज्जनाची अडचण दूर होते आहे या आनंदात त्याने सावकाराला सांगितले, ‘माझा आवडता केदार राग गहाण ठेवून घ्या पण त्या ब्राह्मणाला धन द्या. त्याच्या मुलीचे कार्य पार पडू द्या.’

सावकाराने हसत पैसे मोजले. करारपत्र लिहिले. नरसीने डोळे झाकून त्यावर स्वाक्षरी केली. व्याजासकट पैसे फिटेपर्यंत चुकूनही आपला केदार राग आळवायचा नाही ही करारातील प्रमुख अट होती.

नरसीच्या औदार्याने ब्राह्मण थक्क झाला. कृतज्ञतेने त्याने नरसीच्या चरणी मस्तक ठेवले. ब्राह्मणाच्या मुलीचे मंगल झाले. त्या आनंदापुढे आपल्या हानीची नरसीला खंतच वाटली नाही.

पण प्रभूचे भजन करायला बसल्यावर त्याला चुकल्यासारखे होऊ लागले. केदार गायचा नाही–मग भजन रंगावे कसे? देवाचे दर्शन घडावे कसे? आणि मोक्षालाही लाजविणारा आनंद लाभावा कसा? पण सावकाराला दिलेला श[illegible] कोठल्याही परिस्थितीत पाळायचा ही त्यांनी प्रतिज्ञाच केली. केदारावाचून भजन–कीर्तन चालू राहिले. पण रंग जमेना–वृत्ती रंगेना. देवाच्या प्रत्यक्ष दर्शनाविना हृदयाची व्याकुळता शमेना. दिवसामागून दिवस जाऊ लागले. पैसा कोठे मिळेना, सावकाराचे देणे फिटेना, आणि केदार राग बंधमुक्त झाल्यावाचून नरसींना शांती लाभेना.

याच वेळी त्यांच्या निंदकांनी आणि हितशत्रूंनी उचल केली. त्यांनी खोट्यानाट्या गोष्टी सांगून राजाचे मन कलुषित करून ठेवले. तो ढोंगी आहे. त्याच्या भजनाला भुलून देव प्रत्यक्ष भेटतो, हे सारे थोतांड आहे. जनतेची ही फसवणूक आहे, यासारखे शहरातील पंडितांचे त्यांच्यावर आरोप होते.

राजाने नगरीतील लोकांसमक्ष त्यांची परीक्षा घेण्याचे ठरवले. राजवाड्यातील एका दालनात श्रीकृष्णाची एक मूर्ती ठेवण्यात आली. त्या मूर्तीच्या हाती एक पुष्पहार देण्यात आला. त्या मूर्तीपुढे नरसी मेहेतांनी आपले भजन–कीर्तन करावे. श्रीकृष्णाने सजीव होऊन नरसींच्या गळ्यात पुष्पहार घालावा. ही गोष्ट विशिष्ट कालावधीत

घडून आली नाही तर नरसींवरचे पंडितांचे आरोप खरे समजून त्यांना शासन केले जाईल अशी राजाज्ञा नरसींना ऐकवण्यात आली.

नरसी अविचल होते. सारे शांतपणे ऐकून घेऊन ते म्हणाले, ‘ प्रभूची इच्छा असेल तसे होईल. ’ त्यांनी कृष्णमूर्तीसमोर आसन घातले. टाळवीणा हाती घेतली व हरिभजन चालू केले. देवाचे काम देवावर सोपवून ते अनन्य भावाने भजनात दंग झाले. श्रीकृष्णाची मूर्ती व तिच्या हातातील हार यांकडे सर्वांचे लक्ष होते. केदार राग गाण्याची मुभा असती तर नरसींनी विनाविलंब आपल्या वैऱ्यांनाही श्रीकृष्णाचे दर्शन घडवून पावन केले असते. केदाराच्या स्वरांना भाळणारे श्रीकृष्ण यापूर्वीच नरसींच्या गळयात माळ घालण्यासाठी पुढे सरसावले असते.

पण केदार आळवायचा कसा ? दिलेले वचन मोडायचे कसे ?

प्रेक्षक तटस्थ होते—

नरसी मेहता भजनात तल्लीन होते—

श्रीकृष्णाची मूर्ती होती तशीच स्थिर अचेतन उभी होती—

घटका सरत होती–पळे पळत होती. मध्यरात्र जवळ आली. नरसींच्या विरोधकांच्या आशा आता पालवल्या होत्या—

त्याच वेळी नगरात एक चमत्कार घडला. सावकाराच्या दारावर थाप पडली. त्या मध्यरात्री नरसींची हाक त्याच्या कानी पडली–‘ मी नरसी मेहता आहे हो सावकार ! जरा दार उघडा ! ’

सावकाराने लगबगीने दार उघडले. नरसींनी त्याच्यापुढे व्याजमुद्दल ठेवले व म्हटले– ‘ पैसे परत करण्यास उशीर झाला. क्षमा असावी, पैसे मोजून घ्या आणि केदार राग मोकळा झाला अशी पावती द्या–’

सावकार अवाक् होऊन पाहातच राहिला. त्याने मुकाटयाने पैसे घेतले. करारपत्र काढले. पैसे पोचल्याची स्वाक्षरी करून त्याने कागद नरसींच्या स्वाधीन केला. मध्यरात्रीच्या काळोखात झपाटयाने पावले टाकीत विरून जाणाऱ्या नरसी मेहतांच्या आकृतीकडे तो ‘ आ ’ वासून पाहातच राहिला.

—राजसभेत नरसींचे भजन चालूच होते–भजन करता करता त्यांनी सहज डोळे उघडून कृष्णमुखाकडे पाहिले. तेवढयात एक कागद त्यांच्यासमोर अलगद येऊन पडलेला त्यांना दिसला. व्याजमुद्दल पोचल्याची सावकाराची स्वाक्षरी असलेले ते करारपत्र होते. क्षणार्धात नरसी सारे काही उमजून गेले. श्रीकृष्णांची, त्या लीलालाघवी नटनागराची लीला अगाध होती.

क्षणार्धात नरसींनी केदार राग आळविण्यास आरंभ केला. केदाराच्या स्वरांचे जणू एक छत उभे राहिले. श्रीकृष्णाच्या मूर्तीभोवती एक तेजोवलय निर्माण झाले. नरसींच्या नेत्रांतून प्रेमाश्रू पाझरू लागले. इतका वेळ जड] अचेतन असलेली श्रीकृष्णमूर्ती सजीव

झाली आणि आपल्या हातातील पुष्पमाला नरसींच्या गळयात घालण्यासाठी पुढे सरकू लागली—

केदाराच्या स्वरलहरींनी प्रसन्न झालेले-भक्तांची लाज राखणारे गिरिधर नागर-आपल्या भक्ताला धन्य करून क्षणार्धात अंतर्धान पावले !

° ° °

अमेरिकेत पार्श्वसंगीताचा प्रभावी उपयोग करण्याचे शास्त्र निर्माण झाले आहे. Air Conditioning प्रमाणे Music Conditioning ची प्रथा आता तिकडे रूढ झाली आहे. तिच्याबद्दलची थोडी माहिती सारांशरूपाने वाचकांना सांगणे अगत्याचे वाटते--

चित्रपटातील पार्श्वसंगीत वातावरणाचा जसा परिपोष करते व त्याला उठाव देते; तसेच व तितकेच ते प्रत्यक्ष जीवनातही प्रभावी कार्य करू शकेल व त्याच दृष्टीने आपल्या रीतिरिवाजांत, धार्मिक व सामाजिक संस्कारांत त्याचा अंतर्भाव होतो. पण हल्लीचे आपले जीवन इतके बदलून गेले आहे की, त्या बदललेल्या जीवनाचे स्वरूप धांदलीचे, धडपडीचे-धास्तीचे व धसक्याचेच अधिक झाले आहे. ही स्थिती ध्यानात घेऊन उदबत्तीने किंवा सुगंधाच्या शिडकाव्याने वातावरण प्रसन्न करावे, त्याचप्रमाणे मानवी जीवनात संगीतलहरींनी सुखस्वास्थ्याचे वातावरण निर्माण करण्याचे तंत्र काही संगीतविशारदांनी यशस्वी केले आहे. आणि त्याचा परिणाम पुष्कळच अनुकूल आढळून आला आहे.

ध्वनिमुद्रणाचे टेपरेकॉर्डिंगचे साधन सुलभ झाल्यामुळे हा प्रयोग अमेरिकेत फार मोठया प्रमाणावर करून त्याचे पद्धतशीर शास्त्र बनविण्यात आले आहे. बँका, कारखाने, पोस्ट ऑफिसे, विमानतळ, आगगाडया, स्टेशने, आणि रहदारीच्या जागा अशा सर्व ठिकाणी पार्श्वसंगीताचा उपयोग अत्यंत प्रभावी होत असल्याचे आढळून आले आहे. या सर्व ठिकाणी ध्वनिक्षेपकांचा उपयोग केला जातो आणि ठराविक कालांतराने चटकन ध्यानी येणार नाही, अशा पार्श्वसंगीताचा उपयोग मोठया खुबीने करण्यात येतो. या संगीताची योजना अत्यंत अभ्यासपूर्वक केलेली असते. कठोर, कर्कश, भयाण, भेसूर असेल तेथे ती कठोर कर्कशता व भयाण भेसूरता जाणवणार नाही, अशा तऱ्हेचे वातावरण पार्श्वसंगीतातील स्वरलहरींमुळे किंवा वाद्ययोजनेने निर्माण केले जाते. कामातला कंटाळवाणेपणा दूर करून उत्साह व प्रेरणा देणारे सूर ऑफिसातील वातावरणात घुमत राहातात व त्याचा परिणाम कामाचा वेग वाढवण्यात व निराशेचा किंवा कंटाळयाचा आवेग कमी होण्यात होतो. संतापणाऱ्या व चिडखोर अधिकाऱ्याला आपल्या रागाच्या आगीवर कसला तरी शीतल शिडकावा होतो आहे, चिडखोरपणावर कसलेतरी शामक सिंचन होते आहे असे वाटते आणि त्याचा स्वर नरम होतो, शब्द मृदू होतात. इतकेच नव्हे तर अमक्याची रजा आज मंजूर नाही करायची, हा आकसाने घेतलेला निर्णय अमलात

आणताना त्याचा हट्ट ढासळतो. तो सही करून मोकळा होता. आदल्या दिवशीच्या प्रमादामुळे प्रियकरावर चिडलेली प्रमदा त्याचे वाभाडे काढण्याच्या निश्चयाने उपाहार-गृहात येते. तोही तिची पर्वा न करण्याच्या निश्चयाने येतो. पण संकेतस्थळी येताच तिथे पार्श्वसंगीताचे मधुर ध्वनी हळुवारपणे पाझरत असतात आणि त्या सुखद मंजुळ ध्वनींनी त्यांच्यातला राग मावळतो व अनुराग उजळतो. भांडणाऐवजी सामोपचार विजयी होतो. आणि हातात हात गुंतवीत व डोळयांनी डोळयांतले स्नेहभाव प्राशन करीत ते दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळीची प्रेमभेट निश्चित करतात. पार्श्वसंगीत चालू असलेल्या दुकानातील गिऱ्हाइके दुकानात स्थिरचित्त होतात. त्यांच्या मनाचा शीण दूर होतो. आणि न घ्यायच्या वस्तूदेखील समाधानाने खरेदी करून ती हसत निघून जातात.

दैनंदिन जीवनातील संघर्ष, कडवटपणा, कंटाळवाणेपणा दूर करण्याच्या कामी पार्श्वसंगीताचा पद्धतशीर वापर सुरू करून तो यशस्वी करून दाखवण्याचे काम अमेरिकेतील एका कल्पक संस्थेने केले आहे. 'म्युझॅक कॉर्पोरेशन' हे त्या संस्थेचे नाव. अशा प्रकारचे पार्श्वसंगीतप्रसाराचे काम करणारी ही आद्य संस्था, अशा आणखीही काही संस्था आहेत. पण म्युझॅकइतकी जुनी व मोठी संस्था दुसरी नाही. या संस्थेतर्फे प्रतिवर्षी एक कोटी वीस लक्ष डॉलर्स किंमतीचे पार्श्वसंगीत विकले जाते. प्रसारित होते. अमेरिकेतील मोठमोठे मोटार-कारखाने, गिरण्या, इन्शुअरन्स कॉर्पोरेशन्स, ग्रंथालये, स्टोअर्स अशा सर्व ठिकाणी 'म्युझॅक' चे पार्श्वसंगीत उपयोगात आणले जाते. फक्त मोठया शहरांतूनच १९५४ पर्यंत या पार्श्वसंगीताचा वापर शक्य होत होता. पण आता ते क्षेत्र वाढले आहे. पंचवीसशे लोकवस्तीच्या छोटया नगरांतून देखील या पार्श्वसंगीताचा मोठया प्रमाणावर वापर करण्यात येत आहे व तो प्रभावी होत असल्याचा अनुभव आहे.

म्युझॅक संस्थेचा प्रमुख ओनील अनुभवी संगीतज्ञ आहे. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे वाद्यसंगीत कसे वापरावे व परिणामकारक करावे याचे त्याने पद्धतशीर तंत्र बनविले आहे. कारखान्यात शारीरिक मेहनतीचे किंवा ठराविक काम करणाऱ्या लोकांसाठी ठेकेबाज, द्रुतलय असलेले संगीत तो वापरतो. एकच संगीत वेगवेगळया लयीत व तालांत वापरल्याने वेगवेगळे परिणाम साधता येतात. आपल्याकडे देखील भैरवीचे सूर आनंदाचे आणि खेदांचे दोन्ही प्रकारचे वातावरण निर्माण करू शकतात. लय आणि ताल यांच्यातील बदलामुळेही ही गोष्ट शक्य होते.

ठिकठिकाणी वापरण्यात येणारे हे पार्श्वसंगीत ठराविक अंतरानेच वाजवण्यात येते. पंधरा पंधरा मिनिटांचे अंतर ठेवणे उपकारक असल्याचे आढळून आले आहे. काम करणाऱ्यांच्या कमाल व किमान उत्साहाच्या व कंटाळयाच्या वेळांचा पद्धतशीर अभ्यास करून एक आलेखच तयार करण्यात आला आहे. त्याला अनुसरून कंटाळयाच्या ज्या वेळा आहेत त्या वेळी उत्साहित, उल्हसित करणारे संगीत विशेष प्रमाणात व

विशिष्ट प्रकाराने आळवले जाते. या पार्श्वसंगीताच्या वापरामुळे निश्चित लाभ होतो असे आढळून आले आहे.

'म्युझॅक' संस्था आपल्या पार्श्वसंगीताच्या पुरवठ्यासाठी जो मोबदला आकारते तो त्या त्या कारखान्याच्या विस्तारावर, क्षेत्रफळावर व त्या ठिकाणी दूरध्वनिक्षेपक किती लागतील यावर आकारला जातो. लहानशा पोस्टऑफिसला महिना साठ रुपयेपर्यंत खर्च येतो तर मोठ्या कारखान्याला दोन–तीन हजार रुपये महिना खर्च येतो. काही संस्थांतील कामगारवर्गच हा खर्च खुशीने वाटून घेतो. काही ठिकाणी ती योजना मालक किंवा व्यवस्थापक करतात.

हे पार्श्वसंगीत मुद्दाम वाजविले जात आहे हे ध्यानी येत नाही. पण त्याचा परिणाम मात्र न कळत मनावर आणि मज्जातंतूवर होत राहतो. त्या संगीतामुळे कामात व्यत्यय तर येत नाहीच, उलट आकडेमोड करणाऱ्यांच्या बेरजा बरोबर येण्यास हे सूक्ष्म संगीत मदत करते. कामगारांचा उत्साह सतत ताजा ठेवते.

या वाद्यसंगीतात गीतांच्या–शब्दांचा उपयोग मात्र केला जात नाही. धार्मिक स्तोत्रे किंवा त्यासारखे कार्यनिवृत्त करणारे स्वर वाद्यसंगीतात चुकूनही योजले जात नाहीत. म्युझॅक संस्थेचा सूत्रचालक ओनील अनेक प्रकारचे वाद्यसंगीत तयार करवून घेतो व ते योजकतेने वापरतो. प्रत्येक ठिकाणी तेच ते संगीत प्रत्यही वाजवले जात नाही. त्यामुळे वाद्यसंगीतात तोचतोपणा येत नाही. ज्यामुळे ऐकणारे टाळ्या वाजविण्यास प्रवृत्त होतील किंवा उठून नाचावयास लागतील असे संगीत टाळले जाते. (या विषयीचे विस्तृत विवेचन 'ॐकाररहस्य' या माझ्या ग्रंथात जिज्ञासूंनी पाहावे पृष्ठ ६० ते ६९)

० ० ०

अभिजात संगीताचा देहाच्या व मनाच्या व्याधींवर उपचार म्हणून यशस्वी उपयोग होऊ शकतो याचे काही बोलके पुरावे उपलब्ध झाले आहेत.

पाश्चात्त्य देशात रुग्णालयांतून शस्त्रक्रियेच्या वेळी अभिजात संगीतरचनांचा उपयोग यशस्वीपणाने केला जातो. 'फ्रेंच इन्स्टिटयूट ऑफ ब्लड ट्रॅन्स्फ्यूजन' या संस्थेत रक्तदानाच्या वेळी अभिजात संगीताचे स्वरसिंचन उपयोगात आणले जाते. रक्तदानाच्या वेळी रुग्णाला होणारे क्लेश या संगीतोपचाराने मुळीच जाणवत नाहीत. रक्तदानाच्या वेळी कधी कधी बेशुद्ध होणारे रुग्ण या संगीतोपचाराने स्वस्थ, शांत राहातात असे अनुभवास आले आहे.

शस्त्रक्रियेच्या वेळी भूल म्हणून वापरण्यात येणाऱ्या औषधाचे प्रमाण कमी करून त्याची भरपाई संगीतयोजनेने केली जाते. पोटातील आतड्यावरील एका अवघड शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णाला भूल न देता त्याऐवजी योग्य अशा परिणामकारक अभिजात संगीताचा वापर करण्यात आला. सदतीस मिनिटांची ही शस्त्रक्रिया संगीतोपचाराने सुकर झाली असे अधिकृत वृत्त आहे.

पाश्चात्य तज्ज्ञांच्या संशोधनात व निरीक्षणात या संदर्भात असे आले आहे की, बीथोव्हेन, चॉपीन, वॅग्नर यांसारख्यांच्या अभिजात स्वररचनाच या कामी उपयुक्त व लाभप्रद ठरतात. कर्कश आणि प्रक्षोभक स्वररचना असलेले संगीत उपचार म्हणून हानिप्रद ठरते.

दंतोत्पाटनाच्या कामी तर संगीतोपचार अत्यंत उपयुक्त आढळून आला आहे. दंतरोग्याच्या उपचारासाठी एक खास तंत्र तयार करण्यात आले आहे. हे तंत्र उपयोगिताना रोग्याला हेडफोन्स देण्यात येतात. हेडफोन्समधून ऐकू येणाऱ्या सुखद मंद स्वरलहरींनी रोग्याची पीडा कमी होते. सुसह्य तर खासच होते. दंतरोग्याला चुकून धबधब्याचा आवाज ऐकवला गेला तर मात्र त्याची पीडा तीव्रतम होते असे निदर्शनास आले आहे.

श्वासोच्छ्वासाच्या प्रक्रियेवर आणि रुधिराभिसरणावर संगीताचा उपयोग उपकारक ठरतो. त्रासिकपणा, वैताग यावर लयबद्ध संगीत परिणामकारक ठरते. क्लॅरिओनेटच्या स्वरात रुधिराभिसरणाच्या क्रियेत सुधारणा घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे असे प्रत्ययास आले आहे. शांत, संथ स्वरूपाची स्वररचना रक्तदाबाच्या रुग्णांना उपयुक्त ठरते. ( या दृष्टीने आपल्याकडील सनईचे औचित्य लक्षात घ्यावे. )

संगीताच्या उपयोगाने घडून आलेल्या काही आश्चर्यजनक घटना नुकत्याच वाचनात आल्या. त्यांपैकी काही पुढे देत आहे.

गाईंना संगीत आवडते. आणि विशिष्ट प्रकारच्या संगीतश्रवणामुळे त्या अधिक दूध देतात, हे यापूर्वीच सिद्ध व प्रसिद्ध झाले आहे. इंग्लंडमधील सफोक प्रांतातील बॅरो या गावच्या **W. J. Roberts** या शेतकऱ्याजवळ १५०० डुकरे आहेत. ही डुकरे आपापसात भांडून एवढी दंगामस्ती करत की, त्यांच्या धन्याचे डोके उठून जाई. ही डुक्कर–सेना नियंत्रणाखाली कशी ठेवावी हा त्याला प्रश्न पडला होता. आपापसातील एकसारख्या भांडणांचा त्यांच्या शारीरिक वाढीवरही प्रतिकूल परिणाम होत असे. अपेक्षेप्रमाणे ती अंग धरत नसत. बोलून चालून डुकरेच ती. पण त्या डुकरांना संगीताची आवड आहे, हे रॉबर्ट्स याच्या ध्यानी आले. आणि प्रथम त्याचा या गोष्टीवर विश्वासच बसेना. प्रत्यक्ष प्रयोग केल्यानंतर त्याला असे आढळून आले की, डुकरांना संगीत आवडते, इतकेच नव्हे तर त्यांच्या अभिरुचीची पातळीही उंच आहे. बीथोवेनसारख्या श्रेष्ठ कलाकाराचे अभिजात संगीत डुकरे अतिशय आवडीने ऐकतात हे लक्षात आल्यावर आपल्या डुकरांविषयीचा त्याचा ग्रह बदलला. नृत्य–संगीताचाही त्यांच्यावर अनुकूल परिणाम होतो हेही त्याच्या ध्यानी आले. आणि मग आकाशवाणीवरील काही निवडक संगीत कार्यक्रम त्याने आपल्या या १५०० प्राण्यांना नियमाने ऐकवण्याची व्यवस्था केली आश्चर्य असे की, त्याची डोकेदुखी निरंतरची थांबली. संगीताचा परिणाम म्हणून १५०० डुकरांच्या मारामाऱ्या बंद झाल्या. त्यांच्या वर्तनात इष्ट ती सुधारणा दिसू आली. इतकेच नव्हे तर त्यांच्या शरीराची वाढही मनाप्रमाणे दिसू लागली !

संगीत व वाद्यवादन–प्रवीण अशा एका गरीब कलाकाराचे भाग्य त्याच्या संगीत-कलेने कसे उजळले ही अद्‌भुतरम्य सत्यकथा ऐकण्यासारखी आहे. या कलाकाराचे नाव–लॉईड फ्रँकलिन. बेकारीत दिवस कंठणारा निर्धन लॉईड हा पोटासाठी एका उपाहारगृहात कपबशा विसळण्याचे काम करू लागला. गिटार हे वाद्य वाजवण्यात तो सिद्धहस्त होता. गिटारवादनाची एक विशेष प्रकारची आकर्षक शैली त्याने संपादन केली होती. त्याच्या त्या वादन–कौशल्याने मोहित होऊन एका धनिक रसिकाने त्याला आपल्या घरी एका भोजन–समारंभाच्या वेळी पाचारण केले. त्या भोजन–समारंभाला बारबारा हटन ही धनाढ्य महिला उपस्थित होती. लॉईडच्या गिटारवादनाने ती एवढी प्रभावित आणि प्रसन्न झाली की, तिने लॉईड फ्रँकलिन याच्यावर आपल्या कृपेचा कुबेर–वर्षाव केला. लॉईड फ्रँकलिन याचे जन्माचे दारिद्र्य दूर झाले. त्याच्या सेवेला एक रोल्स रॉइस तर आहेच; पण त्याला कोठेही प्रवास करावयाचा असेल तर त्यासाठी त्याची धनाढ्य धनीण नेहमी एका स्वतंत्र विमानाची व्यवस्था करते!

विश्वविख्यात व्हॉयोलिन वादक श्री. येहुदी मेनुहिन याच्या भगिनी हेफ्जीबा मेनुहिन या आपल्या भावाप्रमाणेच संगीत–विशारद आहेत. संगीताचा उपयोग शहाण्या माणसांना होतो यात काहीच नवल नाही. पण वेड्यांना सुद्धा संगीताचे वेड असते. आणि संगीताचा कौशल्यपूर्ण वापर केला तर भ्रांतचित्त रुग्णांनाही ताळ्यावर आणणे शक्य आहे असा आपला अनुभव असल्याचे त्या सांगतात. आपल्या संगीताच्या कार्य-क्रमातून जेवढा मोकळा वेळ मिळतो तो त्या वेगवेगळ्या रुग्णालयातील व्याधिग्रस्तांना श्रुतिमधुर संगीत आणि सहानुभूतिपूर्ण सुखसंवाद यांचा लाभ देण्यात व्यतीत करतात. ज्यांच्या सान्निध्यात जाण्याची कोणालाही भीती वाटावी अशा उग्र उन्मादी रुग्णांनाही आपल्या स्नेहशीलतेने व संगीतकलेने त्या आपलेसे करतात. व्याधिमुक्त करतात.

ऑस्ट्रेलियातील काही रुग्णालयांनी परिणामी हानिकारक ठरणाऱ्या आधुनिक औषधी उपायांपेक्षा रुग्णांवर संगीताचे उपचार करण्याचे धोरण स्वीकारून ते यशस्वी करून दाखविले आहे. संगीत हे सर्वश्रेष्ठ व व्याधिनिवारक व दुःखशामक रसायन आहे, हे आपले प्रमेय श्रीमती मेनुहीन यांनी प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध केले आहे. अन्न, आच्छादन आणि आश्रय या मानवी जीवनाच्या तीन अपरिहार्य आवश्यकता प्रसिद्ध आहेत. त्यांत संगीताचा समावेश केला जाणे अगत्याचे आहे.

सध्याच्या संघर्षमय, अस्वस्थ, वेगमय व भोगमय जीवनात देहामनाच्या शांती-साठी, प्रसन्नतेसाठी पार्श्वसंगीत म्हणून आणि कित्येक व्याधींवर उपचार म्हणून संगी-ताचा उपयोग होऊ शकेल. तसे संशोधन व साक्षेपी प्रयत्न अधिकात अधिक झाले पाहिजेत. भारतीय संगीताच्या सामर्थ्याचा उपयोग जीवन अधिक संपन्न, सुखशांतिमय व आरोग्यसंपन्न करण्यासाठी त्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी–तज्ज्ञांनी लक्ष घालावे–दक्ष व्हावे अशी अपेक्षा व आवश्यकता आहे.

भारतीय संगीतात असे सामर्थ्य अवश्य आहे. व्यक्तिजीवन व समाजजीवन सर्वांगांनी समृद्ध करून प्रत्यक्ष ईश्वराचा साक्षात्कार घडविण्याचे सामर्थ्य संगीतात आहे. त्या सामर्थ्याचा शोध घेणारे आणि त्याचा दैनंदिन जीवनात चतुर उपयोग करणारे योजक हवे आहेत.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...२०१५१ ... वि: निबंध
क्रमांक ...२२२९ नों दि ८।५।७३

# ८

विज्ञानाने विश्वात क्रांती घडवून आणली आहे; हे उघडे सत्य आहे. यंत्रे आणि विविध शास्त्रीय शोध यामुळे सुखभोगाची विपुल साधने उपलब्ध झाली आहेत. पण असे असूनही आजचा माणूस सुखी-समाधानी नाही. उलट स्वार्थ, स्पर्धा, संघर्ष यांचे थैमान त्याच्या वाट्यास अधिकच उग्र स्वरूपात येते आहे. बुद्धी आणि तर्क यावर अधिष्ठित असलेल्या आजच्या आपल्या जीवनावर विफलता आणि विमनस्कता यांची दाट छाया पडल्याचे दिसून येते. त्यामुळे आजचा माणूस अधिक दैववादी व अगतिक होत आहे. अद्‌भुत, अतींद्रिय, अनाकलनीय याबद्दलचे त्याचे आकर्षण वाढते आहे. आजच्या विज्ञानयुगातही कान व डोळे उघडे ठेवून सृष्टीचे, मानवी जीवनाचे निरीक्षण करणाऱ्याला अशा अनेक प्रचीती येतात, अनेक पुरावे मिळतात की, ज्यामुळे त्याचा बुद्धिवाद बारगळतो, तर्कवाद पांगुळतो आणि असणाऱ्या पण प्रत्यक्ष न दिसणाऱ्या अशा अदृश्य शक्तीला तो शरण जातो. विज्ञानयुगातही चमत्कार घडतात. हे सिद्ध करणाऱ्या काही घटनांचा हा धावता परिचय :

दुसरे महायुद्ध. डंकर्कचा पाडाव झालेला. ब्रिटिशांचे धाबे दणाणलेले. अशा कातरवेळी भारताचे एक शूर सेनानी लेफ्टनंट कर्नल एस. पी. थोरात यांची आसाम-मधील इंफाळच्या रणक्षेत्रावर पाठवणी झाली. परिस्थितीचे गांभीर्य ले. क. थोरातांना जाणवले. मानवी पराक्रमाला आणि प्रयत्नांना दैवाचे पाठबळ असावे अशी त्यांची धारणा. ज्यांच्यावर थोरातांची नितांत निष्ठा होती असे वेदसाक्षात्कारी वामनाचार्य वैद्यराज यांच्या दर्शनास ते गेले. पदवंदन करून त्यांनी वस्तुस्थितीचे सद्‌गुरुंना निवेदन केले. शिष्याचे मनोगत ओळखून व त्याची श्रद्धाभावना लक्षात घेऊन वामनाचार्यांनी एक उपाय योजला. कर्नल थोरात यांची बंदूक त्यांनी मागून घेतली. त्या बंदुकीवर त्यांनी एका विशिष्ट मंत्राचे अभिमंत्रण केले. वसिष्ठसूक्तात सांगितल्याप्रमाणे ते अनुष्ठान वामनाचार्यांनी केले होते. मंतरलेले ते शस्त्र रणक्षेत्रावर युद्धकाळात वापरताना काय करावयाचे याची कल्पना त्यांनी थोरात यांना दिली. प्रतिकूल परिस्थितीत त्या दैवी उपायाने त्यांचे रक्षण तर केलेच पण अनिष्टाचे निराकरण करून त्यांना सन्मान व

साफल्याचा लाभ घडविला. युद्ध संपल्यावर ले. क. थोरात यांनी वामनाचार्य यांना एक प्रशस्तिपत्र पाठविले. मंत्रसामर्थ्याचा आपणास प्रत्यय आल्याचे मान्य करून वेदमंत्रांचा व त्यांचे रक्षण व त्यासाठी तपाचरण करणाऱ्या वेदाचार्यांसारख्या ऋषींचा त्यांनी गौरव केला आहे.

वसिष्ठ–सूक्तात सांगितलेल्या विधीनुसार ले. क. थोरात यांना त्यांचे शस्त्र मंत्र-सामर्थ्याने बलशाली करून दिल्यानंतर वामनाचार्य यांना ५७४ दिवसांच्या अवधीचे एक तपाचरण करावे लागले. त्यासाठी त्यांना आपले तेज व ओज यांची आहुती द्यावी लागली.

वामनाचार्य वैद्यराज यांचा जन्म १९०५ साली झाला. त्यांच्या माता-पित्यांनी संततिलाभासाठी, सुप्रसिद्ध चिदंबर दीक्षित महाराज यांच्या समाधीची सेवा सतत १२ वर्षे केली. त्यांना दृष्टांत झाला. वामनाचार्यांचा अवतार हे त्या तपाचे प्रसादफळ.

वामनाचार्य यांनी वेदाध्ययन पुरे केले. इंग्रजी विद्येतही ते पारंगत झाले. म्हैसूर येथे त्यांनी वैद्यकीचे उच्च ज्ञान संपादन केले. संकेश्वर मठाचे श्री. शंकराचार्य यांनी मंत्र देऊन त्यांच्यावर अनुग्रह केला. कावेरीच्या तीरी श्रीरंगपट्टण येथे त्यांनी गायत्रीचे पुरश्चरण पार पाडले. सांगतेच्या वेळी कावेरीत स्नान करताना लागोपाठ तीन दिवस त्यांना अशरीरिणी वाणी ऐकू आली. पोहता येत नसतानाही दैवी अनुज्ञेनुसार त्यांनी पाण्यात बुडी घेतली. एका रत्नलिंगाचा लाभ त्यांना झाला. त्यानंतरही त्यांना वेदपुरुषाने वारंवार दर्शन व सूचना दिल्या. अनेक विस्मयकारक घटनांतून एका महाकार्याची उभारणी झाली. गोदावरीच्या काठी ईश्वरी संकेतानुसार ' श्री चतुर्वेदेश्वर विश्रामधाम ' हे मंदिर स्थापन झाले. चारी वेदांचे रक्षण, अध्ययन व पूजा-पठन यासाठी हे मंदिर कार्यरत राहील अशी योजना झाली आहे. वेदाचार्य वामनाचार्य वैद्यराज यांचे जीवन वेदरक्षण व लोकसेवा यासाठी समर्पित आहे. त्यांच्या या वेदमंदिराची एक शाखा सांगली येथे चालू झाली आहे. सांगली येथील एक ज्ञानेश्वरभक्त आणि सरकारी वकील श्री. जी. बी. देशमुख यांचे या कामी सक्रिय सहकार्य आहे.

रणांगणाइतकेच किंबहुना त्याहूनही अधिक क्रीडांगणाला जीवनात महत्त्व आहे. मानवी जीवन हीच एक मोठी क्रीडा आहे. रणांगणावर जाणाऱ्या सेनानीने आपल्या पराक्रमाला पोषक ठरावी म्हणून आपली बंदूक अभिमंत्रून घेतली. अशीच एका क्रीडा-क्षेत्रातील सेनानीने यशाच्या निश्चितीसाठी आपल्या बॅटी मंत्रून घेतल्याची एक सत्यकथा मला आठवली. ही अद्भुत सत्यकथा ' नार्मन व्हिन्सेंट पील ' या अमेरिकेच्या प्रसिद्ध लेखकाने निवेदन केली आहे. ' दि पॉवर ऑफ पॉझिटिव्ह थिंकिंग ' हा या लेखकाचा प्रेरक व प्रासादिक ग्रंथ अमेरिकेत गीतेइतका लोकप्रिय व मार्गदर्शक मानला जातो. श्री.पील हे नुसते लेखक नाहीत तर एक महनीय धर्मोपदेशक आणि मानसशास्त्रविशारदही आहेत. मंतरलेल्या बॅटींची त्यांनी सांगितलेली सत्यकथा थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

' जोश ओरेली ' या नावाचा एक प्रख्यात क्रीडापटू. तो एका नामवंत क्रीडासंघाचा

नेता होता. त्याच्या संघाने अनेक विक्रम केले होते. त्यामुळे एक पराक्रमी संघ म्हणून त्यांनी कीर्ती मिळवली होती. अनेक स्पर्धांत त्याच्या संघाने अजिंक्यपद मिळविले होते. अशा या कुशल क्रीडापटूच्या संघाला एका वर्षी दृष्ट लागली. पराभव माहीत नसलेल्या त्या दिग्विजयी संघाला त्या वर्षी ठिकठिकाणी पराभव पत्करून खाली मान घालण्याचा प्रसंग आला. या अनपेक्षित घटनेने खेळाडूंचा आत्मविश्वास ढासळला. त्यांच्यातले चैतन्य आटून ओसरून गेले. एका सामन्यात तर एका सामान्य संघाने त्यांना पिटून काढले. आपले ग्रहच फिरले आहेत, या कल्पनेने त्या संघावर उदासीनतेची छाया पसरली. अशा वेळी जोश ओरेली ह्याला एक उपाय सुचला.

त्यांच्या नगराच्या परिसरात 'स्लॅटर' नावाचा एक धर्मोपदेशक राहात होता. तो केवळ आपल्या हस्तस्पर्शाने अनेकांचे रोग व दुःख निवारण करी. त्याच्या दारी आर्त आणि पीडित यांची रीघ लागलेली असे. त्याच्या दैवी सामर्थ्यावर लोकांची अपार व अनन्य श्रद्धा होती. त्या श्रद्धेमुळे म्हणा किंवा त्याच्या दैवी सामर्थ्यामुळे म्हणा त्याच्याकडे गेलेला माणूस निराश होऊन परतत नसे. जोश ओरेली याला स्लॅटर याची माहिती होती. प्रतिकूल दैवावर मात करण्याचा एक अमोघ उपाय त्याला सुचला. त्याने एका नव्या सामन्यात भाग घेण्यापूर्वी आपल्या सगळ्या भिडूंना एकत्र केले. त्या प्रत्येकाकडून त्याने त्यांच्या आवडत्या दोन-दोन बॅटी मागून घेतल्या आणि त्या एकत्र करून त्याने स्लॅटर या धर्मोपदेशकाचे घर गाठले.

स्लॅटर याने जोश ओरेलीने सांगितलेला वृत्तांत शांतपणे ऐकून घेतला. त्याने त्या साऱ्या बॅटी आपल्यापुढे ठेवल्या आणि प्रार्थना करून त्या प्रार्थनेचे चैतन्य आपल्या हस्तस्पर्शाने व आशीर्वादाने त्या बॅटीत संक्रांत केले. जोश ओरेली याने त्या मंतरलेल्या बॅटी घेऊन त्या आपल्या सर्व खेळाडूंच्या स्वाधीन केल्या. 'या निर्जीव बॅटीत आता बळ भरले आहे आणि त्यामुळे उद्याचा सामना तुम्ही निर्भयपणे खेळा. विजयश्री तुम्हाला सोडून जाणार नाही.' तो म्हणाला.

आणि घडलेही तसेच. तो सामना तर त्या संघाने जिंकलाच; पण त्यानंतर पुढे कित्येक वर्षे त्या मंतरलेल्या बॅटी अजिंक्यच राहिल्या.

° ° °

श्री. चेंबाई वैद्यनाथ भागवतार हे कर्नाटक संगीताचे भीष्म पितामह मानले जातात. त्यांच्या घराण्याला संगीतकलेचे वरदानच आहे. त्यांचे वडील व आजोबा हे दोघेही संगीतात पारंगत व प्रख्यात होते. श्री. चेंबाई हे बालपणापासून संगीताखेरीज दुसरे काही शिकलेच नाहीत. स्वर हीच त्यांची लिपी आणि गायन हीच त्यांची भाषा व विद्या. त्यांच्या स्वरात एवढी माधुरी आणि लयीत एवढी तयारी की त्यांच्या मुखातून अमृतझरी स्रवते आहे असेच कोणालाही वाटावे. त्यांचे वडील गावोगावी संगीताचे संकीर्तन करीत. श्री. चेंबाई हे वडिलांना साथ करीत. बासरीवादनातही ते सिद्धहस्त होते.

ते १६–१७ वर्षांचे असताना सुप्रसिद्ध ' गुरुवायुर ' येथील मंदिरात संगीतसेवेसाठी वडिलांबरोबर जाण्याचा त्यांना प्रसंग आला. गुरुवायुर हे श्रीकृष्णाचे प्रसिद्ध स्थान असून तेथील दैवत जागृत आहे असा प्रत्यय येतो. या वर्षी बिदागी म्हणून मिळालेले ११५ रुपये त्यांनी श्रीकृष्णाला अर्पण केले. प्रतिवर्षी का. शु. ११ या दिवशी या मंदिरात येऊन श्रीकृष्णाची सेवा करावयाची असे व्रत त्यांनी स्वीकारले.

गायक म्हणून श्री. चेंबाई वैद्यनाथ यांची कीर्ती भारतभर पसरली. त्यांना ठिकठिकाणची आमंत्रणे येऊ लागली. त्यांचे गायन एवढे प्रभावी ठरे की, श्रोते मंत्रमुग्ध होत. मद्राससारख्या शहरात त्यांच्या गाण्यासाठी श्रोत्यांचा समुद्र जमू लागला. मान, धन, सुखसमृद्धी त्यांच्या पायाशी लोळू लागली. त्यांचे भक्तिसंगीत तर रसिकांच्या व भाविकांच्या अंतःकरणाचा ठाव घेई.

वैभवाच्या शिखरावर असताना ७ जाने. १९५२ हा एक अशुभ दिवस त्यांच्या जीवनात उगवला. एका पवित्र क्षेत्रात त्यांच्या गायनाचा लाभ अनेक रसिक श्रोते अनुभवीत होते. गाणे अप्रतिम जमले होते. स्वरलहरींच्या परमोत्कर्षाने वातावरण धुंद होऊन गेले होते. अशा वेळी श्री. चेंबाई वैद्यनाथ यांची वाचा एकाएकी बंद झाली. सुरात झंकारणाऱ्या वीणेची तार एकदम तुटावी तसा अनर्थ ओढवला. घडलेला प्रकार इतका आकस्मिकपणे घडून आला होता की, सर्वत्र खेद–विषादाची छाया पसरली. चेंबाई वैद्यनाथ यांच्या साहाय्याला अनेक स्नेही धावले. सुचतील ते उपचार करण्यात आले. पण उपयोग झाला नाही. चेंबाई वैद्यनाथ यांचा आवाज नष्ट झाला होता. ते अवाक्, मुके झाले होते. स्वरांचा अमृतझरा एकाएकी आटला होता. चेंबाई वैद्यनाथ हतबुद्ध झाले होते.

ही दैवी आपत्ती सतत दोन वर्षे त्या संगीतसम्राटाचा पाठपुरावा करीत राहिली. यातून कसा मार्ग काढावा ? हेच त्यांना कळेना. संगीतकलेचा प्राण असलेल्या स्वरोच्चारालाच ते पारखे झाले होते. सर्व उपाय थकले होते. चेंबाई वैद्यनाथ जिवंतपणी मृत्यूच्या यमयातनांचा दारुण अनुभव घेत होते. अशा प्रसंगी माणसाला एक देवाचाच आधार असतो.

१९५४ सालची कार्तिकी एकादशी उजाडली. चेंबाई वैद्यनाथ आपल्या नियमाप्रमाणे गुरुवायुर मंदिरात आले होते. संगीताने आळवून भगवंताची सेवा करण्याचे त्यांचे साधनच दैवाने हिरावून घेतले होते. त्यांचे अंतःकरण विदीर्ण झाले होते. मुक्याने आक्रंदत होते. अशा अवस्थेत मंदिरातील मूर्तीपुढे उभे राहून चेंबाई वैद्यनाथांनी त्या दयासागराची प्रार्थना आरंभिली. त्यांच्या निःशब्द भावना अश्रुपूर्ण डोळ्यांतून ओसंडत होत्या. देवाला ते मुक्यानेच म्हणत होते, ' हे सर्वेश्वरा, मी असे कोणते पाप केले आहे की तू माझी वाचा बंद करावीस ? तूच दिलेल्या सुरेल कंठाने, तुझ्या भक्तीची, महतीची, गाणी मी गात होतो. अनेकांच्या अंतःकरणांना शांति–समाधान देत होतो. ती माझी वाणीच हिरावून घेतलीस. त्यापेक्षा मला मरण का दिले नाहीस ? मूकं करोति

वाचालम् असा तू माझ्यावरच एवढा का कोपलास ? देवा, दया कर. ह्या असह्य यातनातून या सेवकाला सोडव ! सोडव !' चेंबाई वैद्यनाथ आपल्या प्रार्थनेत एवढे गढून गेले होते की आजूबाजूच्या जगाचे संपूर्ण अस्तित्व ते विसरले होते. त्यांची ती तल्लीन अवस्था आणि त्यांच्या मुद्रेवर उमटलेली व डोळयांतून पाझरणारी त्यांची खोल व्यथा थोडयाच अंतरावर उभा असलेला एक नंबुद्री ब्राह्मण भावनेने पाहात होता. सहानुभूतीने तो चेंबाई वैद्यनाथ यांच्या जवळ आला. त्याने चेंबाई वैद्यनाथ यांचे सांत्वन केले, त्यांना आधार दिला. जणू काही श्रीकृष्णानेच त्यांची हाक ऐकली होती. सहृदय नंबुद्री ब्राह्मणाने त्यांच्या आवाजावर उपचार करण्याचे मान्य केले. गुरुवायुरपासून २० मैलांवर असलेल्या आपल्या गावी तो चेंबाई यांना घेऊन गेला. तुपात तयार केलेले एक औषध त्याने चेंबाई यांना दिले. त्या औषधाबद्दल त्याने एक पैही मोबदला घेतला नाही. आपल्या औषधाने चेंबाईचा गेलेला आवाज परत येईलच अशी त्याला खात्री होती. त्याने एकच अट चेंबाईंना घातली होती. त्यांचा आवाज परत आला की त्याच्या एका मित्राला त्यांनी गाणे शिकवावे.

देवाची कृपा म्हणा, औषधाचा प्रभाव म्हणा–दोन वर्षे त्यांना सोडून गेलेली चेंबाईची वाचा तीन दिवसांतच एखादा चमत्कार घडावा त्याप्रमाणे परत आली. चेंबाईंच्या आनंदाला पारावार उरला नाही. ते बोलू शकत होते. गाऊ शकत होते. जसा होता तसा त्यांचा आवाज त्यांना परत मिळाला होता. तेव्हापासून गेली १७ वर्षे श्री. चेंबाई वैद्यनाथ आपल्या संगीतकलेच्या द्वारा ईश्वराची व रसिकांची आणि आपल्या मायभूमीची अखंड सेवा करीत आहेत. वयाच्या ७८ व्या वर्षीही त्यांचे स्वरसामर्थ्य अबाधित आहे ज्या श्रीकृष्णाने त्यांची आर्त विनवणी ऐकून त्यांच्यावर त्या अज्ञात नंबुद्री ब्राह्मणाच्या रूपाने कृपा केली, त्याच्या सेवेसाठी आपल्या संगीताच्या साधनाने मिळणारे सारे द्रव्य ते अर्पण करतात. आपल्याला आपली वाचा परत मिळाली आणि आपली संगीत कला उपयोगिण्याचे सामर्थ्य आपणास लाभले यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे असे ते मानतात.

० ० ०

पूषन नवाथे हा एरवी आनंदी, आरोग्यसंपन्न व अभ्यासशील मुलगा. त्याचे वय अवघे १४ वर्षांचे. त्यावेळी तो एअर फोर्स स्कूलमध्ये शिक्षण घेत होता. १९६७ च्या मार्च महिन्याच्या प्रारंभीच आकस्मिकपणे एका व्यथेने त्याला घेरले. रोज सकाळी त्याचे डोके दुखू लागले. सकाळी झोपून उठताना वेदना तीव्र असत. दिवस जसजसा वर येऊ लागे तसतसा डोक्याचा त्रास कमी होई. संध्याकाळपर्यंत पुष्कळच उतार पडे. सकाळी कित्येकदा उलटया होत, त्यात पित्त पडे. उजेड व गडबड सहन होत नसे. शाळेत जाणे इच्छा असूनही अनियमित होऊ लागले. सकाळी काही खाणे शक्यच नव्हते. डोके जरा कमी झाल्यावर सुमारे ११ वाजता तो थोडेसे खाई. संध्याकाळी मात्र जेवण

नीटपणे होई. दोन महिन्यांनंतर डोक्याबरोबर थोडा पोटदुखीचाही त्रास चालू झाला.

पूषनचे वडील डॉक्टर नवाथे हे मूळचे पुण्याचे. ते व त्यांच्या पत्नी सौ. मंगलाताई दोघेही दिल्लीस नोकरी करतात. मुलाची ही अवस्था पाहून त्यांनी सर्व प्रकारच्या परीक्षा करून घेतल्या. लघवी, रक्त, इ. सर्व तपासण्या झाल्या; पण रोगाचे अचूक निदान झाले नाही. डोके दुखणे थांबले नाही. शेवटी पूषन याला पाँडीचरी येथे नेण्यात आले. एका धन्वंतरीचे औषध चालू केले. औषधाचा उपयोग झाला. डोकेदुखी कमी झाली. पूषन परत दिल्लीस आला. शाळेतही जाऊ लागला. पण १९६८ साल उगवले आणि पूषनची डोकेदुखी पुनः चालू झाली. आता त्याला होमिओपाथीचे उपचार चालू केले. त्यांचा उपयोग झाला नाही. चार महिन्यांनंतर त्याला पुनः पाँडीचरी येथे नेण्यात आले. वाटेत मद्रास व बेलूर येथे अनेक मोठमोठ्या तज्ज्ञ डॉक्टरांना त्याची प्रकृती दाखविली. पुनः नाना प्रकारच्या तपासण्या व चिकित्सा झाल्या. मेंदू व डोळे यांचीही तपासणी झाली. रोगाचे मूळ कोठेच सापडले नाही. पूषनच्या डोक्याने सर्वांची डोकी गरगरविली. व्याधी नित्याची झाल्यामुळे त्याचा अभ्यास, खेळ, संगीत हे सर्व निर्वेध चालू होते. डोके ठीक नसूनही परीक्षेत ७०।८० प्रतिशत गुण व पारितोषिकेही तो मिळवीत होता. १९६८ साल असेच पार पडले.

१९६९ च्या प्रारंभी डोकेदुखीने पुनः जोर केला. माणूस कितीही बुद्धिवादी असला तरी अशावेळी त्याचा बुद्धिवाद पांगुळतो. सौ. नवाथे यांच्या एक सहकारी शिक्षिका सौ. नायर यांनी एक तोडगा सुचविला. त्यांना थोडी अतींद्रिय शक्ती असावी. पूषनच्या डोकेदुखीचे कारण त्यांनी अगदी वेगळेच सांगितले. १९६७ च्या वसंतोत्सवात आपल्या विद्यालयाच्या नाटकात पूषनने नारदाची भूमिका केली होती. ती त्याने उत्कृष्ट वठवली आणि त्या भूमिकेतील गाणी त्याने इतकी चांगली म्हटली की त्याची विलक्षण वाहवा झाली. सौ. नायर यांच्या मते त्यावेळी त्याला कोणाची तरी दृष्ट लागली. डोकेदुखी हा त्याचा परिणाम. सौ. नायर यांनी उपाय सुचविला तो अगदीच विचित्र वाटावा असा होता. हिमाचल प्रदेश मध्ये होशियारपूरजवळ ‘ डेरा बडभागसिंग ’ नावाचे एक शीख धर्मीयांचे पवित्र ठिकाण आहे. त्या ठिकाणी वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठी यात्रा भरते. त्या ठिकाणी असलेल्या गुरुद्वारासमोरील ध्वजस्तंभावर निशाण चढवितात. त्यावेळी त्या ठिकाणी जाऊन त्या ध्वजाचे पूषनने दर्शन घ्यावे म्हणजे त्याची व्यथा नाहीशी होईल, असे सौ. नायर यांनी सुचविले.

श्री. व सौ. नवाथे यांना हा उपाय अशक्यप्रायच वाटला. त्यांना त्या स्थानाची, त्या ठिकाणी जाऊ शकणाऱ्या गाड्या–वाहनांच्या सोयीची काहीही कल्पना नव्हती. पण प्रत्येक गोष्ट अगदी योगायोगाने सहजी घडून आली. त्यांच्या एका माहितगार स्नेह्याला त्यांनी टेलिफोन केला. त्या स्नेह्याजवळ त्या स्थानी जाऊन आलेले आणि तेथील दैवी सामर्थ्याचा पडताळा घेतलेले एक गृहस्थ बसले होते. त्यांनी बर्वा नावाच्या एका माणसाचा पत्ता व फोन नंबर दिला. त्या यात्रास्थळी जाणाऱ्यांची प्रवासाची व अवांतर

सोय बर्वा हे करतात असे सांगितले. श्री. बर्वा यांच्याशी श्री. नवाथे संपर्क साधणार तोच बर्वा स्वतःच त्यांच्याकडे आले. त्यांच्या भेटीत यात्रेला जाण्याची सर्व व्यवस्था निश्चित झाली. श्री. बर्वा यांनी ग्रीन पार्कमध्ये राहणाऱ्या एका शीख साधूला भेटण्यास श्री. नवाथे यांना सांगितले. त्याप्रमाणे दुसरे दिवशी मुलाला घेऊन नवाथे पतिपत्नी त्या ठिकाणी गेले. ग्रंथसाहीबाला त्यांनी नमस्कार केला. त्या शीख सेवादाराने मुलाला अवश्य घेऊन जा असे सांगितले. मुलाच्या आईला व आजीलाही डोकेदुखी आहे का? असा प्रश्न त्याने विचारला. त्याचे होकारात्मक उत्तर अपेक्षितच होते. सेवादाराने पूषनच्या आईलाही बरोबर घेऊन जाण्याचा सल्ला दिला.

श्री. व सौ. नवाथे यांना हवी त्यावेळी रजा मिळणे अशक्य होते; पण योग असा की ते सारे सुरळित जमून आले. आणि अशा प्रकारे श्री. व सौ. नवाथे पूषनला घेऊन 'डेरा बडभागसिंग' या ठिकाणी पोहोचले. यात्रेत जमणाऱ्या भक्त भाविकांच्या साहाय्यासाठी निघालेला बावन सेवादारांचा एक जथा त्यांच्याबरोबर होता. त्यामुळे त्यांची सर्व सोय आपोआपच झाली.

होळीच्या आधी, ३ दिवस त्या ठिकाणी वास्तव्य करणे आवश्यक होते. यात्रेच्या ठिकाणी स्नानाची देखील सोय नव्हती. व्याधिग्रस्त आणि विशेषतः भूतपिशाच्चांची बाधा झालेले शेकडो लोक त्या ठिकाणी गोळा झाले होते. त्या स्थानी घरे नाहीत, धर्मशाळा नाहीत. मैदानात तंबू-राहुटया उभारून लोक राहतात. हाताने करून खातात. तेथून ३ मैलांवर असलेल्या धबधब्यावर स्नानासाठी जावे लागते. ग्रंथसाहीबाचे पठन व भजन कीर्तन अखंड चालू असते. ते ऐकणे एवढेच काम यात्रेकरूंना करावे लागते.

चमत्कार असा झाला की त्या जागी पोहोचल्या दिवशी पूषनची डोकेदुखी एकदम थांबली. मात्र ता. ५ मार्च रोजी त्याचे डोके पुनः दुखू लागले. झोपी जाताना तर त्याची तीव्रता वाढली होती. ता ६ मार्चच्या पहाटे दोन-सव्वादोन वाजता पूषन जागा झाला. त्याने वडिलांना उठविले. तो बहिर्दिशेला जाऊन आला, आणि वडिलांना म्हणाला, 'आपण गुरुद्वारात जाऊ या' इतक्या अपरात्री गुरुद्वारा उघडा असेल की नाही याची त्यांना शंका वाटली. जवळच असलेल्या सेवादार बाबाला त्यांनी विचारले. तो म्हणाला, 'गुरुद्वारा उघडा असेल. मुलगा म्हणतो आहे तर त्याला अवश्य घेऊन जा.' वडिलांनी नैवेद्याचे साहित्य घेतले. नैवेद्य दाखवून त्यांनी निशाणाचे दर्शन घेतले आणि समाधानाने ते परत आले. त्या क्षणापासून पूषनचे डोके पुरते थांबले. ११ मार्च-पर्यंत सर्व मंडळी दिल्लीस परत आली. त्या दिवसापासून पुनः कधी पूषनचे डोके दुखले नाही. ही चमत्कारकथा स्वतः श्री. व सौ. नवाथे यांनी मुद्दाम कसलीही अतिशयोक्ती न करता माझे दिल्ली येथील स्नेही श्री. व सौ. स्नेहा पटवर्धन यांच्या समक्ष त्यांच्याच निवासस्थानी निवेदन केली. ती जशीच्या तशी मी माझ्या वाचकांना सादर केली आहे.

० ० ०

पुजाऱ्याच्या सल्ल्याप्रमाणे डायस बाईंनी बाबांच्या समाधीपाशी रात्रभर धरणे धरले. अशावेळी कित्येक भक्तांना भीतीने त्यांची घाबरगुंडी उडावी अशा स्वरूपात बाबांचे दर्शन होते असे त्यांना समजले. त्यांनी बाबांना प्रार्थना केली की त्यांनी सौम्य सोज्ज्वळ रूपातच दर्शन द्यावे. डायस बाई समाधीपाशी प्रार्थना करीत बसून राहिल्या. रात्री एक तेजस्वी पुरुष त्यांच्यापुढे आला. त्याने उंची वेष परिधान केला होता. अंगावर हिरेमोती परिधान केले होते. त्यांच्या दर्शनाने डायस बाई भारावून गेल्या. त्याने डायस बाईंना खुणेने आपल्याबरोबर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या त्याच्या मागोमाग चालत गेल्या. पाहता पाहता त्याची ती आकृती उंचावर जात जात अदृश्य झाली. डायस बाईंना त्यांच्याशी संभाषण करावयाचे होते तो त्यांचा हेतू साध्य झाला नाही. त्यांना त्याची खंत वाटली. पुजाऱ्याला त्यांनी हे वृत्त निवेदन केले. तो म्हणाला,

'तुम्ही दर्शनाची मागणी केलीत त्याप्रमाणे दर्शन झाले. तुम्ही मागणी केली असती तर बाबांनी तुमच्यापाशी भाषण केले असते.'

डायस बाईंनी सतत तीन रात्री समाधीपाशी धरणे धरले आणि बाबांनी दर्शन देऊन आपल्याशी बोलावे असे साकडे घातले. तिसऱ्या रात्री बाईंची मनीषा पूर्ण झाली, बापजी फकरुद्दिन बाबा आपल्या मूळ स्वरूपात प्रकट झाले. त्यांच्याशी झालेल्या संभाषणात त्यांनी तिला एक रहस्य उघड केले. ते म्हणाले,

'गेल्या जन्मी तू माझी कन्या होतीस. तुझ्या हाकेला मी तातडीने ओ दिली. एवढ्या गर्दीतून तुलाच नेमके जवळ बोलाविले. या सगळ्याचे कारण आपले पूर्वजन्मीचे नाते. माझा तुला आशीर्वाद आहे. जेव्हा जेव्हा माझे स्मरण करशील तेव्हा मी तुझ्याबरोबर असेन. एक काम करीत जा. लोकांना मार्गदर्शन करून त्यांची दुःखे व संकटे हलकी करण्यास साह्यभूत हो. माझा तुला हा वर आहे.'

यात्रेहून डायस बाई परत आल्या त्या अगदी वेगळ्या बनून. बाबांच्या सांगीप्रमाणे त्या वागू लागल्या. दुःखहरण व रोगनिवारण यांचे उपाय जनतेला सांगू लागल्या. त्यांच्या सांगण्याचा अनेकांना उपयोग झाला आहे. 'आर्थ्रीटीस' सारख्या असाध्य रोगावरही त्या औषध सांगतात आणि ते गुणकारी ठरते. ख्रिश्चन असूनही एखाद्या कडक सोवळ्या ब्राह्मणासारखी त्यांची शुद्ध सात्त्विक राहणी व विचारसरणी आहे. त्या स्वतः आपली सर्व कामे पार पाडतात. दुसऱ्यावर अवलंबून राहात नाहीत. एका तरुण मुलीला त्यांनी गायत्री मंत्राच्या जपाचा उपाय सांगितला होता.

हा सर्व वृत्तांत मराठीतल्या एक विद्वान चिकित्सक संशोधिका व लेखिका श्रीमती दुर्गा भागवत यांनी मला सांगितला. त्या अंधश्रद्ध किंवा भोळसट नाहीत. बुद्धिवादी आहेत. डोळस आहेत. त्यांना स्वतःला डायस बाईंच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला आहे.

[ हा लेख प्रसिद्ध झाल्यावर काही वाचक-स्नेही मुद्दाम डायस बाईंकडे जाऊन आले; पण त्यांचा अनुभव फारसा प्रोत्साहक नाही, हे त्यांनी मला कळविले आहे.

मुंबईस भायखळा येथे फायर ब्रिगेडच्या पलीकडे ‘रेडीमनी मॅन्शन’ या इमारतीत डॉ. रोझ डायस या नावाच्या एक ख्रिश्चन बाई वास्तव्य करतात. त्यांच्याकडे येणाऱ्या अनेक दुःखपीडितांना व व्याधिग्रस्तांना त्या औषधोपचार व दैवी उपाय सांगतात. अनेकांना त्याचे प्रत्यंतर आले आहे. डॉ. रोझ डायस हे काम सेवाधर्म म्हणून करतात. त्यांना जी गूढ दैवी शक्ती प्राप्त झाली आहे ती त्यांना कशी लाभली ही एक अद्भुत कथा आहे.

डॉ. रोझ या मुळात हिंदू होत्या. ज्यांच्यावर त्यांचे प्रेम होते तो ख्रिस्तधर्मी होता. त्याच्याशी विवाहबद्ध होता यावे यासाठी त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यांचे वैवाहिक जीवन सुखासमाधानाने चालले होते. त्यांची मुलगी एकदा आजारी झाली. तिच्या आजाराने एवढे उग्र रूप धारण केले की तिचा ताप १०६ अंशांपर्यंत चढला. त्यांच्या मनाची उलघाल झाली. अशा वेळी शेवटी माणूस दैवी उपायाकडे धाव घेतो. त्यांच्या एका हितचिंतक स्नेह्याने त्यांना एक उपाय सुचविला. बापजी फकरुद्दिन या नावाच्या एका साधूची मनोभावे प्रार्थना करावयाची. त्याच्या प्रार्थनेने उतार पडल्यास मुलीला त्या साधूच्या पायावर घालावयाचे एवढी एकच अट होती. रोझ डायस् यांनी श्रद्धाभावाने त्यांनी ज्याला कधीही पाहिले नव्हते व ज्याचे नावही यापूर्वी ऐकले नव्हते त्या बापजी फकरुद्दिनला साकडे घातले. चमत्कार म्हणा, बोलाफुलाला गाठ पडली म्हणा, त्याच रात्री मुलीचा ताप खाली आला. दुखण्याला उतार पडला. आणि मुलगी बरी झाली.

बापजी फकरुद्दिन हा कोणी जिवंत अवलिया आहे अशी डायस बाईंची कल्पना. नवसाप्रमाणे त्याच्या पायावर मुलीला घालण्यासाठी त्या निघाल्या. राजस्थानमध्ये एका दूरच्या ‘गेली अकोट’ नावाच्या गावी या बाबाचा दरवर्षी उरुस किंवा मेळा भरतो. त्यावेळी त्या ठिकाणी लक्षावधी भक्त एकत्र होतात. प्रत्यक्ष त्या गावी गेल्यावर ती अफाट गर्दी पाहून डायस बाई बावरून गेल्या. गर्दीतून कशी तरी वाट काढीत त्या चालल्या असता, समाधीपाशी बसलेल्या एका पुजाऱ्याचे त्यांच्याकडे लक्ष गेले. त्या पुजाऱ्याने आपला माणूस पाठवून इतक्या गर्दीत डायस बाईंनाच नेमके आपल्याजवळ बोलावून घेतले. डायस बाईंना त्याचे नवल वाटले. त्यांनी पुजाऱ्याला प्रश्न केला,

‘बापजी फकरुद्दीन बाबा कोठे आहेत ?’

पुजाऱ्याने पलीकडेच असलेल्या बाबांच्या समाधीकडे बोट दाखविले.

डायस बाईंच्या ध्यानी आले की आपण नवस केला तो एका समाधिस्थ संताला. तिची फार निराशा झाली. जड अंतःकरणाने तिने मुलीला समाधीवर घातले. पूजा, प्रार्थना आटोपली आणि परत पुजाऱ्यापाशी आल्यावर ती म्हणाली, ‘मला, बाबा समाधिस्थ झाले आहेत ही कल्पनाच नाही. ते जिवंत आहेत असे समजून मी त्यांच्या दर्शनाला आले होते. मला त्यांचे प्रत्यक्ष दर्शन हवे आहे.’

पुजारी म्हणाला, ‘दर्शन होईल !’

पुजाऱ्याच्या सल्ल्याप्रमाणे डायस बाईंनी बाबांच्या समाधीपाशी रात्रभर धरणे धरले. अशावेळी कित्येक भक्तांना भीतीने त्यांची घाबरगुंडी उडावी अशा स्वरूपात बाबांचे दर्शन होते असे त्यांना समजले. त्यांनी बाबांना प्रार्थना केली की त्यांनी सौम्य सोज्ज्वळ रूपातच दर्शन द्यावे. डायस बाई समाधीपाशी प्रार्थना करीत बसून राहिल्या. रात्री एक तेजस्वी पुरुष त्यांच्यापुढे आला. त्याने उंची वेष परिधान केला होता. अंगावर हिरेमोती परिधान केले होते. त्यांच्या दर्शनाने डायस बाई भारावून गेल्या. त्याने डायस बाईंना खुणेने आपल्याबरोबर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या त्याच्या मागोमाग चालत गेल्या. पाहता पाहता त्याची ती आकृती उंचावर जात जात अदृश्य झाली. डायस बाईंना त्यांच्याशी संभाषण करावयाचे होते तो त्यांचा हेतू साध्य झाला नाही. त्यांना त्याची खंत वाटली. पुजाऱ्याला त्यांनी हे वृत्त निवेदन केले. तो म्हणाला,

'तुम्ही दर्शनाची मागणी केलीत त्याप्रमाणे दर्शन झाले. तुम्ही मागणी केली असती तर बाबांनी तुमच्यापाशी भाषण केले असते.'

डायस बाईंनी सतत तीन रात्री समाधीपाशी धरणे धरले आणि बाबांनी दर्शन देऊन आपल्याशी बोलावे असे साकडे घातले. तिसऱ्या रात्री बाईंची मनीषा पूर्ण झाली, बापजी फकरुद्दिन बाबा आपल्या मूळ स्वरूपात प्रकट झाले. त्यांच्याशी झालेल्या संभाषणात त्यांनी तिला एक रहस्य उघड केले. ते म्हणाले,

'गेल्या जन्मी तू माझी कन्या होतीस. तुझ्या हाकेला मी तातडीने ओ दिली. एवढया गर्दीतून तुलाच नेमके जवळ बोलाविले. या सगळयाचे कारण आपले पूर्वजन्मीचे नाते. माझा तुला आशीर्वाद आहे. जेव्हा जेव्हा माझे स्मरण करशील तेव्हा मी तुझ्याबरोबर असेन. एक काम करीत जा. लोकांना मार्गदर्शन करून त्यांची दुःखे व संकटे हलकी करण्यास साह्यभूत हो. माझा तुला हा वर आहे.'

यात्रेहून डायस बाई परत आल्या त्या अगदी वेगळया बनून. बाबांच्या सांगीप्रमाणे त्या वागू लागल्या. दुःखहरण व रोगनिवारण यांचे उपाय जनतेला सांगू लागल्या. त्यांच्या सांगण्याचा अनेकांना उपयोग झाला आहे. 'आर्थ्रीटीस' सारख्या असाध्य रोगावरही त्या औषध सांगतात आणि ते गुणकारी ठरते. ख्रिश्चन असूनही एखाद्या कडक सोवळया ब्राह्मणासारखी त्यांची शुद्ध सात्त्विक राहणी व विचारसरणी आहे. त्या स्वतः आपली सर्व कामे पार पाडतात. दुसऱ्यावर अवलंबून राहात नाहीत. एका तरुण मुलीला त्यांनी गायत्री मंत्राच्या जपाचा उपाय सांगितला होता.

हा सर्व वृत्तांत मराठीतल्या एक विद्वान चिकित्सक संशोधिका व लेखिका श्रीमती दुर्गा भागवत यांनी मला सांगितला. त्या अंधश्रद्ध किंवा भोळसट नाहीत. बुद्धिवादी आहेत. डोळस आहेत. त्यांना स्वतःला डायस बाईंच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला आहे.

[ हा लेख प्रसिद्ध झाल्यावर काही वाचक-स्नेही मुद्दाम डायस बाईंकडे जाऊन आले; पण त्यांचा अनुभव फारसा प्रोत्साहक नाही, हे त्यांनी मला कळविले आहे.

वाचकांपुढे त्यांचा हा अभिप्राय ठेवणे हेही माझे काम आहे. ]

० ० ०

दुर्गाबाई भागवत यांच्यावरून आणखी एका वृत्तांताचे स्मरण झाले. दुर्गाबाई काही भोळ्या, अंधश्रद्ध नाहीत, हे मी वर सांगितले आहेच. पण त्याचबरोबर त्या भावनाशून्य किंवा नाठाळ, नास्तिक नाहीत. डोळसपणाने का होईना त्यांचे आध्यात्मिक व अतींद्रिय अनुभवांकडे लक्ष असते. क्वचित त्या स्वतः पण काही प्रयोग करून पाहात असतात. त्या प्रवास पुष्कळ करतात. प्रवासात निसर्गसौंदर्य टिपतात. ऐतिहासिक अव-शेषांच्या आख्यायिकांच्या नोंदी करतात. विशेष गुणांच्या व प्रख्यातींच्या विद्वान पंडितांना व साधुसंतांनाही त्या कुतूहलाने भेटतात. अशाच एकदा त्या गुजराथेत नारेश्वर येथील संतश्रेष्ठ रंगावधूत महाराजांच्या भेटीस गेल्या. त्या भेटीत त्यांना 'दत्तबावनी' नावाचे एक स्तोत्र मिळाले. त्याचा पाठ लाभप्रद होतो असे त्यांना सांगण्यात आले. त्यांनी त्या स्तोत्राची ठराविक आवर्तने करण्याचा परिपाठ चालू केला.

त्या कुशल लेखिका आहेत तशाच सुगरण गृहिणी आहेत. पाकशास्त्रातील अनेक रुचिकर प्रयोग त्या वारंवार करीत असतात. घरगुती कामाचाही त्यांना कंटाळा नाही. त्यांचा कामाचा झपाटाही दांडगा आहे. एक दिवस एक किलो तिखट तयार करण्या-साठी लागणाऱ्या मिर्च्यांचे वाटण त्यांनी हाताने केले. काम हातावेगळे झाल्यावर त्यांच्या हाताचा आगडोंब झाला. काम करताना काही वाटले नाही. पण दुपारपासून संध्याकाळ-पर्यंत हात चांगलाच बोलू लागला. त्याला काय उपाय करावा याचा विचार करीत असतानाच आपला दत्तबावनीचा नित्यपाठ राहिला आहे याची त्यांना आठवण झाली. त्यांनी बिछान्यावर पडल्यापडल्या लोळत आळसत आवर्तने चालू केली. स्तोत्रपाठ चालू असताना हाताच्या आगीकडेही त्यांचे लक्ष होते. आणि स्तोत्रपाठाने ती थांबेल का? असा विचारही त्यांच्या मनात येऊन गेला होता. स्तोत्रपाठ संपल्यावर आश्चर्य असे की आपल्या हाताचा दाह कमी कमी होत चालला आहे असे त्यांना जाणवले. आणि आणखी थोड्या वेळात हाताची आग पूर्णपणे थांबली आहे अशी खात्री पटली. कदा-चित बोलाफुलाला गाठ पडली असेच कोणीही म्हणेल, पण चिकित्सक असूनही दुर्गा-बाईंना मात्र दत्तबावनीच्या आवर्तनाचाच तो प्रत्ययकारी परिणाम आहे असेच वाटले.

० ० ०

दत्तावरून नाथसंप्रदायाची व त्यावरून ज्ञानेश्वरीची आठवण झाली. गीतेच्या १२ व्या अध्यायाच्या पठणाने घडवून आणलेले पुष्कळच चमत्कार यापूर्वी मी माझ्या 'शांताचिया घरा' ( पान ९१ व पान १०३ ) आणि ओंकार–रहस्य ( पान ५९ ) या पुस्तकात ग्रथित केले आहेत. ज्ञानेश्वरीच्या पाठाचेही असेच काही चमत्कार मला ठाऊक आहेत. त्यातला एक या संदर्भात सांगण्यासारखा आहे.

विजापूर येथे श्री. नारायणराव जोशी या नावाचे सद्‌गृहस्थ राहतात. सुविद्य व सुसंस्कृत. नोकरीऐवजी त्यांनी स्वतंत्र व्यवसाय करून नेटका प्रपंच केला. त्यांना संत-साहित्याची विशेष गोडी. लेखनही करतात. अलिकडेच साठी उलटल्यानंतर व्यापार-व्यवसाय मुलांच्या हाती सोपवून ते निवृत्त–निष्काळजी झाले.

त्यांच्या एका स्नेह्यापाशी एक अत्यंत दुर्मिळ आणि जिला पारंपरिक पावित्र्य प्राप्त झाले आहे अशी ज्ञानेश्वरीची हस्तलिखित प्रत होती. श्री. जोशी यांनी ती प्रत आपणास मिळावी अशी त्या स्नेह्यांना विनंती केली होती. पण आपल्या घरचा तो पवित्र ठेवा देण्याचे त्या सद्‌गृहस्थांनी विनयपूर्वक नाकारले.

श्री. जोशी यांचे आरोग्य चांगले. सवयी चांगल्या; असे असताही त्यांना निद्रा-नाशाचा विकार चालू झाला. वास्तविक झोप न आल्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्यावर किंवा आरोग्यावर काहीही परिणाम होत नव्हता; पण त्यांना मात्र हा प्रकार एकंदरीत बरा नव्हे असे वाटले. झोप न येण्यामुळे एखादे वेळी डोक्यावर परिणाम होऊन आपल्याला वेड वगैरे लागून इतरांना त्याचा उपद्रव होऊ नये असे त्यांच्या मनाने घेतले. ते सरळ आपल्या नेहमीच्या डॉक्टरकडे गेले. आपला विकार व त्यावरून आपल्या मनात येणारे विचार यांची माहिती त्यांनी डॉक्टरांना दिली. डॉक्टरांनी तपासणी केली. आणि काही उपायही सुचविले. पण श्री. नारायणराव जोशी डॉक्टरांना निग्रहाने म्हणाले, ‘ आता आयुष्यात कसलीही अभिलाषा उरलेली नाही. निद्रानाशातून मेंदूच्या बिघाडा-पर्यंत जाण्याची आपली इच्छा नाही. काही गोळया घेऊन आयुष्याची इतिश्री आनंदाने करावी असे मला वाटते. माझ्या अवतारसमाप्तीची सारी जबाबदारी माझी. तुम्ही फक्त औषध–जीवन संपविण्याचे–द्या म्हणजे झाले. डॉक्टरांनी हसून त्यांची सर्व प्रकारे समजूत काढली. आणि निद्रानाशामुळे डोके बिघडेल ही कल्पना निराधार असल्याचे त्यांना पटविले.

श्री. नारायणराव जोशी यांना विचार करता एका अमोघ औषधाचा शोध लागला. ज्या स्नेह्यांनी ज्ञानेश्वरीची त्यांच्या संग्रहीची जुनी प्रत देण्याचे नाकारले होते त्यांच्याकडे ते गेले; आणि म्हणाले, ‘ तुमच्या मूळ ज्ञानेश्वरीवरून मी माझ्या हाताने लिहिलेली एक प्रत तयार करण्याचे ठरविले आहे. तेव्हा बक्षिस म्हणून नव्हे तर नक्कल करण्यासाठी आपली प्रत काही दिवसांसाठी द्यावी. काम होताच ती सुरक्षित परत करीन. ’ त्या स्नेह्यांना ती कल्पना पटली. त्यांनी आनंदाने आपली दुर्मिळ प्रत नारायण-रावांच्या स्वाधीन केली.

श्री. नारायणराव जोशी यांना एक आवडीचा उद्योग मिळाला. रोज रात्री कंटाळा येईपर्यंत ज्ञानेश्वरीची प्रत करण्याचे त्यांचे एक अभिनव अनुष्ठान सुरू झाले. निद्रानाशा-मुळे प्रदीर्घ वाटणाऱ्या रात्री भराभर जाऊ लागल्या. ज्ञानेश्वरीची त्यांना मुळातच आवड. आणि स्वतःच्या हाताने ती लिहून काढण्याच्या कल्पनेतील आनंद व श्रद्धाभाव यामुळे ते एका अपूर्व समाधीत मग्न राहू लागले.

अध्यायामागून अध्याय लिहून होत होते. रात्री मागे पडत होत्या. निद्रानाशाची जाणीवही राहिली नव्हती. अशा अवस्थेत १८ व्या अध्यायाचा शेवट लिहून झाला. लिहिणे संपवून श्री. जोशी अंथरुणावर पडले आणि त्यांना झोप लागली ती अगदी शांत-गाढ ! दुसरे दिवशी ते जागे झाले त्यावेळी त्यांचे मन आश्चर्याने भरून गेले. त्यांना इतकी स्वस्थ झोप लागली होती की त्यापूर्वी अशा निवांत झोपेचा त्यांना अनुभवच आलेला नव्हता. त्यानंतर पुनः कधी त्यांना झोप लागली नाही असे झाले नाही.

काही दिवसांनंतर ज्या स्नेह्यांची दुर्मिळ ज्ञानेश्वरी त्यांनी प्रत करण्यासाठी आणली होती ते वैकुंठवासी झाले. त्यांची मुले नव्या पिढीची, नव्या विचारांची. या दुर्मिळ ज्ञानेश्वरीचा त्यांना उपयोग नव्हता, महत्त्वही नव्हते. त्यांच्या वडिलांनी आपल्या मिळकतीची जी व्यवस्था करून ठेवली होती त्यांत आपल्या संग्रहीची ती दुर्मिळ ज्ञानेश्वरीची प्रत आदरपूर्वक श्री. नारायणराव जोशी यांना देणगी म्हणून द्यावी असे लिहून ठेवले होते !

० ० ०

ना. श्रीनिवास शास्त्री हे भारताचे एक थोर सुपुत्र. त्यांनी आपला सारा जन्म भारताचे भाग्य घडविण्यात खर्च केला. जाज्वल्य देशभक्ती, विशुद्ध चारित्र्य, अमोघ वक्तृत्व इ. अनेक सदगुणांचे ते आगर होते. राजकारणात ते प्रागतिक पंथाचे होते. त्यांचे राजकारणातील गुरू ना. गोखले यांची गादी त्यांनी चालविली. संस्कृत व इंग्रजी भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. ना. शास्त्री यांनी आपल्या कृतीने भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व साऱ्या जगाला पटविले.

इंग्रजी विद्येमुळे त्यांच्यावर स्वाभाविकपणेच बुद्धिवादाचा पगडा होता. त्यांचे स्वतःचे आचरण अत्यंत शुद्ध व आदर्श होते. पण धर्म, अध्यात्म याविषयीची त्यांची मते चाकोरीत बसणारी नव्हती. पूजापाठ, जपमंत्र इ. पारंपरिक आचारविचारांवर त्यांची श्रद्धा नव्हती. ईश्वर, पुनर्जन्म इत्यादि विषयांवरील त्यांची मते जुन्यात बसणारी नव्हती. देशाची व समाजाची सेवा आणि त्यासाठी कष्ट व त्याग हाच एक श्रेष्ठ धर्म ते मानीत. मात्र भगवद्गीतेवर त्यांची भक्ती होती. गीतेतील १२ वा अध्याय त्यांचा आवडता होता. त्यातही त्या अध्यायातील पहिल्या आठ श्लोकांची मोहिनी त्यांच्या मनावर विशेष होती. ते एकटे असले म्हणजे त्या अध्यायाचे व विशेषतः त्या आठ श्लोकांचे वारंवार पठण-पारायण हा त्यांच्या आनंदाचा छंद असे.

उतारवयात त्यांच्या मनात ईश्वर, अध्यात्म, परलोक, पुनर्जन्म इ. विचारांचे वादळ चाले. पण त्याबाबतीत निर्णयात्मक अशी त्यांची वृत्ती बनली नव्हती. १९४५ साली १९ फेब्रु. या दिवशी त्यांच्या गुरूंचा-गोखल्यांचा स्मृतिदिन होता. शास्त्रींची प्रकृती त्यावेळी पुष्कळच बिघडलेली होती. ना. गोखले यांच्या जीवनातील एक भावप्रसंग निवेदन करीत असतानाच सभास्थानीच त्यांना मूर्च्छा आली. त्यांना घरी नेण्यात

आले. या दुखण्यातून आपण वाचत नाही असे त्यांना वाटले. जगतात की मरतात अशा अस्वस्थ अवस्थेत ते होते. शुद्ध आली त्यावेळी त्यांनी गीतेचा १२ वा अध्याय आपणास ऐकविण्याची त्यांच्या जवळ असलेल्या मंडळीस विनंती केली. जीवन-मरणाच्या संधि-रेषेवर असताना त्यांनी नेमके गीतेच्या १२ व्या अध्यायाचेच स्मरण करावे ही घटना अनेक दृष्टींनी बोलकी, संस्मरणीय आहे.

° ° °

स्तोत्र-मंत्रांच्या सामर्थ्याच्या प्रत्ययाचे अनेक पुरावे मी 'ॐकाररहस्य' या माझ्या ग्रंथात दिले आहेत. आणखीही कित्येक अधिकृत प्रत्यय-कथा माझ्या संग्रही आहेत. त्यांपैकी एक निवडक अनुभव-कथा कोणालाही विशेष प्रेरक वाटेल अशी आहे, तेवढी येथे सांगतो.

जुन्या पिढीतील एका संपन्न सुसंस्कृत कुटुंबातील एक सज्जन सुपुत्र डॉ. श्रीप्रकाश हे नुकतेच लौकिक जीवनाच्या बंधनातून मुक्त झाले. विद्यासंपन्न, विनयशील, आणि विनोदप्रिय म्हणून ते सर्वप्रिय होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी फार मोठी कामगिरी बजावली होती. स्वातंत्र्योत्तर काळातही मंत्री म्हणून, परदेशी वकील म्हणन, आणि जीवनाच्या उत्तर खंडात राज्यपाल म्हणून, त्यांनी आपले जीवन राष्ट्रसेवेत सत्कारणी लावले. जवाहरलाल नेहरूंचे ते समकालीन आणि सवंगडीही. अशा या श्रेष्ठ भारतपुत्राच्या जीवनातला हा प्रसंग आहे.

डॉ. श्रीप्रकाश महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून काम पाहात असतानाची गोष्ट. डॉ. प्रकाश यांना एकदा एका गंभीर दुखण्याने गाठले. निष्णात वैद्यांचे उपचार चालू होते. पण दुखणे उपचारांना व औषधांना दाद देण्यास तयार नव्हते. वातावरण चिंतेचे होते. त्यावेळी त्यांचे प्रख्यात पिताजी डॉ. भगवानदास विद्यमान होते. त्यांनी राजभवनातील एका कारभाऱ्याला जवळ बोलाविले; आणि त्याला लवकरात लवकर मृत्युंजयाचा होम करण्याची सर्व सिद्धता करण्यास सांगितले. दुसरे दिवशी राजभवनात विधिपूर्वक होमहवन चालू झाले. ब्रह्मश्रेष्ठांच्या पवित्र गंभीर मंत्रोच्चारांनी ती वास्तू पावन झाली. सर्व विधी पूर्ण झाल्यावर मृत्युंजयाच्या मंत्रपठणाने प्रभावी झालेला तीर्थप्रसाद डॉ. श्रीप्रकाश यांना देण्यात आला. त्याआधी अंथरुणातून उठण्याचीही शक्ती नसलेले डॉ. श्रीप्रकाश तीर्थप्रसाद-ग्रहणाच्या वेळी आपोआप उठून बसले. अत्यंत भक्तिभावाने त्यांनी तीर्थप्रसादाचे ग्रहण केले. जे निष्णात वैद्याच्या उपायांनी शक्य झाले नाही ते मृत्युंजयाच्या जपाने व होमाने घडून आले होते. तीर्थप्रसादासाठी उठून बसलेल्या डॉ. श्रीप्रकाश यांना त्यानंतर अंथरुणाचा आश्रय करावा लागला नाही. त्यांचे दुखणे दूर पळाले. हा चमत्कार त्यांनी स्वतःच वर्णन केला आहे.

□ □ □

# १

प्रारब्धाची रेषा पुसता येते असे श्रीसमर्थ रामदास छातीठोकपणाने सांगतात. उपासना व साधना यांच्या बळावर अशक्य वाटणाऱ्या घटनाही घडून येतात. उपासनेमुळे घडून आलेल्या अनेक चमत्कारांपैकी पुढील सत्यकथा वाचकांच्या चित्ताचा ठाव घेईल म्हणून मुद्दाम देत आहे.

सुमारे शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीचा काळ! त्यावेळी आजच्यासारखी गावोगावी आणि मोठ्या शहरांतून गल्लोगल्ली महाविद्यालये नव्हती. मुंबई प्रांतातल्या दूरदूरच्या गावातल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी पुण्यास जावे लागे. त्यामुळे त्याकाळी उच्च पदवी प्राप्त करून घेणाऱ्यांना मान व महत्त्व असे.

रत्नागिरीजवळच्या एका खेड्यातील मध्यम वर्गातील एका ब्राह्मण तरुणाने अशी पदवी प्राप्त करून शिक्षण खात्यात अधिकाराची जागा मिळविली. या तरुणाचे शुभ नाव परशुरामपंत, उपनाव गोडबोले. नोकरीनिमित्त त्यांचे वास्तव्य बेळगाव–धारवाड या भागात अधिक असे. परशुरामपंतांचे घर भरलेले होते. आई होती. सुशील सुस्वभावी पत्नी लाभली होती. नावाप्रमाणेच ती 'गंगा' होती. चांगल्या कुळातली. चांगले संस्कार घेऊन आलेली. पतिभक्त होतीच पण सासू-सासरे आणि कुटुंबातील इतर सर्व माणसांचीही ती सेवाभक्ती करण्यात तत्पर असे. संसार सुरळीत–सुखाचा चालला होता.

एके दिवशी एक अकल्पित घटना घडून आली आणि त्या घटनेने त्या कुटुंबाच्या सुखशांतीला दृष्ट लागली. त्या दिवशी सासूबाई कुठे तरी बाहेर गेल्या होत्या. घरात एक छोटे मूल होते. ते सारखे रडत असे. त्यामुळे त्याला अफू देऊन झोपवीत असत. घरातल्या इतर कामांप्रमाणेच त्या बाळाला अफू देण्याचे कामही त्या दिवशी गंगाबाई-कडेच सोपविले होते. अननुभवी असल्यामुळे लहान मुलाला किती प्रमाणात अफू द्यावयाची हे तिला ठाऊक नव्हते. तिच्या हातून अभावितपणे अफू अधिक प्रमाणात दिली गेली. परिणाम विपरीत झाला. मुलाला अफूची बाधा होऊन, ते जग सोडून गेले. ह्या दुर्घटनेने घरात हाहाःकार उडाला. गंगाबाईला मेल्याहून मेल्यासारखे झाले. प्रत्यक्ष सासूबाईंनीच तिच्यावर मुलाचा बळी घेतल्याचा आरोप केला. भरल्या घरात गंगाबाई

घरातल्या अल्लड अर्भकाची हत्या करणारी एक पापिणी राक्षशीण ठरली. धरणी दुभंगून आपल्याला आत घेईल तर बरे–अशी गंगाबाईच्या मनाची अवस्था झाली. ज्यांच्यापाशी अंतःकरण मोकळे करावयाचे–आणि वस्तुस्थिती समजावून घेऊन जे आपले निरपराधित्व पटून आपल्याला धीर व आधार देतील असा तिला विश्वास होता ते तिचे पतिदेवच जेव्हा आपल्या मातेच्याच बाजूचे झाले–तेव्हा मात्र तिच्यावर खरोखरीच आभाळ कोसळले.

माहेर गावातच होते. काळे तोंड घेऊन तिथेही जाण्याची तिला इच्छा नव्हती. पण निरुपायाने तिला माहेरचा आश्रय घ्यावा लागला. एका निष्पाप बालकाचा बळी घेणारी–'खुनी'–ही अपकीर्ती तिला असह्य होत होती. ईश्वराखेरीज कोणालाही खरे काय घडले हे सांगण्याची सोयच उरली नव्हती. शेवटी त्याच सर्वसाक्षी करुणाकराला शरण जाण्याचा तिने निर्णय घेतला आणि मनाचा दगड करून तिने तो कृतीत आणला. एका पहाटे नेसत्या वस्त्रानिशी, देवाचे नाव घेऊन तिने घर सोडले. पायी प्रवास करीत तिने नरसोबाची वाडी गाठली. दत्ताच्या पायी आपले जीवन तिने समर्पण केले. रात्रंदिवस त्याचीच सेवा करीत राहण्याचा तिने संकल्प केला. त्या क्षेत्रस्थानी एक थोर सत्पुरुष राहात होते. त्यांचा तिने आशीर्वाद घेतला. एका सज्जन गृहस्थाच्या घराच्या पडवीत तिने वास्तव्य केले. ती सासर विसरली. माहेर तिने डोळयाआड केले. ती तपस्विनी बनली. तिची घोर तपश्चर्या चालू झाली. भल्या पहाटे उठावे, कृष्णामाईच्या दयामय अंतःकरणात बुडी घ्यावी, मुखाने सतत नामस्मरण करावे आणि सूर्य माथ्यावर येईपर्यंत दत्तमंदिराभोवती प्रदक्षिणा घालाव्या, असा दिनक्रम चालू झाला. थोराघरची कन्या आणि एका घरंदाज कुळातली ही वज्रचूडेमंडित स्नुषा, पोटाची खळगी भरण्यासाठी चार घरी हिंडून भिक्षा मागे. दुपारी कीर्तन–प्रवचनांचा लाभ आणि सायंकाळी आपल्या कुटीत विश्राम असे तिचे जीवनचक्र चालू झाले.

कालचक्रही कर्तव्यदक्षतेने खाली–वर होतच होते. दिवसांमागून दिवस, वर्षांमागून वर्षे, उलटत होती. एक तपाचा काळ उलटला होता. गंगाबाईच्या तपस्येला तेज चढत होते. देह कृश होत होता. पण आत्मतेज वाढत होते. दत्तसेवेत क्षणाचाही खंड नव्हता. प्रदक्षिणेची पाउले स्थिरपणे फिरत होती. नामस्मरणाची गोडी वाढतच होती. लौकिकाचा, विषयांचा विसर पडला होता. कृष्णामाई आणि दत्तगुरु यांच्या छत्राखाली पुण्याची वाटचाल प्रगत होत होती.

तिकडे–सासरी–बारा वर्षांच्या दीर्घावधीत काळाने आपली क्रीडा केली होती. परशुरामपंतांनी गंगाबाईच्या जागी दुसऱ्या एका स्त्रीची स्थापना केली होती. संसाराचा नवा मांड मांडला होता. संततीही झाली होती. पण गंगाबाईचे पाऊल घराबाहेर पडल्यापासून परशुरामपंत व त्यांचे घर सुखशांतीला कायमचे पारखे झाले होते.

नव्या पत्नीपासून झालेली सारी संतती काळाने हिरावून घेतली होती. परशुरामपंत निराश झाले होते, उदास झाले होते. त्यांना एक तपापूर्वीचा सारा चित्रपट आठवला.

त्या व्यग्र मनःस्थितीतच एका रात्री त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात एका सत्पुरुषाचे दर्शन झाले. परशुरामपंतांना–स्वप्नातच ते सत्पुरुष म्हणाले, ‘ टाकून दिलेल्या आपल्या पहिल्या गृहलक्ष्मीला परत घेऊन ये. तिच्याशी पुन्हा संसार कर. तुला सुख लाभेल–तुझे कल्याण होईल. तिला शोधण्यासाठी नरसोबाच्या वाडीला जा.’ परशुरामपंत जागे झाले. स्वप्नातील सत्पुरुषाने सांगितले ते खरे असेल का ? असे त्यांच्या मनात आले. पण त्यांना आता पूर्ण पश्चात्ताप झाला होता. आपल्या निरपराधी पत्नीवर आपण केवढा अन्याय केला आहे, हे ध्यानी येऊन ते व्यथित झाले होते. ‘ स्वप्न खरे असो वा खोटे, स्वप्नाचा पडताळा घेण्यास हरकत कोणती ’ असा विचार करून त्यांनी वाडीची वाट धरली. ते वाडीस पोहोचले आणि मंदिरापाशी जाताच त्यांना जे दृश्य दिसले, त्याने परशुरामपंतांना जागच्या जागी खिळवून ठेवले. बारा वर्षांपूर्वी टाटातूट झालेली त्यांची धर्मपत्नी दत्ताभोवती प्रदक्षिणा घालीत नसून एक पवित्र ज्योतीच भिरभिरते आहे असे त्यांना भासले. प्रदक्षिणा घालता घालता त्या साध्वीची दृष्टी परशुरामपंतांवर पडली. पतिपत्नींची दृष्टादृष्ट झाली. भोवतालचे सारे विश्व क्षणात विरून विरघळून गेले. तिच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. आनंदाला सीमा उरली नाही. आधीच पतिभक्त–त्यातून बारा वर्षांच्या तपस्येच्या वलयाने वेढलेली ती साध्वी भक्तिभावाने धावत जाऊन दत्ताइतक्याच निष्ठेने पतिदेवाच्या चरणी लागली. शिवशक्तीचा अपूर्व संगम झाला होता. डोळे बोलत होते. हृदये एकमेकांच्या मिठीत केव्हाच एक होऊन गेली होती. एका विलक्षण भावनेची अनुभूती दोघांनाही येत होती.

आनंदाचा क्षण ओसरला. मनाचा चाळा सुरू झाला. तिला वाटले, ‘ हे माझ्यासाठीच म्हणून कशावरून आले असतील ? चारचौघांप्रमाणे दत्तभेटीसाठी आले असले तर–त्यांच्या सुखात आपली अडचण कशाला ? ’–शब्दही न बोलता ती आपल्या उरलेल्या प्रदक्षिणा पुऱ्या करण्यासाठी देवळात गेली. परशुरामपंत तटस्थ–शांत–उभे राहून पाहात होते. प्रदक्षिणा पुऱ्या झाल्या. ती निघाली. नित्याप्रमाणे चार घरी तिने भिक्षा मागितली आणि आपल्या झोपडीत ती परत आली. परशुरामपंतांनी आपल्या पत्नीचे ते नवे तेजस्वी रूप पाहिले. तिच्या थोर मनाची निर्लेपता त्यांनी पाहिली. ते गहिवरले. त्यांनी आपल्या अपराधाचे परिमार्जन करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आधी कृष्णाबाईच्या कुशीत शिरून आपल्या सर्व प्रमादांचे गदळ विनम्र भावाने तिच्या स्वाधीन केले. शुद्ध–स्वच्छ–होऊन त्यांनी आपला नवा संकल्प सांगून दत्तप्रभूंचे पाय धरले. भोजन वगैरे करून आपल्या तपस्विनी गृहिणीच्या निवासस्थानाचा शोध घेऊन त्या ठिकाणी ते गेले. मोकळ्या मनाने आपल्या गृहदेवतेची क्षमा मागून परशुरामपंत तिला म्हणाले, ‘ तुला नेण्याकरता मी आलो आहे. ’

गंगाबाई–‘ ते आता तुमच्या हाती नाही ! ’

परशुराम– ‘ मग कोणाच्या ? ’

गंगा–‘ ज्याने मला इथे आणले त्या दत्तप्रभूंच्या. ’

परशुराम–मग तर फारच उत्तम. त्याच्या सांगण्यावरून मी येथे आलो आहे,—

आता आश्चर्य करण्याची पाळी गंगाबाईंवर होती. तिची मनःस्थिती ओळखून परशुरामपंतांनी आपल्याला झालेला स्वप्न–दृष्टांत तिला हर्षभराने निवेदन केला. तो ऐकून तिला देवाच्या करणीचे नवल वाटले. तरीही ती शांतपणे परशुरामपंतांना म्हणाली, ‘ दत्ताइतकेच ज्यांना मी पूज्य मानते असे एक साधुमहाराज इथे असतात त्यांच्याकडे आपण जाऊ. त्यांना सर्व वृत्तांत सांगू आणि त्यांनी अनुज्ञा दिली तरच मी आपल्याबरोबर परत येईन. ’

पत्नी पुढे व पती मागे असे, ते सत्पुरुष ज्या ठिकाणी होते तेथे गेले. दोघांनीही त्यांचे पदवंदन केले. परशुरामपंत त्या साधुपुरुषाकडे आश्चर्याने पाहातच राहिले, गंगाबाईंनी थोडक्यात सर्व वृत्तांत सांगून महाराजांची अनुज्ञा मागितली. अनुज्ञा मिळणार याबद्दल परशुरामपंतांना शंका उरली नव्हती. त्या सत्पुरुषाने हसतमुखाने त्या लक्ष्मीनारायणांना आशीर्वाद देऊन म्हटले, ‘ सुखाने संसार करा. तुमच्या पुण्याईने आणि भगवंताच्या कृपेने तुमच्या कुळात कुळाची कीर्ती वाढविणारा उज्ज्वल वंशदीप प्रकाशित होईल ’—

आनंदातिशयाने परशुरामपंतांनी इतका वेळ राखून ठेवलेले एक गुपित उघडे केले. ते म्हणाले, ‘ ज्यांनी आपल्याला आशीर्वाद दिला त्यांनीच मला स्वप्नात दर्शन दिले होते. ’ ईश्वराची लीला अगाध आहे.

एका तपाची प्रखर तपस्या आणि दत्तस्वरूप अशा साधु पुरुषाचा आशीर्वाद फळल्यावाचून कसा राहील ? परशुरामपंतांचा संसार सर्व सुखाचा झाला. संपदा–समृद्धी परत घरात आली. घरचे गोकूळ गजबजले. दोन पुत्र झाले. एक सदाशिव तर दुसरा विष्णु. ह्या महाविष्णूपोटीच महाराष्ट्रातला एक महान सत्पुरुष जन्मास आला. आनंदमय–स्व–रूपाचा ज्यांना लाभ झाला आहे, असे महाराष्ट्राचे मूर्त अध्यात्मवैभव म्हणजेच–तपस्विनी गंगाबाईंचे नातू–पावस येथील स्वामी स्वरूपानंद. ’

□ □ □

# १०

१९६९ साल असावे. महाड येथे माझ्या व्याख्यानाचा कार्यक्रम होता. तेथील महाविद्यालयातील एका प्राध्यापकाची सहज भेट झाली. माझे लेखन त्यांच्या परिचयाचे होते. व्याख्यानही त्यांनी ऐकले होते. आमच्या भेटीत स्वाभाविकच काही चर्चा–चिकित्सा झाली, त्यात प्राध्यापक महाशयांनी आपला एक अनुभव सांगितला तो असा :–

महाड येथे दोन जर्मन गृहस्थ आले होते. ते दोघेही प्रत्यही भल्या पहाटे उठत. प्रातःकर्मे आटोपून दोन्ही खांद्यांवर पिशव्या अडकवून ते सरळ अरण्याचा मार्ग धरीत. खाण्याचे पदार्थ व पाणी त्यांच्या बरोबरच असे. सूर्य मावळल्यानंतर ते परत गावात उगवत. त्यांचा हा दिनक्रम प्राध्यापक महाशय कुतूहलाने पाहात असत. अरण्यात जाऊन हे परदेशस्थ सज्जन करतात तरी काय ? हे जाणण्याच्या इच्छेने एकदा प्राध्यापकांनी त्या दोघा जर्मन माणसांची मुद्दाम भेट घेतली. प्राध्यापकांनी ओळख करून दिली व आपला हेतू निवेदन केला. त्यावर त्यांच्यापैकी एकजण हसत उद्गारला, ‘ आम्ही या गावात वास्तव्य करून सकाळपासून संध्याकाळपर्यन्त अरण्यात जाऊन काय उद्योग करतो या आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी आपल्याला एक कटू उक्ती ऐकवणे भाग आहे. तुम्हा भारतीयांच्या इतके महामूर्ख लोक जगात दुसरे कोणी नाहीत. ’

प्राध्यापकांना जर्मन पाहुण्यांच्या त्या उद्गारांचे आश्चर्य वाटले. तरीही पहिल्याच भेटीत असे स्फोटक विचार ऐकविण्यात त्या परदेशी गृहस्थाचा काही विशेष हेतू असला पाहिजे हे ध्यानी येऊन ते हसत म्हणाले, ‘ मान्य आहे. पण आमचा मूर्खपणा कोणता तो कळला तर बरे होईल. ’

त्यावर तो जर्मन माणूस म्हणाला, ‘ तेच सांगणार आहे. आपण प्राध्यापक आहात. भारताला स्वातंत्र्यलाभ झाल्याला किती वर्षे झाली ? ’

प्राध्यापक–‘ झाली २२–२३ वर्षे. ’

जर्मन गृहस्थ –‘ मग या दीर्घ काळात भारतातील ॲलोपॅथिक डॉक्टरांची संख्या वाढली का कमी झाली ? ’

९८७१५
संग्रह शाखा (स्थळ प्रत)



प्राध्यापक–' बहुधा वाढलीच आहे. आयुर्वेदातही आता ॲलोपॅथीची मिसळ झाली आहे. '

जर्मन—' आणि म्हणूनच आरंभीचे निंदास्पद विधान मी केले. वास्तविक चरक व सुश्रुताच्या या संपन्न आयुर्वेदप्रधान देशात केवळ इंग्रजांच्या वर्चस्वामुळेच ॲलोपॅथीची वाढ व चलती झाली होती. या विशाल प्राचीन देशात मानवी आरोग्याला उपयुक्त अशा वृक्षवनस्पतींनी समृद्ध अशी अनेक वने व अरण्ये आहेत. त्यातील वृक्ष–वनस्पतींचा संपूर्ण अभ्यास तुमच्या बुद्धिमान पूर्वजांनी केलेला आहे. असे असताही स्वातंत्र्य मिळून इतका दीर्घकाळ लोटला तरी आपल्या या समृद्धीचे या देशाला भान नसावे. वृक्ष वनस्पतींच्या संशोधनाकडे त्यांचे लक्ष जाऊ नये आणि इंग्रज गेले तरीही ॲलोपॅथीची या देशात वाढ होत राहावी ही वस्तुस्थिती प्रशंसनीय खासच नव्हे. भारतीयांबद्दल आरंभीच मी अत्यंत कटू असे उद्‌गार काढले त्याचे कारण हेच.

' आता आम्ही आमच्या देशातून येऊन महाडसारख्या गावी काय उद्योग करतो तो ऐका. तुमच्या भूमीत अनेक दुर्मिळ औषधी वृक्ष व वनस्पती उगवतात. त्यांपैकी काहींचा आम्ही शोध घेतो. त्यासाठी भटकतो, कष्ट करतो. हव्या असलेल्या वनस्पती मिळवून त्या बरोबर घेऊन येतो. आमची एक छोटी प्रयोग व रसायनशाळा आहे. शोधून आणलेल्या वनस्पतींचे रासायनिक पृथक्करण इत्यादि संस्कार करून आमची माहिती आम्ही आमच्या देशातील मुख्य औषधी कारखान्यांकडे पाठवून देतो. या खटाटोपातून एखादी सर्पगंधासारखी भारतीय वनस्पती आमच्या कारखान्यात जाते आणि तिच्यावर अद्ययावत संस्कार केले जाऊन ' सर्पिना ' सारखे रक्तदाबासारख्या व्याधीवरचे रामबाण औषध जगाला उपलब्ध होते. भारतात जिथे जिथे देवदेवतांची पवित्र यात्रास्थळे आहेत त्या त्या ठिकाणी अशा दिव्य वनस्पतींनी युक्त अशी अरण्ये आहेत. तुमच्याच वनस्पती परदेशात जाऊन आधुनिक संस्कारांनी आपले रूप पालटून आकर्षक बाटल्यांतून तुमच्या हाती येतात; आणि ज्यांची मूळ किंमत तीन आणे देखील नाही अशांसाठी तुम्ही वेळी तीस रुपयेही खर्च करता. वास्तविक तुमच्या देशाला ॲलोपॅथिक डॉक्टरांची आवश्यकताच नाही. तुमच्याजवळ औषधी वृक्ष–वनस्पतींचे एवढे भांडार आहे की असाध्य व्याधिनिवारणासाठीही त्याचा प्रभावी उपयोग होऊ शकेल. पण या महत्त्वाच्या प्रश्नाकडे तुमचे लक्ष जाऊ नये याचे आश्चर्य वाटते. आपण मला क्षमा करा. पण आरंभीचे माझे विधान मी का केले हे आता आपल्या ध्यानी आले असेल. '

महाड येथील प्राध्यापकांनी सांगितलेला हा वृत्तांत फार बोलका आहे. वृक्ष–वनस्पतींचा मानवी आरोग्य व सुखशांती यांच्याशी निकट संबंध आहे, हे रहस्य भारतीय संस्कृतीच्या प्रवर्तकांना निश्चितपणे ठाऊक होते. देव-धर्म, व्रत-वैकल्ये, सण–समारंभ यांच्या संदर्भात ज्या ज्या वृक्ष–वनस्पतींना धर्मात व संस्कृतीत महत्त्व दिले आहे, त्या सर्वांचा अभ्यास केल्यावर देवदेवतांच्या निमित्ताने ज्या ज्या वनस्पती पवित्र

व पूजनीय मानल्या गेल्या आहेत त्या सर्वांच्या मुळाशी त्यांच्यातील औषधी तत्त्व, उपयोगिता व कल्याणकारकता आहे असे स्पष्ट दिसून येते.

आमच्या देवदेवतांचा संबंध आकाशस्थ ग्रहांशी जोडला गेलेला आहे. किंबहुना त्या त्या देवता या त्या त्या विशिष्ट ग्रहांना दिलेली मूर्तिरूपे होत. रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी या ग्रहांची तत्त्वे व गुणधर्म ठरलेले आहेत. त्या त्या ग्रह-नक्षत्रांचे स्वामित्व कोणत्या वृक्षवनस्पतींवर, रत्नांवर व रंगांवर, वर्णमालेतील अक्षरांवर.व संगीतातील स्वरांवर असते हे शास्त्रसिद्ध आहे. म्हणूनच विशिष्ट देवतांना विशिष्ट वनस्पती व रंग प्रिय असतात. ही कल्पना रूढ झालेली आहे. उदाहरणार्थ, गणपती हे आकाशातल्या मंगळ ग्रहाचे रूप आहे. मंगळ हा पृथ्वीतत्त्वाचा ग्रह आहे. त्याचा रंग लाल असतो. मंगळ ग्रहाचा संबंध रक्ताशी, शौर्य-धैर्याशी असतो. मंगळ हा सेनापती आहे. गणपतीला लाल रंगच प्रिय असतो. जास्वंदी, कर्दळी यासारखी तांबड्या रंगाची फुलेच गणपतीला आवडतात. गणपतीला अत्यंत प्रिय असलेल्या दूर्वा मंगळाच्या स्वामित्वाखाली येतात. ' सहजे दूर्वेचा हिरू। अंगेचि तव अमरू ॥ ' असे दूर्वांचे वर्णन ज्ञानेश्वर महाराज करतात. दूर्वा ह्या रक्तवर्धक रक्तदोषनिवारक म्हणून प्रसिद्ध आहेत. दूर्वांचा रस अनेक प्रकारे व्याधिनिवारक ठरतो. दूर्वांच्या रससेवनाने दुःस्वप्ने पडण्याची थांबतात. एकूण गणपतीला दूर्वांचा लक्ष वाहणे या धार्मिक कल्पनेमागे वैद्यकाचा, ज्योतिषाचा व योगाचाही विचार आहे असे दिसून येते. ' त्वं मूलाधारः स्थितोऽसि नित्यं '-असे ॐ कारस्वरूप गणेशाचे अथर्वशीर्षांत वर्णन आहे. म्हणजे गणपतीचा योगाशी संबंध आलाच.

वैद्यकशास्त्रात दूर्वांचे गुण पुढीलप्रमाणे दिलेले आढळतात :- ( दूर्वांचेही नील दूर्वा, श्वेत दूर्वा, वल्ली दूर्वा व गंड दूर्वा असे मुख्य चार प्रकार आहेत. ) तुरट, मधुर, शीतल, तृप्तिकर आणि पित्त, तृषा, अरुची, वांती, दाह, मूर्छा, ग्रह-भूतबाधा, कफ, श्रम यांची नाशक आहे.

वड, पिंपळ, औदुंबर, बेल, शमी, लिंब, या वृक्षांना आणि तुळस, दूर्वा, रुई, मांदार, माका या वनस्पतींना विशेष महत्त्व व पावित्र्य धर्मविधींत व सांस्कृतिक आचारविचारांत दिले गेलेले आढळते. हे बहुतेक वृक्ष व वनस्पती अनेक प्रकारे आरोग्यदायक, सुख-समृद्धिकारक आहेत. म्हणूनच संस्कृतीच्या प्रवर्तकांनी त्यांना पूज्यता व पावित्र्य देऊन ठेवलेले आहे. देव-देवतांशी व धर्माशी ज्यांचा संबंध जोडला जातो त्या वस्तूंबद्दल माणूस स्वाभाविकच आदर व श्रद्धाभाव बाळगतो. हे आपल्या सुज्ञ पूर्वजांना चांगले माहीत होते. कालांतराने केवळ धार्मिक रूढी शिल्लक राहतात. प्रतीके पूजिली जातात, संकेत शिल्लक राहातात. पण त्यांच्या मागचे मूळ जीवनकल्याणाचे, समृद्धीचे रहस्य-विज्ञान लोप पावते, असा प्रकार दिसून येतो. काही प्रसिद्ध वृक्ष-वनस्पतींच्या पावित्र्यामागच्या रहस्यांच्या विज्ञानाचा शोध घेणे उपकारक ठरेल.

त्या त्या देवदेवतांना प्रिय म्हणून काही वृक्ष-वनस्पतींना महत्त्व प्राप्त झाले; हा

एक विचार झाला. भारतीय संस्कृती सौंदर्याला पारखी नाही. सृष्टीशी माणसाचे जिव्हाळयाचे नाते आहे. किंबहुना पशुपक्षी, वृक्षवल्ली इतकेच नव्हे तर नाग-सापांसारख्या विषारी प्राण्यांनाही-भारतीय संस्कृती-ती सर्व ईश्वराचीच रूपे आहेत असे मानून त्यांच्याविषयी प्रेमभावना शिकवते. भारतीय संस्कृतीची ही उदात्तता निःसंशय अपूर्व आहे.

**बेल** :-बेल ही शंकराची वनस्पती मानली जाते. चंद्राचे रूप म्हणजेच शंकर ही देवता. बेलाचे-विशेषतः पानांचे-वैद्यकशास्त्रानुसार विशेष गुणधर्म पुढीलप्रमाणे :- बेलाची पाने वात, कफवात यांची नाशक आहेत. बेलाचे मूळ त्रिदोषनाशक, मूत्र कृच्छ्र व शूलनाशक आहे. बेलाची कोवळी फळे, अग्निदीपक शूल, वात, कफ-नाशक आहेत. पिकलेले फळ त्रिदोषनाशक आहे.

बेलासंबंधी शोध घेता घेता एका प्रसिद्ध प्राचीन वैदिक सूक्तात ऋचा आढळली. हे प्राचीन वैदिक सूक्त 'श्री-सूक्त' या नावाने प्रसिद्ध आहे. श्री-सिद्धीसाठी या सूक्ताची लक्ष पारायणे देखील केली जातात. मात्र अशा सूक्तात काय सांगितले आहे याचा विचार व अभ्यास करण्याकडे, 'साकांक्ष आराधने' व 'भोगासाठी भजने' अशी वृत्ती असलेल्या आमचे लक्ष क्वचितच असते. या प्रसिद्ध श्री-सूक्तात एक ऋचा पुढीलप्रमाणे आहे—

ॐ आदित्यवर्णे तपसोऽधिजातो-वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः
तस्य फलानि तपसा नुदन्तु-मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मीः ॥

या ऋचेत बेलाला, 'लक्ष्मीचा वृक्ष' संबोधले आहे. बेलाला 'लक्ष्मीचा वृक्ष' म्हणायचे कारण काय याचा शोध घेणे अगत्याचे आहे. काही जाणकारांना यासंबंधी मी पृच्छा केली; पण समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तंत्र-शास्त्र-प्रवीण अशा एका महाभागाने या ऋचेचा संबंध किमयेशी असल्याचे सांगितले. संकेताने या श्री-सूक्तात किमयेची प्रक्रिया वर्णन केलेली आहे, असे त्याचे म्हणणे पडले. मीमांसातीर्थ पंडित किंजवडेकरशास्त्री यांनी आपल्या श्रीसूक्त ( सान्वयार्थ विवरण ) या ग्रंथात या ऋचेचा दिलेला अन्वयार्थ पाहिला. पूर्ण समाधान झाले नाही. त्यांचे स्पष्टीकरण काव्यपूर्ण व वाचनीय मात्र वाटले.

बेल हा शंकराला प्रिय आहे. शंकराने विषही पचविले होते. बेलातील औषधी गुणधर्म लक्षात घेता बेलामध्ये विषहरण करण्याचे सामर्थ्य असावे असे वाटते. एका बंगाली संशोधकाने बेलाच्या संदर्भात केलेले एक विधान विचार करण्यासारखे वाटले म्हणून मुद्दाम देत आहे. तो म्हणतो, बेलाच्या झाडाला फूल येण्यापूर्वी ( Before the Bel tree flowers ) त्याची कांडी काढून ठेवावी. अशी कांडी जवळ असल्यावर कसलाही विषारी साप किंवा नाग त्या कांडीच्या स्पर्शाने फणा खाली टाकतो. हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. बेल हा अनेक प्रकारे विषहारक व आरोग्यदायक आहे याचा मात्र प्रत्यय येतो.

कै. हरिभाऊ पाटसकर यांनी या संदर्भांत मला मुद्दाम सांगितलेली एक कथा विचार करण्यासारखी व बेल वनस्पतीच्या गुणधर्मावर प्रकाश टाकणारी आहे म्हणून ती मुद्दाम सांगतो. कै. हरिभाऊ पाटसकर हे त्यावेळी मध्यप्रदेशाचे राज्यपाल होते. भोपाळ-जवळच्या एका अरण्यात एक साधू केवळ बेलाच्या पानांच्या आहारावर राहातो असे त्यांना समजले. त्यांचे कुतूहल जागृत झाले आणि एके दिवशी ते त्या साधूच्या दर्शनास गेले. साधूने त्यांचे यथोचित स्वागत केले. साधूशी झालेल्या संभाषणात हरिभाऊंनी ‘ आपण केवळ बेलाच्या पानांचाच आहार घेता यात काही विशेष रहस्य आहे का ? ’ असे विचारले. त्यावर तो सत्पुरुष उत्तरला, ‘ म्हटले तर आहे. या अरण्यात माझे गुरु राहात असत. त्यांची योग्यता फार मोठी होती. एकदा त्यांचे दर्शन करून मी परत निघालो असता वाटेत मला एका विषारी सर्पाने दंश केला. आश्रमापासून जवळच हा प्रकार घडल्यामुळे माझ्या गुरूंनी मला आश्रमात परत आणून माझ्यावर उपचार केला. तो उपचार बेलाच्या पानांचाच होता. गुरूंनी बेलाच्या पानाचे ते औषध मंत्रून दिले असण्याचा संभव आहे. त्या उपचाराने माझा मृत्यू टळला.

‘ उपचार झाला नसता तर विषबाधेने मी आयष्याला मुकलोच असतो. तेव्हा माझे जीवन संपलेच आहे, अशी कल्पना करून मी पुन्हा लौकिक जगात परत गेलोच नाही. गुरूच्या पायापाशीच राहिलो. ज्या बिल्वदलांनी मला जीवदान दिले, त्या बेलाच्या पानांचाच आहार तेव्हापासून घेऊ लागलो. मला अन्नाची आवश्यकताच वाटेनाशी झाली. माझे सद्गुरू समाधिस्थ झाल्यावर त्यांच्याच आश्रमात त्यांचे स्मरण करीत मी माझी साधना चालू ठेवली आहे. ’

बेलाचे सामर्थ्य सांगणारी ही कथा कोणालाही वेधक व उद्बोधक वाटेल.

बेलाच्या संदर्भात पंडित रामकृष्ण नारायण केळकर या नावाच्या एका ज्योतिष-तज्ज्ञ विचारकाने पुढील उद्गार काढले आहेत, ‘ बेल ही वनस्पती दाहनाशक व शांतपणा आणणारी आहे. मस्तकास ताण पडून वेडेपणा आल्यास डोकीवर बेलाच्या पानांचा कवळ घालतात. ’

पुण्याचे महर्षी अण्णासाहेब पटवर्धन हे धन्वंतरी होते. त्यांचे काढे रामबाण असत. ते देत असत त्या वेगवेगळया रोगांवरील काढयांचे पाठ उपलब्ध झालेले आहेत. त्यात बेल व तुळस या दोन वनस्पतींचा अभाव असलेला एकही काढयाचा पाठ आढळत नाही. बेल व तुळस या वनस्पतींची ही बोलकी गुणप्रशंसा आहे.

देवाचे तीर्थ आपण पवित्र मानतो. हे तीर्थ पूजेसाठी वापरण्यात येणाऱ्या ज्या द्रव्यांपासून बनते ती सर्व पूजाद्रव्ये औषधी व आरोग्यप्रद अशीच योजिलेली आढळतात. बेल व तुळस यांचाही त्यात समावेश असतो.

अलीकडे रक्तदाब व मधुमेह या व्याधीचा आढळ विशेष प्रमाणात होतो. संघर्षमय धावपळीच्या यांत्रिक जीवनाचा व त्यामुळे मानवी देहमनावर पडणाऱ्या ताणाचा तो अटळ परिपाक आहे. या दोन्ही व्याधी असणाऱ्यांना बेलाच्या पानांचा एक

उपाय लाभप्रद आढळून आलेला आहे. बेलाची काही त्रिदळे पाण्याने भरलेल्या तांब्याच्या कळशीत किंवा गडव्यात रात्री टाकून ठेवावी. घरात शंकराची उपासना असेल तर निर्माल्यातील त्रिदळे अधिक उत्तम. बेलाची पाने टाकून ठेवलेल्या तांब्याच्या कळशीतील ते पाणी दुसरे दिवशी दिवसभर पिण्यासाठी वापरावे. इतर औषधे चालू असतील त्याच्या जोडीला हा पूरक उपाय रोगोपशमनाच्या कामी सहाय्यभूत होतो असा अनुभव आहे.

विशिष्ट नक्षत्रावर विशिष्ट ऋतूत वनस्पती लावल्यास किंवा तोडल्यास त्यांच्यातले औषधी सामर्थ्य व गुणकारिता विशेष स्वरूपात प्रत्ययास येते असे दिसून येते. डामरतंत्र नावाच्या तंत्र–विभागात मंत्रयुक्त औषधींचा विचार केलेला आढळतो.

काही जुन्या बाडांतून प्रभावी वनस्पतींची औषधे व त्यांचे खास उपयोग सांगितलेले आढळतात. बेलासंबंधीचे असे दोन उपाय पुढे देत आहे. प्रयोग करून अनुभव घेतला पाहिजे. १ ) स्त्री बाहेरची बसल्यापासून चवथ्या दिवशी अश्विनी नक्षत्रावर ( चवथ्या दिवशी नेमके अश्विनी नक्षत्र येणे हा योग जमला पाहिजे ) बेलाच्या झाडावर उगवलेले बांडगूळ उजव्या हाताने तोडावे. त्यावर ' ऱ्हीं ' या बीजाचे अभिमंत्रण करावे. ( मंत्र किती वेळा म्हणावा हे दिलेले नाही. ) अभिमंत्रित बांडगूळ गाईच्या दुधात उगाळून ते मिश्रण अपत्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या त्या स्त्रीस एक सप्तक पिण्यास द्यावे. निश्चयाने गर्भ राहील.

२ ) बेलावर असलेल्या बांडगुळाची पाच पाने मृग नक्षत्रावर विधिपूर्वक आणावीत. त्यांपैकी अडीच पाने घेऊन त्यावर गोरोचनाने ' श्रीराम ' अशी अक्षरे लिहून ती पाने जपून ठेवावीत. नंतर संतती होत नसलेल्या स्त्रीस ऋतुस्नात झाल्यावर चवथ्या दिवसापासून तीन दिवस ती पाने खाण्यास द्यावीत. म्हणजे निश्चयाने संतती होईल.

**तुळस** :—भारतीय संस्कृतीत तुळशीला देवता मानलेले आहे. तुळस विष्णूला प्रिय आहे. प्रत्येक घराच्या अंगणात तुळशीवृंदावन असावे असा दंडकच आहे. भारतीय स्त्री तुळशीची पूजा भक्तिभावाने करते. देवपूजेतही तुळशीला महत्त्व आहे. देवाला तुळशी वाहतात. सत्यनारायणाच्या प्रसादात तुळशीची पाने टाकतात. तसेच मृत माणसाच्या मुखातही शेवटी तुळशीचे पानच घालतात. तुळशीला ही जी पूज्यता व पावित्र्य प्राप्त झाले आहे त्याचे कारण तुळस ही अनेक प्रकारे मानवी जीवनाला व आरोग्याला कल्याणप्रद आहे हेच होय.

प्राणशक्तीच्या पलीकडेही ज्यांचे सामर्थ्य आहे अशा संपन्न जीवनद्रव्यांचा उत्सर्ग तुळस सतत करीत असते. इंग्रजीत ज्यांना Negative–ions म्हणतात त्यांचा उपकारक उत्सर्ग हे तुळस या वनस्पतीचे वैशिष्टय आहे. दूर्वा या रक्तवर्धक असतात; तर तुळस ही रक्तस्राव बंद करण्याच्या कामी उपयुक्त ठरते.

ज्ञानदेव-तुकारामांच्या पालखीबरोबर जाणाऱ्या भोळ्या भाविक वारकरी स्त्रिया पालखीबरोबरच्या प्रवासात आपल्या डोक्यावर छोटेसे तुळशीवृंदावनच वागवितात.

त्यांच्या गळयातही तुळशीमाळा असते. या संदर्भात नुकतेच घडलेले एक वृत्त सांगण्यासारखे आहे. पालखी पाहण्यासाठी काही प्रबुद्ध पदवीधर भारतीय महिला परदेशी विदुषींसह उपस्थित होत्या. डोक्यावर तुळशीवृंदावने घेतलेल्या वारीतील वारकरी स्त्रियांना पाहून त्यांची आपसात चर्चा चालू होती. अशा प्रकारे डोक्यावर तुळस घेऊन प्रवास करणे हा त्यांच्या मताने श्रद्धेच्या पोटी निर्माण झालेला खुळेपणाचा भाग होता. पण वस्तुतः चर्चा करणाऱ्या सुशिक्षित महिलांचा हा समज हाच खुळेपणा होता. पण त्याची त्यांना जाणीव नव्हती. आळंदीपासून पंढरपूरपर्यंतचा दूरवरचा प्रवास करताना डोक्यावर तुळस घेण्याची ही पारंपरिक पद्धत त्या भाविक स्त्रिया का पाळतात याचे रहस्य शाळा–कॉलेजांतल्या शिक्षणाने समजणारे नाही. अनेक गावे, अनेक प्रकारची हवा, अनेक प्रकारचे अन्न व पाणी, पायाने प्रवास करणाऱ्या यात्रेतील या लोकांच्या वाटयास येते. ज्या काळी आजच्यासारखी रोगप्रतिबंधक औषधे टोचण्याची पद्धत नव्हती त्या काळी भोवतालची हवा शुद्ध ठेवून रोगजंतूंचे निवारण करण्याचे महत्त्वाचे काम वारकऱ्यांच्या डोक्यावरची ही तुळस करीत असते हे रहस्य ठाऊक झाल्यावर डोक्यावर तुळस वाहण्याची वारीतील प्रथा हा खुळेपणा नसून रोगप्रतिबंधक असा हातचा अचूक उपाय आहे; म्हणजेच दूरदर्शी शहाणपणा आहे; हे सहज लक्षात येईल.

तुळशीची देवता म्हणून पूजा करणे ही अंधश्रद्धा–खुळेपणा मानणाऱ्या नव्या पिढीच्या सुशिक्षितांना तुळशीच्या मागचे हे वैज्ञानिक रहस्य ठाऊक नसते. नव्या पिढीच्या मंडळींना आपल्या नवसौंदर्यवादी अद्ययावत वास्तुशिल्पात सनातनी तुळशीवृंदावनाचा अंतर्भाव स्वाभाविकच सौंदर्यविघातक वाटतो. पण 'तुळशीवृंदावन' घरात असलेच पाहिजे असा नियम संस्कृतीने का केला याचे ज्ञान आम्हांला असत नाही. ते सध्या अमेरिकेतील संशोधकांच्या अभ्यासाचा विषय झाले आहे याची अमेरिकेतूनच शिकून आलेल्या आमच्या नव्या पिढीच्या नवसौंदर्यवाद्यांना माहिती नसते. संघर्षमय व अशांतिमय यांत्रिक जीवन आणि अणुस्फोटामुळे होणाऱ्या दूषित हवेचे परिणाम दूर करण्यासाठी अमेरिकेत जे उपाय शोधले व योजले जात आहेत त्यांत हवाशुद्धीसाठी कृष्णतुळशीची लागवड करण्याची मोहीम हा अमोघ उपाय प्रत्ययास येत आहे व लोकप्रिय ठरत आहे.

नुसती तुळसच नव्हे तर तुळशीतील मातीही अत्यंत औषधी गुणकारी असते. गांधीलमाशी किंवा विंचू यांचा दंश झाल्यास त्यावर तुळशीतील मातीचा लेप दिल्यास तो वेदना हरण करणारा ठरतो. त्वचारोगावरही तुळशीचा चांगला उपयोग होतो. आयुर्वेदातही तुळस ही अनेक प्रकारे औषधी म्हणून प्रशंसिली आहे. तुळशीविषयी वैद्यकशास्त्र पुढील माहिती देते :—तुळस तिखट, कडू, उष्ण, रुचिकर, वात, कफवात, जंतू, कृमी यांची नाशक आहे. विष (लूतादिकांचे) आणि भूतबाधा यांचीही ती नाशक आहे. अग्नि–दीपक, हृद्य, कुष्ठ, कफ, रक्तदोष, मूत्रकृच्छ्र हे रोग व दोष दूर करणारी आहे.

सुदैवाने तुळशीबद्दल पुष्कळसे संशोधन झाले आहे–आणखी होत आहे.

तुळशीच्या संदर्भात एका अध्यात्मसंपन्न अधिकारी सज्जनाने एक महत्त्वपूर्ण रहस्य सांगितले. नैवेद्य किंवा कुठल्याही पदार्थावर तुळशीची दळे टाकून तो शुद्ध केला जातो. ज्या पदार्थांवर तुळस टाकून त्यांची शुद्धी केली जाते. त्या पदार्थांना अवती-भवती वासना देहाने वावरणारे भूचर-खेचरादि मानवेतर कोटीतील जीव स्पर्श करण्याचे धारिष्ट्य करू शकत नाहीत. म्हणून देवाच्या नैवेद्यावर तत्काळ तुळशीपत्र टाकून या अशा जीवांपासून त्याचे रक्षण केले जाते.

**शमी :**—शमी वृक्षाचा देवपूजेत अंतर्भाव नाही. पण या वृक्षाला सांस्कृतिक दृष्ट्या अनन्य महत्त्व आहे. भारतीय सण-समारंभात अनेक रूढी परंपरेने चालत आल्या आहेत. पण त्यामागे जीवनकल्याणाची, जीवनसमृद्धीची काय निश्चित बैठक आहे याचे ज्ञान आपल्याला नाही. शमीच्याच संदर्भात नुकतीच घडलेली एक घटना सांगण्यासारखी आहे.

ता. २६ ऑगस्ट १९७१ या दिवशी गणेशोत्सवात अहमदनगर येथे माझे व्याख्यान होते. दिल्ली दरवाजाजवळ असलेल्या ‘शमी विघ्नेशा’ पुढे हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या ‘शमी विघ्नेशा’ चा इतिहास कानी आला तो असा-या जागी असलेला शमीचा वृक्ष दोन शतकांइतका जुना व वडील आहे. आजही त्या वृक्षाचा वैभव-विस्तार प्रेक्षणीय आहे. या प्राचीन पवित्र वृक्षराजाखाली श्रीगणेशाची आकृती निर्माण झाली. जुन्या शमी वृक्षाखाली अशा प्रकारचा श्रीगणेशाचा आविर्भाव होणे हे अत्यंत शुभ मानले जाते. या चमत्कारामुळे त्या वृक्षाचे व स्थानाचे माहात्म्य इतके वाढले की भाविक भक्तांची तेथे रीघ लागू लागली. त्या ठिकाणी मंदिर निर्माण झाले. संस्थान स्थापन झाले. पूजा-अर्चा, भजन-पूजन, आरत्या-धूपारत्या झडू लागल्या. पण ज्या शमीच्या वृक्षामुळे हा चमत्कार घडून आला त्या शमी वृक्षाला एवढे महत्त्व मिळण्याचे कारण काय हा विचार कोणाला सुचला नाही किंवा शमीच्या झाडामागे कोणते विज्ञान-रहस्य आहे याचे संशोधन करावे अशी कल्पना कोणालाच स्फुरली नाही.

हाच विचाराचा प्रमुख धागा घेऊन माझ्या व्याख्यानात काही विचार मी तेथील श्रेष्ठ समाजापुढे ठेवले. शमी या वृक्षाचे महत्त्व भारतीयांच्या ‘विजयादशमी’ या सणाशी संलग्न आहे. विजयादशमीच्या सणाच्या दिवशी सीमोल्लंघन व शमीपूजन हे मुख्य विधी सांगितले आहेत. विजयादशमीच्या वेळी शरद ऋतूचे साम्राज्य असते. ‘ऋतु बरवा शारदु’ हे ज्ञानेश्वरांचे प्रशस्तिपत्र लाभलेल्या या श्रीमंत शरदकालात सृष्टी प्रसन्न असते. वर्षाकाल ओसरत आलेला असतो. शेतकरी, शिवाराच्या समृद्धीने संपन्न व संतुष्ट असतो. विश्वमोहिनी शारदेने वनशोभेच्या खाणी उघडलेल्या असतात. असा हा सुखाचा, सौंदर्याचा, सौभाग्याचा सु-काळ असतो.

विजयादशमीच्या वेळी ग्रहनक्षत्रांचे असे काही योग असतात की त्यावेळी पराक्रमी व प्रयत्नशील पुरुषांनी काही विशेष पूजन-अर्चनविधी अवलंबिले तर ते परमकल्याणाचे सुवर्णफल पदरात टाकतात. शेतीचा विकास, त्यातून धनवैभवाचे वैपुल्य व ते लाभल्यावर

स्वाभाविकच जेथे जाऊ तेथे विजयलाभ अशी चढत्यावाढत्या श्रेणीची उन्नती हेच प्रगतिशीलांचे ध्येय असणार. ते ध्येय निश्चितपणे साध्य होण्यासाठी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आपल्या सुज्ञ पूर्वजांनी ' अपराजिता ' नावाच्या देवीचे पूजन सांगितले. हे पूजन दशमीच्या दिवशी दुपारनंतर ( अपराण्ह काली ) पुरुषांनी ईशान्य दिशेस जाऊन यथाविधी करावयाचे असते. ती देवी विजय देते आणि तिच्या कृपेमुळे तो विजय एक सारखा चढता–वाढता व टिकाऊ असतो.

यावेळी शमीवृक्षाचे पूजन करावयाचे असते. पूजनानंतर त्या वृक्षाच्या मुळाशी असलेली ओलसर माती पूजेतील अक्षतांसह घ्यावी व ती वाजत गाजत घरी आणावी, अशी प्रथा आहे. शमी–पूजनाच्या वेळी म्हणावयाचा मंत्र पुढीलप्रमाणे आहे :

अमंगलानाम् शमनीम् । शमनीम् दुष्कृतस्य च ।
दुःस्वप्ननाशिनीम् धन्याम् । प्रपद्येऽहं शमीम् शुभाम् ॥

वाईट कृत्यांची फळे नाहीशी करणाऱ्या, अमंगळाचा नाश करणाऱ्या व वाईट-साईट स्वप्नांचा नायनाट करणाऱ्या शुभंकर शमीला मी शरण आलो आहे.

' शमी शमयते पापं, शमी लोहितकंटका' ॥ असेही एक वचन आहे. विजयादशमी-सारख्या सणाच्या दिवशी शमीचेच पूजन पूर्वाचार्यांनी का सांगितले आहे ? विजया-दशमीच्या दिवशी सोने लुटण्याचा सोहळा आपण सहस्रावधी वर्षे पाळीत आलो आहोत. सोन्याचा व शमीचा काही संबंध आहे का ? अवश्यच असला पाहिजे. शमीखालच्या मातीत देखील मांगल्य असते. त्या अर्थी शमी वृक्ष हा खरोखरीच ' विशेष ' वृक्ष असला पाहिजे. वर्षानुवर्षे खोटे सोने लुटण्याचा समारंभ आम्ही श्रद्धाभक्तीने न चुकता साजरा करतो. पण शमी वृक्षाचे या दृष्टीने काही संशोधन–पृथक्करण करावे असे मात्र आम्हास वाटत नाही. असा प्रयत्न झाल्याचे ऐकिवात नाही. पण तसा तो केला जाण्याची नितांत आवश्यकता आहे. शमी–पूजनाच्या, सोने लुटण्याच्या व्रतामागे फार मोठा इतिहास व परंपरा आहे. ती लक्षपूर्वक अभ्यासून शमी वृक्षामागची शास्त्रीय रहस्ये अवश्य संशो-धिली गेली पाहिजेत.

शमीपूजन व सोने लुटणे या विजयादशमीच्या दिवशीच्या दोन्ही प्रमुख प्रथांचा उगम एका प्राचीन कथेत आहे. त्या कथेचा सारांश असा—

' श्री रघुराजाने ' विश्वजित ' यज्ञ केला. विश्वजित यज्ञाचे मुख्य प्रयोजन असे की, ज्या सम्राटाने समुद्रवलयांकित पृथ्वी जिंकून आपला पराक्रम व सार्वभौमत्व सिद्ध केले आहे त्याने आपल्या सर्वस्वाचे दान या यज्ञात करून धन्य व्हावयाचे असते. या कल्पनेची भव्यता व उदात्तता ध्यानी घेण्यासारखी आहे. आधी पराक्रमाने सर्व जिंकावयाचे आणि मग ते सर्व निर्लोभ औदार्याने दान करून टाकावयाचे ! विश्वजित यज्ञाची सांगता करून रघुराजा धन्य झाल्यावर त्याच्याकडे एके दिवशी एक श्रेष्ठ तेजस्वी व ज्ञानसंपन्न असा याचक आला, त्याचे नाव कौत्स. वरतंतू नावाच्या महान ऋषीचा तो शिष्य. ज्या गुरूच्या

कृपेने आपल्याला चौदा विद्या प्राप्त झाल्या त्याचे ऋण चौदा कोटी सुवर्णमुद्रांची दक्षिणा देऊन फेडावयाचे हा त्या शिष्योत्तमाचा संकल्प होता. दान मागण्यासाठी तो ज्याच्याकडे आला होता तो नृपश्रेष्ठही ' उदारांचा राजा ' होता. पण वेळ नेमकी अशी होती की दान देण्यास त्याच्याजवळ काही शिल्लकच उरले नव्हते. रघुराजाने कौत्साचे स्वागत केले होते तेही मृत्तिकेच्या पात्रात त्याला जलपान देऊन. कौत्स सुज्ञ होता, समजूतदार होता. रघुराजाची अगतिकता पाहून योग्य तो आशीर्वाद देऊन तो परत जाऊ लागला. पण रघुराजाचे राजरक्त उसळून आले. श्रेष्ठ व विद्वान याचकाने त्याच्या दारातून विन्मुख जाणे हे रघुकुलाच्या ब्रीदाला साजेसे नव्हते. रघुराजाने कौत्साला जाऊ दिले नाही. त्याच्याजवळ दान देण्यास काही शिल्लक नसले तरी त्याचे महापराक्रमी बाहू अद्याप त्याला सोडून गेलेले नव्हते. त्या बाहूंच्या बळावर कौत्साची इच्छा पूर्ण करण्याचे त्याने ठरवले. पृथ्वी आधीच जिंकून झाली होती; पण स्वर्ग जाग्यावर होता आणि त्यावर स्वारी करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी होते. इंद्र व कुबेर हे त्याचे मांडलिक होते. आज्ञा करण्याचा अवकाश की त्यांनी हवे तेवढे धन रघुराजापुढे ओतले असते. पण दानासाठी लागणारे धन पराक्रमानेच मिळविलेले असले पाहिजे यावर रघुराजाचा कटाक्ष होता. म्हणून त्याने सरळ स्वर्गावरच स्वारी केली. त्याच्या पराक्रमाची झेप स्वर्गापर्यंत आलेली पाहताच स्वर्गस्थ देव भयभीत झाले. त्यांनी स्वर्गातून सुवर्णमुद्रांचा प्रचंड वर्षाव आरंभिला. तो पृथ्वीवरील एका शमीच्या झाडावर पडला. रघुराजाने सुवर्णाचा तो पर्जन्य पाहिला. चौदा कोटींहून कितीतरी अधिक धनराशीचा स्वर्गातून भूमीवर-भूमीवरील एका शमीवर-वर्षाव झाला होता. शिष्यवर कौत्स हाही असा निर्लोभी की त्याने आपल्या संकल्पित दक्षिणेपेक्षा सुवर्णाचा एक कणही अधिक स्वीकारण्यास नकार दिला. तेव्हा रघुराजाने आपल्या प्रजाजनांना पाचारण केले आणि स्वर्गातून सांडलेल्या त्या सुवर्णाच्या राशी प्रजाजनांकडून लुटविल्या. हा प्रकार घडला तो दिवस आश्विन शुद्ध दशमीचा होता. त्या प्रसंगाची सोनेरी स्मृती विजयादशमीच्या सोने लुट-ण्याच्या प्रथेने, संस्कृतीने चिरंजीव केली आहे !

या पौराणिक कथेमागचे रहस्य, सांकेतिकता व सूचकता उलगडून पाहिली तर भारतीय सांस्कृतिक मूल्याचे एक भांडार अनावृत होण्याचा निश्चयाने संभव आहे. देवांनी सुवर्णाचा वर्षाव शमी वृक्षावरच करावा या संकेतामागे, निसर्गाचे, वनस्पति-सृष्टीचे एखादे रहस्य लपलेले असले पाहिजे. या रहस्याचा नव्या पिढीच्या संशोधकांनी शोध घेण्याचे ठरविले तर ते एक अभिनव ' सीमोल्लंघन 'च ठरेल.

शमी वृक्षासंबंधी पुढील काही महत्त्वाच्या गोष्टी अवश्य विचारात घ्याव्यात अशा आहेत. शमी वृक्षाच्या समिधा यज्ञासाठी इष्ट मानल्या जातात. यज्ञप्रसंगी शमीच्या कांड्या एकमेकावर घासून अग्नी उत्पन्न केला जात असे. शमीचा व शस्त्रास्त्रांचा काही तरी विशेष संबंध असला पाहिजे. अज्ञातवासात जाताना पांडवांनी आपली शस्त्रास्त्रे याच शमीच्या झाडावर ठेवल्याचे पुराणात वर्णन आहे. शमीचेच झाड त्यांनी त्यासाठी का

निवडले याचे गूढही शोधले गेले पाहिजे.

ज्या ठिकाणी शमी वृक्ष दुर्मिळ असेल तेथे शमीचे स्थान अश्मंतक किंवा आपट्याच्या झाडाला दिले गेलेले आहे. आपल्याकडे शमीपेक्षा आपटापूजनाची व सोने म्हणून आपट्याची पाने लुटण्याचीच पद्धत रूढ आहे. आपट्याच्या झाडाच्या पूजनाच्या वेळी पुढील मंत्र म्हटला जातो :—

अश्मन्तक महावृक्ष महादोषनिवारण ।
इष्टानाम् दर्शनम् देहि शत्रूणां च निवारय ।

शमीच्या ऐवजी पर्यायी म्हणून सांगितलेल्या या झाडातही शमीसारखेच काही विशेष सामर्थ्य साठवलेले असले पाहिजे हे उघड आहे.

आयुर्वेदात शमीचे गुणधर्म पुढीलप्रमाणे दिले आहेत :—

शमी–रुक्ष, तुरट, रक्तपित्त व अतिसार यांची नाशक आहे. शीतल, लघु, रेचक, कफ, कुष्ठ, मूळव्याध, श्वास, कांस, कृमी, भ्रम यांची नाशक आहे.

आपटा वनस्पतीचे औषधी गुण–मधुर, शीतल, पित्त, प्रमेह, दाह, विषमज्वर, विष, वांती, भूतबाधा आणि शस्त्र–व्रण–नाशक आहे.

**कडुनिंब** :—कडुनिंबाला देवपूजेत स्थान नाही. पण संस्कृतीने कडुनिंबाचे औषधी गुण ओळखून नववर्षाच्या पहिल्याच दिवशी त्याला अत्यंत महत्त्व दिले आहे. वर्षप्रतिपदेच्या दिवशी हर्षचिन्ह म्हणून गुढी उभारण्याची प्रथा आहे. नवसंवत्सराच्या प्रारंभदिनीच गुढी उभारताना सर्वप्रथम कडुनिंबाचा पाला खाऊन मगच दिनक्रमाला आरंभ करावयाचा अशी धार्मिक रीत परंपरेने चालत आलेली आहे. आनंदोत्सवाचा आरंभ जिभेला अप्रिय अशा कडुनिंबाच्या भक्षणाने करावयाचा या सकृत् दर्शनी चमत्कारिक वाटणाऱ्या आचारामागे निश्चितपणे शास्त्रीय दृष्टिकोन आहे. प्रत्येक भारतीय आचार–विचारात आरोग्य म्हणजेच वैद्यक, योग व ज्योतिष यांचा विचार केलेला असतो. हे यापूर्वी आपण पाहिलेच आहे. कडुनिंब हा अत्यंत औषधी वृक्ष आहे. एका तंत्रग्रंथात असा उल्लेख आढळतो की सूर्याने मेष राशीत प्रवेश केल्यावर ( साधारण १४ एप्रिल ते १३ मे या कालावधीत सूर्य मेष राशीत असतो. ) स्नान केल्यानंतर कडुनिंबाचे एक जरी पान चघळले तरी ते अमृतोपम असते. निंबाच्या झाडातील रोगप्रतिबंक गुण किंवा सामर्थ्य या काळात अधिक प्रभावी होते. निंबाच्या पानांची या काळातील ही वाढती अमृतमयता ध्यानी घेऊन वर्षाच्या पहिल्याच शुभ दिवशी निंबाच्या पाल्याचे भक्षण करण्याचा आचार आपल्या संस्कृतीने रूढ करून ठेवला आहे.

आजही पाडव्याच्या दिवशी घरातली आजीबाई नव्या पिढीच्या तरुण–तरुणींना निंबाचा पाला खावयास सांगते. पण या सांस्कृतिक आचारामागचे कल्याणप्रद विज्ञान ठाऊक नसल्यामुळे नव्या पिढीचे नवयुवक वैताग म्हणून निंबाच्या पाल्याबरोबरचा गूळ तेवढा खातात आणि कडू लागणारा पाला अज्ञानाने फेकून देतात. पण या कडूपणातली

अंतिम गोडी, या प्रथेमागचे सखोल शास्त्रीय रहस्य उलगडल्यावर त्यांना अवश्य कळेल आणि या अमृतपल्लवांचा अव्हेर करण्याचा अदूरदर्शीपणा ते खासच करणार नाहीत.

कडुनिंबाच्या झाडासंबंधी जुन्या बाडांत आढळलेले दोन प्रयोग किंवा तोडगे चमत्कारपूर्ण आहेत. पहिला तोडगा दारिद्र्यनिवारणासाठी आहे. तो असा :—ब्रह्मचर्य-व्रतपूर्वक राहून सूर्योदयापूर्वी शय्येवरून उठताच कोणाशी न बोलता कडुलिंबाच्या झाडास नित्य मिठी मारावी. याप्रमाणे एक वर्षभर केले असता दारिद्र्य दूर जाऊन इष्टार्थ-प्राप्ती होते.

दुसरा तोडगा असा : एका लहान पिशवीत हरभरे भरून ती जुन्या निंबाच्या झाडाचे खोड कोरून त्यात ठेवावी. त्या भोकास त्या झाडाचे बूच बसवून ते चिखल लावून बंद करावे. सहा महिन्यांनंतर ती पिशवी त्या खोडातून काढावी. पिशवीतील डाळ रोज एक दाणा याप्रमाणे आठ दिवस सेवन करीत जावी. डाळ पचल्यास मग रोज एकेक सबंध हरभऱ्याचा दाणा खात जावा. असे तीन महिने न चुकता केल्यास सर्पादिकांची विषबाधा मुळीच होत नाही. तेलकट व आंबट वर्ज्य हे पथ्य पाळावे. सर्पविषावर लिंबाच्या पाल्याचा आणखी एक तोडगा खेडोपाडी प्रचलित असलेला आढळतो.

खेड्यात एखाद्या माणसास पान लागले म्हणजेच सर्पदंश झाला तर प्रथम त्यास मिरच्या अगर मीठ देतात. तिखट किंवा खारट न लागल्यास दंश झाला आहे असे समजून मग कडुनिंबाचा पाला कडू लागेपर्यंत खाण्यास देतात. कित्येक ठिकाणी विषबाधा झालेल्या माणसास निंबाच्या पाल्यात गुंडाळून त्यास बहिरोबाच्या देव-ळात नेतात.

कडुनिंबाच्या पाल्याची गुणकारकता ध्यानी घेऊनच स्त्रियांनी आणखी एक इष्ट प्रथा अजूनही टिकविलेली दिसून येते. बाळंतिणीच्या स्नानाकरिता पाणी ताप-विताना त्यात निंबाचे डहाळे घालतात. त्यामुळे अनेक रोगांचा प्रतिबंध शक्य होतो. बाळंतिणीच्या बऱ्याचशा रोगनिवारणासाठी निंब अत्यंत उपयोगी पडतो. म्हणून त्याला बाळंतनिंब असेच दुसरे नाव प्रचलित आहे. कडुनिंब अनेक रोगांवर रामबाण औषध म्हणून उपयोगी पडतो, पण महारोगावरही त्याचा उपयोग निश्चित होतो, हे त्याचे श्रेष्ठत्व आहे. महारोग व सर्व प्रकारचे कुष्ठ निवारण होण्यासाठी कडुनिंबाची अनेक औषधे प्रसिद्ध व प्रचलित आहेत.

कडुनिंबाची छाया उन्हाळ्यातच नव्हे तर नेहमीच थंड व उत्साहदायक असते. कडुनिंबाच्या छायेत केवढे सामर्थ्य आहे यावर प्रकाश टाकणारी एक दंतकथा अवश्य ऐकण्यासारखी आहे. घटना पेशवाईतील आहे. एका श्रीमंत गृहस्थास काही असाध्य व्याधी झाली. त्याने पुण्यातील एका प्रख्यात धन्वंतरींना प्रकृती दाखविली. वैद्यराजांनी नाडी पाहून निदान केले. त्या गृहस्थाच्या व्याधीचे स्वरूप असे होते की त्यासाठी दिल्लीस जाऊन एका निष्णात हकीमास प्रकृती दाखवण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्याप्रमाणे ते व्याधिग्रस्त धनिक गेले. त्या काळात दिल्ली खरोखरीच दूर होती

हकीमांची भेट झाली. पुण्याच्या भिषग्वर्यांचे पत्र वाचून हकीमसाहेबांनी त्या श्रीमान रुग्णाची कसून तपासणी केली. हकीमसाहेब गंभीरपणाने म्हणाले, 'आपली व्याधी हमखास बरी होईल. पण त्यासाठी एक जगावेगळी दवा मी तुम्हांला सांगणार आहे. ती केलीत की रोग खात्रीने हटलाच म्हणून समजा.' हकीम साहेबांनी उपाय सांगितला. तो खरोखरीच अगदी विचित्र जगावेगळा होता. हकीमसाहेब म्हणाले, 'मी आपल्याला चूर्ण, गोळ्या, वगैरे काहीही देणार नाही, आपण दिल्लीहून सरळ पुण्यास जाणे हेच औषध. पण दिल्लीपासून पुण्याचा प्रवास अशा रीतीने करावयाचा की, प्रत्येक दहा बारा मैलांवर मुक्काम ठोकावयाचा आणि तोही कडुलिंबाच्या झाडाखाली. अशी वाटचाल करीत पुणे गाठा आणि तेथे जाताच आपल्या वैद्यराजांना भेटून प्रकृती तपासून घ्या आणि ते काय म्हणतात ते मला कळवा.' हकीमसाहेबांची ती औषध योजना ऐकून ते गृहस्थ विस्मयात पडले. पण त्यांनी हकीमसाहेबांचा सल्ला मानला. त्यांनी सांगितलेला जगावेगळा उपचार काटेकोरपणे अंमलात आणला. पुण्यास पोहोचताच त्यांनी वैद्यराजांना गाठले. झालेला सर्व वृत्तान्त निवेदन केला. वैद्य महाराजांनी नाडी पाहिली. प्रकृती तपासली आणि त्यांनी हर्षोद्‌गार काढले, 'आपल्या रोगाचे संपूर्ण निवारण झाले आहे. आपण निश्चिंत व्हा. आणि उपाय लागू पडल्याचे हकीमसाहेबांना कळवून धन्यवाद द्या. पारितोषिक पाठवा.' केवळ लिंबाच्या झाडाखाली मुक्काम करीत राहिल्यामुळे असाध्य व्याधीही संपूर्ण बरी झाली इतके कडुलिंबाचे सामर्थ्य आहे, हा या दंतकथेचा गाभा आहे.

मागे बेलाच्या संदर्भात कै. पाटसकर यांच्या अनुभवाचा उल्लेख आला आहे. कडुलिंबाच्या पाल्याचा कसा उपयोग होतो यासंबंधी त्यांनी आपला अनुभव मला मुद्दाम सांगितला. कै. हरिभाऊंना मूळव्याधीचा उपद्रव होता. त्यासाठी रोज सकाळी दूध पिण्यापूर्वी निंबाची एक छोटी डहाळी काढून तिची पाने खाण्याचा सल्ला त्यांना कोणीतरी दिला होता. आरंभी लिंबाचे एक देखील पान चावून ते घशाखाली उतरविणे अशक्य होत होते. पण सवयीने तो उपाय हळूहळू त्यांच्या अंगवळणी पडला आणि सतत लिंबाचा पाला पोटात गेल्याने त्यांचा त्रास कमी झाला. पुढे पुढे लिंबाचा पाला खावयास मिळाला नाही तर दूधही त्यांना गोड लागेनासे झाले.

अगदी अलीकडे २१ मार्च १९७१ च्या रविवारच्या केसरीत डॉ. वा. ब. राहुडकर यांनी कडुनिंबाच्या बहुविध उपयुक्ततेवर प्रकाश टाकणारा एक संशोधनपर लेख प्रसिद्ध केला आहे. औषधी उपयोगाबरोबरच निंबामुळे जमिनीतही सुधारणा होते ही महत्त्वाची बाब त्या लेखात त्यांनी सांगितली आहे. कडुनिंबाचे हे महत्त्व ध्यानी घेऊनच संस्कृतात त्याला पारिभद्र म्हणजे कल्पवृक्ष असे म्हटले आहे.

**अश्वत्थ किंवा पिंपळ :—**अश्वत्थ किंवा पिंपळ हा वृक्ष हिंदुधर्मात अत्यंत पवित्र व पूज्य मानला जातो. सर्व वृक्षांत अश्वत्थ ही माझी विभूती आहे, असे श्रीभगवान गीतेत सांगतात. अशा या वृक्षश्रेष्ठ अश्वत्थाची सेवा करण्याची प्राचीन परंपरा आहे.

आज ती वेडगळ म्हणून नाहीशी होत चाललेली आहे. अश्वत्थाच्या उपासनेने अनेक असाध्य गोष्टीही साध्य होतात, असे शास्त्र सांगते व प्रत्यक्षात त्याचा प्रत्यय आल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत. अश्वत्थाचे एक स्तोत्र पुढे दिले आहे. ते स्तोत्र मनात म्हणत अश्वत्थाला १ लाख प्रदक्षिणा घातल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात. या साधनाने महापातकापासून देखील मुक्ती मिळते. रोगहरण व दारिद्र्यनिवारण यासाठीही ही उपासना हमखास उपयोगी पडते असे जाणत्यांचे सांगणे आहे. पिंपळाखाली एका ब्राह्मणास किंवा भुकेल्यास अन्नदान देणे हे अनेक ब्राह्मणांना–भोजन घातल्यासारखे आहे. पिंपळाखाली पुरुषसूक्ताचा पाठ केला तर तो विशेष फलदायक होतो. ब्रह्मचर्यपालन, भूमिशयन व हविष्यान्नभक्षण करून अश्वत्थोपासना करणारास निश्चयाने फलप्राप्ती होते. पिंपळाखाली केलेला यज्ञ, पूजाविधी व मंत्रजप शीघ्र फलदायी होतो.

मूलतो ब्रह्मरूपाय मध्यतो विष्णुरूपिणे
अग्रतः शिवरूपाय वृक्षराजाय ते नमः ।।
यं दृष्ट्वा मुच्यते रोगैः स्पृष्ट्वा पापैः प्रमुच्यते
यदाश्रयाच्चिरंजीवो तमश्वत्थं नमाम्यहम् ।।
अश्वत्थ सुमहाभाग सुभग प्रियदर्शन
इष्टकामांश्च मे देही शत्रुभ्यस्तु पराभवम् ।।
आयुः प्रजा धनं धान्यं सौभाग्यं सर्वसंपदम्
देहि देव महावृक्ष त्वामहं शरणं गतः ।।

अश्वत्थाची प्रार्थना अगर स्तोत्र वरीलप्रमाणे आहे. अर्थ समजण्यास सोपा आहे म्हणून दिला नाही.

अश्वत्थाच्या पायाशी संधिकालात तुपाचा दिवा लावण्याची रीत आहे. असा दीप लावण्याचा नियम काही विशिष्ट कालावधीपर्यंत पाळल्यास त्यामुळे पुत्रप्राप्ती होते असा समज व अनुभव आहे.

संधिकालात हा वृक्षराज काही विशेष द्रव्यांचा उत्सर्ग करीत असतो. ती द्रव्ये कोणती आणि त्यांचा निश्चितपणे काय उपयोग होतो याचे संशोधन होणे अगत्याचे आहे.

मध्यंतरी मी मध्यप्रदेशात गेलो होतो. देवास येथे माझे वास्तव्य होते. मी राहात होतो त्या घराच्या समोरच्या विस्तृत पटांगणात दोन छायाळ व डौलदार व जुने पिंपळ होते. त्यांच्या सळसळणाऱ्या पानांवर मावळत्या सूर्याची किरणे पडून एक विलक्षण शोभा दिसे. सूर्यास्तानंतर त्या वृक्षाच्या पायथ्याशी ढोलीत कोणीतरी दिवा लावून जाई. कितीही जोराचा वारा आला तरी दिवा विझत नसे. त्या मंद स्निग्ध प्रकाशाकडे मी टक लावून पाहात बसे. त्या झाडांबद्दल चौकशी करता ती एका मुसलमानाने लावलेली असून तिथे तो दीपही एक मुसलमान कुटुंब लावते असे कळल्यावर माझ्या आश्चर्याला पारावर उरला नाही.

झाडपाल्याच्या औषधी गुणांचा एक चमत्कार मी 'शांताचिया घरा' या माझ्या ग्रंथात दिला आहे. ( पाहा पान ६६-६७. )

**वटवृक्ष :**—वटवृक्षाला त्याच्या पावित्र्यापेक्षा त्याची विशालता, छायाळपणा व उपयुक्तता यामुळे आदराचे व मानाचे स्थान दिले गेले आहे.

या वृक्षराजाशी एक महत्त्वाचा सांस्कृतिक आचार संलग्न आहे. प्रतिवर्षी ज्येष्ठ मासात वटसावित्रीचे व्रत पाळले जाते. सत्यवान सावित्रीची पुराणकथा सर्वश्रुत प्रिय व मान्य आहे. सावित्रीची सौभाग्यस्मृती म्हणून या व्रत-समारंभाच्या वेळी वटवृक्षाची पूजा भक्तिभावाने केली जाते. सहस्रावधी वर्षे हे व्रत अव्याहतपणे स्त्रियांनी टिकविले आहे. परंपरेने चालत आलेल्या या व्रताचे वेळी या दीर्घकाय वृक्षाची पूजा करताना त्याच्याभोवती सूत गुंडाळण्याची पद्धत आहे. विराट असूनही वर्षानुवर्षे सतत गुंडाळल्या जाणाऱ्या या दोऱ्याने कित्येक वड झिजलेले आढळतील. एखादी अत्याधुनिक सावित्री ही पारंपरिक पूजा करीत असताना त्याच वेळी पतिदेवाविरुद्ध केलेल्या तिच्या घटस्फोटाचा खटला न्यायालयात चालू असतो. जन्मोजन्मी तर राहोच पण पुढच्या वर्षी देखील विद्यमान पती नको असे वाटणाऱ्या भगिनीही या पारंपरिक व्रतात व्यत्यय येऊ देत नाहीत.

इतक्या प्रदीर्घ कालात एकाही महिलेच्या मनात असे कधी आले नाही की सावित्रीच्या या प्राचीन प्रसिद्ध व पवित्र कथेत वटवृक्षाला एवढे महत्त्वाचे स्थान कशामुळे प्राप्त झाले ? सावित्रीच्या सौभाग्याशी आणि आपल्या पतीला तिने मिळवून दिलेल्या दीर्घ जीवनाशी या वृक्षराजाचा खरेच काही संबंध आहे का ?

प्रश्न अवश्य विचार करण्यासारखा आहे. या संदर्भात माझे सांस्कृतिक लेखन आस्थेने वाचणाऱ्या एका साधुपुरुषाने मला दिलेली दृष्टी समाजापुढे ठेवणे मला अत्यंत अगत्याचे वाटते. हे सत्पुरुष अरण्यवासी आहेत. गेली कित्येक वर्षे साधना करीत ते एकांतात वास्तव्य करीत आलेले आहेत. त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणात आलेली एक सत्य-कथा त्यांनी मला मुद्दाम सांगितली. ते म्हणाले, 'सावित्रीच्या कथेत वडाच्या झाडाला एवढे महत्त्व का मिळाले आहे ? याचा काही शोध तुम्ही घेतला आहे का ?' मी अर्थातच नकारार्थी उत्तर दिले. त्यावर ते अनुभवी व ज्ञानी पुरुष म्हणाले, 'माझ्या अरण्यवासात मी अनेक गोष्टी पाहतो-अनुभवतो. माझा आश्रम ज्या ठिकाणी आहे तो परिसर वटवृक्षांनी समृद्ध आहे. वडाच्या झाडाची काही असाधारण वैशिष्ट्ये माझ्या निदर्शनास आली आहेत.' माझ्याकडे दृष्टी रोखून मिस्किलपणाने हास्य करीत ते तपस्वी म्हणाले, 'का हो-तुम्ही कावळा पाहिला आहे का ?—कावळा ?'

त्यावर मी हसत म्हटले, 'हो, कावळा कुणाला माहीत नाही ? चिऊ-काऊच्या गोष्टीपासून तर साहित्याला प्रारंभ होतो. बालपणापासून मरणोत्तर कालापर्यंत कावळा माणसाचा सोबती असतो. ज्ञानेश्वरांनी तर, 'मला चांगला शकुन दे. पाहुणे पंढरीराय

घरी येऊ देत म्हणजे मग 'तुझे सोन्याने मढविन पाऊ' अशी लालूच कावळ्याला दाखविली आहे.'

हिंदू धर्मात माणसाच्या मृत देहाचे मंत्राग्नी देऊन दहन केले जाते. दहनाची ही पद्धत अत्यंत शास्त्रीय आणि म्हणूनच विचारपूर्वक केलेली आहे. मृताच्या और्ध्वदेहिक विधीत पिंडाला कावळा शिवणे ही गोष्ट महत्त्वाची मानली जाते. या प्रथेमागे एक रहस्य आहे. ते पुष्कळांना माहिती नसेल. माणूस गतप्राण झाल्यावर त्याच्या शरीरातून त्याचा लिंगदेह बाहेर पडतो. सूक्ष्म स्वरूप असल्यामुळे स्थूल दृष्टीला तो दिसू शकत नाही. या लिंगदेहावरोबरच माणसाचे पूर्वसंस्कारही अवशेषरूपाने विद्यमान असतात. देहातून बाहेर पडलेल्या या लिंगदेहाला काही काळ आपले आश्रयस्थान नष्ट झाल्यामुळे संभ्रम निर्माण होतो. तशा अवस्थेत देहाचे दहन ज्या ठिकाणी झालेले असते त्या परिसरात तो सूक्ष्म लिंगदेह अथवा वासनादेह भिरभिरत राहतो. वस्तुस्थितीचे ज्ञान झाल्यावर मग तो ते स्थान सोडून जातो. लिंगदेह जोपर्यंत दहनभूमीत घोटाळत असतो तोपर्यंत पिंडाला कावळा कधीही शिवत नाही. एकाक्ष कावळ्याला निसर्गाने अशी काही विशेष दृष्टी दिली आहे की माणसांना न दिसणारा मृताचा लिंगदेह कावळ्याच्या सूक्ष्म दृष्टीला दिसत असतो. लिंगदेहाचे दर्शन योगी, साधू अशांना होऊ शकते; कारण त्यांच्या ठिकाणी अतींद्रिय दृष्टी असते. कदाचित ही वस्तुस्थिती चिकित्सकांना अद्भुत वाटण्याचा संभव आहे. ती पुराव्याने सिद्ध करता आली नाही तरी अतींद्रिय सामर्थ्य असलेल्या व्यक्तींनी तिच्या सत्यतेबद्दल ग्वाही दिली आहे म्हणून कावळ्याच्या संदर्भात हा वृत्तांत मला सांगावासा वाटतो. ( यावर अधिक प्रकाश टाकला जाण्याची आवश्यकता आहे. )

त्यावर साधू महाशय म्हणाले, 'ते ठीक आहे, पण कावळा तुम्ही नीट लक्षपूर्वक पाहिला आहे का ?'

'हो ! तो एकाक्ष असतो. दुडक्या चालीने चालतो. काळा कुळकुळीत असतो. आणि कुठल्याही गवयाला खाली मान घालायला लावील अशी कर्कश कठोर काव काव करतो.' मी म्हटले.

'ठीक आहे. पण असा हा अवगुण-संपन्न पक्षिराज सर्वांत अधिक आरोग्यसंपन्न आणि दीर्घजीवी असतो हे तुम्हांला–तुम्हांलाच काय–बहुतेकांना ठाऊक नसेल.'

या वस्तुस्थितीविषयी माझे अज्ञान मी लगेच मान्य केले. त्यावर आपले निरीक्षण ते महाशय पुढे सांगू लागले–'माणसाला जे कळले नाही ते एक महत्त्वाचे रहस्य या प्राण्याला गवसले आहे !'

'ते कोणते ?'–असा भाव माझ्या मुद्रेवर उमटला तो ओळखून साधू सांगू लागले.–'खूप कसे जगावे आणि निरोगी कसे राहावे हे कावळ्याला कळले आहे. कावळ्याचे जीवन–पोषण हा वटवृक्ष करतो. वटवृक्षाची फळेमुळे हे कावळ्याचे खाद्य असते. त्या पोषणद्रव्यात दीर्घजीवित्व आणि निरोगिता देण्याचे सामर्थ्य असले पाहिजे

वडाची फळे खाली पडतात, त्यापासून विशिष्ट वेळी उगवणाऱ्या छत्र्या हे कावळयाच्या आहारातले पक्वान्न असते. ( नेमका हाच शोध परवा परवा एका शास्त्रज्ञाने लावल्याचे प्रसिद्ध झाले आहे. वटवृक्षाच्या फळापासून निर्माण होणाऱ्या छत्र्यांत सर्वश्रेष्ठ प्रथिने असतात असे सिद्ध झाले आहे. )

वटवृक्षाच्या ठिकाणी दीर्घायू व आरोग्यसंपन्नता देणारी द्रव्ये भरपूर असतात हे कावळयांच्या निरीक्षणाने समजले. सत्यवान अल्पायुषी होता. सावित्रीने आपल्या एकनिष्ठतेने, चातुर्याने व बुद्धिमानतेने आपल्या पतीचे आयुष्य वाढविले. सावित्रीच्या कथेत प्रामुख्याने असलेल्या आणि संस्कृतीत सहस्रावधी वर्षे पूजिल्या जाणाऱ्या या महा-वृक्षाचे या दृष्टीने संशोधन झाले तर सावित्रीच्या कथेला एक वेगळाच उजाळा मिळेल असे मला वाटते.

त्या सत्पुरुषाचे हे सूक्ष्म निरीक्षण विचारांनाच नव्हे तर एका संशोधनाला चालना देणारे आहे यात शंका नाही.

**औदुंबर** :—औदुंबर हा दत्तगुरूंचा वृक्ष मानला जातो. दत्तसांप्रदायिकच नव्हे तर सर्वच हिंदू या वृक्षाला पवित्र व पूजनीय मानतात.

हिरण्यकश्यपूचा वध केल्यावर नरसिंहरूपी विष्णूने आपली नखे त्यांचा दाह शमविण्यासाठी औदुंबर वृक्षात खुपसली अशी पुराणात कथा आहे. या कथेतील सांकेतिकता स्पष्ट आहे. कसलाही तीव्र दाह शांत करून मानवी देहा-मनाला शीतलता देण्याचा दिव्य गुण या झाडात आहे. श्रीगुरुचरित्राची पारायणे औदुंबराखाली बसून करणे पुण्यफलप्रद होते अशी सकारण समजूत आहे. कसल्याही प्रकारच्या ताप-संतापाचे शमन करणाऱ्या या वृक्षाखाली त्रिगुणात्मक त्रयमूर्ती श्रीदत्तांचा अधिवास असतो यात आश्चर्य नाही.

**माका** :—माका या वनस्पतीचा उपयोग विशेषतः यज्ञात केला जातो. माका ही वनस्पती अनेक प्रकारे उपयुक्त व गुणकारी आहे. माक्याचा एक विशेष उपयोग मला प्रत्यक्ष पाहावयास सापडला. माझे एक आदरणीय स्नेही व प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. आबा चांदोरकर माझ्याच घरी लिहावयास बसत. सतत वाचन-लेखन करून आधीच वृद्धापकाळामुळे क्षीण झालेले त्यांचे डोळे थकून जात. अशा वेळी ते थोडा वेळ बाहेर जात आणि परत येताना कोठून तरी माका शोधून आणीत. त्याची पाने स्वच्छ धुऊन घेऊन ते ती हाताने चुरडीत आणि त्यातून निघालेला रस बोटाने अंजनासारखा डोळयातून फिरवीत. थोडयाच वेळात त्यांचे डोळे स्वच्छ होत आणि ते पुन्हा वाचन-लेखनात निमग्न होत. यज्ञात आणि पूजेत होणारा माक्याचा आणखी एक उपयोग त्यांनी मला समजावून सांगितला. यज्ञात दर्भ वापरले जातात. या दर्भाची टोके धारदार असतात. ( यावरून '-कुशाग्र-' हा शब्द भाषेत रूढ झाला. कुश म्हणजे दर्भ, अग्र म्हणजे टोक, 'दर्भाच्या टोकाप्रमाणे धारदार '-अशा अर्थाने हा प्रयोग केला जातो. उदा. एखाद्याची बुद्धी कुशाग्र आहे असे म्हणतात. ) अशा दर्भांनी यज्ञकर्त्याचे बोट किंवा हात कापला गेल्यास त्यावर माक्याचा रस प्रतिबंधक म्हणून उपयोगी पडतो. माक्याचे तेल

केस काळे करणारे आहे. माक्याच्या संदर्भात माझ्या आईच्या तोंडी असलेल्या व लहानपणी वारंवार ऐकलेल्या एका म्हणीची आठवण होते. ती म्हण अशी, 'नाकाला माका–आणि पिंपळाला झोका!'

**आघाडा :—** श्रावण महिना सुरू झाला की, 'आघाडा, दूर्वा–फुले'–यांचे माहात्म्य चालू होते. सांसारिक सुखशांतीसाठी नवग्रहांची पूजा घडावी म्हणून आजही घराघरातून नाग–नरसोबाचा कागद भिंती भूषवितो. या नाग–नरसोबाला, आघाडा, दूर्वा–फुलांची माळ घातली जाते. पण याच विशिष्ट वेळी आघाड्याला एवढे महत्त्व का दिले गेले याचा विचार किंवा अभ्यास करण्याची आवश्यकता आम्हांला वाटत नाही. ही वनस्पती आरोग्याला अनेक प्रकारे उपकारक आहे. आणि श्रावण महिन्याच्या प्रारंभी विशिष्ट नक्षत्रावर या वनस्पतीतले गुणधर्म प्रकर्ष पावतात. म्हणून श्रावणातील पूजा व इतर धार्मिक समारंभात आघाड्याला महत्त्व आले आहे. त्या दृष्टीने या वनस्पतीचे अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

अलीकडे रविवार केसरीच्या ता. ३।१०।७१ च्या अंकात श्री. दामोदर दत्तात्रय जोशी यांनी आघाडा या वनस्पतीचे अनेक औषधी उपयोग दिले आहेत ते जिज्ञासू वाचकांनी अवश्य पाहावेत.

**शेवगा :—**सर्वसामान्यपणे आपल्या नित्याच्या उपयोगातील कित्येक वनस्पतींच्या ठिकाणी अद्‌भुत गुण असतात. जुन्या अनुभवी लोकांना ते ठाऊक असतात. शेवग्याचे झाड हे प्रत्येकाच्या परिचयाचे आहे. शेवग्याच्या शेंगा या अनेकांना आवडतात. पण तुम्हाआम्हाला माहीत नसलेली शेवग्याच्या बाबतीतली एक गोष्ट एका अडाणी समजल्या जाणाऱ्या वडारी माणसाने मला सांगितली. ही कामकरी मंडळी शेवग्याच्या शेंगापेक्षाही शेवग्याच्या पाल्याची भाजी आवर्जून खातात. महारोगासारखी व्याधी बरी करण्याचे सामर्थ्य त्या पाल्यात आहे असे झाडपाल्याची चांगली माहिती असणाऱ्या त्या वडाऱ्याने सांगितले. त्यातील सत्य व तथ्य शोधून पाहिले पाहिजे.

घोसावळ्याची भजी आपण रुचीने खातो. घोसावळ्याच्या पाल्याचा एक अमोघ उपचार एका प्रयोगशील तपस्व्याने सांगितला. हे तपस्वी म्हणजे दापोली येथे वास्तव्य करणारे ऋषितुल्य श्री. दादा फाटक हे होत. त्यांना अशा औषधी वनस्पतींची माहिती आहे. नागीण नावाच्या रोगावर डॉक्टरी उपाय लागू पडत नाहीत. त्यासाठी घोसावळ्याच्या पाल्याचा रस औषध म्हणून अचूक उपयोगी पडतो, असे श्री. दादा फाटक यांनी मला सांगितले. आघाडा वनस्पतीचेही अनेक औषधी उपयोग त्यांना ठाऊक आहेत. जिज्ञासूंनी त्यांच्याशी संपर्क साधावा. (श्री. दादासाहेब फाटक, मु. पो. दापोली, जि. रत्नागिरी.)

नाथपंथीयांनी गौरविलेला अजानवृक्ष हा एक असाच अपूर्व व अद्‌भुत वृक्ष आहे. त्यासंबंधी माझे सहकारी व साधक स्नेही श्री. आत्मानंद यांनी आपल्या 'अज्ञाताचा शोध व बोध' या गायत्री–प्रकाशनाच्या अभिनव ग्रंथात विस्तृत परामर्श घेतला आहे,

तो जिज्ञासूंनी मुळातच पाहावा. (पाहा, 'अज्ञाताचा शोध व बोध' पृष्ठे २५०तें२५३).

**सोमवल्ली :**—प्राचीन काळी आपले पूर्वज यज्ञप्रसंगी सोमरसपान करीत असत. या सोमवल्लीसंबंधी सध्या संशोधन व चर्चा चालू आहे. माझे स्नेही व आदरणीय इतिहाससंशोधक आबा चांदोरकर यांनी सोमवल्लीचे पुष्कळ संशोधन केले होते. त्यांच्या संशोधनाचे फलित ते असे सांगत की, यज्ञप्रसंगी आपले पूर्वज उपयोगीत असत ती सोमवल्ली आज दुर्मिळ झाली आहे. प्राचीन काळी वेदातच सोमाचे २४ विविध प्रकार सांगितले आहेत; पण मूळ स्वरूपातील 'सोम' आज उपलब्ध नसावा असा त्यांचा निष्कर्ष होता. पुण्यातील एका औषधी संस्थेने सोमवल्लीचे संशोधन हाती घेतले आहे.

**रुद्राक्ष :**—आपल्याकडे रुद्राक्षांना पूजेत व धर्मविधीत महत्त्व आहे. या रुद्राक्षांच्या एकमुखी, पंचमुखी, षण्मुखी, अशा भिन्न भिन्न जाती आहेत. चांगल्या रुद्राक्षाची माळ गळयात घातल्यास रुधिराभिसरणाचे काम सुरळित चालते. साधकांचे रुधिराभिसरण ठीक असावे लागते. रुद्राक्षमाळेच्या उपयोगाने रक्तदाबावर ताबा ठेवता येतो. काही रुद्राक्ष मधात उगाळून मूर्छा-फेफरे यासारख्या विशिष्ट व्याधींवर दिले जातात. एकूण रुद्राक्ष हा आरोग्याला उपकारक व औषधी म्हणून आपल्या संस्कृतीने त्याला महत्त्व दिले आहे. रुद्राक्षाची झाडे नेपाळ, तिबेट या भागात अधिक आढळतात असे म्हणतात. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वनस्पतिविभागाच्या उद्यानात ही झाडे होती.

रुद्राक्षासंबंधी आणखी काही उपयुक्त माहिती मुद्दाम पुढे देत आहे. रुद्राक्ष शिवाच्या डोळयातून गळालेल्या अश्रुबिंदूपासून निर्माण झाले अशी पौराणिक कथा आहे.

रुद्राक्षात काळे, पिवळे, तांबडे, पांढरे असे भेद आहेत. ज्या रुद्राक्षाला स्वयंभू छिद्र आहे तो रुद्राक्ष विशेष पवित्र व उपयुक्त मानला जातो. रुद्राक्षांचे एकूण चौदा प्रकार आहेत.

(१) एकमुखी रुद्राक्ष शिवरूप मानला जातो. त्याच्या वापराने ब्रह्महत्येसारखी पापेही नाहीशी होतात. एकमुखी रुद्राक्षाचे पूजन जेथे होत असेल तेथून लक्ष्मी दूर जात नाही. एकमुखी रुद्राक्षाचा मंत्र 'ॐ रुद्र एक वक्त्रस्य.' हा धारण करताना 'ॐ ऱ्हीं नमः' हाही मंत्र म्हणावा असा संकेत आहे.

(२) दोनमुखी रुद्राक्ष देवदेव या नावाने प्रसिद्ध आहे. हा धारण केल्याने गोहत्ये-सारखी पातके नाहीशी होतात; स्वर्गप्राप्तीला हा साहाय्यक होतो. 'ॐ खं द्विवक्त्रस्य' हा त्याचा मंत्र आहे. हा धारण करताना 'ॐ नमः' हा मंत्र म्हणावा.

(३) तीनमुखी रुद्राक्ष अनल या नावाने प्रसिद्ध आहे. हा धारण केल्यानेही सर्व पापांचा नाश होतो आणि विद्यांची प्राप्ती होते. शत्रुनाश आणि पचनविषयक व्याधींचा परिहार हे याचे विशेष फळ. अपघात आणि अशुभ यापासून हा संरक्षण करतो. 'ॐ वुं त्रिवक्त्रस्य' हा याचा मंत्र होय. 'ॐ क्लीं नमः' हा मंत्र हा धारण करताना म्हणावा.

(४) चारमुखी रुद्राक्ष ब्रह्मा या नावाने ओळखला जातो. हा धारण करणारा

वेदशास्त्रसंपन्न, धनसंपन्न होतो. मनुष्यहत्येचे पापही याच्या वापराने नाश पावते. याचा मंत्र, ' ॐ ऱ्हीं चतुर्वक्त्रस्य ' असा आहे. हा धारण करताना ' ॐ ऱ्हीं नमः ' हा मंत्र म्हणावा.

(५) पंचमुखी रुद्राक्ष कालाग्नी या नावाने ओळखला जातो. सर्व रुद्राक्षांत हा अधिक शुभ आणि पुण्यप्रद मानला जातो. यश, वैभव, धन, सुख, शांती यांची प्राप्ती हा वापरणाऱ्याला होते. अभक्ष्य–भक्षणामुळे निर्माण होणारी पापे व दुःखे या रुद्राक्षाच्या वापराने नाहीशी होतात. याचा मंत्र ' ॐ ऱ्हां पंचवक्त्रस्य ' असा आहे. धारण करतेवेळी ' ॐ ऱ्हीं नमः ' हा मंत्र म्हणावा.

(६) षण्मुखी रुद्राक्षाला कार्तिकेय अशी संज्ञा आहे. याचा वापर करणारा सद्‌गुणी, सुलक्षणी, धैर्यशील आणि विजयी होतो. सर्व वर्णांच्या लोकांना तो सारखाच फलप्रद होतो. वक्तृत्व आणि सभाजय यांची प्राप्ती याच्या वापरामुळे होते. षण्मुखी रुद्राक्ष वापरणाऱ्या भक्तावर देवी पार्वतीची कृपादृष्टी असते. याचा मंत्र ' ॐ हुंषड्वक्त्रस्य. ' हा धारण करताना ' ॐ ऱ्हीं हुं नमः ' हा मंत्र म्हणावा.

(७) सप्तमुखी रुद्राक्ष अनंत या नावाने प्रसिद्ध आहे. हा वापरणाऱ्याला विषबाधा होत नाही. सर्व पापांचा नाश आणि सुखसमृद्धीचा लाभ हे फळ याच्या धारकांना मिळते. ' ॐ हुः सप्तवक्त्रस्य ' असा मंत्र आहे. ' ॐ हुं नमः ' हा मंत्र धारण करताना म्हणावा.

(८) अष्टमुखी रुद्राक्षाला विनायक असे दुसरे नाव आहे. याचा वापर करणाऱ्याला आयुष्यात पीछेहाट स्वीकारावी लागणार नाही. कलानैपुण्य आणि नेतृत्व यांचा लाभ त्याला प्राप्त होईल. ' ॐ कं अष्टवक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र आहे. ' ॐ हुं नमः ' हा मंत्र धारण करतेवेळी म्हणावा.

(९) नऊमुखी रुद्राक्ष भैरव या नावाने ओळखला जातो. हा हातावर बांधल्यास साधक शिवरूप पावतो. स्वर्गातही त्याची इंद्रासारखी पूजा केली जाते. ' ॐ जूं नववक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र होय. ' ॐ ऱ्हीं हुं नमः ' हा धारण करतेवेळी म्हणावा.

(१०) दशमुखी रुद्राक्ष वापरणाऱ्याला पाहाताच नाग सर्प नाश पावतात. हा अत्यंत शक्तिशाली मानला जातो. ' ॐ क्षं दशवक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र आहे. ' ॐ ऱ्हीं नमः ' हा मंत्र धारण करताना म्हणावा.

(११) अकरामुखी रुद्राक्ष. हा गळ्यात न घालता शिरोधार्य समजावा. हा वापरणाऱ्याला सहस्र अश्वमेध यज्ञांचे पुण्य लाभते आणि त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. ' ॐ श्रीं एकादश वक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र आहे. तो धारण करताना ' ॐ ऱ्हीं हुं नमः ' हा मंत्र म्हणावा.

(१२) बारामुखी रुद्राक्ष धारण करणाराचे दारिद्र्य आणि व्याधीनिवारण होते. अग्निप्रलयापासून त्याचे संरक्षण होते. बारामुखी रुद्राक्ष हा गळ्यात धारण करावयाचा असतो. याच्या वापरामुळे आदित्याची कृपा लाभते. ' ॐ ऱ्हां द्वादशवक्त्रस्य ' हा

त्याचा मंत्र होय. धारण करताना ' ॐ क्रों क्षौं रौं नमः ' हा मंत्र म्हणावा.

(१३) तेरामुखी रुद्राक्षाला रुद्र हेच नाव आहे. हा धारण करणाऱ्याच्या सर्व आकांक्षा पूर्ण होतात. ' ॐ क्षौम् त्रयोदशवक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र होय. ' ॐ ऱ्हींम् नमः ' हा मंत्र धारण करताना म्हणावा.

(१४) चौदामुखी रुद्राक्ष हा परम शिवरूप मानला जातो. तो मस्तकावर किंवा दंडावर धारण करणे उचित मानले जाते. हा धारण करणाऱ्याची देव देखील पूजा करतात. ' ॐ त्राम् चतुर्दशवक्त्रस्य ' हा त्याचा मंत्र आहे. ' ॐ नमः ' हा मंत्र धारण करताना म्हणावा.

रुद्राक्षमाळा भूत-पिशाच्च, शाकिनी-डाकिनी यांच्यापासून रक्षण करते.

रुद्राक्ष विकत घेताना जाणकारांच्या सल्ल्याने घ्यावेत. खरा रुद्राक्ष पाण्यावर तरंगत नाही. तो पाण्यात बुडतो.

तांब्याच्या भांड्यात रुद्राक्ष घालून ठेवून ते पाणी पिणे विशेष आरोग्यप्रद आहे. रक्तदाब आणि मधुमेह या व्याधींवर असे पाणी पिण्याचा उपयोग हमखास होतो. तांब्याच्या भांड्यात बेलाची पाने रात्री टाकावी व ते पाणी दुसरे दिवशी पिण्यासाठी वापरावे. रक्तदाब व मधुमेह यावर उपयुक्त ठरते.

देवघरात देवासमोर आडणीवर शंख असतो. शंखध्वनी हा ॐ कारनाद आहे. बंगालमध्ये पूजेच्या वेळी शंखाचा आवाज काढतात. या शंखाच्या ठिकाणी आरोग्यप्रद व भाग्यकारक अशी अनेक सामुद्रिक द्रव्ये व तत्त्वे असतात. शंखातले पाणी देवपूजेला वापरतात. शंखातल्या पाण्यात पावित्र्य व औषधी तत्त्वे असतात. शंखोदक प्राशनाने कित्येक व्याधी नाहीशा होतात असा अनुभव आहे. उजवा म्हणजे दक्षिणावर्त शंख दुर्मिळ असतो. एखाद्याला तो मिळाला तर शनीच्या खड्याप्रमाणे तो लाभावा लागतो. उजवा शंख लाभला तर तो परमभाग्यकारक ठरतो. न लाभल्यास मात्र तो अनेक प्रकारची हानी करतो. एका सद्गृहस्थास एका संन्याशाने कृपाळू होऊन एक उजवा शंख दिला. साधूची देणगी म्हणून त्यानी तो शंख घरात पूजेत ठेवला. शंख घरात आल्यापासून या गृहस्थावर आपत्तीमागून आपत्ती कोसळत गेल्या आणि शेवटी त्या आपत्तीचे मूळ त्या शंखात आहे हे ध्यानी आल्यावर त्या संत्रस्त सद्गृहस्थांनी त्या साधूची ती देणगी गंगेच्या प्रवाहाच्या स्वाधीन केली. ते कसेही असो, पूजाविधीत आलेला शंख हा उगीचच आलेला नाही. त्याच्यामागे विज्ञान आहे. जीवनकल्याणाचे, आरोग्याचे रहस्य आहे हे खास.

० ० ०

ॲना लिंडबर्ग नावाची एक अमेरिकन विदुषी संसाराच्या कटकटीतून आणि जगाच्या कोलाहलापासून दूर जाऊन समुद्रकाठी काही काळ एकांतवासात राहिली. त्या काळात तिला आलेले अनेक अमोल अनुभव तिने ' Gift from the sea ' या

आपल्या उपनिषदासारख्या अपूर्व ग्रंथात शब्दबद्ध केले आहेत; ते रसिक वाचकांनी मुळातूनच वाचावे. त्या ग्रंथाचा मराठी अनुवाद, 'समुद्राची देणगी' या नावाने सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती दुर्गा भागवत यांनी केला आहे.

देवाचे तीर्थ अमृतोपम मानले जाते. यात श्रद्धेपेक्षाही विज्ञानच अधिक आहे. देवपूजेच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रात सामर्थ्य असते. पूजेसाठी वापरण्यात येणारी तांब्याची उपकरणे, पाणी, मंत्रपठण, आणि पूजेत वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट वनस्पती, फुले, मध, दही, दूध, तूप इत्यादि द्रव्यांच्या ठिकाणी असणारे व्याधिनाशक व आरोग्य-दायक गुणधर्म हे सर्व तीर्थात एकरूप होत असतात. म्हणून विधिपूर्वक केलेल्या देव-पूजेतील तीर्थ हे पापनाशक पंचामृत मानले गेले आहे. बेल, तुळस, इत्यादींचे गुणधर्म यापूर्वी वर्णन केलेच आहेत. पूजेत आणि इतरत्र आपल्या संस्कृतीत मधाचा वापर विपुल प्रमाणात करण्याची प्रथा आहे. आयुर्वेदातील औषधे मधातच घ्यावीत यावर कटाक्ष असतो. असा हा मध आरोग्याला अत्यंत उपकारक आणि व्याधिनाशक व शामक आहे.

आधुनिक जीवनात साखरेचा अतिरिक्त वापर करण्यात येतो. त्यामुळे मधुमेहा-सारखा रोग हे आधुनिक जीवनाचे एक अटळ 'वैभव' झाले आहे. मधुमेहावर मधाचा औषध म्हणून प्रभावी उपयोग होतो असे पाश्चात्त्य देशांत यासंबंधी केल्या गेलेल्या प्रयोगात व संशोधनात सिद्ध झाले आहे. इतर कोणत्याही औषधांपेक्षा मधुमेहावर मधाचा निश्चित उपयोग होतो. मात्र मधाच्या उपयोगाने होणारे रोगशमन हे हळूहळू होत असते.

रशियातील एक डॉक्टर **A. Y. Davdow** याने मधासंबंधी महत्त्वाचे संशो-धन करून मधुमेहाच्या रोग्यांना सर्वाधिक प्रमाणात मधाचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. मधुमेहपीडितांना होणारा **Acetonemia** नावाचा उपद्रव मधामुळे कमी होतो असे त्याचे म्हणणे आहे. मधुमेहाच्या रोग्यांनी वापरावयाचा मध पातळ असावा असे तज्ज्ञांचे सांगणे आहे. मधमाशा फुलांपासून जो मध गोळा करतात तो मधुमेहाला उपयुक्त असतो. दाट आणि ज्याची पुढे साखर बनते असा मध मधुमेहासाठी वापरला जाऊ नये, कारण अशा मधात एरवीच्या साखरेत असणारीच द्रव्ये काही प्रमाणात असतात.

जगातील सर्व धर्मांत प्राचीन काळापासून मधाचे माहात्म्य अनेक प्रकारे सांगि-तले आहे. पाश्चात्य देशांत शस्त्रक्रियेनंतर जंतुप्रतिबंधक आणि व्रण लवकर भरून यावे म्हणून मधाचा उपयोग केल्याची व तो अत्यंत उपयुक्त ठरल्याची अनेक उदाहरणे अधिकृत वैद्यकीय नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली आहेत.

सौंदर्यवर्धनासाठी आणि त्वचा तेजस्वी आणि निरोगी राहावी यासाठी मधाचा उपयोग किती प्रभावी होऊ शकतो याचे एक उदाहरण लक्षात राहावे असे आहे.

एक प्रसिद्ध अभिनेत्री एका दुकानातून नेहमी मध विकत घेत असे. पण त्या

मधाचा उपयोग ती पोटात घेण्यासाठी करीत नसे. प्रत्येक रात्री अभिनयासाठी केलेली रंगरंगोटी पुसून टाकल्यावर ती आपल्या मुद्रेवर मधाचे लेपन करीत असे. त्वचा तुळतुळीत आणि निरोगी ठेवण्याचा हा अमोघ उपाय प्रत्यक्ष तिच्या आईने मरतेवेळी तिला सांगितला होता. तिची आई देखील अभिनेत्रीच होती आणि नेहमी वापरण्यात येणाऱ्या रंगभूषेतील काही अपायकारक द्रव्यामुळे तिच्या मुद्रेवरील त्वचेत दोष निर्माण झाला. तिचा तो त्वचा-दोष मधाच्या लेपनामुळे पूर्णपणे नाहीसा झाला. रोज रात्री सुमारे एक तासभर ती आपल्या मुखमंडलावर मधलेपन करीत असे. या उपायाने तिचा त्वचा-दोष तर गेलाच; पण कोणाचेही लक्ष वेधून घेण्याइतकी तिची कांती तुकतुकीत आणि आकर्षक झाली.

अमेरिकेत व्हर्माउंट या नावाचा एक प्रांत आहे. या प्रांतातील रहिवासी आरोग्य-संपन्न आणि दीर्घायुषी किंबहुना शतायुषी असतात अशी ख्याती आहे. या प्रांतातीलच एक प्रसिद्ध डॉक्टर जार्व्हिस यांनी Folk Medicine ( आजीबाईचा बटवा ) या नावाचा एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. आपल्या प्रांतातील लोकांच्या दीर्घायुषित्वाचे आणि आरोग्यसंपन्नतेचे रहस्य डॉ. जार्व्हिस यांनी आपल्या पुस्तकात प्रसिद्ध केले आहे. व्हर्माउंट प्रांतातील लोकांच्या आहारात मध आणि आंब यांचा वापर सर्वाधिक असतो हे सांगून त्यांनी मध हा मानवी आरोग्याला आणि दीर्घ जीवनाला किती व कसा उपकारक आहे हे आपल्या ग्रंथात वर्णन केले आहे.

लहान मुलांना चॉकलेट आणि विविध प्रकारच्या गोड गोळया आवडतात. आणि त्या विपुल प्रमाणात दिल्या जातात. चॉकलेट आणि अशा प्रकारच्या गोळया मुलांच्या दाताना घातक ठरतात. त्यांच्या दातांचे रक्षण व्हावे आणि त्यांना मधुर खाद्यही मिळावे यासाठी मधाचा उपयोग अनेक प्रकारे केला जावा असे तज्ज्ञांचे सांगणे आहे.

मधाच्या संदर्भात मी भारतीय असूनही मला अज्ञात असलेली पुढील माहिती एका मधविषयक इंग्रजी ग्रंथात आढळली.

भारतीय ब्राह्मणात-विशेषतः बंगाली-विवाहप्रसंगी वधूवरांचा विवाह शुभ व सुखप्रद व्हावा आणि त्यांना भूत-पिशाच्चांची बाधा होऊ नये यासाठी वधूच्या कपाळी, ओठावर, पापण्यावर आणि कानांच्या पाळयांवर मधाचे लेपन करण्याची पद्धत आहे.

फार प्राचीन काळी काही जातींत वधूच्या स्तनांना आणि गुह्येंद्रियाला मध-लेपन करण्याची पद्धत असे. वधूने सुप्रजा निर्माण करावी यासाठी हा विधी असे.

देवपूजेत ऊद, धूप यांचा वापर प्रशस्त मानला जातो. या संदर्भात दिल्ली येथील शासकीय, वैद्यकीय महाविद्यालयाच्या संशोधनशाखेने केलेले संशोधन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. विशेषतः गुग्गुळ अथवा देवधूप हा हृदयविकार, मेंदूतील रक्तस्रावाचे विकार आणि लठ्ठपणा यावर प्रतिबंधक म्हणून उपकारक ठरतो असे या संशोधनात सिद्ध झाले आहे. डिंकाप्रमाणेच गुग्गुळ हा त्याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतीपासून निघतो. या देवधूपाचा उपयोग अग्नीवर टाकल्यावर निर्माण होणारा धूर श्वसनाबरोबर

आत गेल्यावर अनेक व्याधींवर उपशामक म्हणून होतो. अपचन, काही मूत्ररोग, छातीचे रोग, क्षयाच्या गाठी, दमा, त्वचारोग या सर्वांच्यावर गुग्गुळाचा उपयोग प्रभावी ठरतो. याचा अर्थ धूपाच्या उपयोगाच्या मागे केवळ सुगंधी श्रद्धा नसून आरोग्यदायक विज्ञान आहे हे स्पष्ट दिसून येते.

अश्वगंधा आणि कंटकारी या दोन वनस्पतींच्या संशोधनात त्या अनेक रोगांवर अत्यंत उपयुक्त आहेत असे संशोधनात सिद्ध झाले आहे.

धर्म व संस्कृतीत पूज्य व पवित्र मानल्या गेलेल्या वृक्ष–वनस्पतींच्या मागे केवढी रहस्ये आहेत याची कल्पना यावी याखाठी थोडया विस्ताराने हे विचार व्यक्त केले आहेत. या संदर्भात अद्ययावत डोळस संशोधन आणखी उपयुक्त ठरेल. तसे ते केले जाणे आवश्यक आहे.

□ □ □

# ११

भारतीय संस्कृतीने रूढ केलेले कित्येक आचार-विचार, सण-संस्कार, आजही समाजात प्रचलित आहेत. पण प्रत्येक रूढ आचार-विचारामागे असलेली जीवनकल्याणाची आणि समृद्धीची वैज्ञानिक बैठक मात्र आपल्याला ठाऊक नसते. परंपरेने चालत आलेल्या चाली व रूढी चैतन्यहीन स्वरूपात पाळल्या जातात.

भारतीय संस्कृतीला संयम व विवेकाचे महत्त्व पूर्ण समजलेले होते. शाश्वत सुख आणि निकोप आरोग्य यांचा लाभ व्हावा असे वाटणाऱ्यांनी आहारविहार आणि स्वैर सुखोपभोग यावर नियंत्रण ठेवावे असे भारतीय संस्कृती कटाक्षाने शिकविते.

एका प्रत्यक्ष उदाहरणानेच हा मुद्दा आपण उलगडून पाहू. एकादशी, चतुर्थी, प्रदोष यांसारखी व्रते व उपवास आजही समाजात श्रद्धेने चालू असलेले आढळतात. ऋतुमानाप्रमाणे आहारविहारात पालट करून देहाचे व मनाचे आरोग्य राखण्यासाठी भारतीय संस्कृतीने अनेक उपाय सुचविले आहेत.

भागवत धर्माने जे नीतिनियम शिरोधार्य मानले आहेत त्यांत एकादशीच्या उपवासाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. सर्व तिथींत भागवत धर्माच्या प्रवर्तकांनी उपवासासाठी एकादशीचीच निवड का केली याचा विचार करण्याची आपल्याला कधी आवश्यकताच वाटत नाही. आपल्याला एकादशी ठाऊक असते ती, ‘एकादशी आणि दुप्पट खाशी’ या स्वरूपात. एकादशी म्हणजे चविष्ट साबुदाण्याची खिचडी खाण्याची संधी हेच समीकरण बहुतेकांच्या परिचयाचे असते. व्रत म्हणून हीच तिथी निश्चित करण्यामागे काही वैज्ञानिक रहस्य असेल याची कल्पनाही आपल्याला नसते. तुकारामासारख्या संतश्रेष्ठाने शपथ घालून हरिदिनीचे व्रत पालन करा असा उपदेश का केला याचा शोध घेण्याची आपल्याला गरज वाटत नाही.

भारतीय संस्कृतीचे ध्येय, जिवाची व आत्म्याची भेट घडवून सच्चिदानंदाचा साक्षात्कार साधणे हे आहे. आत्म्याच्या-ईश्वराच्या-विठ्ठलाच्या-जवळ जावयाचे म्हणजे माणसाचे मन निर्विकार, शुद्ध, पवित्र असले पाहिजे. काम-क्रोध, मोह-मद, यांसारख्या विकारांवर विजय मिळविण्यासाठी जे अनेक उपाय धर्माने व संस्कृतीने सांगितले आहेत

त्यांत निराहार–उपवास हा एक प्रभावी उपाय आहे.

'विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः' असे गीता सांगते. अध्यात्मलाभासाठी जिभेवर आणि झोपेवर ताबा मिळविला पाहिजे, 'इंद्रियांचे लळे' न पुरविता आहार-विहारात संयमाचा–युक्तीचा–अवलंब केला पाहिजे, असा मंत्र ज्ञानेश्वर महाराजही आवर्जून देतात.

जो रसनेंद्रियांचा अंकिला। निद्रेसी जीवे विकिला।
तो नाही येथ म्हणितला। आधिकारिया ।।

असे ते बजावतात. जिभेवर ज्याचा ताबा नाही आणि झोपेचा जो दास आहे तो अध्यात्माचा अधिकारी होऊच शकणार नाही असे त्यांचे स्पष्ट सांगणे आहे.

भारतीय संतांना व संस्कृति–प्रवर्तक संशोधकांना अनुभवाने, निरीक्षणाने, निदिध्यासाने आणि तपाचरणाने अनेक दुर्मिळ तत्त्वे व जीवनमूल्ये हस्तगत झाली होती. अंतरंगाच्या अंतराळात ध्यानसमाधीची याने नेऊन ईश्वराची जवळीक साधणे हा त्यांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ पराक्रम होता. निराहारामुळे विकारांचा उपशम होतो. विकारांचे प्राबल्य कमी झाले म्हणजे मनाची एकाग्रता सुलभ होते.

आकाशस्थ ग्रह–गोलांची भ्रमणे–ग्रहणे, प्रकाश–किरणे यांचे मानवी जीवनावर–मनावर इतकेच नव्हे तर मज्जातंतू व ज्ञानतंतूवर दूरगामी परिणाम होतात हे भारतीय प्रज्ञावंतांना ठाऊक होते. सर्व तिथींपेक्षा एकादशी या तिथीच्या दिवशी अंतरंगाच्या अवकाशात कमीत कमी विघ्ने वा अडथळे असतात. सूर्य, चंद्र या दोन प्रमुख तेजोगोलांमधील अंतर एकादशीच्या दिवशी ज्योतिषशास्त्रदृष्ट्या शुभ असते. कित्येकदा तर ते एकमेकांच्या त्रिकोणात असतात. त्यामुळे मन एकाग्र करणे, अंतर्मुख होऊन अंतरात्म्याच्या अधिकात अधिक जवळ जाणे ही प्रक्रिया किंवा साधना या विशिष्ट तिथीला सुकर होते.

एकादशीचे आणखीही काही सांकेतिक खोल अर्थ समजून घेण्यासारखे आहेत. दशेंद्रियांच्या पलीकडे असणारे जे सूक्ष्म निर्विषय आत्मतत्त्व त्याकडे जाणे; दहा इंद्रिये व अकरावे मन यांनी एकरूप होऊन आत्मतत्त्वाला, ईश्वराला–विठ्ठलाला शरण जाणे, म्हणजेच एकादशी. वैषम्य नाहीसे करून श्वासोच्छ्वासाची गती सम करणे ही प्रक्रिया म्हणजेच एकादशीची साधना ( श्वासोच्छ्वास प्रक्रियेतही अकरा श्वास व अकरा उच्छ्वास अशी क्रिया होणे अभिप्रेत असते. )

मानवी शरीरात काही सूक्ष्म चैतन्यकेंद्रे असतात. मूलाधाराच्या ठिकाणी असलेली सुप्त कुंडलिनी शक्ती जागृत करून सुषुम्ना नाडीतून ती ऊर्ध्वगामी करणे आणि तिच्या या ऊर्ध्व प्रवासात षट्चक्रांचे भेदन करणे ही योगप्रक्रिया आहे. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा, आणि सहस्रार ही सात चक्रे किंवा सूक्ष्म चैतन्यकेंद्रे प्रसिद्ध आहेत. पण काही राजयोगी एकूण चक्रे किंवा सूक्ष्म केंद्रे बारा मानतात. बाराव्या

स्थानास ‘ अनादि द्वादश तारक श्रीहरी ’ असे ते संबोधितात. एकादशाच्या पलीकडले हे बारावे स्थान गाठणे ( या स्थानाला ‘ द्वादशांगुल स्थान ’ असेही म्हणतात. ) म्हणजेच एकादशीचे व्रत पालन करणे होय.

एकादशीच्या रूढ आचारामागे केवढे रहस्य व किती सूक्ष्म संकेत आहेत हे ध्यानी घेतल्यावर एकादशीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन निश्चयाने वेगळे वळण घेतो.

एकादशीच्या व्रतपालनामागची जी रहस्ये आम्हाला ठाऊक नाहीत त्यांचा शोध व बोध रशियन वैज्ञानिक व संशोधक यांनी घेतला आहे, हे आश्चर्य नव्हे काय ? जे ‘ पिंडी ते ब्रह्मांडी ’ हे भारतीय तत्त्वज्ञानाचे सूत्र आहे. अंतर्मुख होण्यासाठी–अंतरंगाच्या अंतराळाचा वेध घेण्यासाठी कमीत कमी विघ्ने व अडथळे असण्याचा काल म्हणजे एकादशी, ह्या भारतीय संस्कृतीतील रहस्याचा उपयोग रशियन वैज्ञानिकांनी अचूक यशस्वीपणाने केला. रशियाची आरंभीची सर्व अंतराळयाने एकादशी या तिथीच्या आसपासच अंतराळात निर्विघ्नपणे उडाली हे प्रसिद्ध आहे. अगदी अलीकडे संकटात सापडलेले अमेरिकेचे अंतराळयान संकटमुक्त होऊन परत आले तेही या एकादशी तिथीलाच. एकादशीच्या व्रतपालनामागचे रहस्य, धर्म ही अफू मानणाऱ्या साम्यवादी रशियाला समजते आणि एकादशी हा आमचा सांस्कृतिक वारसा असून आम्ही त्या आचाराचे पारंपरिक चैतन्यहीन परिपालन तेवढे करण्यातच धन्यता मानतो. हे कशाचे द्योतक म्हणावयाचे ?

० ० ०

श्रीगणेशाची उपासना लोकप्रिय आहे. लो. टिळकांनी गणेशोत्सव चालू केला आणि गेली कित्येक वर्षे तो धूमधडाक्याने चालू आहे. पण गणपती म्हणजे कोण ?— त्याची उपासना का करावयाची यामागचे विज्ञान आपल्याला ठाऊक नसते. लौकर पावणारी व विघ्नहरण करणारी देवता म्हणून तिच्या उपासनेकडे लोकांचा अधिक कल दिसून येतो.

श्रीगणेशाची उपासना ही ज्याला एकाक्षरी ब्रह्म म्हणून संबोधतात त्या ॐ काराची उपासना आहे आणि ॐकारस्वरूप गणेशाच्या आराधनेत चतुर्थीच्या व्रताला जे महत्त्व आहे त्याचा उगम योगशास्त्राशी–कुंडलिनी जागरणाशी आहे हे रहस्य सर्वसामान्य गणेशोपासकांना अज्ञातच असते.

श्रीगणेशाच्या भक्तांनी चतुर्थीच आपल्या उपवासासाठी निवडली यामागचे योगशास्त्रीय आणि आध्यात्मिक रहस्य मी ‘ ॐकाररहस्य ’ या माझ्या ग्रंथात उलगडून दाखविले आहे. या संदर्भात जिज्ञासूंनी तो ग्रंथ अवश्य दृष्टीखालून घालावा.

० ० ०

पंचांग हा भारतीय संस्कृतीचा कणा आहे. भारतीयांचे सारे जीवन सूर्य, चंद्र व इतर ग्रहगोलांच्या तालावरच चालते. चंद्रसूर्यांची गती, स्थिती व भ्रमणे यांचे पृथ्वीवरील

मानवी जीवनमान, मज्जातंतू यावर काय, कसे व किती परिणाम होतात याबद्दल अनेक प्रकारचे संशोधन व प्रयोग पाश्चात्य देशांत सध्या चालू आहेत, त्यांपैकी काही महत्त्वाच्या निवडक प्रयोगांची फलश्रुती ऐकण्यासारखी आहे.

सुप्रसिद्ध रशियन संशोधक डॉ. निकोलस शुल्ज (Schulz) यांनी सूर्याचे चलनवलन, व त्याचे प्रकाशकिरण आणि अवकाशातून दूरस्थ ग्रहगोलांवरून येणाऱ्या प्रकाश व अन्य लहरी यांच्या मानवी आरोग्यावर व विशेषतः मानवी रक्ताशी संबंधित असलेल्या विकारांवर होणाऱ्या परिणामांचे शेकडो प्रयोग केले. त्यांत असे आढळून आले की रक्तदाब, हृदयविकार, अर्धांगवायू इत्यादी व्याधींचा उद्‌भव व त्यांची वाढ यांचा संबंध शरीरातील रक्ताभिसरणावर सूर्यकिरणांचा व सूर्याच्या भ्रमणाचा जो परिणाम होतो त्यावर अवलंबून असतो. त्या त्या व्याधीतील रुग्णांच्या रक्तातील श्वेत व रक्त पेशींची वाढ किंवा घट त्यांच्यावर सूर्यप्रकाशामुळे होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेवर अवलंबून असते.

प्रसिद्ध इटॅलियन संशोधक प्रा. जिनो पिकार्डी (Gino Piccardi) यांनी या संदर्भात केलेले संशोधन निर्णायक स्वरूपाचे आहे. प्रा. पिकार्डी एके दिवशी आपल्या प्रयोगशाळेत एक महत्त्वाचा प्रयोग करीत होते. प्रयोगासाठी त्यांनी प्रयोगनलिकांतून घेतलेले साहित्य अचूक व निर्दोष होते. असे असताही प्रयोगाच्या फलितात प्रत्येक वेळी पालट जाणवू लागला. वास्तविक तसे घडण्याचे काहीच दृश्य कारण नव्हते. प्रयोगात आढळून आलेले पालट का व कशाने होतात याचा उलगडा पिकार्डी यांना होईना. प्रयोगासाठी वापरण्यात आलेले शुद्ध पाणी शुद्ध निर्दोष आहे याची त्यांनी पुन्हा एकदा खात्री करून घेतली.

विचार करता करता प्रा. पिकार्डी यांना एक कल्पना सुचली. त्यांनी आपल्या प्रयोगशाळेत एक शिशाचे जाड आवरण उभे केले. बाहेरच्या वातावरणातून किंवा दूर अंतरिक्षातून येणाऱ्या प्रकाशकिरणांचा व इतर लहरींचा प्रतिबंध व्हावा हा असे करण्यात त्यांचा हेतू होता. शिशाच्या आवरणात त्यांनी आपला प्रयोग पुन्हा वारंवार करून पाहिला. आता प्रयोगाच्या फलितात पालट पडत नाही अशी त्यांची खात्री झाली. याचा अर्थ असा : यापूर्वी प्रयोगात दर वेळी जो पालट होत होता तो अंतरिक्षातून येणाऱ्या प्रकाश वा अन्य लहरींच्या व्यत्ययामुळे होत होता. पृथ्वीवरील वस्तुमात्रावर, मानवी देहमनावर सूर्य, चंद्र व अवकाशातील अनंत अंतरावरील ग्रहगोलांवरून येणाऱ्या प्रकाश-लहरी व अन्य स्पंदने निश्चयपूर्वक परिणाम करतात असे पिकार्डी यांच्या या प्रयोगाने निःसंदिग्धपणे सिद्ध झाले. या आपल्या प्रयोगाच्या संदर्भात मानवी शरीरात साठ टक्के पाणी आहे, आणि त्याच्याशी होणारा बाहेरच्या प्रकाश व अन्य किरणांचा संयोग अनेक बदल व घडामोडी घडवून आणतो असे डॉ. पिकार्डी यांनी म्हटले आहे.

चंद्राचे मानवी जीवनावर होणारे अनेक परिणाम नव्या वैज्ञानिक संशोधनात प्रत्ययास आले आहेत. प्रसिद्ध अमेरिकन शस्त्रवैद्य डॉ. एडसन् अँड्र्यूज यांनी

शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या अनेक रुग्णांवर प्रयोग केले. अमावास्या व पौर्णिमा या तिथींना चंद्रकिरणांचे परिणाम प्रकर्षाने प्रत्ययास येतात असे त्यांना आढळून आले. डॉ. अँड्र्यूज शस्त्रक्रियेसाठी पौर्णिमेचा दिवस कधीही योग्य समजत नाहीत. पौर्णिमा ही तिथी शस्त्रक्रियेसाठी अत्यंत अनिष्ट व घातक आहे असा त्यांचा अनुभव आहे. त्या दिवशी केलेल्या शस्त्रक्रिया अयशस्वी ठरतात किंवा तात्पुरत्या यशस्वी झाल्या असे वाटले तरी काही दिवसांनंतर रुग्णाचे दुखणे उलटते किंवा शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या जखमेतून रक्तस्राव तरी होतोच अशी त्यांची खात्री झाली आहे.

वर उल्लेखिलेले रशियन शस्त्रवैद्य डॉ. शुल्ज हे देखील शस्त्रक्रियेची तिथी निश्चित करताना आधी पंचांग पाहातात. डॉ. शूल्ज आणि आणखी काही रशियन शस्त्रवैद्यही शस्त्रक्रियेसाठी पौर्णिमा वर्ज्य मानतात.

भारतीय संस्कृतीत चंद्राला आपण चंदूमामा असे प्रेमाने संबोधतो. चंद्राशी जोडलेल्या या मामाच्या नात्यात फार दूरवरचा वैज्ञानिक विचार समाविष्ट आहे. स्त्रीच्या गर्भाची वीण चंद्र करतो अशी आपल्या उपनिषदांची कल्पना आहे ती केवळ कविकल्पना नसून, तिच्यामागे शास्त्रीय बैठक आहे हे पाश्चात्त्यांच्या प्रयोगशाळेत प्रत्ययास आले आहे. इलिनॉइस विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागाने एक महत्त्वाचे संशोधन केले. (त्याचे अध्वर्यू डॉ. विल्यम पीटरसन हे होते. ते ख्रिस्तवासी झाले आहेत.) स्त्रियांच्या गर्भधारणेशी चंद्राचा निकट संबंध आहे असे त्यांच्या संशोधनात आढळून आले आहे. पौर्णिमेपूर्वीचे बारा दिवस व नंतरचे तीन दिवस या कालावधीत गर्भधारणा झाली तर बव्हंशी पुत्रसंततीच जन्मास येते असे डॉ. विल्यम पीटरसन यांनी केलेल्या प्रयोगात सिद्ध झाले आहे.

अवसेपुनवेला भारतीय जीवनात–विशेषतः खेडयांत फार महत्त्व दिले जाते. अवसेपुनवेला होणारे चंद्रकिरणांचे परिणाम हा केवळ अंधश्रद्धेचा भाग नाही हे सिद्ध करणारे प्रयोग डॉ. लिओनार्ड रॅवीज (Leonard Ravitz) यांनी डयूक विद्यापीठात केले आहेत. त्यांनी केलेल्या यांत्रिक मापनात असे दिसून आले की दर चौदा ते सतरा दिवसांच्या अंतराने मानवी देहातील रासायनिक दाब निश्चितपणे वाढतो. (Chemical Voltage ).

न्यूयॉर्क शहरातील एका प्रसिद्ध संस्थेने केलेल्या पाहणीत एक विलक्षण गोष्ट दिसून आली. अमेरिकेत प्रत्येक ४३ मिनिटांना एक खून आणि प्रत्येक १९ मिनिटांना एक बलात्कार होतो, असे प्रसिद्ध झाले आहे. न्यूयॉर्कसारख्या प्रचंड शहरातील जाळपोळ, अत्याचार यांसारख्या गुन्ह्यात पौर्णिमेच्या आसपास शंभर टक्क्यांनी वाढ होते. तर मानवी हत्येचे प्रमाण पौर्णिमेस शेकडा पन्नासनी वाढते.

आकाशातील नक्षत्रांचा व ग्रहगोलांचा मानवी जीवनावर परिणाम होतो, हे भारतीय ऋषिमुनींना अभ्यासाने व सूक्ष्म निरीक्षणाने कळले होते. खगोल शास्त्राचाच एक विभाग असलेले फलज्योतिष, भारतीय संस्कृतीचे एक प्रधान अंग बनले आहे

पत्रिकेतील जन्मकालीन ग्रहस्थितीवरून माणसाच्या जीवनाविषयी अनेक गोष्टी आगाऊ व पुष्कळ प्रमाणात अचूकपणे सांगता येतात. अमेरिकेसारख्या प्रगत विज्ञानवादी देशातही फल-ज्योतिष हे शास्त्र आहे असे मान्य करणे चिकित्सक पंडितांनाही भाग पडावे असाच पुरावा संशोधनात उपलब्ध झाला आहे. माणसाने दैववादी व पर्यायाने निष्क्रिय व्हावे हे मात्र भारतीय संस्कृतीला अभिप्रेत नाही. या शास्त्राचे ज्ञान आणि मार्गदर्शन जीवन सुखमय करण्यास उपयुक्त ठरते असा अनुभव आहे.

पत्रिकेतील ग्रहांवरून स्त्री-पुरुषांचे स्वभाव, आनुवंशिक गुणावगुण, त्यांच्या सुप्त प्रवृत्ती, त्यांची संभोगक्षमता किंवा त्यांच्या ठिकाणच्या लैंगिक विकृती व तत्संबंधीचे व्याधी–विकार यांचा बोध होतोच होतो. वैवाहिक जीवन जगणाऱ्या स्त्री-पुरुषांना दोष व उणीवा अशा रीतीने कळून आल्यावर योग्य ते वैद्यकीय उपचार व त्यांच्या जोडीला आवश्यक त्या दैवी साधना व उपासना यांच्या सहाय्याने ते दोष, दुर्गुण, त्या उणीवा, आणि विकृती नाहीशा करता येतात. निदान त्यांचे दुष्परिणाम तरी आटोक्यात आणणे निश्चयाने शक्य होते.

सुदैवाने या संदर्भातले जे संशोधन मी सादर करणार आहे ते भारतातीलच आहे. आणि एका भारतीय संशोधकानेच ते सिद्ध केले आहे. त्यांचे शुभ नाव डॉ. जगन्नाथ राव असे आहे. डॉ. राव आपल्या विद्येत पारंगत (M. B. B. S., M. R. S. F.) व अग्रेसर आहेतच. पण त्यांचा फल-ज्योतिषशास्त्राचाही गाढा अभ्यास आहे. या शास्त्राच्या साहाय्याने त्यांनी आपले महत्त्वाचे व डोळस संशोधन केले आहे. रुग्णाच्या शारीरिक व मानसिक, वैद्यकीय तपासणीबरोबरच त्यांच्या जन्मपत्रिकांचे निरीक्षण करण्याचा त्यांचा प्रघात आहे. स्त्री–पुरुषांचे आरोग्यविषयक प्रश्न व लैंगिक समस्या यावर वैद्यकीय उपचारांच्या जोडीला पत्रिकेतील ग्रहांची स्थिती पाहून दैवी उपासनेचा अवलंब केल्यास तो फलप्रद होतो असा त्यांचा अनुभव आहे.

लैंगिक समस्या असणाऱ्या अनेक स्त्री-पुरुषांच्या कुंडल्यांचा अभ्यास करून त्यांनी त्याबद्दलचे अनुभव प्रसिद्ध केले आहेत. ( पाहा ‘ दि अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन ’ जानेवारी १९७१ ‘ अॅस्ट्रॉलॉजी अॅण्ड डिसीजेस ऑफ सेक्स ’ पान ७३. ) पत्रिकेतील सप्तम व अष्टमस्थानाचा व त्यातील ग्रहांचा स्त्री–पुरुषांच्या वैवाहिक जीवनाशी व लैंगिक सुखाशी सबंध असतो. आपल्या संस्कृतीत विवाह ठरविताना वधूवरांच्या जन्मपत्रिका पाहावयाची पद्धत आहे. पत्रिकेतील राशिकूटाला अतिशय महत्त्व आहे असे डॉ. राव यांच्या प्रत्ययास आले आहे. स्त्री–पुरुषांच्या जननेंद्रियाचे आकार व त्यांची संभोगक्षमता यांचा बोध अष्टमस्थान व त्यांतील ग्रह यावरून होतो. पत्रिकेत गण, नाडी, योनी, इत्यादींचा उल्लेख असतो. त्या प्रत्येकाला विशेष अर्थ आहे. उदा. मार्जार योनी, मूषक योनी, असा जो उल्लेख असतो तो सांकेतिक व सूचक असतो. योनीच्या या संकेतावरून ज्याची पत्रिका आहे त्याच्या जननेंद्रियाचा आकार व इतर गुणदोष यांचा बोध होऊ शकतो. अनेक स्त्री–पुरुषांच्या कुंडल्यांच्या निरीक्षणात त्यांना हे स्पष्टपणे

# १२

गरोदरपणी स्त्रीच्या मनावर शुभ संस्कार व्हावेत आणि तिच्या भोवतालचे वातावरण पवित्र, उत्साही, आरोग्यप्रद आणि आशावादी असावे याविषयी भारतीय संस्कृतीत वाढलेली आजीबाई कटाक्षाने दक्ष असते. या अवस्थेत गर्भवतीच्या हाती सात्त्विक विचारांचे साहित्य पडावे, तिच्या वृत्ती उन्नत व उल्हसित होतील अशीच रंजनाची साधने तिला उपलब्ध करून दिली जावीत, अशी आपल्या घराघरांतून जुनी रीत चालत आलेली आहे.

भारतीय संस्कृती आणि धर्म यांच्या अभ्यास व संशोधनाविषयी विद्यापीठाची उदासीन व उपेक्षेची वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. स्वाभाविकपणेच नव्या पिढीच्या पदवी-धर महिलांना संस्कृतीतील कित्येक आचारविचारांच्या मागची रहस्ये ठाऊक नसतात. एक घडलेले उदाहरण या विधानावर प्रकाश टाकील. M. A. उपाधी प्राप्त करून घेतलेली एका प्रगत मध्यमवर्गीय कुटुंबातील एक सुकन्या नुकताच विवाह होऊन गर्भवती झालेली होती. अवस्था नाजुकच होती. एके दिवशी भर दुपारी जामानिमा करून ती बाहेर निघाली. कुठल्यातरी बकाल वस्तीतील चित्रपटगृहात एक नवे चित्र लागले होते. ते पाहण्यासाठी ती निघाली होती. घरातल्या आजीबाईला राहावले नाही. तिने या नव्या पिढीच्या कन्येला हटकले. म्हणाली, 'तुझ्या या अवस्थेत उन्हातान्हाची, कुठल्यातरी वस्तीत, कसल्यातरी करमणुकीच्या नादाने जाऊ नकोस. सध्याच्या तुझ्या अवस्थेत तुला सांभाळून राहिले पाहिजे. या अवस्थेत चांगली दृश्ये, चांगले वातावरण याकडे लक्ष पुरवले पाहिजे.'—मुद्रेवरील रंगरंगोटीचे शेवटचे संस्कार पुरे करीत ती उच्च पदवीधर नात आपल्या अडाणी आजीच्या पुराण्या विचारांची कीव करीत म्हणाली, 'आजी ! आजच्या काळात तू सांगतेस तसे वागणे अशक्य आणि अवास्तव आहे. शिवाय मी जो चित्रपट पाहायला जात आहे त्याचा आज शेवटचा दिवस आहे. माझी आवडती अभिनेत्री मीनाकुमारी त्यातील प्रमुख भूमिका करते आहे. आणि शिवाय शंकर-जयकिशनचे संगीत आहे. माझ्याऐवजी तूच ज्ञानेश्वरी वाचीत बैस' असे म्हणून पादत्राणे घालून आणि आपला बटवा हाती घेऊन ती नवतरुणी घराबाहेर पडली.

महाविद्यालयातील तिच्या अभ्यासक्रमात गरोदरपणी होणाऱ्या संस्काराचे महत्त्व केवढे आहे आणि कळकळीने सांगणाऱ्या आजीबाईच्या उपदेशात पुराणमतवादापेक्षा वैज्ञानिक रहस्य कसे आहे, हे शिकविले गेले असते तर कदाचित आजीबाईचे सांगणे धुडकावून घराबाहेर पडण्याचा विचार करावयास ती धजली नसती.

पाश्चात्य देशात तज्ज्ञ वैद्यकीय संशोधकांना गरोदरपणी होणाऱ्या संस्कारांचे महत्त्व पटले आहे, ही वस्तुस्थिती अमेरिकेतील एक प्रयोगशील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. W.S. क्रोगर याने आपल्या या विषयाच्या संदर्भातील एका लेखात उघड केली आहे. गरोदरपणी स्त्रीच्या मनावर होणारे संस्कार तिच्या पोटात वाढणाऱ्या बालकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावरच नव्हे तर त्यापलीकडचे दूरगामी परिणाम घडवून आणतात याचा पडताळा आल्यामुळे सध्या अमेरिकेतील अनुभवी वैद्य गरोदरपणीच्या संस्कारांना नितान्त महत्त्व देतात.

कित्येक बालकांच्या ठिकाणी त्यांच्या वयाच्या मानाने जी असाधारण गुणवत्ता दिसून येते, तिचा उगम कशात आहे याचा शोध घेताना संस्कारांचे हे महत्त्व अनेक प्रकारे तज्ज्ञांच्या प्रत्ययास आले आहे. पूर्वजन्म व पुनर्जन्म न मानणाऱ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांना अशा बालकांच्या विशेष गुणवत्तेचा उगम मातेच्या गरोदरपणात होणाऱ्या संस्कारांशी संबंधित आहे असे दिसून आले.

गरोदरपणी होणाऱ्या संस्कारांचे परिणाम किती व कसे होतात यावर वास्तवाचा प्रखर प्रकाश टाकणारी दोन इतिवृत्ते अवश्य ऐकावीत अशी आहेत. पहिला वृत्तांत सर फ्रॅन्सिस गाल्टन यांनी 'नेचर' नावाच्या नियतकालिकात प्रसिद्ध केला आहे. दुसऱ्या क्रमांकाचे इतिवृत्त डॉ. क्लाडियस, मॅरटन M. D. या तज्ज्ञाने 'द मेडिकल न्यूज' या नियतकालिकात प्रकाशित केले होते.

(१) कर्नलच्या पदावर असलेला एक अधिकारी रूपाने, स्वभावाने, प्रकृतीने निकोप-निर्दोष. केव्हाही आणि कोठेही स्वतःचे किंवा दुसऱ्या कोणाचे दुखावलेले किंवा रक्ताळलेले नख पाहिले की तो कावराबावरा होई. त्याला घाम फुटे, आणि मग काही काळ त्याचे चित्त अस्वस्थ होऊन जाई. या आपल्या वैगुण्याची त्याला विलक्षण खंत वाटे. या प्रकाराचा उगम कशात आहे. याचा शोध घेताना एक विलक्षण रहस्य उघडकीस आले. त्याची आई त्याच्यावेळी गरोदर होती; त्या नाजूक अवस्थेत एके दिवशी अभावितपणे तिचे बोट कुठेतरी चेंगरले. तिचा जीव कळवळला. त्या वेदनांचे दुःख पोटात वाढणाऱ्या जिवापर्यंत जाऊन पोहोचले अशी तिची भावना झाली. आईकडून सत्य घटनेचे हे रहस्य कळल्यावर त्या अधिकाऱ्याला आणि त्याच्यावर उपचार करणाऱ्या वैद्यांनाही नवल वाटले.

(२) एका तरुणाचा त्याची गरोदर पत्नी त्याच्या समवेत असताना कोणीतरी गोळी घालून प्राण घेतला. गोळी छातीला भोक पाडून गेली. त्या दुर्घटनेचा इतका खोल ठसा तिच्या अंतःकरणावर उमटला की ती गोळी आपल्या पतीला लागली नसून आपल्या

पोटात वाढणाऱ्या पतीच्याच बालरूपाला लागली आहे असे तिला वाटले. तिची पूर्ण खात्री होती की प्रसूत झाल्यावर ज्या ठिकाणी पतीला गोळी लागली होती त्या शरीराच्या भागावर गोळी लागल्याचा वण बाळाच्या अंगावर उमटलेला असणार. तिच्या भ्रममूलक भीतीची थट्टा उडवणाऱ्या डॉक्टरांनी जेव्हा तिचे मूल प्रत्यक्ष पाहिले तेव्हा ते आश्चर्याने अवाक् झाले. ज्या ठिकाणी तिच्या पतीला गोळी लागली होती त्याच छातीच्या जागी गोळी लागल्यासारखा तांबडा स्वच्छ वण बालकाच्या अंगावर दिसून आला !

माझ्या व्याख्यान-प्रवचनांतून ही इतिवृत्ते मी नेहमी सांगत असतो. अगदी परवा परवा ता. ७ व ८ सप्टेंबर १९७२ या दिवशी, येरवडा बंदीशाळेतील एका अधिकाऱ्याच्या घरी, हृषिकेश येथील स्वामी शिवानंद यांच्या जन्मतिथीनिमित्ताने माझे व्याख्यान होते. गरोदरपणीच्या संस्कारांचे महत्त्व विशद करताना वर दिलेली माहिती मी स्वाभाविकपणे सांगितली. तिचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर नेहमीप्रमाणेच प्रभावी ठरला. व्याख्यान आटोपल्यानंतर एका अधिकाऱ्याने या संदर्भात आपला स्वतःचा एक जिवंत अनुभव निवेदन केला. या अधिकाऱ्याचे मूळ वास्तव्य विदर्भातील चंद्रपूरजवळचे एक खेडेगाव. त्या गावात देवीचे एक पुरातन मंदिर आहे. प्रतिवर्षी नवरात्रात देवीचा उत्सव होतो. देवीच्या नवरात्र उत्सवात देवीपुढे त्यांच्या घराण्यातील पुरुषाने खांद्यावर व डोक्यावर मोठया जळत्या समया घेऊन नृत्य करावयाचे अशी पारंपरिक प्रथा आहे. प्रस्तुत गृहस्थ आपल्या आईच्या पोटात वाढत असताना एक अद्भुत घटना घडली. त्यांची आई गरोदर अवस्थेत देवीच्या उत्सवाच्या वेळी उपस्थित होती. या गृहस्थांचे चुलते कुटुंबाचे नृत्याचे व्रत पार पाडणार होते. नेहमीप्रमाणे समया पेटवून त्या खांद्यावर व डोक्यावर घेऊन ते भक्तिभावाने 'समई नृत्य' करू लागले. नृत्य रंगात आले होते. भाविक भक्त ते तटस्थपणाने पाहात होते. वातावरणात भक्तीची तन्मयता निर्माण झाली होती. अशा स्थितीत नृत्य करणाऱ्या त्यांच्या चुलत्याचा कसा कुणास ठाऊक तोल गेला आणि डोक्यावरची पेटती जड समयी आकस्मिकपणे कोसळली. त्यांच्या डाव्या कपाळाच्या कानाच्या वरच्या बाजूला ती अशा काही वेगाने लागली की त्या प्रहाराने त्या जागी खोक पडून रक्त वाहू लागले. हे अपघाती दृश्य त्यावेळी पोटात असणाऱ्या या गृहस्थांच्या मातोश्रींनी पाहिले. एक तर वंशपरंपरा चालत आलेल्या व्रतपालनाच्या शुभप्रसंगी हा आकस्मिक व्यत्यय आला होता आणि म्हणूनच तो अशुभसूचक वाटून त्यांच्या मनाला विलक्षण धक्का बसला. नृत्य गतिशील असतानाच झालेल्या आकस्मिक प्रहाराने त्यांच्या दिराला झालेला हा अपघात त्यांना सहन झाला नाही. या प्रसंगाचा त्यांच्या मनावर इतका खोल संस्कार झाला की, त्या प्रसूत झाल्यावर त्यांच्या बाळाच्या कपाळावर ज्या ठिकाणी त्याच्या चुलत्याला समयी पडून खोक पडली होती त्याच जागी अगदी तशीच खूण जन्मतःच असलेली स्पष्ट दिसून आली. ती खूण आजही त्या गृहस्थांच्या कपाळावर जशीच्या तशीच विद्यमान आहे. ती त्यांनी मला प्रत्यक्ष दाखविली. आणि माझ्या विवेचनाच्या परिपोषासाठी मला एक बोलका जिवंत

पुरावा उपलब्ध करून दिला.

पाश्चात्य देशांत पुनर्जन्म अद्याप विज्ञानाने सिद्ध झाला नाही. तरीही पुनर्जन्म असला पाहिजे आणि माणूस जन्मतः जे संस्कार घेऊन येतो–त्यांचा संबंध पूर्व जन्माशी निगडित असला पाहिजे. हे इंग्लंडमधील एका प्रयोगशील मानसोपचारतज्ज्ञ अशा धन्वंतऱ्याच्या प्रत्ययास आले आहे. त्या श्रेष्ठ वैद्यराजाचे नाव डेनिस केल्सी असे आहे. त्याची पत्नी जोन ग्रँट हीही त्याच्यासारखीच धन्वंतरी आहे. तिच्या ठिकाणी काही अतींद्रिय शक्ती विद्यमान आहेत. तिला आपल्या पूर्वजन्मीच्या काही स्मृती आहेत.

सौ. जोन ग्रँट यांनी आपल्या रुग्णालयात येणाऱ्या बालकांच्या गुणविशेषांची पद्धतशीर नोंद ठेवली आहे. तिच्या निरीक्षणात आणि प्रयोगात तिला एका सत्याचा निःसंदिग्ध साक्षात्कार झाला आहे. जन्मास येणाऱ्या कोणाही बालकाच्या–व्यक्तिमत्त्वाची आणि गुणसंस्कारांची घडण ते बालक गर्भरूप धारण करण्यापूर्वीच झालेली असते. आणि पूर्वजन्म मानल्याशिवाय या सत्याची संगती लागत नाही हे पटल्यामुळे माणूस आपले संस्कार पूर्वजन्मातूनच घेऊन येतो हा सिद्धांत तिच्या मनाशी ठाम झाला आहे.

तिचे पती डॉ. डेनिस केल्सी यांना तर एका विशिष्ट स्त्रीवर उपचार करीत असताना या सिद्धांताचा प्रत्यक्ष पडताळा मिळाला. 'मेनी लाईफ टाइम्स' (जन्म जन्मांतर) 'Many Life Times' Dr. Denys Kelsey and Dr. Joan Grant प्रकाशक Pocket Books, New York.) या आपल्या ग्रंथात त्यांनी तो निवेदन केला आहे. तो वृत्तांत थोडक्यात असा :—

डॉ. केल्सी आणि त्यांच्या पत्नी डॉ. जोन ग्रँट हे दोघेही आपल्या उपचारपद्धतीत संमोहन विद्येचा (Hypnosis) यशस्वी उपयोग करतात. रुग्णाच्या संमतीने एका विशिष्ट तंत्राचा अवलंब करून ते त्याला संमोहनावस्थेत नेतात. त्या अवस्थेत रुग्णाच्या जीवनातील भूतकाळातील घटना त्याला पुन्हा अनुभवावयास लावतात. कित्येक व्याधींचे व मानसिक दोषांचे मूळ शोधून काढणे या पद्धतीने सोपे होते. माणसाच्या मनाच्या तळी अनेक संस्कार, अनेक भावना–वासना, व्यथा–व्याधी, सुप्त व सूक्ष्म स्वरूपात दडलेल्या असतात. भूतकालीन घटनांच्या, संमोहनावस्थेतील पुनरअनुभूतीने रुग्णाला त्याच्या व्याधी व दुःखांच्या उगमांचा व कारणांचा शोध घेता येतो. आणि मग त्याच्या जाणीवयुक्त सहकार्याने व्याधिनिवारण अथवा रोगशमन सुलभ व शक्य होते.

डॉ. केल्सी यांच्याकडे पंचविशीतील एक संसारी स्त्री रुग्ण म्हणून उपचारासाठी बरेच दिवस येत होती. तिला दोन अपत्ये होती. पती अनुरूप होता. तिच्या संसारात वास्तविक दुःखाचे काही कारण नव्हते. तरीही त्या स्त्रीची वृत्ती नेहमी उदास–निराश असे. खदखदून हसणे तिला ठाऊक नव्हते. आनंदाचा अनुभव ती मनमोकळेपणाने घेऊच शकत नसे. आपल्या पोटात काही तरी बिघाड आहे अशी तिची भावना होती. दोन अपत्यांना तिने जन्म दिला होता तरीही काम–क्रीडा, संभोग यांचा तिला

स्वाभाविक उबग होता. संभोग–कामक्रीडा यांची कोठे चर्चा चालू असेल तर त्या ठिकाणी बसणे तिला असह्य होत असे. या तिच्या एक प्रकारच्या विकृतीमुळे पतीच्या प्रेमाचा मनमुराद सुखानुभव तिच्या वाट्यास येत नसे. आपण या जगात उगीचच जन्माला आलो. जन्माला येतानाच आपल्या हातून काहीतरी प्रमाद घडला आहे या अपराधी भावनेचा प्रबळ पगडा तिच्या मनावर बसून ठसून गेला होता.

डॉ. केल्सी यांनी तिच्यावर तिच्या संमतीने आणि सहकार्याने संमोहनाचा प्रयोग केला. रुग्णाला संमोहनावस्थेत भूतकाळात घेऊन जाण्याच्या प्रक्रियेला Regression असे म्हणतात. या रुग्ण स्त्रीच्या व्याधीचा उगम शोधण्यासाठी डॉ. केल्सी यांनी ती आपल्या आईच्या पोटात होती त्या अवस्थेपर्यंत तिला मागे नेले. त्या अवस्थेतील अनेक अनुभव त्यांनी तिच्या मुखावाटे वदवले. गरोदरावस्थेत पाचव्या महिन्यात गर्भाला आपल्या अस्तित्वाची चांगली जाणीव असते असा अनुभव आहे.—' आपण जगात आलो हीच मोठी चूक झाली. आपण जन्मच घ्यायला नको होता. ' या त्या रुग्ण स्त्रीच्या अपराधी भावनेचा उगम शोधण्यासाठी पाचव्या महिन्याच्याही मागच्या अवस्थेत तिला नेले पाहिजे, असे डॉ. केल्सी यांना वाटले. ती स्वतःही या बाबतीत डॉक्टरांशी सहमत होती डॉ. केल्सी यांनी त्या रुग्ण स्त्रीला तिच्या आईला गर्भधारणा ज्या क्षणी झाली त्या अवस्थेपर्यंत कौशल्याने नेले आणि त्या प्रसंगाची अनुभूती संमोहनावस्थेत त्या स्त्रीने रेखीवपणे निवेदन केली.

संमोहनावस्थेत ती रुग्ण स्त्री म्हणाली, ' मी म्हणजे आता एक सूक्ष्म बिंदू–एक ठिपका–आहे, असे माझे स्वरूप मला जाणवत आहे. मी एका अगदी आकुंचित जागेत आहे. '

—थोडा वेळ स्तब्ध अवस्थेत निघून गेल्यावर ती अचानक उद्‌गारली, ' हं ! आता माझ्या भोवतालचे क्षेत्र विस्तारले आहे. सूक्ष्म बिंदुरूप असलेली मी एका वस्तूला स्पर्श करण्याच्या विचारात व तयारीत आहे. पण ज्या वस्तूला मला स्पर्श करावयाचा आहे ती स्थिर नाही. ती एकसारखी भिरभिरती गतिमान आहे. माझ्यापासून ती दूर जाते आहे. '—

थोडा वेळ ती रुग्ण स्त्री शांत राहिली आणि मग संमोहनावस्थेतच आपले डोके दोन्ही हातांनी गच्च धरून ती एकदम पुन्हा उद्‌गारली. तिच्या त्या उद्‌गारात व्यथा होती, कष्ट होते. ती म्हणाली, ' शेवटी त्या वस्तूला मी एकदाचा स्पर्श केला. पण मी तसे केले नसते तर बरे झाले असते. त्या भिरभिरत्या वस्तूला मी स्पर्श करायला नको होता– नको होता ! माझी ती चूक झाली. अगदी चूक झाली ! '

डॉ. केल्सी यांनी त्या रुग्ण स्त्रीला पुन्हा पूर्ववत वर्तमान अवस्थेत आणली. तिने वर्णन केलेला प्रसंग हा तिच्या आईच्या ठिकाणी गर्भधारणा झाली तो क्षण होता असे डॉ. केल्सी यांच्या ध्यानी आले.

सुदैवाने या रुग्ण स्त्रीची आई जिवंत होती आणि या संदर्भात तिची आणि

डॉ. केल्सी यांची भेट उपकारक ठरली. तिच्या तोंडून जी माहिती मिळाली तिच्यात डॉ. केल्सी यांना आश्चर्यकारक घटनांचा शोध लागला. त्या रुग्ण स्त्रीच्या आईचा विवाह प्रेमविवाह होता. पण तिच्या सासूला आपल्या मुलाने केलेली पत्नीची निवड मान्य नव्हती. विवाहाला मोडता घालणे तिला शक्य झाले नव्हते; पण या ' बये 'पासून आपल्या मुलाला संतती होऊ नये अशी तिची इच्छा होती. त्यासाठी ती आपल्या सुनेला वारंवार भीती घालीत असे. धमकी देत असे. या घटनेचा परिणाम म्हणून गर्भारपणाबद्दल तिने एक प्रकारचा धसका घेतला होता. आपल्याला दिवस गेले तर सासू आपल्या अपत्याचे बरेवाईट केल्याशिवाय राहणार नाही या भीतीचा परिणाम तिच्या मनात खोलवर गेला होता. पतीशी समागम करीत असताना आपण गरोदर तर राहाणार नाही ना ही भीती तिच्या मनाचा थरकाप उडवीत असे.

पतिपत्नीच्या एका एकांत प्रसंगी स्त्री व पुरुष बीजांचा शुक्र-शोणिताचा संयोग घडला. गर्भधारणेच्या त्या क्षणी गर्भरूप घेणाऱ्या तिच्या अपत्याला सूक्ष्म बिंदु-स्वरूपात गतिमान वस्तूला धरावे की न धरावे असा संदेह निर्माण झाला. शेवटी ती वस्तू त्या सूक्ष्म बिंदूने पकडली. (म्हणजेच स्त्री बीज व पुरुष बीज यांचा संयोग झाला.) आणि हे कृत्य आपण उगीचच केले ही भावना त्या सूक्ष्म बिंदूला त्या अवस्थेतही प्रकर्षाने जाणवली.

डॉ. केल्सी यांना त्या रुग्ण स्त्रीच्या उदासवृत्तीचा व भीतिग्रस्ततेचा उगम सापडला होता. तिच्या आईची गर्भधारणेविषयीची भीती, गर्भधारणेच्या क्षणी प्रबळ होती आणि तिचा परिणाम संस्कार रूपाने जन्माला येणाऱ्या अपत्याच्या–या मुलीच्या वृत्तीत संक्रांत झाला होता.

डॉ. केल्सी यांनी ही वस्तुस्थिती त्या रुग्ण स्त्रीच्या ध्यानी आणून तिच्या भीतीच्या उगमाचे दर्शनच तिला घडविले. याचा परिणाम असा झाला की आपली भीती निराधार आहे, उदासीनता अवास्तव आहे हे तिला पुरेपूर पटले. या शोध-बोधामुळे तिची उदासीनता हळूहळू मावळली आणि आनंदमय नवजीवनाचा अनुभव तिच्या वाट्यास आला.

या वृत्तांतातील गाभ्याची गोष्ट तेवढी मी याठिकाणी थोडक्यात निवेदन केली आहे. डॉ. केल्सी यांचे संशोधन अत्यंत महत्त्वाचे व मोलाचे आहे. या विषयाच्या अभ्यासकांनी डॉ. केल्सी यांचा ग्रंथच मुळातून अवश्य वाचावा. विशेषतः पृष्ठे ४० ते ४६–४८ ही अवश्य पाहावीत.

वरील तीनही अधिकृत इतिवृत्ते जितकी अद्‌भुत तितकीच वास्तव आहेत. भारतीय संस्कृतीत वाढलेली आजीबाई परंपरेने चालत आलेले जे ज्ञान व अनुभव सांगते त्याच्या मागे सत्याची, आणि शास्त्रीयतेची बैठक असते याची साक्ष वरील घटना स्पष्टपणे देतात.

० ० ०

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी जेथे मुस्लीम संस्थान होते अशा एका प्रसिद्ध गावी माझे व्याख्यान होते. विषय, ‘ भारतीय संस्कृती ’ हाच होता. व्याख्यानाचा अपेक्षित इष्ट परिणाम झाला. व्याख्यान संपल्यावर शुभ्र दाढीचा भव्य देहयष्टीचा एक खानदानी मुसलमान गृहस्थ मला मुद्दाम भेटण्यास आला. व्याख्यानाची मनःपूर्वक प्रशंसा करीत तो आपल्या घनगंभीर वाणीने उर्दू भाषेत बोलू लागला :

“ वाह साहब। आपने बहोत ही अच्छा लेक्चर झाडा। आपके अगले व्याख्यानमें बताने लायक एक बात मैं आपको बताना चाहता हूँ। क्या कहें साब ! ये अंग्रेज बडे खतरनाक थे। इन्होंने हमारे रस्मों रिवाजोंका सत्यानाश कर डाला। देखो साहब ! आप जगह जगह घुमते हैं। आप तो देखते होंगे, नन्हे मुन्हे फूल जैसे बच्चोंको आजकाल क्या बीमारी होती है ? पोलिओ होता है। हम तो बर्दाश्त नहीं कर सकते। क्यों होता है ये पोलिओ ? कोई सोचता है ? साब ! आप सुनकर ताज्जुब करेंगे। हमारे खानदानमें आजतक किसी भी बच्चेको ये खतरनाक बीमारी नहीं हुई है। क्यों ? जानते हैं ? हमारी कितनी पिढीयाँ यहाँ गुजर गयीं। हमारे घरमें जब बच्चा पैदा होता है तो कोई भी स्त्री अस्पतालमें नहीं जाती है। हमारे घरमें जब बच्चा पैदा हो जाता है तो कुछ दिनों तक उस बच्चे को और उसकी माँ को एक घरेलु दवाई पिलाई जाती है। उस दवामें ऐसा जादू है की वो पीनेवाले किसी बच्चेको पोलिओ हरगिज नहीं होता। वो क्या दवा है मालूम है ? ” त्यावर मी हसत म्हटले, “ भला मैं कैसे जानूं ? आपही बतानेवाले हैं। और मैं सुननेवाला हूँ। ” तो वृद्ध मुसलमान पुढे म्हणाला, “ हां तो सुनिये साब ! शहदमें सोना घिसकर उस बच्चेको पिलाया जाता है। न मालूम ये रिवाज हमारा है या हिंदूओंसे लिया हुआ है। लेकिन है देसी और बिलकुल फायदेमंद। ”

आस्थेवाईकपणाने त्या वृद्ध मुस्लिमाने सांगितलेल्या त्या अमोघ रसायनाबद्दल अधिक माहिती मी शोधू लागलो. आजही बाळबाळंतिणीला ऊन पाण्यात सोन्याची बांगडी किवा दुसरा एकादा सोन्याचा अलंकार बुडवून ते सुवर्णमिश्रित पाणी प्यावयास देण्याची पद्धत रूढ आहे. असे अनेक अनुभवी गृहिणींनी आणि माझ्या पत्नीनेही मला सांगितले. आयुर्वेदात यासंबंधी काय माहिती मिळते याचाही मी शोध घेतला. स्त्रिया सुवर्णाचे विविध अलंकार देहाच्या विशिष्ट भागावर वापरतात. त्यातील मूळ हेतू श्रीमंतीचे प्रदर्शन किंवा सौंदर्यवर्धन हा नसून आरोग्यवर्धन आणि रोगप्रतिबंधन हा आहे हे माझ्या ध्यानी आले. सुवर्णाचे अनेक औषधी उपयोग वैद्यक शास्त्राला ठाऊक आहेत. स्त्रिया आपल्या देहावर ज्या ज्या जागी सुवर्णालंकारांचा वापर करतात त्या भागी किंवा जागी सहसा त्वचारोग उद्‌भवत नाहीत.

हैद्राबादच्या निजामाच्या स्वयंपाक्याला पाक सिद्धीत वापरण्यासाठी एक व त्याचा पगार म्हणून एक अशा दोन सुवर्ण मोहरा प्रत्यही दिल्या जात. असे ऐकिवात आहे. निजामासारख्या गर्भश्रीमंताच्या अन्नभोजनात सुवर्णाचा उपयोग हेतुपूर्वक केला

जात असे. या विषयासंबंधी आणखी संशोधन करता सुवर्णाचा त्या वृद्ध मुस्लीमाने सांगितलेला उपयोग हा आपल्या धार्मिक वा सांस्कृतिक जातक संस्कारातच अंतर्भूत केलेला आहे असे आढळून आले. लहान बालकाच्या जिभेवर सुवर्णाची काडी मधात बुडवून तिने ॐ कार काढण्याची प्रथा कित्येक ठिकाणी प्रचलित आहे. सुवर्णाचे हे अनेकविध अमोलिक महत्त्व आज आपल्याला माहीत नाही आणि त्याच्या वापरामागचे मूळ रहस्यही अज्ञातच आहे.

सुवर्णाच्या औषधी गुणांवर प्रकाश टाकणारे अद्‌भुत संशोधन अमेरिकेत झालेले नुकतेच माझ्या वाचनात आले. समाधी अवस्थेत जाऊन अतींद्रिय सामर्थ्याच्या साहाय्याने अनेक दुःसाध्य व्याधींवर अचूक उपचार सुचविणारा एक अलौकिक गृहस्थ अमेरिकेत होऊन गेला. त्याचे नाव 'एडगर केसी'. तो एक सामान्य माणूस होता. पण देवाने त्याला ही एक अद्‌भुत सिद्धी दिली होती. त्याने सांगितलेले औषधी व अन्य उपचार व उपाय रामबाण ठरतात असे कित्येक निष्णात व अनुभवी वैद्यांनाही आढळून आले होते. एकदा समाधी अवस्थेत 'एडगर केसीने' लवकर बऱ्या न होणाऱ्या शरीरव्रणांवर एक उपाय सुचविला. तो अमेरिकेत तरी विचित्र आणि जगावेगळा मानला गेला, लवकर बऱ्या न होणाऱ्या व्रणांवर सोन्याच्या वर्खाच्या किंवा जरीच्या मलमपट्या बांधाव्यात हा तो उपाय होता. डॉ. जॉन. पी. गॅलाघेर आणि डॉ. चार्लस् एफ् गेसचिकटेर यांनी व्रणपीडितांवर आपल्या रुग्णालयातून हा प्रयोग करून पाहिला. या अद्‌भुत मलमपट्या पाहण्यासाठीच रुग्णालयात गर्दी उसळली. मलमपट्यांच्या वापराने गुण मात्र निश्चित आला. जे व्रण बरे होण्यास कित्येक दिवस लागत ते या उपायाने अगदी अल्पावधीतच बरे होतात, असे आढळून आले.

समाधी अवस्थेत केसीने, 'गोल्ड क्लोराईड' ( सुवर्णभस्म ) या औषधाचे उपयोग सांगितले. संधिवातातून उद्‌भवणाऱ्या अनेक पीडांसाठी आणि मानवी शरीरातील झिजून निर्बल झालेल्या इंद्रियांना नवचैतन्य Rejuvination लाभण्यासाठी सुवर्णभस्म प्रभावी ठरेल असा त्याने निर्वाळा दिला. तज्ज्ञ वैद्यांनी केलेल्या प्रयोगात त्या औषधाचा त्या त्या व्याधीवर अचूक उपयोग होतो, याचा प्रत्यय आला. सुवर्णाच्या ठिकाणी असणाऱ्या या औषधी गुणांना आणि तद्विषयक अभिनव प्रयोगांना 'वॉशिंग्टन स्टार' या प्रसिद्ध नियतकालिकाने ५ सप्टेंबर १९६५ च्या आपल्या अंकात प्रमुख स्थान दिले. सुवर्णासंबंधी केले गेलेले हे प्रयोग त्यानंतर 'जर्नल ऑफ दि अमेरिकन मेडिकल असोसिएशन' या नियतकालिकात अधिकृतपणे प्रकाशित झाले.

या संदर्भात भारतीयांना स्वाभाविकच हेमगर्भ मात्रेचे स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही. पण अमेरिकेतील हे सुवर्णविषयक संशोधन ही देखील आमच्या सांस्कृतिक आचारविचारविषयक उदासीनतेवर एक सुवर्णमात्राच ठरावी अशा स्वरूपाचे आहे. सुवर्णाच्या सद्‌गुणांबद्दलचे हे परदेशी इतिवृत्त वाचल्यावर भारतीय संस्कृतीतील अडाणी

आजीबाई जे आचारविचार जतन करते व नव्या पिढीला शिकविते त्यामागे जीवन-समृद्धीचा केवढा मोठा विचार आहे आणि भारतीय संस्कृती कशी वैज्ञानिक मूल्यांवर आधारलेली आहे हे स्पष्ट ध्यानी येते.

□ □ □

# १३

भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्म यांत प्रतीके व संकेत यांचा वापर मोठया प्रमाणात केला गेला आहे. कित्येक वेळी ही प्रतीके किंवा संकेत यांची मूळ रहस्ये लोप पावतात आणि कालांतराने त्यात विकृतीही निर्माण होते. म्हणून अशी प्रतीके, संकेत, रूपके, यांच्यावरील धूळ झाडणे, पुटे नाहीशी करणे आणि त्यांच्या मूळ अर्थांचा व रहस्याचा मागोवा घेणे अत्यंत आवश्यक ठरते. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक आचार-विचारामागे (१) वैद्यक (२) योग व (३) ज्योतिष ह्या त्रिवेणीचे अधिष्ठान असतेच असते असे मी वारंवार लिहिले आहे, प्रत्यक्ष उदाहरणांनी सिद्ध केले आहे.

भगवा ध्वज हा हिंदूंचा मानबिंदू. भगव्या ध्वजाचे प्राचीनत्व अनेकांनी सांगितले आहे. त्याचा आकार व रंग कसा सार्थ, सहेतुक व प्रेरक आहे याबद्दलही अनेकांनी लिहिले आहे, सांगितले आहे. भारतीय संस्कृतीने आपल्या अध्यात्मप्रधान जीवनाचे व वैभवाचे प्रतीक म्हणून भगवा ध्वजच का निवडला यामागचे योगविषयक रहस्य फारच थोडयांना ठाऊक असण्याचा संभव आहे.

समाजात खरे सुख व शांती नांदावयाची असेल तर मानवी जीवनातील सर्वांत अनर्थकारी शत्रू जो काम त्याच्यावर नियंत्रण ठेवणे अगत्याचे आहे. अनेक अनर्थांचे मूळ काम आहे. असा हा काम आणि त्याचाच सहोदर असलेला क्रोध यांना ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञाननिधींचे भुजंग, विषयदरीचे वाघ आणि भजनमार्गीचे मांग, अशी संबोधने बहाल केली आहेत. विवेक आणि संयम हा आमच्या संस्कृतीचा प्राण आहे.

भगव्या ध्वजाचा भगवा रंग हा विरक्तीचा रंग नव्हे. या रंगाचा उगम योग-शास्त्रात आहे. मानवी देहातील चैतन्यकेंद्रांपैकी मूलाधार हे नावाप्रमाणेच मूळ व आधारचक्र आहे. या चक्राचे स्थान जननेंद्रिय व गुद यांमधील शिवण हे आहे. आपल्या भगव्या ध्वजाचा रंग ऋषिमुनींनी या चक्रावरून घेतला आहे. मुळांत हा रंग सोनेरी पिवळा आहे. पण आरक्त व भगवा या त्या रंगाच्या जवळच्या छटा आहेत. मूलाधार चक्र हे ‘ काम-केंद्र ’ आहे. याच ठिकाणी, चैतन्य-चक्रवर्तीची शोभा, कुंडलिनी जगदंबा, ही सुप्तावस्थेत असते, या चक्रावर संयम करणे म्हणजेच कामाला-विषयवासनेला

आटोक्यात ठेवणे. कामप्रवृत्तीचे नियंत्रण हेच समाजस्वास्थ्याचे रहस्य होय. आणि या रहस्याचे चिरस्मरण असावे म्हणूनच या चक्राचा रंग आपल्या पवित्र ध्वजासाठी संस्कृतीच्या प्रवर्तकांनी निवडला. कामप्रवृत्तीचे संयमन करणारा समाज अधोगतीला जाण्याची शक्यता फार कमी असते. भगव्या ध्वजामागचे हे योग–रहस्य प्रत्येक भारतीयाला ठाऊक असले पाहिजे. पीतांबर हा शब्द आपल्याला ठाऊक आहे. पण त्यामागचे ‘ रहस्य ’ मात्र अज्ञात आहे. पीतांबर म्हणजे सोनपिवळे रेशमी वस्त्र. धार्मिक क्रिया व समारंभांच्या वेळी शुद्ध–पवित्र म्हणून ते वापरावयाचे असते. पण पीतांबराचा खरा अर्थ माहीत नसल्यामुळे कसलेही कळकट मळकट पिवळे (किंवा मग कुठल्याही रंगाचे) कद मुकटयाच्या स्वरूपाचे वस्त्र गुंडाळून आम्ही धर्म–कर्म पार पाडण्यात इतिकर्तव्यता मानतो. पीतांबर याचा मूळ ऋषिमुनींना अभिप्रेत असलेला अर्थ ज्ञानरूपी वस्त्र असा आहे. श्रीकृष्ण किंवा भगवान विष्णू हे पीतांबर परिधान करतात असे वर्णन आपण वाचतो. योगी आणि साधुसंत यांची वस्त्रेही पीत वर्णाचीच असतात. रंगासंबंधीच्या कल्पनांचा उगम योग व ज्योतिष यातून झाला आहे. ज्ञानाचा रंग सोनेरी पिवळा असा संकेत आहे. म्हणजे पीतांबर किंवा संत योग्यांची पिवळी वस्त्रे ही ज्ञानरूपी वस्त्रे असा मूळ भव्य व सखोल अर्थ संस्कृतीस अभिप्रेत आहे. पण या मूळ कल्पनेची विकृती व विटंबना आम्ही किती केली आहे हे पीतांबराचे रूढ प्रचलित अवनत रूप पाहिले की सहज ध्यानी येते.

या संदर्भात लॉब्संग–रंपा (Lobsang–Rampa) हा मूळ तिबेटमधील पण सध्या अमेरिकेत असलेला लामा योगी अधिकृतपणे काय सांगतो हेही कानावरून जावे असे आहे. ‘ The chapters of life ’ या आपल्या ग्रंथात पिवळया रंगाबद्दल तो म्हणतो की, ‘ पिवळा हा परमार्थाचा–अध्यात्माचा–रंग आहे ’ जेव्हा जेव्हा या संदर्भात पिवळया रंगाचा उल्लेख होतो त्यावेळी तो सोनेरी पिवळा हाच अर्थ नेहमी अभिप्रेत असतो. संत योगी, सत्पुरुष यांच्या मस्तकाभोवती तेजोवलय असते. स्थूल दृष्टीला ते एकदम दिसू शकत नाही. अतींद्रिय दृष्टी व सामर्थ्य असणाऱ्यांना ते स्पष्ट दिसू शकते. योग्यांची वा साधूंची साधना व सात्त्विकता जितकी अधिक तितके त्याचे तेजोवलय सुवर्णांकित असते.

व्हेरा ॲल्डर ही साधिका व लेखिका आपल्या ‘ The Finding of the third eye ’ या ग्रंथात म्हणते की, सोनेरी पिवळा हा बुध ग्रहाचा रंग आहे. बुध हा बुद्धिकारक ग्रह आहे. मेंदूचे रोग, स्नायू व मज्जातंतू यांची विफलता यावर पिवळया प्रकाशकिरणांचा उपयोग लाभप्रद ठरतो. अशा व्याधींनी पीडित असलेल्या लोकांनी आपल्या घरात पिवळया विद्युद्दीपांचा वापर करणे हिताचे ठरते. या लेखिकेच्या मतेही जेवढी बुद्धी प्रखर व ज्ञान प्रगल्भ तेवढे त्या व्यक्तीचे तेजोवलय अधिक सुवर्णरंगी सोनपिवळे असते.

बी. भट्टाचार्य या बंगाली संशोधकाने रंगाविषयी मौलिक संशोधन व ग्रंथलेखन

केले आहे. मंत्रजप प्रभावी का होतो हे विशद करताना श्री. भट्टाचार्य म्हणतात की, अंतराळातून प्रसारित होणारी प्रकाश व रंगकिरणे अवकाशात अप्रतिहत प्रवास वा संचार करू शकतात. या प्रक्रियेत मंत्राचे बळ सामावलेले आहे. 'पाहे पा ॐ तत्सत ऐसे। हे बोलणे तेथ नेतसे। जेथूनि हे प्रकाशे।–दृश्यजात ॥' हा ज्ञानेश्वर महाराजांचा सिद्धान्त या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे. या विषयाच्या विवेचनात श्री. भट्टाचार्य यांनी संजीवनी मंत्र खरोखरी कोणता यावर महत्त्वाचा प्रकाश टाकला आहे. गायत्री मंत्र व मृत्युंजय मंत्र यांचे संपुट करणे म्हणजेच संजीवनी मंत्र होय. आधी गायत्री मंत्र म्हणून मधे 'त्र्यंबकम् यजामहे' हा मृत्युंजय मंत्र म्हणणे व पुन्हा गायत्री मंत्र म्हणणे याचा अर्थ संपुट असा होतो. गायत्रीप्रमाणेच आधी मृत्युंजय, मधे गायत्री व पुन्हा मृत्युंजय असेही संपुट होऊ शकेल. भट्टाचार्यांनी मात्र आधीच्या सं टाचाच पुरस्कार केला आहे. या संपुट किंवा संजीवनी मंत्रात सर्वाधिक स्पंदने निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

भगव्या ध्वजाप्रमाणे 'हरहर महादेव' या घोषणेमागेही फार मोठे मंत्ररहस्य आहे. गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांनी हीच घोषणा का स्वीकारली आणि प्रचलित व लोकप्रिय केली हे या रहस्याचा शोध घेतल्यास सहज ध्यानी येते आणि त्यांच्या सखोल दूरदृष्टीचे कौतुक वाटते. बीजात जसे प्रचंड वृक्ष निर्माण करण्याचे सामर्थ्य असते तसेच अपरंपार सामर्थ्य बीजमंत्रांच्या किंवा मंत्रबीजांच्या ठायी असते. अशा सामर्थ्यशाली बीजमंत्रांत 'ऱ्हाम्' या बीजाचा समावेश होतो. 'रं' हे अग्निबीज आहे. 'हं' हे शिवबीज आहे. या दोन्हींचा संयोग असलेले 'ऱ्हाम्' हे सामर्थ्याचे कोठारच आहे. अशा या शक्तिशाली बीजाचा आविष्कार 'हरहर महादेव' या मराठ्यांच्या प्रसिद्ध व प्रेरक घोषणेत आहे. आणि म्हणूनच मराठ्यांच्या इतिहासात ह्या मंत्रमय घोषणेचे महत्त्व व सामर्थ्य दिसून येते. महाराष्ट्र म्हणजे बुद्धिमंतांचा देश हा अर्थही या संदर्भात ध्यानी घ्यावा. हरहर महादेव या घोषणेत मराठ्यांच्या–नव्हे हिंदूंच्या शंभू महादेवाचेच स्मरण आहे असे नव्हे तर त्या घोषणेमागे हे मंत्ररहस्य पण आहे, हे समजल्यावर त्या घोषणेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन अधिक श्रद्धामय होईल यात शंका नाही.

० ० ०

प्रतीक कल्पनेमागची मूळ शास्त्रीय वैज्ञानिक बैठक कालांतराने कशी विस्मृत, विकृत वा उपेक्षित होते, याचे एक अपूर्व उदाहरण सांगण्यासारखे आहे. शाळिग्राम शिळेच्या परंपरागत धार्मिक रूढीच्या संशोधनात ते हाती आले.

शाळिग्राम शिळा ही अत्यंत पूज्य व पवित्र मानली जाते. सुवर्णरेखा असलेला शाळिग्राम तर दुर्मिळ व म्हणूनच विशेष शुभ मानला जातो. आपल्याकडे जी शाळिग्रामपूजा प्रचलित आहे. तिच्यात काही वैशिष्ट्ये व संकेत आढळतात. शाळिग्राम

पूजेसाठी विशिष्ट संख्येने तुळशीपत्रांची आवश्यकता असते. शाळिग्राम पूजा स्त्रियांना वर्ज्य आहे असे मानले जाते.

उत्तर भारतात व विशेषतः हिमालयात शैलोदक किंवा शिलोदक नावाच्या विशिष्ट रासायनिक गुणधर्म असलेल्या पाण्याचे प्रवाह आढळतात. गंडकी नदीच्या पाण्यात आणि हृषिकेश वगैरेच्या परिसरात हे शैलोदक प्रवाह आढळतात. शैलोदक हे अत्यंत औषधी असते. या पाण्याच्या ठिकाणी असा काही गुण असतो की त्यात पडणाऱ्या द्रव्यांचे दगड बनतात. हे पाणी ज्या ठिकाणी वाहाते त्याच्या अवतीभवतीच्या जमिनीचे रूपांतर शिळांत होते. शैलोदकाचा उपयोग किमयेच्या प्रक्रियेत लोहवेध करण्याच्या कामी मुख्यत्वे होतो. या शैलोदकापासूनच शाळीग्राम शिला तयार होतात. शाळीग्राम शिला हे शाल नावाच्या किडयांचे ग्राम म्हणजे वसतिस्थान असते. त्या किडयांचे पोषण शैलोदकात विद्यमान असलेल्या विशिष्ट रासायनिक द्रव्यामुळे ( ताम्र ) होते. त्यांना लाभणाऱ्या पोषण द्रव्यांचा परिणाम म्हणून एक अद्‌भुत निसर्गलीला घडते. हे शाल नावाचे किडे मृदुकाय व मांसमय शरीराचे असतात. ते जी विष्टा टाकतात ती सोन्याची असते. ( चांदीची विष्ठा करणाऱ्या शाल किडयांची एक जात आहे असे म्हणतात.) शाळिग्राम शिलेचे रक्षण–पूजन करणाऱ्याला त्या शिळेत राहणाऱ्या किडयाच्या विष्ठेतून मिळणारे सुवर्ण सहजच प्राप्त होते. ते अत्यल्प असले तरी शिळेचे पूजन करणाऱ्याच्या उपजीविकेला ते पुरेसे होते. शैलोदकातील औषधी सामर्थ्य आणि त्यात वास करणाऱ्या शाल किडयाच्या विष्ठेतून निर्माण होणाऱ्या सुवर्णाचा ईश्वरी चमत्कार यामुळे शाळिग्रामाची पूजा पवित्र व प्रभावी मानली गेली असली पाहिजे.

गंडकीतील या शाळिग्राम शिळा पूजनीय ठरल्यावर स्वाभाविकच त्या सतत आपल्या जवळ असाव्यात असे भाविकांना वाटले असल्यास त्यात नवल नाही. गंडकी-तील ह्या शिळा अन्यत्र नेल्यावर त्यांत राहणाऱ्या शाल किडयांच्या रक्षणपोषणासाठी आवश्यक असणारी व त्यांच्या मूलस्थानी शैलोदकामुळे प्राप्त होणारी द्रव्ये कशी उपलब्ध होतील या शोधात असणाऱ्यांना ती द्रव्ये तुळशीपत्रात आहेत असे आढळून आले. तुळसीदलांची विशिष्ट संख्या शाळिग्रामावर वाहिली म्हणजे शाल किडयाला जगण्यासाठी आवश्यक असणारी पोषण द्रव्ये जी शैलोदकाने पूर्वी प्राप्त होत होती ती प्राप्त होतात असे आढळून आले. शाल किडा आपल्या विष्ठेतून सुवर्णाचा उत्सर्ग करतो हे रहस्य स्त्रियांपासून गुप्त राखणे अगत्याचे वाटल्यामुळे स्त्रियांना शालिग्रामपूजा निषिद्ध आहे असा संकेत रूढ झाला असला पाहिजे. स्त्रियांच्या स्पर्शाने या किडयाच्या ठिकाणची सुवर्णोत्सर्गाची क्रिया बंद होते असे म्हणतात. स्त्रियांच्या स्पर्शाने पारदबंधन होते. शाळिग्रामाला शंखोदकाचा अभिषेक करतात. कारण शंखोदक शालकिडयांना पोषक ठरते. दुध व पाणी ही द्रव्येही अभिषेकरूपाने त्याला पोषक ठरतात.

एक दैवत म्हणून ज्या शिलेची आपण धार्मिक भावनेने पूजा करतो त्या

शाळिग्राम पूजेच्या पारंपरिक रूढ आचारामागे एक निश्चित शास्त्रीय बैठक व वैज्ञानिक रहस्य आहे असे दिसून येते. काळाच्या ओघात मूळ रहस्य लोप पावले आणि पूजा-विधी मात्र रूढ राहिला.

संस्कृतीतील अशी अनेक रहस्ये लुप्त, सुप्त, विस्मृत वा विकृत झाली आहेत. त्यांचा डोळस शोध घेऊन त्यातील जीवनसमृद्धी व जीवनकल्याणाची मूळ बैठक वा मूल्ये शोधली व आत्मसात केली पाहिजेत.

० ० ०

माझे सख्खे मामेबंधू श्री. बळवंत महादेव गणपुले, निवृत्त मामलेदार, सध्या वास्तव्य पुणे, यांच्या कुटुंबात घडलेली पुढील सत्य घटना विचारप्रवर्तक वाटली, म्हणून ती जशीच्या तशीच निवेदन करीत आहे. श्री. गणपुले यांचे चिरंजीव श्री. गोविंदराव गणपुले यांचे कॉमर्स विषयाचे वर्ग पुण्यात सुप्रसिद्ध आहेत. श्री. बळवंतरावांना दोन नातू आहेत. दोघेही बुद्धिमान आणि अभ्यासात तल्लख आहेत. यांपैकी एका मुलाला एकदा एक विलक्षण त्रास सुरू झाला. इतर काही कारण नसताना त्याची झोप बिघडली. स्वप्ने पडू लागली आणि झोपेतून तो वारंवार उठू लागला. याचा परिणाम त्याच्या एकूण आरोग्यावर व स्वास्थ्यावर आणि पर्यायाने अभ्यासावर होऊ लागला. श्री. बळवंतराव आपल्या नातवाला घेऊन आपल्या नेहमीच्या डॉक्टराकडे गेले. डॉक्टरांनी तपासणी केली व नेहमी डॉक्टर लोक लिहून देतात तशीच एका कागदावर त्यांनी काही उपाययोजना लिहून तो कागद श्री. गणपुले यांच्या स्वाधीन केला. थोडे दिवस हा उपाय करा म्हणजे मुलाचा त्रास कमी होईल असे आश्वासन त्यांनी दिले.

डॉक्टरांनी चिठ्ठीत काय लिहिले आहे याची कल्पना नसल्यामुळे ते एखादे नेहमीसारखेच औषध असेल असे वाटून ते डॉक्टरांकडून येताना मुलासह एका औष-धाच्या प्रसिद्ध दुकानी गेले व ती चिठ्ठी त्यांनी दुकानातील सेवकाच्या हाती दिली. ती वाचून तो श्री. गणपुले यांच्याकडे आश्चर्याने पाहातच राहिला. तो म्हणाला, ' हे औषध आमच्या दुकानातच काय कोणत्याच दुकानात मिळणारे नाही. या चिठ्ठीत काय लिहिले आहे हे तुम्ही पाहिले आहे कां ? ' असे म्हणून त्याने ती चिठ्ठी परत श्री गणपुले यांच्या हाती दिली. श्री गणपुले ती वाचू लागले व मग आपली चूक त्यांच्या ध्यानी आली. त्या चिठ्ठीत डॉक्टरांनी जे जगावेगळे औषध लिहिले होते, ते औषधाच्या दुकानात मिळणे शक्य नाही, हे त्यांच्या ध्यानी आले व ते दुकानदाराची समजूत घालीत नातवासह घरी आले. त्या चिठ्ठीत डॉक्टरांनी पुढील उपाय त्यांच्या नातवासाठी लिहून दिला होता—

' या मुलाला काही दिवस सातत्याने रोज वैश्वदेवाचा भात खावयास घालावा. त्याचा त्रास दूर होईल. '

सध्या प्रत्येक घरात गॅस आलेला आहे. श्री. गणपुले यांना स्वतःला वैश्वदेव

येत होता. पण सध्या घरात तो चालू नव्हता. वैश्वदेवाचा भात कसा तयार करावयाचा या विचारात ते आपल्या घरातल्या मंडळींशी चर्चा करीत होते. तेवढ्यात कसल्यातरी धार्मिक कार्यासाठी त्याच वेळी घरी आलेले त्यांचे उपाध्याय गुरुजी यांनी घरातला संवाद ऐकला. ते हासत म्हणाले, एवढ्या चिंतेचे कारण नाही. तुम्ही रोज तांदूळ माझ्याकडे देत चला. वैश्वदेव आमचा होतो त्याबरोबर तुमचाही करीत जाईन आणि भात आणून पोचवीत जाईन !

—गुरुजींच्या या साहाय्याने प्रश्न सुलभ झाला. गुरुजी प्रत्यही वैश्वदेवाचा भात आणून देऊ लागले. तो भात तो मुलगा खाऊ लागला. सुमारे महिन्याभराच्या काळात त्या मुलाची झोपेची तक्रार दूर झाली. वाईट स्वप्ने पडणे बंद झाले आणि झोप सुधारल्यामुळे त्याचे एकूण आरोग्य पूर्ववत 'स्वस्थ' झाले. डॉक्टरांनी सुचविलेला जगावेगळा औषधोपचार फलप्रदच नव्हे तर अचूक ठरला होता.

हा वृत्तांत श्री. गणपुले यांनी मला सांगितला. असला उपचार सुचविणारे हे डॉक्टर कोण म्हणून मी चौकशी केली. डॉक्टर ओळखीचेच निघाले.

भरत-नाट्य-संशोधन मंदिराचे एक कार्यकर्ते नाट्यप्रेमी डॉ. बापट हेच श्री. गणपुले यांचे फॅमिली डॉक्टर निघाले. मी सरळ डॉ. बापट यांच्या भेटीस गेलो. त्यांना वाटले, नाटक सिनेमाचे काही काम असेल. पण मी खुलासा केला व विचारले, 'का हो डॉक्टर, आपण गणपुले यांच्या नातवाला सुचविलेला औषधोपचार कोणत्या Materia Medica च्या साहाय्याने आपण सुचविलात ? एक पदवीधर डॉक्टर वैश्वदेवाचा भात औषध म्हणून सुचवितो हे आश्चर्यच आहे !'

डॉक्टर हासत म्हणाले,—'आमच्या आजीच्या बटव्यातले ते रामबाण औषध आहे. मी त्याचा अनुभव घेऊन मगच ते देण्यास आरंभ केला. अशी पुष्कळ औषधे मला माहीत आहेत. बाटली, गोळ्या, टोचणे या उपायांनी बरे न होणारे या मुलाच्या व्याधींसारखे रोग अशा उपायांनी अवश्य बरे होतात.' डॉ. बापटांना मी धन्यवाद दिले.

ही घटना केवळ अद्भुताला आरती ओवाळण्यासाठी मी निवेदन केली नाही. वैश्वदेवाच्या भातात असे काय असावे की ज्यामुळे मुलाची व्याधी अचूक बरी व्हावी ? वैश्वदेवाच्या आचारामागच्या तत्त्वाचा-विज्ञानाचा-रहस्याचा शोध डोळसपणे घेणे अगत्याचे आहे, असे या घटनेवरून सहज सिद्ध होत नाही काय ? असे आणखी पुष्कळ आचार-विधी-व्रते आपल्या संस्कृतीत आहेत; ज्यांच्या रूढ धार्मिकतेमागे वैज्ञानिक दृष्टिकोण अवश्य आहे आणि तो आपण नव्याने शोधला-तपासला पाहिजे.

□ □ □

# १४

भारतीय संस्कृती ही ' सुखाची लिपी ' आहे. पण आज ती आपल्याला वाचता येत नाही. आजच्या गतिमान अणुयुगात विज्ञानाने मानवी जीवनात आणि मूल्यांत आमूलाग्र क्रांती केली आहे. सांपत्तिक सुस्थिती आणि वैज्ञानिक प्रगती शिगेला पोहोचलेल्या पाश्चात्य देशांतून सुख, शांती व समाधानाचा अभाव दिसून येतो. किंबहुना वैफल्य आणि विमनस्कता यांनी पाश्चात्य राष्ट्रांचे जीवन आणि स्वास्थ्य पोखरून टाकले आहे. सुखशांती–प्रीती–कशी लाभेल व टिकेल यासंबंधीचे विचारमंथन पाश्चात्य पंडित व समाजहितैषी करीत आहेत, हे माझ्या विवेचनात मी दाखविले आहे.

अमेरिकेतील एका आरोग्यकेंद्रात ५०० रुग्णांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांपैकी ३८६ रुग्ण मानसिक व्याधींनी त्रस्त असलेले आढळले. दुसऱ्या एका अशाच आरोग्यधामात आतड्यांच्या व्रणांनी अस्वस्थ असणाऱ्या रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यांत निम्म्यापेक्षा अधिक रुग्णांना चिंता आणि अतिरिक्त मानसिक ताण यामुळे ती उपाधी निर्माण झाल्याचे आढळून आले.

एका तज्ज्ञाने मानसिक अस्वास्थ्य व असमाधान यामुळे उद्‌भवणाऱ्या डोकेदुखीचे प्रमाण प्रसिद्ध केले. त्यात असे आढळून आले की, अमेरिकेत प्रत्येक माणसाचे वर्षांतून पन्नास वेळा डोके दुखते. हे प्रमाण ज्या वर्षी आढळून आले त्या वर्षी म्हणजे १९५२ साली अमेरिकेत ॲस्पिरिन या औषधाची विक्री ११ कोटी पौंडांची झाल्याची नोंद आहे. ही सर्व माहिती अमेरिकेचे एक लोकप्रिय लेखक आणि धर्मक्षेत्रातील प्रगतिशील अधिकारी श्री. नॉर्मन व्हिन्सेंट पील यांनी आपल्या The Power of Positive Thinking या जगप्रसिद्ध पुस्तकात दिली आहे.

वेग आणि भोग यांच्या अतिरेकाची प्रतिक्रिया म्हणून पाश्चात्य देशांतील संत्रस्त लोक भारतीय जीवन व तत्त्वज्ञान याकडे आशेने व अपेक्षेने पाहात आहेत. आकृष्ट होत आहेत. प्रयोगशाळांतून सुखशांती देणाऱ्या मूल्यांच्या आणि आचारविचारांच्या संदर्भात अनेक प्रकारचे संशोधन सतत चालू आहे.

भारतीय संस्कृतीतील प्रत्येक आचार, विचार व संस्कार वैज्ञानिक बैठकीवर

आधारलेला आहे. भारतीय संस्कृतीने शाश्वत अशा सुखशांतीचा सखोल व चौफेर विचार केला आहे. हे सिद्ध करणारे अनेक पुरावे मी सादर केले आहेत. धर्मकल्पना आणि रूढी यांच्या प्राबल्यामुळे संस्कृतीतील मूळ आचारविचारांच्या बैठकीवर अनेक प्रकारची धूळ साचली. पुटे चढली. ती झाडून झटकून टाकल्यावर भारतीय संस्कृतीने जीवन कल्याणाचा व जीवन समृद्धीचा शास्त्रशुद्ध विचार निश्चितपणे केला आहे असे स्पष्ट दिसून येते.

आजच्या अणुयुगात प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवरच घासून घेतली पाहिजे हे अटळ सत्य आहे. भारतीय संस्कृतीचा गौरव गाताना तिच्यातील आचार–विचार आजच्या यंत्रयुगात आपण जसेच्या तसे स्वीकारावेत असा आग्रह वेडेपणाचा ठरेल. त्यासाठी संस्कृतीतील आचार–विचार स्वीकारताना त्यांच्यातील शाश्वत मूल्यांचा गाभा ध्यानी घेऊन तो आजच्या जीवनात समाविष्ट कसा करता येईल हे पाहिले पाहिजे. पूर्वीचे आचार–विचार आणि जीवनाचे आदर्श जसेच्या तसे आचरणात आणणे आज केवळ अशक्य आहे. पण प्राचीन आचार–विचारातील मूल तत्त्व ग्रहण करून ते आजच्या जीवनाशी कसे जोडता येईल याचा विचार समाजसुधारकांनी केला पाहिजे. ज्या गोष्टी कालबाह्य ठरतील त्या निःशंकपणे बाजूस टाकल्या पाहिजेत.

माझे वरील विधान एका उदाहरणाने स्पष्ट करतो. गायत्री मंत्राच्या पाठीमागे संपूर्ण विज्ञान कसे आहे हे मी साधार सिद्ध केले आहे. हा गायत्री मंत्र ज्या व्रतबंधाच्या संस्कारात समाविष्ट आहे तो संस्कार पूर्वीच्या स्वरूपात जसाच्या तसा आचरणात आणणे आज मुळीच शक्य नाही. त्या संस्कारविधीतील गायत्री मंत्र आणि त्याची बुद्धिवर्धक साधना हा गाभ्याचा भाग आहे. स्नान-संध्या, यज्ञोपवीतधारण इत्यादि विधी न कर-ताही बुद्धीच्या प्रखरतेसाठी आणि विद्येच्या आराधनेसाठी गायत्री मंत्राचा उपयोग कसा करता येईल याचा नव्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. एखाद्या वैमानिकाने धावत्य विमानातही या मंत्राचे पारायण पुरश्चरण केले तरी त्याचा परिणाम दिसून येतो की नाही यासंबंधी डोळस प्रयोग केले गेले पाहिजेत, शोध घेतला गेला पाहिजे.

सारख्याच बुद्धिमत्तेचे दहा विद्यार्थी घेतले आणि त्यांपैकी पाच विद्यार्थी गायत्री मंत्राचा जप करणारे असतील आणि पाच विद्यार्थी जप न करणारे असतील तर त्यांच्या एका वर्षाच्या बौद्धिक कर्तबगारीत काय तफावत जाणवते हे प्रयोगाने आकडेवारीने अजमावले पाहिजे. बुद्धिमान परंतु गायत्री मंत्र न करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा गायत्री मंत्र जपणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कर्तबगारीत लक्षात येणारी विशेषता दिसून आली तर त्या आधारे गायत्री मंत्राचा प्रभाव सिद्ध करता येईल. नुसत्या जपाने साध्य होणाऱ्या बौद्धिक तेजस्वितेत स्नान, आसन, यज्ञोपवीतधारण, भस्मलेपन याने वाढ होते का हेही प्रयोगाने ठरविले पाहिजे. सारांश, नव्या जीवनाच्या संदर्भात नव्या कसोट्या लावून जुन्या आचारविचारांना कलाटणी दिली गेली पाहिजे. योग, आहार, विहार, संयम, विवेक यांना प्राधान्य देऊन नवे जीवन अधिक शांति–सुखमय कसे करता येईल याचा

विधायक विचार झाला पाहिजे.

आमचा देश दरिद्री आहे. अद्याप आमच्या समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धा कमी झालेली नाही. आमची विवाहसंस्था पाश्चात्त्यांच्या तुलनेने अजूनही स्थिर आहे. अमेरिकेसारख्या देशासारखी वैफल्याची भावना आणि मानसिक अस्वास्थ्याची परिसीमा आपल्या वाट्यास आलेली नाही. अशा वेळी भोगलालसेच्या लाटेबरोबर वाहावत जाऊन पाश्चात्त्यांचे अंधानुकरण न करता आमच्या संस्कृतीचा वैभवशाली वारसा आम्ही टिकवला पाहिजे. त्यासाठी अधिक डोळस आणि प्रयोगशील संशोधन आमच्या विद्यापीठांनी व संशोधकांनी हाती घेतले पाहिजे. असे झाल्यास पाश्चात्त्यांना ज्यांची उणीव भासते ती सुख-शांतिप्रद शाश्वत मूल्ये आपण टिकवू शकू. नव्या दृष्टीने ती आचरणात आणून आपले जीवन अधिक समृद्ध व निरामय करू शकू असा विश्वास मला तरी वाटतो.

पाऊण शतकापूर्वी स्वामी विवेकानंदांनी एक भविष्यवाणी उच्चारली होती. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या शोधांमुळे पाश्चात्त्यांच्या जीवनाला एक नवा वेग आणि एक नवे तेज मिळाले आहे. हे जसे त्यांना दिसले होते तसेच वैज्ञानिक विकासामुळे आणि यंत्र-तंत्रांच्या शोधांमुळे पाश्चात्त्यांच्या जीवनातील ईश्वर, धर्म, नीती इत्यादी श्रद्धांना आणि मूल्यांना तडा गेल्याचे त्यांच्या ध्यानी आले होते. आध्यात्मिक अधिष्ठानाचा अभाव असलेली पाश्चात्त्यांची केवळ भौतिक संस्कृती व प्रगती, जीवनात आवश्यक असलेली चिरंतन सुखशांती टिकवू शकणार नाही, हे सत्य त्यांच्या ध्यानी आले होते. धार्मिक किंवा आध्यात्मिक अधिष्ठानाची जोड मिळाली नाही तर पाश्चात्त्यांच्या भौतिक ऐश्वर्याचा डोलारा कोसळल्यावाचून राहणार नाही. हीच भविष्यवाणी त्यांनी त्यावेळी उच्चारली होती. पाश्चात्त्यांना–विशेषतः अमेरिकेला– वैज्ञानिक विकासाबरोबर शाश्वत जीवनमूल्यांसाठी, खऱ्या सुखशांतीच्या लाभासाठी भारतीय ऋषिमुनींच्या ज्ञानातून आणि तपस्येतून निर्माण झालेल्या अद्वैत वेदांताच्या तत्त्वज्ञानाची–धर्माची, अध्यात्मशास्त्राची–थोडक्यात 'ब्रह्मविद्ये'ची जोड देण्यावाचून तरणोपाय नाही, अशी सिद्धवाणी त्यांनी उच्चारली होती. ती अक्षरशः खरी ठरली असल्याचा प्रत्यय येतो आहे.

अमेरिकेतील बुद्धिवादी, विचक्षण-विचारवंतांना देखील मानवी जीवनाला अध्यात्माचे अधिष्ठान आवश्यक आहे हे पुरेपूर पटले आहे. या विधानावर प्रकाश टाकणारे एकच उदाहरण बोलके ठरेल. गणकयंत्राचा जनक ( Fathhr of computers ) अशी पदवी असलेला एक अमेरिकन शास्त्रज्ञ व्हॅनिव्हर बुश याने, वर्तमान आणि भावी मानवी जीवनविषयक आपले विचार आणि सिद्धांत व्यक्त करणाऱ्या लेखांचा संकलनात्मक असा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. या आपल्या ग्रंथाला या थोर शास्त्रज्ञाने दिलेले 'सायन्स इज नॉट इनफ्' हे शीर्षकच अत्यंत स्फोटक आहे. प्रत्यक्ष प्रत्ययावाचून एकही पाऊल पुढे न टाकणारा हा शास्त्रज्ञ अध्यात्माच्या आवश्यकतेसंबंधी काय उद्गार काढतो त्याचा हा एकच नमुना पाहा—

'To deny that there is any validity beyond the findings of science is absurd.

In fact to pursue science rightly, is to furnish a frame work on which the spirit may rise'

विज्ञानाचे सिद्धान्त ही ज्ञानाची परिसीमा नव्हे. विज्ञानाच्याही पलीकडे-माणसाच्या बुद्धीला न उलगडलेले आणि दृष्टीला न दिसलेले सत्य व तथ्य असले पाहिजे हे न मानणे यासारखी भ्रांती नाही.

आध्यात्माच्या अधिष्ठानाची आधारशिला उभी करणे यातच विज्ञानाच्या प्रगतीचे सार्थक आहे

('Science is not enough', By Vannever Bush, Perspective series no. 1; Vakils and Feffer and Simons Pvt. Ltd., Hague Bldg., Sprott's Road, Ballard Estate, Bombay.)

जीवनपरावृत्ती--निवृत्ती-म्हणजे धर्म नव्हे. साक्षेपाने पुरुषार्थाने आणि संपूर्ण आनंदमयतेने जगणे म्हणजेच खरे धर्मपालन, हे तत्त्व नव्या भारताने मनात रुजवले पाहिजे. मोक्ष, निर्वाण, म्हणजे आकाशापलीकडची एखादी काल्पनिक जागा किंवा अवस्था नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण संपूर्ण विकास हे ध्येय ठेवून त्यासाठी केलेली पराक्रमाची पराकाष्ठा व निःस्वार्थी सेवा म्हणजेच मोक्ष-निर्वाण-ही नवी व्याख्या आम्ही स्वीकारली पाहिजे. डॉ. राधाकृष्णन् यांनी या संदर्भात काढलेले पुढील उद्गार आम्ही शिरोधार्य मानावेत अशा योग्यतेचे आहेत. ते म्हणतात—

Moksha, Nirvana, eternal life are not an escape from life but the realisation of life's fullest possibilities; The perfection of personality.

Religion is not only the way to God but the way to man. It is a way of active service.

भ्रातरो मनुजाः सर्वे । स्वदेशो भुवनत्रयम् ।।

ही भारतीय संस्कृतीची विश्वव्यापक बैठक आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानात हेच सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य उद्घोषित केले आहे. किंबहुना आपल्या पसायदानाच्या रूपाने त्यांनी मानवतेच्या हाती शाश्वताचा अमृतकुंभच दिला आहे. आमच्या या वैभवशाली वारशाचे मोलमान पाश्चात्त्यांच्या प्रयोगशाळांतून विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध होत आहे. आम्ही मात्र भ्रांतीने फसव्या आदर्शांच्या मागे लागून हा अमृतकुंभ लाथाडीत आहोत. कोणत्याही स्वरूपात का असेना, अद्याप आमची संस्कृती स्त्रियांनी टिकविली

आहे. त्या संस्कृतीतील मूल्ये मानवतेला सुखशांती आणि समाधान यांचा लाभ करून देण्यास कशी समर्थ आहेत यावर स्वच्छ प्रकाश टाकणारे अनेक शास्त्रीय प्रयोग व अधिकृत अद्ययावत शोध माझ्या विवेचनात मी सादर केले आहेत.

भारतीय संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान यांच्या डोळस संशोधनाने आणि प्रत्यक्ष आचरणाने आजची आणि उद्याची मानवता, वैफल्य आणि विमनस्कता यांच्या काळोखातून मुक्त होऊन सुख-शांतीच्या अमृतात न्हाऊन निघेल एवढे सामर्थ्य ऋषिमुनींच्या या भारतीय धर्म, संस्कृती व तत्त्वज्ञानात निश्चित आहे. त्यासाठी आम्ही भारतीयांनी मात्र नव्या डोळस संशोधनाची कास धरली पाहिजे. आमच्याजवळ जो अमोल सांस्कृतिक ठेवा आहे त्याचे चैतन्यमय व जीवनकल्याणकारी मूळ-सत्य-स्वरूप, त्यावर साचलेली अज्ञानाची, अपसमजांची, विस्मृतीची आणि विकृतीची सारी पुटे-जळमटे, कवचे झाडून-मोडून-फोडून-नीट न्याहाळले पाहिजे, आत्मसात केले पाहिजे. त्यासाठी आज आपल्याला परिचित नसलेली-विस्मृत झालेली- 'सुखाची लिपी' आपण नव्याने अभ्यासिली, गिरवली पाहिजे. आजच्या गतिमान युगात जुन्या मूल्यांचा गाभा नव्या कौशल्याने उपयोगून माणुसकीची मशागत करून केवळ आपलेच नव्हे तर साऱ्या विश्वाचे, आजच्या आणि उद्याच्या मानवतेचे जीवन, सुख-शांतिमय आणि निरामय कसे होईल याचा शास्त्रशुद्ध विचार केला पाहिजे. असे आपण केल्यास—

सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वेऽसन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।

ही आपल्या तपोधन ऋषिमुनींची प्रार्थना साकार, चिरंजीव केल्याचे श्रेय आपल्याला लाभेल.

□ □ □

# संदर्भ आणि टीपा

पृष्ठ १ :—‘ सुखाची लिपी ’

हे शब्द ज्ञानेश्वर महाराजांचे आहेत. देवनागरी लिपी, रोमन लिपी हे शब्द आपल्याला परिचित आहेत; पण ‘ सुखाची लिपी ’ म्हणजे काय ? याची आपल्याला कल्पना नाही. संस्कृती–विशेषतः–भारतीय संस्कृती ही–‘ सुखाची लिपी ’ आहे असे या ग्रंथात प्रतिपादन केले आहे.

‘ सुखाची लिपी ’ हे शब्द ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत, तिसऱ्या अध्यायाच्या ३७ व्या श्लोकावर केलेल्या भाष्यात वापरले आहेत. काम, क्रोध हे माणसाचे नुसते शत्रूच नव्हेत तर ते कृतान्तासारखे आहेत. त्यांना जिंकल्याशिवाय अध्यात्मात–आत्मलाभाच्या साधनेत प्रगती होणे अशक्य आहे. कामक्रोधांचा विघातक पराक्रम वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात–या कामक्रोधरूपी दुष्टांनी ‘ साध्वी शांती नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तियेकरवी बिटाळविली। साधुवृंदे। २५१।३. इही बोधाची रोपे लुंचिली। ‘ सुखाची लिपी ’ पुसिली। जिव्हारी आगी सूदली। तापत्रयाची। २५४।३.

या वर्णनातील–‘ सुखाची लिपी ’ हे शब्द कोणाचेही लक्ष वेधून घेतील इतके अर्थपूर्ण, आकर्षक आणि तितकेच सुबोधही आहेत.

भारतीय संस्कृतीला ‘ सुखाची लिपी ’ या ज्ञानेश्वरांच्या शब्दांनी मी संबोधिले आहे. तशीच संस्कृतीची एक सोपी आणि सुटसुटीत व्याख्या माझ्या चिंतनात स्फुरली आहे. प्लेटोपासून रामकृष्ण मठाचे स्वामी रंगनाथानंद यांच्यापर्यंत अनेकांच्या संस्कृतीच्या व्याख्या मी वाचल्या–अभ्यासिल्या. कमीत कमी शब्दात अधिकात अधिक अर्थ—तोही सर्वाधिक सोपेपणाने व्यक्त करील अशी संस्कृतीची व्याख्या मी शोधीत होतो. भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी शेत चांगले पिकावे यासाठी रात्रंदिवस झटतो. राबतो. त्या शेताची मनोभावे मशागत करतो. संस्कृतीतही अशीच मशागत अपेक्षित असते. म्हणूनच माणुसकीची मशागत म्हणजेच संस्कृती अशी व्याख्या मला सुचली. आणि ती मला अत्यंत समर्पक वाटली. संस्कृतिविषयक माझ्या व्याख्यानांना–‘ सुखाची लिपी ’–किंवा ‘ माणुसकीची मशागत ’ असे शीर्षक मी उपयोगितो. खेड्यापाड्यातील श्रोत्यांना ‘ माणुसकीची मशागत ’ पटते, आवडते.

पृष्ठ ६ :—वैदिक मंत्रांच्या अभिमंत्रणाने पाण्याच्या रासायनिक स्वरूपात बदल होतो का, हा पुण्यास मुद्दाम आलेल्या एका परदेशी पंडिताच्या संशोधनाचा विषय होता.

परदेशांतील संशोधन याच्याही पुढे गेलेले आहे. यासंबंधीचा एक आश्चर्यकारक पुरावा ‘ Bring out the magic in your mind ’ या Al Koran या लेखकाने लिहिलेल्या ‘ Tandem ’ प्रकाशनात आढळतो. ( पान २२ ) De La Warr या प्रयोगशाळेत पुढील दोन प्रयोग सिद्ध झाल्याचे प्रसिद्ध झाले आहे. उत्कट संकल्प

अथवा विचार प्रभावीपणे प्रक्षेपित केल्यास नुसती स्पंदनेच निर्माण होतात असे नव्हे तर त्या संकल्पांचे किंवा विचारांचे आकृतिबंध निर्माण होऊन त्यांचे परिणाम प्रत्ययाला येतात. असाच उत्कट संकल्प करणारी एक व्यक्ती, विशेष स्वरूपाची रंगीत छायाचित्रे निर्माण करणाऱ्या एका यंत्रासमोर बसविली. त्या व्यक्तीने काही क्षण उत्कटपणाने एका धारदार शस्त्राचे ( Pen knife ) चित्र आपल्या मनात रेखिले. त्या यंत्राने घेतल्या गेलेल्या छायाचित्रात त्या व्यक्तीने उत्कटपणे संकल्पिलेली चाकूची ती आकृती स्पष्टपणे उमटलेली आढळली. हा प्रकार पाहून संकल्पसामर्थ्यावर ज्याचा विश्वास नाही असा एक माणूस त्या यंत्रापुढे बसला आणि त्यानेही आपल्या मनात तशीच चाकूची आकृती धरली. पण त्याचे चित्त साशंक आणि अश्रद्ध असल्यामुळे यंत्राच्या द्वारे निर्माण झालेले त्याच्या विचारांचे प्रतिकृतिरूप छायाचित्र अस्पष्ट, धूसर आणि उमटलेल्या आकृतीचा नीट बोध न होणारे आढळले. या यंत्राच्या द्वारे निर्माण होणाऱ्या या अद्भुत छायाचित्रांना ' थॉटोग्राफ्स ' असे नाव मिळाले आहे.

याच यंत्रावर साध्या नळाच्या पाण्याचे एक छायाचित्र घेण्यात आले. आणि नंतर एका सत्पुरुषाने आपल्या आशीर्वादाने पावन केलेल्या पाण्याचेही छायाचित्र घेण्यात आले. साध्या पाण्याच्या छायाचित्राच्या ठिकाणी ( त्याच्या फिल्मवर ) प्रकाशकिरणांचा उत्सर्ग करण्याचे अत्यल्प सामर्थ्य असल्याचे दिसून आले. त्याउलट सत्पुरुषाचा आशीर्वाद लाभलेल्या पाण्याच्या छायाचित्रात प्रकाशकिरणांचा प्रभावी उत्सर्ग करण्याची विलक्षण शक्ती त्या पाण्यात असल्याचा स्पष्ट प्रत्यय मिळाला.

पृष्ठ १२ :—अमेरिकेत ' ब्रह्मसूत्रां ' चा अभ्यास करणारी संस्था स्थापन झाली आहे हे वृत्त ' पुरुषार्थ ' मासिकाने प्रसिद्ध केले होते.

पृष्ठ १३ :—पुण्याजवळील औंध या गावी झालेल्या माझ्या व्याख्यानात ( १३ ऑक्टो. १९७२ ) मी Vance Packard याच्या लैंगिक हाहाःकार ( The sexual wilderness ) या ग्रंथाचा उल्लेख केला.

व्याख्यान संपल्यावर त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या आणि नुकत्याच परदेशी जाऊन आलेल्या एका थोर अधिकारी गृहस्थांनी अमेरिकेतील आपला एक अनुभव मुद्दाम सांगितला. ते म्हणाले, ' एका प्रसिद्ध व प्रतिष्ठित महाविद्यालयाने प्रसिद्ध केलेल्या आपल्या जाहिरातीत महाविद्यालयाची जी वैशिष्टये आणि ज्या सुखसोयी यांचा मुद्दाम उल्लेख केला होता त्यांत, ' आमच्या महाविद्यालयात गर्भपाताचीही उत्तम सोय आहे ' असे चक्क घोषित केले होते !

पृष्ठ १६ :—L. S. D. हे Lysergic acid diethylamide चे संक्षिप्तरूप. हे द्रव्य अति सूक्ष्म प्रमाणात सेवन केल्याने मेंदूवर विशिष्ट परिणाम होतात. घेतल्यानंतर सुमारे अर्धा ते एक तासाने त्याचा प्रभाव दिसू लागतो व तो ८।१२ तास टिकतो.

पृष्ठ १९ :—स्वामी प्रत्यगात्मानंद सरस्वती हे हॅन्स जेकब्स यांचे सद्गुरू आजही विद्यमान आहेत. यांचे पूर्वाश्रमीचे नाव प्रा. प्रमथनाथ मुखोपाध्याय. तंत्र-मंत्र ग्रंथ,

सौंदर्यलहरी यासारख्या ग्रंथांवर –भारतीय नसूनही–ज्यांनी अधिकृत अभ्यासपूर्ण आणि सखोल इंग्रजी ग्रंथ लिहिले त्या सर जॉन वुड्रॉफ या न्यायाधीशपदावर असलेल्या इंग्रज संशोधकाचे सहकारी म्हणून स्वामी प्रत्यगात्मानंद सरस्वती यांनी काम केले होते. स्वामी प्रत्यगात्मानंद सरस्वती यांनी मंत्रशास्त्रावर वैज्ञानिक प्रकाश टाकणारा एक अप्रतिम ग्रंथ लिहिला आहे. त्याचा इंग्रजी अनुवाद नुकताच प्रकाशित झाला आहे. या विषयाच्या अभ्यासकांनी ‘ जपसूत्रम् ’ हा ग्रंथ अवश्य अभ्यासावा–JAPASUTRAM–( The Science of Creative Sound )–प्रकाशक–गणेश–आणि कं. ( मद्रास ) प्रा. लि. –१९७१, मूल्य रु. १५. पृष्ठे सुमारे ३००.

मॅक्स रॉजिस्ट्रॉर या संशोधक प्रवाशाचे वृत्त मला The Astrological Magazine, बंगलोर या नियतकालिकात उपलब्ध झाले. पाहा : ‘ अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन ’ बंगलोर, मार्च १९६७ पान ३१२.

पृष्ठ २१ :—रॉबर्टो अॅसॅगिओली यांच्यासंबंधीची माहिती प्रामुख्याने–‘ What Interests you most in the world today ’–लेखिका Julie Medlock... Wilco Publishing House, Bombay या पुस्तकात लेखिकेने घेतलेल्या डॉ. रॉबर्टो अॅसॅगिओली (Dr. Roberto Assagioli) यांच्या मुलाखतीमधून मिळाली. पाहा : प्रस्तुत ग्रंथ, पृष्ठे १४३ ते १४९.

पृष्ठ २४–२५ :—अमेरिकन शास्त्रज्ञ रॉबर्ट ऑपेन हॅमर यांच्याबद्दलची माहिती प्रामुख्याने डॉ. प्र. न. जोशी यांच्याकडून मिळाली. त्याशिवाय आणखी अनेक ठिकाणच्या अशा उल्लेखांची नोंद मी करीत गेलो होतो.

पृष्ठ २५ :—‘ Flood of Beauty ’ संपादक आणि अनुवादक Prof W. Norman Brown. संस्कृत विषयाचे प्राध्यापक Pennsylvania विद्यापीठ,अमेरिका. प्रस्तुत ग्रंथ हारवर्ड विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आला.१९५८. मूल्य त्यावेळी रु. ३० आता रु. ६० (डॉलर्स ७–५०).

पृष्ठ २५ :—शार्ले वोद्रेविल या फ्रेंच विदुषीची आणि तिच्या हरिपाठविषयक संशोधनाची माहिती रविवार केसरीत प्रसिद्ध झाली होती.

पृष्ठ २६ :—अर्नाल्ड टॉयन्बी यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांचे इतरही ग्रंथ उपलब्ध आहेत.

पृष्ठ २८ :—‘ The Diary of a Mystic ’ लेखक Edward Thornton प्रकाशक George Allen and Unwin Ltd., 1967, लंडन.

पृष्ठ ३० :—डॉ. आल्फ्रेड कूपर वुल्नर.विश्वेश्वरानंद वैदिक रीसर्च इन्स्टिटयूशन साधुआश्रम होशियारपूर या संस्थेच्या काही ग्रंथांवरून प्रस्तुत वृत्तांत उपलब्ध झाला.

पृष्ठ ३३ :—ज्ञानेश्वरांनीही, ‘ जीवात्मभाव एकवाट । होती जेणे ।। ते योगतत्त्व ’ असेच स्पष्ट म्हटले आहे. ( ज्ञानेश्वरी अध्याय १० ओवी २६, प्रसाद प्रकाशन१९५३).

पृष्ठ ३३ :—‘ Indian Thought and it's development ’ लेखक

Albert Schweitzer प्रकाशक ‘ Wilco Publishing House, Bompay 1 ’ आवृत्ती १९६०.

पृष्ठ ३४ :—ज्ञानेश्वरी अध्याय १३ – ओवी १३१
ज्ञानेश्वरी अध्याय २ – ओवी ३४५

पृष्ठ ३५ :—एल् एल् व्हॅसिलेव याचा ग्रंथ :—
‘ Mental Suggestion ’ I. S. M. I. Publications Hampshire. England पृष्ठे १७८, मूल्य ३० शिलिंग.

पान ३८ :—हॅरॉल्ड शेरमन याचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

( १ ) Know your own mind. फॉसिट गोल्ड मेडल स्वस्त आवृत्ती.
( २ ) Your key to Happiness– फॉसिट बुक.
( ३ ) How to make Esp work for you– ,, ,,
( ४ ) How to take yourself apart and put yourself together again. ,, ,,
( ५ ) How to use the power of Prayer–फॉसिट.
( ६ ) Your key to happiness–फॉसिट.
( ७ ) You live after death–फॉसिट.

पृष्ठ ४० :—‘ भारतीय मानसशास्त्र अथवा पातंजल योगदर्शन ’ लेखक श्री. कृष्णाजी केशव कोल्हटकर, प्रकाशक केशव भिकाजी ढवळे; आवृत्ती पहिली, शके१८७३ पृष्ठे ७७५–७६.

पृष्ठ ४२ :—व्ही. झाइत्सेव यांचे संशोधन रशियन नियतकालिक, ‘ स्फुटनिक ’ सप्टेंबर १९६८ यांत अधिकृतपणे प्रसिद्ध झाले.

पृष्ठ ५३–५४ :—शास्त्रज्ञ हॉवर्ड. डी. स्टॅंगल याची माहिती दक्षिण भारतातील आनंदाश्रम (व्हाया कान्हनगड) येथील प्रसिद्ध साधु पुरुष स्वामी रामदास हे प्रसिद्ध करीत असलेल्या ‘ The Vision ’ या इंग्रजी मासिकाच्या मे १९५६ च्या अंकात मिळाली.त्या अंकात बुद्ध भिक्षू संघरक्षिता यांच्या एका भाषणाचा संक्षिप्त वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. मंत्रसामर्थ्याचा वैज्ञानिक पुरावा म्हणून त्यांनी हॉवर्ड डी. स्टॅंगल यांच्या संशोधनाचा उल्लेख केला आहे. त्या लेखातील शब्द असे : ‘ The American scientist Mr. Howard D. Stangle, has succeeded in measuring the power of Mantra vibrations numerically by means of radiation ( particularly radiesthesia ). The Gayatri Mantra for instance when recited in the ordinary way, several times vibrates at the rate of 2,10,000 a second. The highest rate at which a mantra can vibrate is 2,50,000.

श्री. विनयकुमार भट्टाचार्य यांच्या ग्रंथात हॉवर्ड डी. स्टॅंगलचा लेख आढळला.

पृष्ठ ५६ ते ६० :--विश्वामित्राने सिद्ध केलेल्या गायत्री मंत्राच्या जन्माचे वृत्त डॉ. ह. रा. दिवेकर यांच्या 'आमचा महाभारतपूर्व राजकीय व सांस्कृतिक इतिहास', प्रकाशक पुणे विद्यापीठ, प्रथमावृत्ती १९६२ या ग्रंथाच्या आधारे वर्णन केले आहे. (पृष्ठे ३० ते ३४).

पृष्ठ ६१-६२ :—श्रीमती ह्यू वॅट्स् व त्यांचे यंत्र Eidophone यासंबंधीची माहिती दोन ग्रंथांत आढळली.—

(१) Japa by M. P. Pandit, पृष्ठे ६ ते ८, प्रकाशक-श्री. एम्.पी.पंडित अरविंद आश्रम पाँडिचेरी दुसरी आवृत्ती १९६१.

(२) 'The finding of the third-eye' लेखिका श्री.व्हेरा स्टॅन्ले अॅल्डर रायडर आणि कं., लंडन, आवृत्ती १९६८, पृष्ठ-१०६.

पृष्ठ ६२-६३ आनंदमयी मां—यांच्याविषयीचा वृत्तांत 'मातृदर्शन'-ले.'भाईजी' (हिंदी भाषेत). प्रकाशक-आनंदमयी संघ, भदैनी वाराणसी-१९६१ या ग्रंथाच्या आधारे; पृष्ठ ११० ते ११२.

पृष्ठ ६४ :—डॉ. व्ही. बी. गोरे— 'अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन' बँगलोर, यातील त्यांच्या एका संशोधनपर लेखाच्या आधारे. पुण्यातील या विषयावरील त्यांच्या व्याख्यानांचा साराश-सकाळमध्ये प्रसिद्ध झाला होता.

पृष्ठ ६९-७० :—श्री. गोविंद कृष्ण टिळक यांनी लिहिलेले भिषग्वर्य बापूसाहेब मेहेंदळे यांचे चरित्र या इ. स. १८८८ या वर्षी प्रसिद्ध झालेल्या दुर्मिळ चरित्राच्या आधारे.

पृष्ठ ७० :— पेरु अय्यासंबंधीचा वृत्तांत- 'अण्णासाहेब पटवर्धन' चरित्र-लेखक अप्रबुद्ध, पृष्ठ-५९ ते ६१.

पृष्ठ ७०-७१ :—महालिया जॅक्सन हिच्या चरित्राची रूपरेषा 'सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या ५ डिसें. १९५९ च्या अंकातील एका लेखावरून मिळाली.

पृष्ठ ७२-७३ :—जॉन हिगिन्स याची माहिती भवन्स जर्नल (मुंबई) यावरून.

पृष्ठ ७७ :—म्युझिक कंडिशनिंग आणि म्युझॅक कार्पोरेशन आणि तिचा प्रमुख संगीतज्ञ ओनील यांची माहिती 'सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट' या नियतकालिकाच्या आधारे.

पृष्ठ ७९ :—'अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन' बँगलोर या नियतकालिकावरून. अंक जानेवारी, १९७१.

पान ८० :--डब्लू जे रॉबर्टस आणि त्याची डुकरे यांचा वृत्तांत अल् कोरान या लेखकाच्या 'ब्रिंग आउट द मॅजिक इन युवर माइंड' या पुस्तकाच्या आधारे 'टांडेम प्रकाशन' लंडन, पृष्ठ १५५.

पान ८१ :--लॉइड फ्रँकलिन आणि हेफझीबा मेनहीन यांचा वृत्तांत वरील अल्

कोरान याचे पुस्तक. पान १५४–१५५.

पान ८३-८४ :--सांगली येथील ज्ञानेश्वर भक्त आणि सरकारी वकील श्री. जी. व्ही. देशमुख यांनी दिलेल्या माहितीवरून आणि पुरविलेल्या पत्रकांच्या आधारे.

पान ८५ :--श्री चेंबाई वैद्यनाथ भागवतार यांचा वृत्तांत 'भवन्स जर्नल' या नियतकालिकाच्या आधारे, अंक डिसेंबर १४–१९६९.

पान ९२–९३ :--श्री. नारायणराव जोशी यांच्या संबंधीचे इतिवृत्त प्रथम प्रसिद्ध लेखक रा. चिं. ढेरे यांच्या तोंडून आणि नंतर प्रत्यक्ष श्री. नारायणराव जोशी यांच्या मुखाने ऐकावयास मिळाले.

पान ९५ :--डॉ. श्रीप्रकाश यांच्या विषयीची माहिती 'भवन्स जर्नल 'जुलै ११–१९७१ च्या अंकावरून.

पान ९६ ते ९९ :—पावस ( रत्नागिरी ) येथील सत्पुरुष श्री स्वरूपानंद यांच्या प्रसिद्ध झालेल्या ( श्री. परांजपे कृत ) चरित्रातील ही सत्यकथा मी माझ्या शब्दांत सांगितली आहे.

पान १२१ :—मधुमेहावर मधाचा उपयोग हे रशियातील संशोधन 'भवन्स जर्नल' या नियतकालिकातील लेखाच्या आधारे.

पान १२१–१२२ :—मधासंबंधी विविध माहिती 'हनी फॉर हेल्थ' लेखक सेसील टोन्सले, टांडेम प्रकाशन, लंडन, या ग्रंथाच्या आधारे.

पान १३२ :—डॉ. डब्लू. एस्. क्रोगर M. D. डॉ. क्रोगर यांचा एक लेख 'योग इन् मॉडर्न लाइफ' या योग इन्स्टिटयूट, सांताक्रूझ या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात आढळला. डॉ. क्रोगर हे ऑब्स्टेसिक्स आणि गायनाकॉलॉजी या विषयाचे शिकागो मेडिकल स्कूल या संस्थेत असोसिएट प्रोफेसर होते. 'सायको सोमॅटिक गायनेकॉलॉजी' आणि 'चाइल्ड बर्थ विइथ् हिप्नॉसिस' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. संमोहन शास्त्र आणि भारतीय योगातील समाधी या दोन्ही विषयांत ते पारंगत आहेत. संमोहनापेक्षा समाधीमुळे साध्य होणारे रोग्यांवरील परिणाम अधिक टिकाऊ आणि विश्वासार्ह असतात असे यांचे मत अनुभवाने झाले आहे. गरोदरपणी स्त्रीच्या मनावर होणारे संस्कार तिच्या पोटात वाढणाऱ्या गर्भाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर होतात याविषयी बरीच माहिती त्यांनी प्रसिद्ध केली आहे.

पान १३८ :—एडगर केसी याच्या चरित्रावर व चमत्कारांवर प्रकाश टाकणारी अनेक पुस्तके अमेरिकेत प्रसिद्ध झाली. 'देअर इज ए रिव्हर' लेखक थॉमस सर्ज हे त्याचे चरित्र अधिकृत मानले जाते. १९६७ ते १९७० या कालावधीत डेल पब्लिशिंग कंपनी, न्यूयॉर्क या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या स्वस्त आवृत्तीची तेरा मुद्रणे झाली.

पान १४३ :—शैलोदकासंबंधी अधिक माहिती 'अज्ञाताचा शोध व बोध 'लेखक आत्मानंद. प्रकाशक–गायत्री प्रकाशन या ग्रंथात पान २४७ ते २५० यात पाहावी.

□ □ □

# परिशिष्ट

[ संगीताच्या सामर्थ्यावर प्रकाश टाकणारी एक सत्यकथा. ]

गोष्ट घडली तशी सांगणार आहे. धागे जुळवून घ्या. सूर मिळवून घ्या.

सुमारे दोन वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात एक छोटी जाहिरात प्रसिद्ध झाली–' चांगल्या स्थितीतील ऑर्गन विकणे आहे. ' मालाडचे माझे एक जिवलग स्नेही श्री. भागवत यांचे मला पत्र आले–' अशी अशी जाहिरात आली आहे. तुम्ही स्वतः जाऊन ' वस्तू ' कशी आहे पाहा. किमतीचा अदमास घ्या. तुमचा अनुकूल अभिप्राय आला तर समक्ष येऊन पाहीन. मग सौदा करू. '

श्री. भागवत हे केंद्र सरकारच्या चित्रपट विभागात छायालेखक आहेत. पूर्वी ते माझ्याबरोबरच ' प्रभात ' मध्ये होते. ' प्रभात ' सोडल्यावरही ते आमच्या संचात काही काळ होतेच. त्यानंतर डब्ल्यू. झेड्. अहमद या धाडसी निर्मात्याच्या ' शालिमार ' चित्रपट-संस्थेत ते राहिले. ती संस्था स्मृतिशेष झाल्यावर ते सरकारी नोकरीत शिरले.

आज चित्रपट-विभागाचे एक ज्येष्ठ व उत्कृष्ट छायाचित्रकार म्हणून त्यांचा लौकिक आहे. भागवत मूळचे साताऱ्याचे. नाटकाचे वेड त्यांना बाळपणापासून. संगीत व साहित्य यांचा रसीला आस्वाद घेण्याची अभिजात अभिरुची. फावल्या वेळात जुनी नाट्यगीते– विशेषतः बालगंधर्वांची ऐकण्याचा, त्या गीतांच्या जुन्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिका जमविण्याचा त्यांचा आवडता छंद. पेटीवर हात पडल्यावर बोटे सराईतपणे फिरून ऐकणाराने कान टवकारावेत अशी वादनाची सफाई. आपल्या घरात एखादे सुरेल ' हत्यार ' असावे अशी बऱ्याच दिवसांची त्यांची इच्छा. हे सर्व मला माहीत असल्यामुळे त्यांच्या पत्रानुसार त्वरित हालचाल करणे मला भागच होते.

पुण्यात घर नंबरावरून एखादे ठिकाण हुडकणे म्हणजे नेमके ते हुकणे याचा अनुभव मी घेतला. शेवटी एकदाचे दुसऱ्या खेपेच्या शोधात हवे ते घर सापडले. जाहिरात देणारे श्री. नातू हे रात्री भेटतात असे कळल्यामुळे पुन्हा रात्री गेलो. नातूंनी सस्मित स्वागत केले. आस्थेवाईकपणाने ऑर्गन वाजवून दाखविले. दोन वेगवेगळ्या जातींचे ऑर्गन्स त्यांच्याकडे होते. ते ऑर्गनचे स्वर ऐकताच जुन्या किर्लोस्कर नाटकगृहात ऐकलेले व कानात घर करून राहिलेले बालगंधर्वांच्या वेळचे स्वरविश्व मला आठवले. नातूंनी व्यवहाराची बाजूही समजावून सांगितली.

आवश्यक ती चौकशी झाली होती. माहिती मिळाली होती. दोहोतील एक ऑर्गन मला आवडला होता. मी नातूंचा निरोप घेऊ लागलो. वेळ रात्री दहाची होती–तरी नातूंनी चहा–कॉफी आणली. आणि ते आतिथ्य नाकारणे अशक्य झाले. नातू मोठे मार्मिक व रसिक दिसले. इतका वेळ दडविलेली एक गोष्ट त्यांनी आता उघड केली. मला ते चांगलेच ओळखत होते. इतकेच नव्हे तर माझ्यावद्दलच्या बारीक-सारीक बाबीही त्यांना अवगत होत्या असे दिसले. १९३९ पूर्वी मी खजिना विहिरीसमोर वाडकरांच्या माडीवर राहत असे.त्या वाडकरांचा मुलगा व नातू हे वर्गमित्र होते. वाडकरांचा तो मुलगा पुढे विहिरीत पडून अपघाताने वारला. नातूंना माझी गाणी, प्रभातचे चित्रपट यांबद्दल इत्थंभूत माहिती होती. प्रभातबद्दल नितान्त आदर व माझ्याबद्दल प्रेमळ अभिमान त्यांना दिसला. व्यवहारासाठी गेलो आणि एक जवळीक जोडून आलो.

माझ्या अनुकूल मतामुळे पुण्यास येऊन भागवतांनी नातूंचे ' हत्यार ' पाहिले; पण काही ना काही कारणामुळे सौदा झाला नाही. पण दुसरा एक फायदा माझ्या मात्र वाट्यास आला. पहिल्या एकदोन भेटीत कमी बोलणाऱ्या व देखावा टाळणाऱ्या नातूंच्या व्यक्तिमत्त्वातले काही पैलू माझ्या मनावर ठसा उमटवून गेले. रेल्वेतली रूळबंद नोकरी करणारे नातू पैसे खर्च करून उत्तमोत्तम निवडक इंग्रजी ग्रंथ विकत घेतात हा शोध मला हर्षित करणारा होता. ग्रंथांनी आमच्या गाठी आणखी जुळविल्या. आणि नातूंच्या ग्रंथसंपदेच्या निवडीवरून त्यांच्या रसिकतेची व सखोलतेची उंची मला मोजता आली. मला हवे असलेले काही दुर्मिळ इंग्रजी ग्रंथ नातूंनी माझ्या घरी पोचविले.

दरम्यान चित्रपटाच्या कामासाठी मी वारंवार पुण्याबाहेर राहू लागलो. माझे ' प्रभातकाल ' हे पुस्तक या अवधीतच प्रकाशित झाले. नातू बऱ्याच वेळा घरी येऊन गेले. भेट झाली नाही. काम संपवून पुण्यास मी थोडा स्थिर झाल्यावर एके दिवशी नातू हसतहसत आले. त्यांनी माझ्यापुढे फाऊंटन धरून एका नव्याने विकत घेतलेल्या पुस्तकाच्या पहिल्या कोऱ्या पानावर मी स्वाक्षरी करावी अशी विनंती केली. मी त्यांच्या मनाप्रमाणे केले. नातूंना एक आगळा आनंद झालेला दिसला. ते पुस्तक ' प्रभातकाल ' हेच होते ! नातूंनी ते आवर्जून विकत घेतले होते, आणि त्यावर माझ्या स्वाक्षरीची स्नेहमुद्रा उमटावी म्हणून ते कधीचे थांबले होते. माझे पुस्तक वाचून त्यातील गुणांबरोबर नातूंनी एक प्रमादही मार्मिकपणे माझ्या निदर्शनास आणला. आता नातूंचे माझे स्नेहबंधन ' सुदृढ ' झाले. सुटीच्या दिवशी आमच्या भेटीगाठी होऊ लागल्या. भेटीत मुख्यत्वे नाट्य, साहित्य, संगीत, नवी-जुनी पुस्तके, यांची चहाइतकीच चविष्ट चर्चा होई.

एका गोष्टीचे मला आश्चर्य वाटले होते. नातूंनी आपले ऑर्गन्स विकण्याचे रहित केले होते ! त्यासंबंधी मी त्यांना एकदा विचारले. त्यावर नातू म्हणाले, " मीच यापुढे त्यांचा उपयोग करण्याचे ठरवले आहे. " आमच्या गप्पांत गंधर्वमंडळी, त्या

वेळची नाटके, कादरबक्ष, तिरखवाँ, केशवराव कांबळे, हरिभाऊ देशपांडे इत्यादी कलाकारांचे अद्वितीयत्व, यासंबंधी रसभरी चर्चा होत असे. या वादकांचा व त्या काळच्या संगीताच्या धुंद वातावरणाचा माझ्यावर झालेला परिणाम मी अनेक वेळा बोलून दाखविला होता. 'प्रभातकाल' मध्येही तसा भाग होताच. जुन्या जाणकार वादकांपैकी काहींची अलीकडे कशी दैना झाली आहे या संदर्भात नातूंनी मला केशव कांबळे ह्या ऑर्गन-वादनातील जादूगाराबद्दल बरेच सांगितले होते. एके काळी वैभवात व मस्तीत असलेल्या त्या गुणी कलावंताबद्दल अनेक आठवणी माझ्या कानी त्यांनी घातल्या होत्या. असा हा गुणी वादक सध्या निर्वासिताप्रमाणे कसे निष्प्रभ, निर्धन जीवन जगत आहे, याचे एक भेदक चित्र त्यांनी माझ्यापुढे उभे केले होते. त्यांची व केशव कांबळे यांची जुनी ओळख असल्याचेही त्यांनी मला सांगितले होते.

माझ्या 'वावटळ' चित्राबद्दल नातूंनी दिलेला स्वच्छ अभिप्राय मला फार रुचला होता. त्या चित्राला पारितोषिक मिळालेले कळल्यावर पेढे घेऊन माझ्या अभिनंदनासाठी येणाऱ्यांत नातू आघाडीवर होते. आणि याच सुमारास कान्होपात्रा नाटकातील एका गाण्यातील अर्थ नातूंनी मला विचारला. मी त्यांचे समाधान केले व त्यावेळी मला समजले की नातू केशव कांबळे याच्याकडून सध्या संथा घेत आहेत. केशव कांबळे यांच्या हाताचा गोडवा, त्यांची लयकारी व त्यांच्या बोटांची तरल सफाई मला चांगली माहीत होती. तरीदेखील नव्या जाणीवेने त्यांच्या हाताचा सुरेल साक्षात्कार पुन्हा एकदा घडावा अशी तीव्र इच्छा मनात होत होती. तसे मी नातूंना बोलून दाखवले. त्यावेळी ते म्हणाले, "तुम्ही म्हणाल तेव्हा तुम्हाला जरूर ऐकवीन."

त्यानंतर एक चिंताकारक घटना घडली. माझे स्नेही भागवत यांना एकाएकी काही आजार झाला. त्यांच्या कमरेत व पायात काही दोष निर्माण झाला. त्यांना उठणे-बसणे, चालणे कष्टदायक होऊ लागले. दुखणे वाढत चालले. उपचारांची पराकाष्ठा करूनही दुखण्याचे निश्चित निदान होईना. अखेरीस ते पत्नीसह पुण्यात आले. पुण्याची हवा चांगली आणि तज्ज्ञ रेडिऑलॉजिस्टच्या दवाखान्यासमोरच राहण्याची व्यवस्था--या सोयीमुळे त्यांनी उपचार पूर्ण होईपर्यंत पुण्यातच वास्तव्य करण्याचे ठरविले.

उठून बसणे किंवा काठीचा आधार न घेता चालणे त्यांना कठीण झाले होते. अशा वेळी माणसाच्या मनाची विलक्षण अवस्था होत असते. चित्रपट विभागाच्या चाकरीत सतत दौऱ्यावर राहणाऱ्या व अष्टौप्रहर कार्यमग्न असणाऱ्या भागवतांना सबंध दिवस पडून राहावे लागे. स्वाभाविकच वाचन आणि स्नेही-सोबत्यांचा सहवास व गप्पा हाच एक विरंगुळा. माझा बराचसा वेळ त्यांच्या सहवासात जाऊ लागला. जुन्या आठवणी, विनोद व साहित्य-संगीत यांवरील चर्चेत वेळ निघून जाई. उपचार चालू होते. हळूहळू सुधारणा दिसून येत होती. थोड्याच दिवसांत भागवत थोडे बसू लागले. काही अंतर चालू लागले. फावल्या वेळात माझे लेख वाचीत असता, संगीताचा माणसाच्या

मनावर व मज्जातंतूवर केवढा परिणाम होतो व ते एक नादब्रह्मच कसे आहे याचे विवेचन करणारा माझा लेख त्यांनी वाचला. त्यावरून जुनी नाटके व गंधर्वांची गाणी यांवर आम्ही आलो. याच सुमाराला नारायणराव बालगंधर्व आजारी अवस्थेत पुण्यास आले होते आणि केशव कांबळे व नारायणराव यांची भेट नातूंनी घडवून आणली होती. त्याचे वर्णन माझ्या आठवणीत ताजे होते. भागवतांना मी तो वृत्तान्त सांगितला.

नारायणराव व केशव कांबळे यांचे नाव निघताच भागवत उल्हसले, रंगले. त्या रंगात नातूंची, त्यांच्या ऑर्गनची सहजच आठवण निघाली. नातूंच्यात व माझ्यात निर्माण झालेल्या नात्याचे आणि ते सध्या केशव कांबळे या कसबी कलाकाराकडून ऑर्गनवादनाची तालीम घेत असल्याचे वृत्त मी भागवतांना सांगितले. भागवतांच्या दुखण्यावर डॉक्टर जो उपचार करू शकणार नाहीत तो त्यांच्या आवडीच्या जुन्या संगीताच्या श्रवणाने होऊ शकेल असे माझ्या मनात आले. मी सहज म्हणालो, " डॉक्टरांनी चालण्याची नि बाहेर जाण्याची संमती देताच मी तुम्हाला केशव कांबळे यांचे ऑर्गनवादन नातूंच्या घरी ऐकवू शकेन." भागवतांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्या उत्साहाच्या भरात आम्ही नातूंकडे जाण्याचा दिवसही अदमासे निश्चित केला. केशव कांबळे यांचे अप्रतिम स्वरवादन आपल्याला ऐकायला मिळणार या एकाच कल्पनेने भागवतांना कल्पनातीत आराम वाटू लागला.

डॉक्टरांनी थोडेफार काठीवाचून फिरण्यास व वाहनातून बाहेर जाण्यास परवानगी दिली. ते अपेक्षितच होते. मी नातूंना सांगून आगाऊच सर्व योजना करून ठेवली होती. चार ऑगस्ट १९६६ चा दिवस. गुरुवार होता तो. सायंकाळी साडेसातनंतर नातूंकडे जमावयाचे ठरले होते. भागवतांची सकाळपासूनच उतावळी चालू होती. वेळेपूर्वीच त्यांची टॅक्सी माझ्या दाराशी थांबली. आम्ही नातूंकडे पोचलो. भागवत उत्साहाच्या भरात विनाकष्ट जिना चढून गेले. त्यांना एकसारखे बसवणार नाही याची आम्हांला कल्पना होती. त्यांना आरामात पडून ऐकता येईल अशी सोय नातूंनी केली होती. आम्ही बैठकीवर बसलो. नातूंनी कोपऱ्यात एक उदबत्ती आधीच पेटवून ठेवली होती. तिचा सात्त्विक सुगंध खोलीत दरवळत होता. नातूंनी कांबळ्यांशी आमची ओळख करून दिली. कांबळे हसले; पण त्या हसण्यात तेज नव्हते. काळीसावळी अशी कांबळ्यांची वामनमूर्ती गुडघे पोटाशी घेऊन भिंतीशी टेकून बसली होती. त्यांच्या हाती विडी होती. विडीच्या धुराचे वलय झाले होते. भागवत कांबळ्यांशी आस्थेवाईक उत्सुकतेने बोलत होते. माझे मन मात्र म्हणत होते, हेच का ते कांबळे ? ज्यांच्या सुरेल साथीने बालगंधर्वांच्या गाण्याला अधिकच गोडवा येत होता ? त्यांच्या विडीने निर्माण केलेल्या धूम्रवलयांत सजीव होणारी एकेक पूर्वस्मृती सांगत होती—होय, हेच ते केशव कांबळे....ज्यांनी नट म्हणून नाटकधंद्यात प्रवेश केला पण ज्यांच्यातील उपजत आवडीने त्यांना पेटीवादनाकडे वळविले. हेच ते केशव कांबळे ज्यांनी, ' मला वादनकला शिकवा ' अशी त्या कलेतील त्यावेळचे स्वरप्रभू गोविंदराव टेंबे यांना शिष्यभावाने प्रार्थना केली होती, आणि

गोविंदरावांनी तिची उपेक्षा करून त्या महत्त्वाकांक्षी तरुणाचा मनोभंग केला होता. हेच ते केशव कांबळे ज्यांनी जिद्दीने आणि अविश्रान्त परिश्रमांनी ती कला हस्तगत केली, आणि बालगंधर्वांसारख्या स्वर्गीय गळा असलेल्या संगीत नटाची साथ करण्याची संधी लाभावी म्हणून गंधर्व कंपनीत फक्त पंचवीस रुपये पगारावर नोकरी पत्करली. हेच ते केशवराव कांबळे ज्यांनी पुढे ऑर्गन-वादक म्हणून आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले, आणि एका प्रसंगी कंपनीची सुटी संपवून कामावर रुजू होण्यास थोडा उशीर झाला म्हणून कंपनीने एक महिन्याचा पगार कापला या अन्यायाने चिडून नारायणरावांना ज्यांनी चोवीस तासांची नोटीस दिली. हेच ते केशवराव कांबळे ज्यांनी गंधर्वांकडील नोकरी गेल्याची खंत मानली नाही, पण ज्यांच्या साथीवाचून गंधर्वांच्या गाण्याचा रंग फिका पडू लागल्यावर त्याच गंधर्वांना, तिरुखवाँ, कादरबक्ष यांच्या बरोबरीने दरमहा शंभर रुपये पगार, पूर्वी अन्यायाने कापलेल्या पगाराची भरपाई, या कांबळयांच्या अटी मान्य करून त्यांना कंपनीत बोलवावे लागले. हेच ते केशवराव की ज्यांना नारायणरावांनी त्या काळात कधीही मनमोकळी वाजवी शाबासकी दिली नाही, आणि हेच ते केशवराव जे निर्धन, निर्वासित अशा अवस्थेतही परवापरवा अत्यवस्थ स्थितीत असलेले नारायणराव पुण्यास आले असता त्यांना नातूंच्या आग्रहावरून भेटावयास गेले आणि ज्यांना इतक्या वर्षांच्या अवधीनंतर नारायणरावांनी कृतज्ञतेने त्यांच्या अप्रतिम साथीची स्तुती करून पूर्वीच्या कंजूष वृत्तीची भरपाई केली ! हेच ते केशवराव जे भल्यामोठया ऑर्गनवर बसल्यावर आपल्या जागी स्थिर राहून आपल्या विजेच्या हातांची आणि स्वरलाघवी बोटांची द्रुत हालचाल करून ऑर्गनच्या पांढऱ्या पट्ट्यांतून स्वरचैतन्याची बरसात करून ऐकणाराची समाधी लावीत !

'मानस का बधिरावे ?' ह्या गाण्याचे स्वर माझ्या कानी आले आणि त्यांनी मला माझ्या भासविश्वातून भूमीवर आणले. नातूंच्या ऑर्गनवर केशवराव बसले होते. तीच स्थिर बैठक. तीच बोटांची तरल हालचाल. तेच चैतन्य; पण काहीसे मंदसुंद झालेले. स्वर लागला होता. गाणे नाचू लागले होते. नातूंनी लावलेल्या उदबत्तीच्या सुगंधाशी कांबळयांचा स्वरविलास स्पर्धा करीत होता. भागवत भान विसरले होते. त्यांच्या आजाराच्या वेदना संगीताच्या संजीवनीने लुप्त झाल्या होत्या. त्यांच्या पत्नी आपल्या पतीचा वृत्तिपालट आश्चर्याने निरखीत होत्या. तबल्याची साथ नव्हती. हत्यार पुराणे होते. भागलेले होते. पण कांबळयांना दुर्मिळ दर्दी श्रोत्यांचा लाभ झाला होता. त्यांनी एकामागून एक जुनी रसाळ गाणी आपल्या करस्पर्शांच्या किमयेने पुन्हा एकदा सुवर्णमय, सनाद व सनाथ केली.

श्रवणसौख्याचा पहिला उत्कट आवेग ओसरल्यावर भागवतांनी 'शापसंभ्रम', 'शाकुंतल' या जुन्या नाटकांतील काही वेचक गीतांची फर्माइश केली. कांबळयांनी पुन्हा समाधी साधली आणि त्या जुन्या गीतांना सुरेल, सजीव केले. स्थळकाळाच्या, सुखदुःखांच्या बंधनापलीकडे आम्ही सगळी गेलो होतो. घडयाळाने आम्हांला काळ–

वेळेची खबर दिली. आम्हांला भान आले. कॉफी आली. नातूंनी कांबळयांना विडी ओढून श्रम-परिहार करा, असे सुचविले. तेथून उठण्याची इच्छा होत नव्हती. बोला-वेसेही वाटत नव्हते. त्या धुंद वातावरणात निर्माण झालेल्या स्वरलहरींच्या महिरपीतच मौनाला मिठी घालून बसावे, असे वाटत होते.

निरुपायाने आम्ही उठू लागलो. तेवढयात नातूंनी कांबळयांच्या संथेनुसार बसविलेली दोन गीते तयारीने गाऊन आम्हांस चकित केले. त्यांचे हे सुरेल अंग मला अज्ञात होते. निरोपाची वेळ आली. आम्ही कांबळयांचे शब्दांवाचून डोळयांनीच आभार मानले. भागवतांनी कांबळयांचा लाघवी हात हाती घेऊन त्यात हळूच एक पांढरे पाकिट सारले. अगदी माझ्या आतल्या मनातली गोष्ट ओळखल्यासारखे भागवतांनी केले होते !

दुसऱ्या दिवशी भागवतांच्या प्रकृतीतील सुधारणा एकदम उठून दिसत होती. डॉक्टरांनी त्यांना तपासून मुंबईस जाण्यास अनुमती दिली. भागवत पति–पत्नी मुंबईस गेले. जाताना सौ. ताई भागवत मला हळूच म्हणाल्या, "डॉक्टरांच्या उपचारांपेक्षा तुमच्या नादब्रह्माचा साक्षात्कार अधिक प्रभावी ठरला, बरं का !"

नुकतेच भागवतांचे पत्र आले आहे.

सौ. ताईंनी लिहिले आहे, 'भाऊंना आणखी एकदोन अशाच मैफली ऐकायला मिळतील तर ते लवकरच पुन्हा कामावर जाऊ लागतील.'

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
नवुक्रम १०१५१ वि: निबंध
क्रमांक २२२९ सो. वि: ८५१०३
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७१५
REFBK-0018715